तरी उपरोक्तप्रमाणे इम्पोर्टेड इक्वीपमेंट पुरविणेचे काम तातडीचे आहे. त्याकामी प्राधान्याने कार्यवाही करावी तसेच कस्टम डयुटी माफीकरीता श्री शिरगुळकर यांना राईट इक्वीपमेंटस् प्रा.लि.यांनी तातडीने इनव्हाईस पाठवावा. तसेच निविदेमधील अटी /शर्ती क्रं. १६ नुसार सिक्युरिटी डिपॉझीट ५% रक्कम संस्थानकडे भरावयाची आहे. सदर रक्कम पुरवठा आदेश मिळालेपासून ०८ दिवसाचे आत रोखीने अगर डी.डी ने जमा करणेची आहे. इम्पोर्टेड इक्वीपमेंट पुरविणेकामी निविदेतील अटी/शर्ती स आधीन राहुन हा पुरवठा आदेश देणेत यावा. सदर इम्पोर्टेड इक्वीपमेंटस्चा पुरवठा व कमिशनींगचे काम ३१ मे २००७ पूर्वी होणे गरजेचे असल्याने त्याकामी १०० रु स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन घेणेत यावा. सदर पुरवठयासाठी परकीय चलनातील पतपत्र ( Letter of Credit) उघडण्यात यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**विषय नं.०७** **दिनांक १७.२.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तावर करण्यात आलेली कार्यवाही.**

**निर्णय क्र.३६०** दिनांक १७.०२.२००७रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्तावर करण्यात आलेल्या व होत असलेल्या कार्यवाहीच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०८** **नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता मार्च,२००७.**

**(ब) माहे मार्च, २००७ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे मार्च-एप्रिल,२००७ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे मार्च,२००७ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद षेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र.३६१** (A) माहे मार्च,२००७ मधील जमा रुपये १३७,२५८,५९८.२६ व खर्च रुपये ४१९,४०४,६७८.०७ चा तक्ता, माहे मार्च,२००७ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्च रुपये ५३३,९३६.०० खर्चाचा तक्ता, दिनांक १५ मे,२००७ अखेरीस रुपये २,२०२,०१८,५५२.०० गुंतवणूकीची परिस्थिती दर्शविणारा तक्ता, माहे मार्च/एप्रिल,२००७ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या एकूण रुपये ४३,०१८,९९२.०० व रुपये ४५,४८१,९४४.०० देणगीचा तक्ता, माहे मार्च, २००७ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा रुपये २,२४,६५७.०० चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०२. माहे मार्च-एप्रिल २००७ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.३६१ (B)** माहे मार्च-एप्रिल, २००७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान रुपये ७४,२९,१५०.०० व रुपये ९४,८२,६६०.०० चा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

**०३. साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना माहे मार्च-एप्रिल २००७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ३६१ (C)** माहे मार्च-एप्रिल, २००७ मध्ये साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता अंतररुग्ण रुपये ४१३८४.०० व रुपये ४७८३०.०० बाह्य रुग्ण रुपये ५४५३९.०० व रुपये ५७८२८.०० थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ४४१००.०० व रुपये ३६८००.०० ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०३. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये माहे मार्च,२००७ देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ३६१ (D)** माहे मार्च, २००७ मध्ये श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या रुपये १६,०३,१८३.०० सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

**०५. माहे मार्च-एप्रिल,२००७ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ३६१ (E)** माहे मार्च-एप्रिल, २००७ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या अनुक्रमे २८२४० व २८२३७ कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ३६१ (F)** बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पूरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात आली.

तसेच तक्ता "ब" मध्ये नमूद केलेली खालील अंतिम बिले आदा करणेसाठी मंजूरी देण्यात आली.

०१) श्री साईबाबा हॉस्पिटल येथे फर्निचर व ॲल्युमिनियम पार्टीशन करणे कामाचे अंतिम बिल रक्कम रुपये ३,२५,८१९/-

०२) श्री साईबाबा हॉस्पिटल येथे रुग्णांचे नातेवाईकांना थांबणेसाठी ए बिल्डींग टेरेसवर व औषध दुकानगाळ्यासमोर शेड उभारणे कामाचे अंतिम बिल रक्कम रुपये ७,४५,०००/-

०३) नवीन भक्तनिवासस्थान इमारतीतील अ,ब,क प्रकारच्या तीन सॅम्पल रुम तयार करणे कामाचे अंतिम बिल रक्कम रुपये ३,६७,३४२.२६ (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०७. पाणी तपासणी अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे**

**निर्णय क्र. ३६१ (G)** माहे मार्च, २००७ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०९ संगणक प्रि-प्रिंटेड प्रसाद पाकिटे छपाईकामी आलेल्या कोटेशन्सधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३६२** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५.११.२००६ निर्णयानुसार संस्थानचे विविध विभागासाठी आवश्यक असणारी जनरल व संगणक स्टेशनरी छपाई खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मागविण्यात आलेल्या निविदा मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०१.२००७ मध्ये उघडणेत आलेल्या होत्या. तसेच संबंधितांशी चर्चा तथा वाटाघाटी होऊन त्यांनी दिलेल्या सुट दरांचा विचार करुन निर्णय क्र.४१ नुसार पुरवठा आदेश देणेत आलेले आहेत. संगणक स्टेशनरी छपाईमध्ये संगणक प्रि-प्रिंटेड प्रसाद पाकिटे ५

लाख नग (१ लाख शिटस) साठी मे.अल्ताफ पेपर ट्रेडींग यांचे एकच दरपत्रक आल्याने व त्यांनी ऑफसेटचे कोणतेही कागदपत्रे जोडलेले नसल्याने प्रसाद पाकिटाचा पुरवठा स्थगित ठेवणेत आलेला होता.

श्री रामनवमी उत्सव दि.२६ ते २८.०३.२००७ असा साजरा होणार असल्याने सभासद तसेच भक्तांना संस्थानमार्फत प्रसाद पाकिटातून उदी पाठविणे आवश्यक होते. मध्यवर्ती भांडार विभागामध्ये प्रसाद पाकिटाचा साठा पुर्णतः संपलेला असल्याने तातडीची गरज म्हणून यापूर्वीचे पुरवठादार मे.प्रिमीअर डाटा फॉर्म्स प्रा.लिमीटेड, मुंबई यांना १ लाख पाकिटे तातडीने छपाई करुन देणेची विनंती केली असता, त्यांनी रु.२,३४०/-अधिक ४% व्हॅट प्रती हजारी शिट दराने ७ दिवसाचे आत पुरवठा करणेची तयारी दर्शविली. त्यानुसार त्यांनी १७००० शिटसचा पुरवठा पुर्ण केलेला असून भक्तांना उदीप्रसाद पाठविणेत आलेली आहे. प्रसाद पाकिटे छपाईसाठी एकुण रु.४१,३७१/-खर्च आलेला आहे. सदरील खर्च हा निविदेत आलेल्या दरापेक्षा फारच कमी आहे. पुढील उत्सवासाठी पाकिटे छपाई करुन घेणे आवश्यक असल्याने उर्वरीत ४ लाख नग पाकिटासाठी जा.क्र.एसएसएस/खरेदी-प्रशासन/ ५०१६/ २००७ दि.२८.०३.२००७ अन्वये दि.१५.०४.२००७ अखेर कोटेशन मागणी करणेत आलेली आहे. त्यानुसार प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव व गांव |
|---|---|
| ०१ | प्रिमीअर डाटा फॉर्म्स प्रा.लिमीटेड, मुंबई |
| ०२ | क्लासिक ऑफसेट, श्रीरामपूर |
| ०३ | साई डाटा फॉर्म्स, मुंबई |

तरी तातडीची गरज म्हणून मे.प्रिमीअर डाटा फॉर्म्स प्रा.लि.,मुंबई यांचेकडून छपाई करणेत आलेल्या १७००० शिटसचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस तसेच उर्वरीत पाकिटासाठी प्राप्त दरपत्रके आपणासमक्ष उघडणेस व संबंधित कोटेशनधारकाशी चर्चा तथा वाटाघाटी करुन अंतिम निर्णय घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन, कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव व गांव | कोटेशनमधील दर | वाटाघाटीअंती देऊ केंलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | प्रिमीअर डाटा फॉर्म्स प्रा.लिमीटेड, मुंबई | २१७५.०० + ४% Vat = २२६२.०० | अनुपस्थित |
| ०२ | क्लासिक ऑफसेट, श्रीरामपूर | २०९५.०० | १७३८.८५ |
| ०३ | साई डाटा फॉर्म्स, मुंबई | २३५०.००+ ४% Vat = २४४४.०० | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.प्रिमिअर डाटा फॉर्म्स प्रा.लि.मुंबई यांचेकडून तातडीने छपाई करुन घेतलेल्या १ लाख पाकिटे (१७००० शिटस्) व त्यासाठी आलेल्या रुपये ४१,३७१/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. उर्वरित ४ लाख पाकिटांसाठी मे.क्लासिक ऑफसेट,श्रीरामपूर यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन,त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा,असें ठरलें.

(कार्यवाही-अधिक्षक-खरेदी विभाग)

**विषय नं.१०** **भक्तनिवासस्थान विभागासाठी बेडशिट व उशीकव्हर खरेदीकामी आलेल्या कोटेशन्सधारकाशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३६३** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१४.१०.२००६ मधील निर्णय क्र.८२२ नुसार श्री साईबाबा भक्तनिवासस्थानकडील खोल्यांकरीता प्रिंटेड बेडशीट (54"x90") व उशीकव्हर (18"x24") प्रत्येकी ८००० नग खरेदी करणेस व त्याकामी येणारी रक्कम रु.१५,२०,०००/-पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

बेडशीट व उशीकव्हरसाठी दि.९-११.१२.२००६ चे दरम्यान वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, निविदाधारकाचे लेटरहेडवर दर व बयाणा रक्कम तसेच आवश्यक कागदपत्रे असलेल्या सिलबंद निविदाची दि.२३.१२.२००६ अखेर मागणी करणेत आलेली होती. तसेच प्राप्त निविदा मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०१.२००७ मध्ये उघडणेत येऊन संबंधितांना सुट दर पत्र देण्यास सांगणेत आलेले होते. निर्णयाअंती बॉम्बे डाईंग व प्रकाश कॉटन या दोन कंपनीचेच बेडशीट घेणेबाबत निर्णय झालेला असून मा.उपसमितीने नमुने पाहून निर्णय घेणेस मान्यता मिळालेली आहे. प्राप्त ११ पैकी ४ कोटेशनधारकांनीच प्रकाश कॉटन व बॉम्बे डाईंग दर दिलेले असल्याने मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेमध्ये फक्त बॉम्बे डाईंग बेडशीटचे दर मागविणेत यावेत असे ठरलेले आहे. त्यानुसार ३१.०३.२००७ चे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन फेरनिविदा व नमुने दि.१०.०४.२००७ पर्यंत मागविणेत आलेले असून मुदतीअंती प्राप्त दरपत्रकांचा तपशील खालीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **कोटेशनधारकाचे नाव व गांव** |
|---|---|
| ०१ | ओम गुरुदेव एजन्सी, सावळविहीर |
| ०२ | सारडा इंटेरीअर, अहमदनगर |

| | |
|---|---|
| ०३ | सोनु एजन्सीज, नाशिक |
| ०४ | मालपाणी टेक्सटाईल्स, नाशिक |
| ०५ | एम.बी.ट्रेडींग कंपनी, नाशिक |
| ०६ | पी.पी.कार्पोरेशन, विंचुर, ता.निफाड |
| ०७ | कृष्णा कलेक्शन्स, श्रीरामपूर |

तसेच यापूर्वी बॉम्बे डाईंग बेडशीटची निविदा भरलेले व बयाणा रक्कम असलेल्या निविदाधारकांनाही आजचे सभेपुढे आमंत्रित करणेत आलेले होते.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन, कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव व गांव | बॉम्बे डाईंग कंपनी प्रकार | कोटेशनमधील दर | वाटाघाटीअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|---|
| ०१ | ओम गुरुदेव एजन्सी, सावळविहीर | फ्लोरा | २६१.२० | २३३.०० |
| | | गोल्ड लाईन | ३१९.८० | २८९.०० |
| | | बिकल | ४०१.०० | ३९०.०० |
| | | ब्लॉसम | २७१.०० | --- |
| | | अल्ट्राकेअर | ४२०.०० | -- |
| | | रिगल | ३५५.०० | ३००.०० |
| | | ब्ल्यू व्हाईट | ३४५.०० | ३२०.०० |
| | | न्यू बॉ.डाईंग | २३४.०० | -- |
| ०२ | सारडा इंटेरीअर, अहमदनगर | गोल्डलाईन | २४३.८४ | २१७.०० |
| | | गोल्डलाईन एक्सपोर्ट | २९२.१० | २५९.९६ |
| ०३ | सोनु एजन्सीज, नाशिक | नं.०१ | ३५४.०० | ३३६.३० |
| | | नं.२ | ५९९.०० | ५६९.०५ |
| | | एक्सपोर्ट नं.३ | ३५०.०० | ३३२.५० |
| ०४ | मालपाणी टेक्सटाईल्स, नाशिक | नं.०९ | २१७.०० | २०५.०० |
| | | नं.११ सुपरफाईन | ३८०.०० | ३६०.०० |
| ०५ | एम.बी.ट्रेडींग कंपनी, नाशिक | फ्लोरा | २८०.०० | २७४.४० |
| | | गोल्ड लाईन | २८५.०० | २६९.३० |
| | | ब्लॉसम | ३३०.०० | ३२३.४० |
| ०६ | पी.पी.कार्पोरेशन, विंचुर, ता.निफाड | गोल्ड लाईन | २८६.०० | २६५.०० |
| ०७ | कृष्णा कलेक्शन्स, श्रीरामपूर | गोल्ड लाईन | २७२.०० | २७२.०० |
| | | | १४२.०० | --- |
| ०८ | शिंगी ट्रेडींग कं.,अहमदनगर | नं.०१ गोल्ड लाईन | २७२.०० | २४०.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.विश्वस्त श्री.पांडूरंग गमाजी अभंग व मा.विश्वस्त श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांनी मुंबई येथे बॉम्बे डाईंग या कंपनीत समक्ष जाऊन बेडशीट व उशी कव्हर ची समक्ष पहाणी करुन खरेदीबाबत अंतिम निर्णय घ्यावा असें ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक-खरेदी विभाग)

**विषय नं.११ संस्थानचे श्रीसाईबाबा हॉस्पिटलसमोरील जागेत लॅण्डस्केपिंगचे सिव्हिल कामासाठी आलेल्या निविदांवर निर्णय घेणे**

**निर्णय क्र.३६४** श्रीसाईबाबा हॉस्पीटल (सुपर स्पेशालीटी) मध्ये येणाऱ्या रुग्ण व त्यांचे नातेवाईक तसेच इतर व्यक्तींना प्रसन्न व प्रफुल्लीत वातावरण अनुभवयास मिळावे तसेच रुग्णाना धुळीचा व प्रदुषणाचा त्रास होऊ नये या दृष्टीकोनातून सदर जागेवर लॅण्डस्केप करावयाचे आहे. याकामी आर्किटेक्ट आमृता पवार,नाशिक यांनी सादर केलेले प्राथमीक अंदाजपत्रकानुसार रुपये ५,५३,५७२.३२ मात्र खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि. २५/११/२००६ चे सभेतील निर्णय क्र. ८९९ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार आर्किटेक्ट अमृता पवार नाशिक यांचेकडून याकामाचे प्लॅन व निविदा तयार करुन घेण्यात आल्या आहेत. दि. २१/०४/२००७ चे मंजूर टिपणी अन्वये सदरहू कामाचे वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या आहेत. निविदा विक्रीची मुदत दि. २६/०४/२००७ ते दि. ०२/०५/२००७ ठेवण्यात आली होती. सदर मुदतीत श्री साईबाबा हॉस्पीटल लॅण्डस्केपींग करीता खालील तीन ठेकेदारांनी कोऱ्या निविदा विकत घेतल्या होत्या.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव व गांव |
|---|---|
| ०१ | श्री. मिलींद पाचोरकर,नाशिक |
| ०२ | शिवम नर्सरी, औरंगाबाद |
| ०३ | श्री. मंगेश लोढा, शिर्डी |

ठेकेदारांना निविदा सादर करणेसाठी दि. ०७/०५/२००७ अखेर कार्यालयीन वेळेपुर्वीची मूदत देण्यात आली होती. त्यानुसार विहित मूदतीत श्री साईबाबा हॉस्पीटल येथे लॅण्डस्केपींग करणेकामी खालीलप्रमाणे सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादर कर्त्यांची नांवे |
|---|---|
| ०१ | श्री. मिलींद पाचोरकर,नाशिक |
| ०२ | शिवम नर्सरी, औरंगाबाद |
| ०३ | श्री. मंगेश लोढा, शिर्डी |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादर कर्त्यांची नांवे | निविदेतील दर | चर्चा/वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. मिलींद पाचोरकर,नाशिक | ११.५% अधिक | ११.५% अधिक |
| ०२ | शिवम नर्सरी, औरंगाबाद | अपात्र | -- |
| ०३ | श्री. मंगेश लोढा, शिर्डी | २५% अधिक | २५% अधिक |

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री मिलींद पाचोरकर, नाशिक यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१२** **नवीन प्रसादालय इमारतीकरीता आवश्यक असलेल्या फर्निचर खरेदीकामी आलेल्या निविदांवर चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.३६५** दि. ०६/०१/२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे बैठकीत निर्णय क्र.२५ अन्वये सविस्तर चर्चा होऊन नवीन प्रसादालय इमारत अंतर्गत सजावट,फर्निचर आणी लॅण्डस्केपींगचे प्लॅन, एस्टीमेट, निविदा इ.सेवा पुरविण्याचे कामासाठी आर्किटेक्ट अमृता पवार,नाशिक यांची नेमणूक करण्यात यांवी तसेच सदरहू काम त्यांचेकडून,आर्किटेक्ट शक्ती परमार ॲण्ड असो.मुंबई व बांधकाम विभाग यांचे सल्ल्याने करुन घेण्यात यावे असे ठरले आहे. त्यानुसार आर्किटेक्ट अमृता पवार,नाशिक यांनी ITEM RATE धर्तीवर निविदा तयार केल्या होत्या. त्यानुसार दि. १५/०४/२००७ रोजी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्रीसाठी दिनांक १६/०४/२००७ दि.२३/०४/२००७ इतका कालावधी ठेवण्यात आला होता. दिनांक २८/०४/२००७ अखेर सिलबंद निवदा सादर करण्याची मुदत ठेवण्यात आली होती.

वरील मुदतीत मुंबई कार्यालय येथे एकूण ०६ कोऱ्या निविदा आणि शिर्डी कार्यालय येथे ०३ निविदांची विक्री झाली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**अ) मुंबई कार्यालय येथे विक्री झालेल्या निविदाधारकांची नांवे**

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | स्वदेशी खादी ग्राम उद्योग सेवा संघ, मुंबई |
| ०२ | मे.कॅटरिंग एड दहिसर, मुंबई |
| ०३ | मे.वैष्णव देवी फर्निचर्स , मुंबई |
| ०४ | मॉड्युलर डिझाईन, मुंबई |
| ०५ | अपोलो इंड्रस्टीज, अहमदाबाद |
| ०६ | डॅश इंटेरिअर्स , मुंबई |

**ब) शिर्डी कार्यालय येथे विक्री झालेल्या निविदाधारकांची नांवे**

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | श्री एजन्सीज, जळगांव |
| ०२ | साई इंजिनिअर्स, नाशिक |
| ०३ | सुदर्शन फ्लेक्झिबल पॅक.प्रा.लि.नाशिक |

वरीलप्रमाणे एकूण ०९ निविदांची विक्री झालेली असून खालील चार निविदांधारकांनी विहीत मूदतीत सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | वैष्णव देवी फर्निचर्स, मुंबई |
| ०२ | डॅश इंटेरीअर्स , मुंबई |
| ०३ | अपोलो इंड्रस्टीज, अहमदाबाद |
| ०४ | सुदर्शन फ्लेक्झीबल पॅकेजींग प्रा.ली.नाशिक |

दि. ३०/०४/२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या चार निविदांमधिल लिफाफा क्र. १ उघडणेत आले सदरहू लिफाफा क्र. १ मध्ये

निविदासादरकर्त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची आर्किटेक्ट अमृता पवार यांचेमार्फत छाननी करुन ठेकेदारांचे पूर्वपात्रतेबाबत त्यांचा अहवाल घेणेत यावा असे उपरोक्त सभेत ठरले आहे.

त्यानुसार इकडील जा.क्र. एसएसएस/बांध./७०९३/२००७/दि.०३/०५/२००७ रोजी सदर निविदांचे लिफाफा क्र.१ कागदपत्र आर्किटेक्ट अमृता पवार यांचेकडे छाननीसाठी पाठविण्यात आले होते.

आर्किटेक्ट अमृता पवार,नाशिक यांनी उपरोक्त निविदाधारकांचे लिफाफा क्र. ०१ ची छाननी केली असून सर्व चारही निविदाधारक पात्र असल्याचे दि. ०७/०५/२००७ रोजीचे अहवाला अन्वये कळविले आहे.

उपरोक्त विषयांकित कामाबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी दि.०७.०५.२००७ रोजी संबंधित निविदाधारक यांचेशी कामाविषयीच्या शंका व कामाचे स्वरुप कसे असावे याबाबत आर्किटेक्ट अमृता पवार यांचे उपस्थितीत चर्चा केली. त्यावेळी संबंधित निविदाधारक यांना निविदेतील पान क्र.२८ आयटम क्र.डी-१ व पान क्र.३१ आयटम क्र.जी-१ मध्ये दर्शविलेल्या खुर्च्यांचा प्रत्येकी एक नमुना तयार करुन सादर करावा, असे सुचित करण्यात आले होते.

वरिल प्रमाणे प्राप्त झालेल्या चार निविदांचे लिफाफा क्र. ०२ आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नांव** | **निविदेतील दर रुपये** | **चर्चा/वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर रुपये** |
|---|---|---|---|
| ०१ | डॅश इंटेरीअर्स , मुंबई | २८,८९,३९०.०० | २०,२२,५७३.०० |
| ०२ | सुदर्शन फ्लेक्झीबल पॅकेजींग प्रा.ली.नाशिक | २९,८६,४५०.०० | २४,००,२१०.०० |
| ०३ | अपोलो इंड्रस्टीज, अहमदाबाद | २३,२४,०५५.०० | २१,६१,३७१.१५ |
| ०४ | वैष्णव देवी फर्निचर्स , मुंबई | २७,३२,७००.०० | २५,९६,०६५.०० |

उपरोक्तपैकी डॅश इंटेरिअर ,मुंबई यांनी देऊ केलेल्या ३०% सवलतीच्या दरात काम करणे शक्य नाही असे तोडी सांगितले.

उपरोक्तपैकी न्युनतम दराचे पुरवठादार मे.अपोलो इंडस्ट्रीज,अहमदाबाद यांनी यापुर्वी संस्थानमध्ये अथवा परिसरात काम केलेले नाही असे निदर्शनास आले. त्यामुळे ते सदर फर्निचरचे काम वेळेत व चांगल्याप्रकारे पूर्ण करु शकतील याबाबत शाश्वती नाही. तसेच द्वितीय निम्नतम दराचे पुरवठादार मे.सुदर्शन फेक्सीबल पॅकेजींग प्रा.लि.,नाशिक यांचा संस्थानकडे काम केल्याचा यापुर्वीचा अनुभव चांगला असून,त्यांनी संस्थानचे चौकशी व निवासस्थान कार्यालय व व्यवस्थापन समिती बैठक कक्षाचे संपूर्ण फर्निचर तसेच साईबाबा हॉस्पिटलकडील काही फर्निचरचे काम वेळेत व समाधानकारकरित्या पूर्ण केलेले आहे. तसेच आर्किटेक्ट अमृता पवार,नाशिक या सभेपुढे उपस्थित होत्या त्यांनी उपरोक्त चार पुरवठादारांनी दिलेल्या नमुनेदाखल फर्निचर पैकी सुदर्शन फेक्सीबल पॅकेजींग प्रा.लि.,नाशिक यांनी दिलेले फर्निचर योग्य व उत्तम आहे,असें सांगितले.

तरी,मा.विश्वस्त,श्री.पांडुरंग गमाजी अभंग, मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे यांनी सुदर्शन फेक्सीबल पॅकेजींग प्रा.लि.,नाशिक यांचे कार्यशाळेची समक्ष पहाणी करावी, त्यानंतर त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१३ मौजे कनकुरी येथील संस्थान पाणीपुरवठा साठवण तलावाभोवती चेनलिंक कम्पाऊंड कामासाठी आलेल्या निविदांवर निर्णय घेणे**

**निर्णय क्र.३६६** कनकुरी तलाव येथे चेनलींग जाळीचे ८ फुट उंचीचे कंपाऊंड करणेकामी येणारे अंदाजे रुपये २५,००,०००.०० मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०६/०८/२००६ नि.क्र.४२० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. याकामी आवश्यक असलेले अँगल, चेनलिंक जाळी ठेकेदार यांना पाणीपूरवठा विभागामार्फत पूरविण्यात येणार आहेत. ठेकेदार यांनी कंम्पाऊंडसाठी आवश्यक ती खोदाई करणे, कम्पांऊड चे अँगल कॉक्रीटमध्ये रोवणे यासाठी आवश्यक ते सिमेंट,वाळी,खडी ठेकेदार यांनी स्वतः वापरणे व मजुरी दराने अँगल उभे करुन त्याला चेनलिंक जाळी लावणे याकामासाठी आर्किटेक्ट निकम पा.असो.,श्रीरामपूर यांनी रुपये ५,६६,५२०.०० मात्र रकमेची निविदा तयार करुन दिलेली आहे. याकामी वर्तमान पत्रात निविदा सुचना प्रसिध्द करण्यात येऊन निविदा विक्री दि. २६/०४/२००७ ते दि. ०२/०५/२००७ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि. ०७/०५/२००७ अखेर ठेवण्यात आली होती.

विहीत मूदतीत खालील ठेकेदारांनी कोऱ्या निविदा विकत घेऊन विहित मूदतीत सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.नं. | निविदा सादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | चेअरमन, अमर मजुर बांधकाम सोसायटी,पांगरी (बु) ता.सिन्नर |
| ०२ | इंजि. योगेश पाटील, कोपरगांव |

| | |
|---|---|
| ०३ | साईदिप मूजर सहकारी संस्था मर्यादित, कोतेगल्ली, शिर्डी |
| ०४ | श्री.मंगेश आर.लोढा,शिर्डी |
| ०५ | श्री. रोडे जी.सी.,येवला |

तरी वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदा सादरकर्त्याचे नांव | निविदोतील दर | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | चेअरमन, अमर मजुर बांधकाम सोसायटी,पांगरी (बु) ता.सिन्नर | २% कमी | १०% कमी |
| ०२ | इंजि. योगेश पाटील, कोपरगांव | १% अधिक | ३ % कमी |
| ०३ | साईदिप मूजर सहकारी संस्था मर्यादित, कोतेगल्ली, शिर्डी | ५% कमी | ५% कमी |
| ०४ | श्री.मंगेश आर.लोढा,शिर्डी | १५% अधिक | ११% अधिक |
| ०५ | श्री. रोडे जी.सी.,येवला | ५% अधिक | ५% अधिक |

यावर सविस्तर चर्चा होऊन, चेअरमन, अमर मजुर बांधकाम सोसायटी,पांगरी (बु) ता.सिन्नर यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१४ इंडियन इक्वीपमेंट व अलाईड सिस्टम तसेच फॅब्रीकेटेड किचन इक्वीपमेंट खरेदी कामी आलेल्या निविदांवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३६७ अ)** नविन प्रसादालयासाठी इंडियन इक्वीपमेंटस् व अलाईड सिस्टीम खरेदीकामी दिनांक १६/०२/०७ चे मंजूर टिपणीनूसार निविदा मागविणेसाठी वृत्तपत्रात जाहीरात देण्यात आलेली होती. त्यानूसार आलेल्या मोहरबंद निविदा दिनांक १६/०३/०७ चे मा.व्यवस्थापन उपसमिती सभेमध्ये उघडण्यात आलेल्या आहेत. सदर निवीदा उघडल्यानंतर असे आढळून आले की - प्रत्येक ॲटमसाठी एक - एकच दरपत्रक आलेले होते. प्रति ॲटमसाठी कमीत कमी ३ दरपत्रक आवश्यक असल्याने दि. १६/०३/०७ चे उपसमिती सभेमध्ये फेर निवीदा मागविण्यात याव्यात असा निर्णय झालेला आहे. दि.२१/०४/०७ चे मंजूर टिपणीन्वये फेरनिवीदाकामी वृत्तपत्रात जाहीरात देण्यात आलेली होती.

मा.व्यवस्थापन उपसमिती दि. १६/०३/०७ मधील व दिं २१/०४/०७ चे मंजूर टिपणीन्वये को-या निवीदांची दि.२/०४/०७ ते ९/०४/०७ अखेर विक्री करण्यात आली असून दि.१३/०४/०७ पर्यंत भरुन आलेल्या निवीदा स्विकारण्यात आलेल्या आहेत.

**मुंबई व शिर्डी येथे विक्री झालेल्या निविदा खालीलप्रमाणे**

०१) अपोलो इंडस्ट्रीज , अहमदाबाद
०२) सुयोग इक्वीपमेंट प्रा.लि. , पुणे
०३) मेटल इंडस्ट्रीज प्रा.लि. , हैद्राबाद
०४) नवनीतलाल ॲण्ड ब्रदर्स , नाशिक
०५) आकार मशिनरी इंडस्ट्री , कोल्हापूर
०६) सुभाष पाटील , पुणे
०७) राजलक्ष्मी इंडस्ट्रीज , कोल्हापूर
०८) ग्रीन फिल्ड इंन्स्टुमेंटल ॲण्ड इक्वीपमेंट प्रा.लि., नाशिक
०९) विशाल इंजिनीअरींग , डोंबिवली
१०) एल.एल.इक्वीपमेंट ॲण्ड मशिन्स प्रा.लि. , अंधेरी मुंबई
११) AGNI किचन ( विपुल मेहता ) , पुणे
१२) PBS इलेक्ट्रॉनिक्स (प्रकाश सेबि) कांदिवली , मुंबई
१३) ॲक्वा लाईफ केअर , पुणे
१४) SS इक्वीपमेंट ॲण्ड मशिन्स, पुणे
१५) ब्लोसोम रेफ्रीजरेशन , मुंबई
१६) मे.लेनॉर्ड एन्टरप्राईजेस , मुंबई

वरीलप्रमाणे १६ को-या निविदांची विक्री झालेली असून निर्धारीत वेळेत खालीलप्रमाणे ९ मोहरबंद निविदा जमा झालेल्या आहेत.

१) मे.विशाल इंजिनीअरींग , डोंबिवली
२) PBS इलेक्ट्रॉनिक्स (प्रकाश सोब) कांदिवली , मुंबई
३) मे.लेनॉर्ड एन्टरप्राईजेस , मुंबई
४) ब्लोसोम रेफ्रीजरेशन , मुंबई
५) मेटल इंडस्ट्रीज (A) प्रा.लि. , हैद्राबाद
६) नवनीतलाल ॲण्ड ब्रदर्स , नाशिक
७) सुयोग इक्वीपमेंट प्रा.लि. , पुणे
८) ग्रीन फिल्ड इंन्स्टुमेंटल ॲण्ड इक्वीपमेंट प्रा.लि., नाशिक

९) राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर ( प्रशासन शाखेतून टपालातून उघडून आलेले)

१०) कोनार्क इंजिनीअर्स , नाशिक ( यापूर्वी खरेदी केलेले )

वरीलप्रमाणे ९ मोहरबंद निविदेसोबत १ निवीदा (कोनार्क इंजिनिअर्स) यापूर्वी खरेदी केलेली होती. मात्र सादर करतांना फेर निविदेसोबत सादर केलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे १ ते १० निवीदाधारकांची अनप्राईजबीडची पाकीटे दिनांक २१/०४/२००७ चे मंजूर टिपणीनूसार मा.व्यवस्थापन समिती दि.३०/०४/०७ चे सभेपुढे उघडण्यात आलेली असून श्री किरण मांजरेकर, प्रतिनिधी किचन सोल्युशन कॉम किचन कन्सलटंट यांनी टेक्नीकल माहीती तपासली आहे. प्राईज बीडची पाकीटे (निवीदा) उघडणेच्या बाकी आहेत. तसेच दि.१६/०३/०७ चे मा.व्यवस्थापन उपसमिती सभेपुढे उघडण्यात आलेल्या निवीदाधारकाची सुधारीत डिस्काउंटेड दरपत्रकाची बंद पाकीटे उघडणेचे बाकी आहेत.

तरी उपरोक्तप्रमाणे १ ते ९ व पूर्वी खरेदी केलेली कोनार्क इंजिनिअर्स अशा सर्व १० निवीदा, तसेच १६/०३/०७ चे उपसमितीमध्ये दिलेली सुधारीत डिस्काउंट दराची पाकीटे आजचे सभेत उघडण्यात आली. या निविदांचा तूलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे संबधित निविदाधारकांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात येऊन अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

**ब) तसेच** नविन प्रसादालयाकरीता फॅब्रिकेटेड इक्वीपमेंट खरेदीसाठी मा.व्यवस्थापन उपसमिती दि. १७/२/२००७ चे सभेतील निर्णय क्रं. ११५(ब) व दि. ७/४/०७ चे मंजूर टिपणीनूसार वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन जाहीर निवीदा मागविणेत आलेल्या आहेत. त्याकामी दि. १६/०४/०७ ते २३/०४/०७ अखेर को-या निविदांची विक्री करण्यात आलेली असून दि. २८/४/०७ पर्यंत भरुन आलेल्या मोहरबंद निवीदा स्विकारण्यात आलेल्या आहेत.

मुंबई व शिर्डी कार्यालयाकडून एकूण २५ निवीदांची विक्री झालेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

मुंबई कार्यालयात विक्री झालेल्या निवीदा.

१) कॉन्फीनेनटेल इक्वीपमेंट इंडीया प्रा.लि., मुंबई
२) बोनीसन इक्वीपमेंट प्रा.लि. पुणे.
३) फॅब्रि स्टील फुड सर्व्हीस इक्वीपमेंट , साकीनाका मुंबई
४) एस.एस. इक्वीपमेंट मशिन्स , पुणे
५) ग्रे हाउंड इंडस्ट्रीज, कोल्हापूर.
६) मार्क्स टेन इक्वीपमेंट (इं.) प्रा.लि. मुंबई .
७) शिवा इंजिनीअर्स, मेटाप्रो, पुणे.
८) ठाकर इक्वीपमेंट कंपनी, नवी दिल्ली.
९) केटरींग एड , मुंबई
१०) मेटल फेब्रीकेटरर्स ऑफ इंडिया, मुंबई .
११) सिंम्पल एन्टरप्राईज, नवी दिल्ली.
१२) एल.एल.इक्वीपमेंट ॲण्ड मशिन्स प्रा.लि.मुंबई .
१३) अपोलो इंडस्ट्रीज, वटवा, अहमदाबाद.
१४) बिंदल इक्वीपमेंटस् , इंदौर.
१५) करिश्मा मेटल इंडस्ट्रीज , अंधेरी मुंबई
१६) राजलक्ष्मी इंडस्ट्रीज , कोल्हापूर

**<u>शिरडी कार्यालयात विक्री झालेल्या निवीदा.</u>**

१) श्री एजन्सी , जळगांव
२) श्री राजलक्ष्मी इंडस्ट्रीज , कोल्हापूर
३) श्री नवनीतलाल ॲण्ड ब्रदर्स , नाशिक
४) सुयोग इक्वीपमेंटस् , पुणे
५) साई इंजिनिअर्स , नाशिक
६) स्टील टेक इंडस्ट्रीज , कोल्हापूर
७) स्वराज इंडस्ट्रीज, कोपरगांव
८) पुरफील इंजिनीअर (इं) प्रा.लि., पुणे
९) स्वाती एन्टरप्राईजेस , पुणे

त्यापैकी ८ मुंबई कार्यालयात व ७ शिर्डी कार्यालयात अशा एकूण १५ मोहरबंद निविदा खालीलप्रमाणे जमा झालेल्या आहेत.

१) शिवा इंजिनीअर्स, मेटाप्रो, पुणे.
२) ग्राईहुड इंडस्ट्रीज, कोल्हापूर.
३) एल.एल.इक्वीपमेंट ॲण्ड मशिन्स प्रा.लि.मुंबई .
४) ठाकर इक्वीपमेंट कंपनी, नवी दिल्ली.

५) राजलक्ष्मी कमर्सियल किचन इक्वीपमेंट प्रा.लि. बेंगलोर.
६) सिंम्पल एन्टरप्राईज, नवी दिल्ली.
७) मेटल फेब्रीकेटरर्स ऑफ इंडिया, मुंबई .
८) मार्क्स टेन इक्वीपमेंट (इं.) प्रा.लि. मुंबई .
९) साई इंजिनीअर्स, नासिक.
१०) स्वराज इंडस्ट्रीज, कोपरगाव.
११) बोनीसन इक्वीपमेंट प्रा.लि. पुणे.
१२) बिंदल इक्वीपमेंटस् , इंदौर.
१३) अपोलो इंडस्ट्रीज, वटवा, अहमदाबाद.
१४) राजलक्ष्मी इंडस्ट्रीज , कोल्हापूर
१५) सुयोग इक्वीपमेंटस् प्रा.लि., पुणे

वरीलप्रमाणे आलेल्या प्राईजबीड व अनप्राईजबीड निवीदापैकी अनप्राईजबीड निवीदा दि.३०/०४/०७ चे मंजूर टिपणीनूसार मा.व्यवस्थापन समिती दि.३०/०४/२००७ चे सभेमध्ये उघडणेत आलेल्या आहेत. श्री किरण मांजरेकर, प्रतिनिधी किचन सोल्युशन कॉम किचन कन्सलटंट , मुंबई यांनी अनप्राईजबीड मधील टेक्नीकल माहीती तपासली आहे. आता प्राईज बीडची पाकीटे (निवीदा) उघडणेच्या बाकी आहेत.

तरी वरीलप्रमाणे १ ते १५ निवीदाधारकांच्या प्राईजबीड मोहरबंद निवीदा आजचे सभेत उघडण्यात आल्या. या निविदांचा तूलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे संबधित निविदाधारकांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात येऊन अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**विषय नं.१५ नविन प्रसादालयासाठी लिफ्ट बसविणेकामी प्राप्त झालेले टेंडर उघडून टेंडरधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय नं.३६८** नविन प्रसादालय इमारतीमध्ये किचनकरीता सर्व्हीस लिफ्ट व व्ही.आय.पी. करीता पॅसेंजर लिफ्ट अश्या एकुण दोन लिफ्ट बसविण्याकरीता व त्यासाठी लागणा-या रु. ३७,१०,८७६.०० इतक्या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेसाठी दिनांक १६-०३-२००७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या प्रसादालय उपसमितीच्या सभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या सभेत चर्चा होऊन वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले होते. यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागविण्यात आलेले होते. टेंडर विक्रीच्या मुदतीत मुंबई कार्यालयात ठेवलेले टेंडर विक्री झाले नाहीत. तसेच शिर्डी कार्यालयातून फक्त एकच टेंडर विक्री झालेली आहे. व ते मुदतीनंतर दि.१६-०४-२००७ रोजी प्राप्त झाले आहे. तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.कायनेटीक इलेव्हेटर लि., अहमदाबाद |

प्राप्त झालेल्या एकाच टेंडरवर निर्णय घेणे अशक्य होते. तसेच प्रसादालयाचे काम प्रगतीपथावर असून लिफ्टचेही काम त्या अनुषंगाने पुर्ण होणे गरजेचे असल्याने तसेच वेळ वाचविण्यासाठी टेंडर विक्रीसाठी पुन्हा वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. टेंडर विक्रीच्या मुदतीत मुंबई कार्यालयात ठेवलेले टेंडर विक्री झाले नाहीत. तसेच संस्थानच्या शिर्डी कार्यालयामार्फत विक्री झालेले दोन टेंडर्सपैकी मुदतीत ०१ व मुदतीनंतर ०१ असे एकुण ०२ टेंडर प्राप्त झाले असून टेंडरधारकांचा तपशील खालीलप्रमाणे :-

**मुदतीत आलेल्या टेंडरचा तपशील :-**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | मे. पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक |

**मुदतीनंतर आलेल्या टेंडरचा तपशील :-**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | मे. ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया)लि., मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | तपशील | मे.कायनेटीक इलेव्हेटर लि., अहमदाबाद | | मे. ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया)लि., मुंबई | | मे. पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पॅसेंजर लिफ्ट | मालवाहतूक लिफ्ट | पॅसेंजर लिफ्ट | मालवाहतूक लिफ्ट | पॅसेंजर लिफ्ट | मालवाहतूक लिफ्ट |
| ०१ | कोलॅप्सिबल डोअर्स | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | निविदेतील दर | -- | १८,००,०००/- (कायनेटीक ) | -- | १७,१८,०००/- ( ओटीस ) | -- | १५,६१,०००/- (पॉवरलिंक) |
| | वाटाघाटीअंती दर | -- | मागणीप्रमाणे नाही | -- | १५,९७,७४०/- ( ओटीस ) | -- | १४,८२,९५०/- (पॉवरलिंक) |
| ०२ | पावडर कोटेड डोअर्स | | | | | | |
| | निविदेतील दर | १०,००,०००/- (कायनेटीक ) | -- | १४,०८,०००/- ( ओटीस ) | -- | ११,९१,०००/- (पॉवरलिंक) | -- |
| | वाटाघाटीअंती दर | मागणीप्रमाणे नाही | -- | १३,०९,४४०/- ( ओटीस ) | -- | ११,३१,४५०/- (पॉवरलिंक) | -- |
| | स्टेनलेसस्टील डोअर्स | | | | | | |
| | निविदेतील दर | ११,३०,०००/- (कायनेटीक ) | १९,५०,०००/- (कायनेटीक ) | १५,५२,०००/- ( ओटीस ) | -- | १४,४२,०००/- (पॉवरलिंक) | १७,८६,०००/- (पॉवरलिंक) |
| | वाटाघाटीअंती दर | मागणीप्रमाणे नाही | मागणीप्रमाणे नाही | १४,४३,३६०/- ( ओटीस ) | -- | १३,६९,९००/- (पॉवरलिंक) | १६,९६,७००/- (पॉवरलिंक) |
| | ईचड मिरर फिनिश्ड डोअर्स | | | | | | |
| | निविदेतील दर | -- | -- | १८,०३,०००/- ( ओटीस ) | -- | १५,०७,०००/- (पॉवरलिंक) | १८,३६,०००/- (पॉवरलिंक) |
| | वाटाघाटीअंती दर | -- | -- | १६,७६,७९०/- ( ओटीस ) | -- | १४,३१,६५०/- (पॉवरलिंक) | १७,४४,२००/- (पॉवरलिंक) |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.ओटीस हे स्वतः लिफ्ट्चे नामांकित उत्पादक असल्याने ओटीस कंपनीचे, मालवाहतूकीकरीता कोलॅप्सीबल डोअर्सचे एक लिफ्ट व पॅसेंजरकरीता स्टेनलेस स्टील डोअर्सचे एक लिफ्ट खरेदीकामी मे. ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया)लि., मुंबई यांना पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं.१६ श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान उपहारगृहात एलपी गॅस मेनफोल्ड किचन गॅसपाईपलाईन तयार करणेकामी आलेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३६९** श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान उपहारगृहात एल.पी.गॅस मेनफोल्ड किचनगॅस पाईपलाईन तयार करणेबाबत दि.०६.०१.२००७ चे मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय नं.०१, निर्णय क्र.६९ (१५) नुसार १२ व्यक्तिंना/कंपन्यांना कोटेशन पाठविण्याबाबतचे पत्र पाठविणेत आलेले होते. खालील ०४ कंपन्यांनी कोटेशन दाखल केलेले आहे. त्यापैकी अ.नं.०१ ते ०३ यांनी मुदतीत दि.१६.०४.२००७ अखेर कोटेशन पाठविलेले आहे. अ.नं.०४ यांनी मुदतीनंतर दि.१९.०४.२००७ रोजी कोटेशन दाखल केलेले आहे.

| अ.नं. | कोटेशनधारकांचे नाव |
|---|---|
| ०१ | ग्लोब गॅस इक्वीपमेंट इंडस्ट्री प्रा.लि., मुंबई व दि.१२.०४.०७ रोजी त्यांनी पाठविलेला फॅक्स |
| ०२ | एच. जोशी ब्रदर्स, भारत गॅस डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक |
| ०३ | यशराज टेक्नोक्रॅटीस, नाशिक |
| ०४ | चंद्रा इंजिनियरींग ॲण्ड मेकॅनिकल प्रा.लि., मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन, कोटेशनसादकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं | कोटेशनधारकांचे नाव | कोटेशन मधील दर रुपये | वाटाघाटीनंतरचे दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | ग्लोब गॅस इक्वीपमेंट इंडस्ट्री प्रा.लि., मुंबई | १,०९,३९०.००+Vat | १,११,०००/- |
| ०२ | एच. जोशी ब्रदर्स, भारत गॅस डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक | १,२७,८२०.०० | १,१५,०३८.०० |
| ०३ | यशराज टेक्नोक्रॅटीस, नाशिक | १,३४,२३५.००+Vat | १,२४,८३८.५० |
| ०४ | चंद्रा इंजिनियरींग ॲण्ड मेकॅनिकल प्रा.लि., मुंबई | ३,५५,९६६.०० | अनुपस्थित |

आजचे सभेत मे. ग्लोब गॅस इक्वीपमेंट इंडस्ट्री प्रा.लि., मुंबई यांनी चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेली रक्कम सर्व करांसह, याकामासाठी येणाऱ्या प्रतिनिधींना प्रसाद भोजन व निवासव्यवस्था आणि कामाकरिता विद्युत व पाणी संस्थानमार्फत मोफत, ५०% रक्कम ॲडव्हान्स द्यावी अशी मागणी केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, ग्लोब गॅस इक्वीपमेंट इंडस्ट्री प्रा.लि., मुंबई यांची निम्नतम दर स्वीकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,भक्तनिवासस्थान)

**विषय नं.१७ नवीन प्रसादालय इमारतीमध्ये संगणकीय जाळयाची उभारणी करण्यास आवश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदावर चर्चा/वाटाघाटींअती निर्णय घेणे**

**निर्णय क्र.३७०** संस्थानमार्फत श्रीसाईभक्तांना नेहमीच सेवा-सुविधा पुरविण्यात येत असून, श्रीसाईभक्तांची भोजनाची व्यवस्था होणेसाठी अत्याधुनिक नविन प्रसादालय इमारतीचे बांधकाम चालू आहे. या इमारतीमध्ये प्रसादालय कार्यालय, तिकीट बुकींग काऊंटर, देणगी काऊंटर, स्टोअर, किचन रुम, व्हीआयपी इत्यादी ठिकाणीची कामे संगणकाव्दारे करण्यात येणार आहे. तसेच या ठिकाणी संस्थानचे मुख्य दूरध्वनी यंत्रणेतील एक स्वतंत्र इ.पी.ए.बी.एक्स. बसवून, त्या इ.पी.ए.बी.एक्स. पासून नविन प्रसादालयाच्या विविध कार्यालयांत संदेश देवाण-घेवाण करणेसाठी दूरध्वनी सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

उपरोक्त सर्व सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी लागणारे आवश्यक साहित्य विहित पध्दतीने खरेदी करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १७ फेब्रुवारी, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १६७ नुसार मंजूरी देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन, नविन प्रसादालय इमारतीमध्ये संगणकीय सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी अधिकृत निविदाधारकांकडून सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार खालील निविदाधारकांनी आपल्या निविदा सादर केलेल्या आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदा सादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | **HCL INFOSYSTEM LTD. PUNE.** |
| ०२ | **UNICOM INFOTEL PVT. LTD. MUMBAI.** |
| ०३ | **ALLIED DIGITAL SERVICES LTD. MUMBAI.** |
| ०४ | **MINI COMP, MUMBAI.** |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन, निविदासादकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं | निविदासादरकर्त्याचे नाव | निविदेमधील दर रुपये | वाटाघाटीनंतरचे दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | **HCL INFOSYSTEM LTD. PUNE.** | ९,४९,०३०/- | ८,७८,९५१/- |
| ०२ | **UNICOM INFOTEL PVT. LTD. MUMBAI.** | ५,४९,७४७/- | ४,६५,०००/- |
| ०३ | **ALLIED DIGITAL SERVICES LTD. MUMBAI.** | ७,७८,५७४/- | ७,२५,०००/- |
| ०४ | **MINI COMP, MUMBAI.** | ४,४४,४१५/- | ४,००,००१/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन **MINI COMP, MUMBAI** यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं.१८ नवीन प्रसादालय इमारतीमध्ये अंतर्गत दुरध्वनी सुविधेसाठी आवश्यक साहित्य खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदावर चर्चा/वाटाघाटींअंती निर्णय घेणे**

**निर्णय क्र.३७१** संस्थानमार्फत श्रीसाईभक्तांना नेहमीच विविध सेवा-सुविधा पुरविण्यात येत असून, श्रीसाईभक्तांची भोजनाची व्यवस्था होणेसाठी अत्याधुनिक नविन प्रसादालय इमारतीचे बांधकाम चालू आहे. या इमारतीमध्ये संस्थानचे मुख्य दूरध्वनी यंत्रणेतील एक स्वतंत्र इ.पी.ए.बी.एक्स. बसवून, त्या इ.पी.ए.बी.एक्स. पासून नविन प्रसादालयाच्या विविध कार्यालयांत संदेश देवाण-घेवाण करणेसाठी दूरध्वनी सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच याठिकाणी प्रसादालय कार्यालय, तिकीट बुकींग काऊंटर, देणगी काऊंटर, स्टोअर, किचन रुम, व्हीआयपी इत्यादी कामे संगणकाव्दारे करण्यात येणार आहे.

उपरोक्त सर्व सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी लागणारे आवश्यक साहित्य विहित पध्दतीने खरेदी करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १७ फेब्रुवारी, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १६७ नुसार मंजूरी देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन, नविन प्रसादालय इमारतीमध्ये अंतर्गत दूरध्वनी सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी अधिकृत पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात आल्या असून, खालील पुरवठादारांनी निविदा सादर केलेल्या आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदा सादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | **Simens Pvt. Ltd., Mumbai.** |
| ०२ | **HCL Infinet Ltd., Mumbai.** |
| ०३ | **CTL Telecom Pvt. Ltd., Mumbai.** |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन, निविदासादकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं | निविदासादरकर्त्याचे नाव | निविदेतील दर रुपये | वाटाघाटीनंतरचे दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | **Simens Pvt. Ltd., Mumbai.** | ७,८५,५००/- | ५,८०,०००/- |
| ०२ | **HCL Infinet Ltd., Mumbai.** | ५,१७,६००/-+ कर अतिरिक्त | ४,५०,०००/- |
| ०३ | **CTL Telecom Pvt. Ltd., Mumbai.** | ९,२३,२१०.०० | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, **HCL Infinet Ltd., Mumbai.** यांनी देऊ केलेले दरपत्रक हे Non IP Based असल्याने ते सध्याच्या सिमेन्स कंपनीच्या EPBAX शी एकरुप होऊ शकत नसल्याने त्याचा centralised System मध्ये उपयोग होऊ शकत नाही. सिमेन्स कंपनीने देऊ केलेले EPBAX हे IP-Based असल्याने ते सध्याच्या सिस्टमशी एकरुप होऊ शकते. शिवाय त्यांनी देऊ केलेल्या किंमतीत फ्री Software Upgradation १० युजर्स लाईसन्सचे पॅरलेले युजर कॅलींगची सुविध त्यांनी देऊ केली आहे. या सर्व बाबींचा विचार करता **Simens Pvt. Ltd., Mumbai.** दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं.१९ TREND MICRO ANTI VIRUS सॉफ्टवेअरचे पूढील तीन वर्षासाठी नुतनीकरण करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.३७२** संस्थानमधील कार्यालयीन कामकाजाचे बहुतेक करुन संगणकीकरण करण्यात आले आहे. संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत संस्थानमध्ये सध्या १२५ संगणक नेटवर्कींगच्या साहाय्याने जोडलेले आहेत. नेटवर्कमध्ये चालू असणाऱ्या संगणक प्रणालीला संगणक व्हायरसचा प्रादूर्भाव होऊ नये, साठविण्यात आलेली माहिती सुरक्षित रहावी, नेटवर्क पूर्ण क्षमतेने सतत कार्यान्वीत रहावे यासाठी उपरोक्त संदर्भ क्र. ०१ चे निर्णयानुसार TREND MICRO ANTI VIRUS चे ५१ युजरसाठी चालणारे सॉफ्टवेअर खरेदी करण्यात आलेले आहे. हे सॉफ्टवेअर नेटवरुन सतत अपडेट करावे लागते. याची मुदत मार्च, २००७ अखेर संपलेली आहे. सदर सॉफ्टवेअर पुढील कालावधीसाठी नुतनिकरण करणे आवश्यक असल्याने, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ३१ मार्च, २००७ रोजी झालेल्या सभेमध्ये पुढील तीन वर्षासाठी नुतनिकरण करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,४८,२५४/- (कर अतिरिक्त) यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार, संगणक व सॉफ्टवेअरच्या अधिकृत विक्रेत्यांकडून TREND MICRO ANTI VIRUS सॉफ्टवेअरचे पुढील तीन वर्षासाठी नुतनिकरण करणेसाठी दरपत्रके मागविण्यात आली असून, खालील प्रमाणे दरपत्रके प्राप्त झाली आहे.

| **Sr.No.** | Party Name |
|---|---|
| ०१. | BENELEC INFOTECH PVT.LTD., PUNE |
| ०२. | FOURTECH COMPUTERS, PUNE |
| ०३. | ALLIED DIGITAL SERVICES LTD., MUMBAI |
| ०४. | RAMCO SYSTEMS LTD., MUMBAI |
| ०५. | S.K.INTERNATIONAL, PUNE |
| ०६. | TEAM ONE COMPUTER, MUMBAI |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन, निविदासादकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं | निविदासादरकर्त्याचे नाव | निविदेतील दर रुपये | वाटाघाटीनंतरचे दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | BENELEC INFOTECH PVT.LTD., PUNE | १,९५,४५७.०० | अनुपस्थित |
| ०२ | FOURTECH COMPUTERS, PUNE | १,७६,०००.०० | अनुपस्थित |
| ०३ | ALLIED DIGITAL SERVICES LTD., MUMBAI | २,२४,३००.०० | २,००,०००.०० |
| ०४ | RAMCO SYSTEMS LTD., MUMBAI | ३,७३,०००.०० | अनुपस्थित |
| ०५ | S.K.INTERNATIONAL, PUNE | १,५०,१८२.०० | १,४५,०००.०० |
| ०६ | TEAM ONE COMPUTER, MUMBAI | २,११,६००.०० | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, S.K.INTERNATIONAL, PUNE यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं.२० एच.डी.एफ.सी.बॅंक ,मुंबई यांना त्यांचे विविध सेवांचे बदल्यात ठेवी देणेबाबत.**

**निर्णय क्र.३७३** उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भ क्रमांक १ नुसार मुख्याधिकारी, एच.डी.एफ.सी., लोअर परेल, मुंबई यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दि.२७.१२.२००६ रोजी पत्र पाठवुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून ठेवी व ऑनलाईन डोनेशन स्विकारणेसाठी विनंती केलेली आहे. या पत्रास अनुसरुन मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी Pl. Process & Grant असा अभिप्राय दिलेला आहे. या अनुषंगाने उपरोक्त संदर्भ क्रमांक २ (सासवि- २००७/८९/(१३)- का सोळा, विधी व न्याय विभाग, मुंबई) नुसार महाराष्ट्र शासनाने त्यांचेकडील दि.२५.४.२००७ चे पत्राने संस्थानडे अभिप्राय विचारलेले आहेत.

अधिनियम,२००४ मधील तरतुदीनुसार व विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्राच्या अनुषंगाने खाजगी, सहकारी व शेडयुल्ड/कमर्शियल बँकेत अद्यापपर्यंत संस्थानने गुंतवणूक केलेली नाही. तसेच अशा बँकांकडे पूर्वी झालेली गुंतवणूक त्यांचेकडून काढून घेऊन त्याची पुनर्गुंतवणूक ही राष्ट्रीयीकृत बँकेत करण्यात आलेली आहे.

एच.डी.एफ.सी., लोअर परेल, मुंबई ही शेडयुल्ड/कमर्शियल बँक आहे. मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे एच.डी.एफ.सी यांचे पत्रावरील अभिप्रायांचा विचार करता शासनाकडून परवानगी प्राप्त झाल्यास एच.डी.एफ.सी.बँकेकडे ठेवी ठेवण्यास तसेच सदरचा निर्णय झालेनंतर तसे महाराष्ट्र शासनास पत्रव्यवहार करण्यासही मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. एच.डी.एफ.सी. बँकेकडे शासनाने परवानगी दिल्यास ठेवी ठेवण्यास व त्यांचेकडून विविध सेवा घेण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी महाराष्ट्र शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.२१** **मौजे निमगांव-कोऱ्हाळे गट नं. ८०,८५ मधील नवीन प्रसादालय इमारत बांधकामासाठी अपेक्षित जादा खर्चाबाबत**

**निर्णय क्र.३७४** श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देणाऱ्या साईभक्तांना प्रसाद भोजनाची सुविधा विनासायास व विनाविलंब प्राप्त व्हावी, या दृष्टीने एकाच वेळी ५५०० भक्त प्रसाद भोजन घेऊ शकतील अशी क्षमता असलेल्या नवीन प्रसादालय इमारतीचे बांधकाम संस्थान मालकीच्या मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नंबर ८० व ८५ मधील एकूण ०२ हेक्टर ८५ आर क्षेत्रामध्ये सुरु करण्यात आलेले आहे. या इमारतीमध्ये तळमजला व पहीला मजला असून, प्रसाद भोजन बनविणेकामी आवश्यक असणाऱ्या सर्व अद्ययावत सुविधा करण्यात येणार आहेत. त्यामध्ये शुध्द पाणी पूरवठा व्यवस्था, उपभांडार गृह, प्रतिक्षागृह, भाजीपाला साठवणुकीसाठी शीतगृहाची सोय, प्रसाद भोजन बनविणेकामी एलपीजी प्लॅन्टची व्यवस्था, सोलर व जनरेटर करीता सुविधा, वायुवीजन व अग्नीशमन व्यवस्था आदी महत्वाच्या सुविधा करण्यात येत आहेत. तसेच परिसर सुशोभिकरणासाठी बाग-बगीचा व प्रशस्त अंतर्गत रस्त्यांचा अंतर्भाव या प्रकल्पांतर्गत करण्यात आलेला आहे. सदर इमारतीमध्ये तळमजल्यावर प्रशस्त असा मुख्य डायनिंग हॉल असून पहील्या मजल्यावर चार व्ही.आय.पी. डायनिंग हॉल्स आहेत.

संस्थानचे निमगांव- कोऱ्हाळे येथिल गट नं. ८०,८५ मधिल नवीन प्रसादालय भव्य इमारतीचे बांधकाम ठेकेदार मे.आय.व्ही.आर.सी.एल. इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लिमिटेड,पुणे यांचे मार्फत प्रगतीपथावर असून या कामाचा संक्षिप्त तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| **प्रकल्पाचे नांव** | :- | मौजे निमगांव - कोऱ्हाळे गट नं. ८०,८५ मध्ये नवीन प्रसादालय इमारत बांधकाम करणे. |
| **प्रकल्पाचे वास्तुविशारद (आर्किटेक्ट)** | :- | शक्ती परमार ॲण्ड असोशिएटस्, मुंबई |
| **बांधकाम व्यवस्थापन सल्लागार** | :- | टिसीई कन्सल्टींग इंजिनीयर्स लि.,पुणे |
| **ठेकेदाराचे नांव** | :- | मे. IVRCL इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस लि. हैद्राबाद |
| **प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी** | :- | एक वर्ष (दि. १५/०६/२००६ ते दि. १४/०६/२००७ अखेर) |
| **मंजूर निविदा रक्कम** | :- | रु. १७,७७,९६,६४७.०० |

वरील प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण करणेसाठी मंजूर निविदा रकमेपेक्षा जादा खर्च होणे अपेक्षित असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. याबाबत टिसीई कन्सलटींग इंजिनिअर्स, लि.,पुणे व शक्ती परमार ॲण्ड असो., मुंबई यांनी प्रत्येकी दि. ०५/०५/२००७ चे पत्रांव्दारे सविस्तर अहवाल सादर केलेले असून त्यानुसार अपेक्षित खर्चात होत असलेली वाढ ही प्रामुख्याने खालील बाबींमध्ये होणार आहे.

**०१) <u>खोदाई, माती वहातूक व फिलींग</u> :- (अपेक्षित वाढ रक्कम :- रु. २२,७१,७९६.००)**

स्ट्रक्चरल कन्सल्टंटस् यांनी १५ टन/ चौ.मिटर या भारवाहक क्षमतेच्या स्ट्राटावर फौंडेशन घेणेची शिफारस केली होती. तथापी प्रत्यक्ष साईटवर नुसत्या नजरेव्दारे स्ट्राटाचे क्षमतेबाबत अंदाज घेणे शक्य नव्हते. त्यासाठी टीसीई यांचे सल्लायाने मातीचे परिक्षण (STP) चाचण्या घेण्यात आल्या त्यानुसार ३.३० मि. या खोलीवर फौंडेशन घेण्याचे निश्चित झाले. तथापी निविदेमध्ये फक्त ३.०० मि. खोलीपर्यंत खोदाईची तरतूद होती. अशाप्रकारे खोदाईचे क्वांटीटीत वाढ झाली. त्याचप्रमाणे तांत्रिक

मान्यतेचे वेळी सा.बां.विभागाशी झालेल्या चर्चेनुसार प्लीन्थ लेव्हल ही ०.९ मि. उंच ठेवणे आवश्यक होते. परंतू इमारतीचा परिसर अविकसीत स्वरुपाचा असल्याने भविष्यातील विकासकामे विचारात घेऊन प्लीन्थ लेव्हल ही अस्तित्वातील रस्त्याचे पृष्ठभागापासून १.०० मिटर उंच अशी निश्चित करण्यात आली. मूळ निविदेतील प्लीन्थ लेव्हल ०.४५ मि.होती. त्यामुळे फिलींगचे क्वांटीटीत वाढ झ ाली. तसेच सिक्युरिटी केबीन, बॉयलर हाऊस ही बांधकामे आवश्यकतेनुसार वाढविणेत आली. त्यामुळेही सदर बाबींच्या क्वांटीटीज् मध्ये वाढ झाली.

**०२) <u>स्ट्रक्चरल स्टील</u> :- (अपेक्षित वाढ रक्कम :- रु. २३,२१,५८६.८०)**

सदर बाबीसाठी शॉप ड्रॉईंगचे मान्यतेवेळी स्ट्रक्चरल कन्सल्टंट यांनी काही सेक्शनमध्ये बदल केले. तसेच सिलींगला ई - बोर्डचे आधारासाठी ISA - ५०x५०x६ चे अतिरिक्त सेक्शन दिले. त्यामुळे सदर बाबींच्या क्वांटीटीत वाढ झाली.

**०३) <u>आर.सी.सी. कॉंक्रीटींग</u> :- (अपेक्षित वाढ रक्कम :- रु. २६,५२,३६४.८४)**

खोदाईची खोली वाढल्यामुळे कॉलमची उंचीही वाढली. तसेच फुटींगच्या सेक्शनमध्येही सुधारणा करण्यात आली. तिकीट काउंटरचे समोर रांगेत उभ्या राहणाऱ्या भक्तांना उन पावसापासून संरक्षणासाठी पक्क्या स्वरुपाचे आर.सी.सी. छताचा समावेश आर्किटेक्ट यांचे सल्लयाने करण्यात आला लिफ्ट रुम, वॉचमन केबीन, बॉयलर हाऊस ही अत्यावश्यक बांधकामे वाढीवरित्या समाविष्ट करण्यात आली. त्यामुळे आर.सी.सी. कामाचे क्वांटीटीत वाढ झाली.

**०४) <u>रिनफोर्समेंट स्टील :- </u> (अपेक्षित वाढ रक्कम :- रु. १,८९,३३,७२०.००)**

सदर साईटवर पक्क्या स्वरुपाचा स्ट्राटा नसल्यामुळे आर्किटेक्ट यांचे सल्ल्यानुसार सेप्टीक टँकचे बांधकाम बी.बी.एम. ऐवजी आर.सी.सी. मध्ये करण्यात आले. मूळ एस्टीमेटमध्ये सार्वजनीक बांधकाम विभाग, डीझाईन सर्कल, मुंबई परिपत्रक BDG - ३८६५ (k), दि. १८.०६.१९७१ नुसार प्रती क्युबीक मीटर प्रमाणात स्टीलची क्वांटीटी धरण्यात आली होती. प्रत्यक्षात आर.सी.सी डिझाईननुसार याबाबींचे क्वांटीटीत वाढ झाली. मूळ निविदेमध्ये डी.एस.आर. व ई.एस.आर. या बाबी लम्पसम होत्या. परंतू प्रत्यक्षात आवश्यकतेनुसार त्या आर्किटेक्ट यांचे सल्ल्यानुसार आर.सी.सी. कन्सल्टंटने डीझाईन केल्या. त्यासाठी स्टीलची वाढीव क्वांटीटी लागली. तसेच लिफ्ट रुम, वॉचमन केबीन व बॉयलर हाऊस ही अत्यावश्यक बांधकामे वाढीवरित्या समाविष्ट करणेत आली.

**०५) <u>व्हीट्रीफाईड टाईल्स</u> :- (अपेक्षित वाढ रक्कम :- रु. ५,६९,३५५.८०)**

पहील्या मजल्यावरील तीन व्ही.आय.पी. डायनिंग हॉल्समध्ये इंटेरीअर डिझायनर आर्किटेक्ट अमृता पवार यांचे सल्ल्याने ग्रेनाईट फ्लोअरींगऐवजी व्हायट्रीफाईड टाईल्स बसविण्याचे ठरले आहे. त्यामुळे सदर बाबींचे क्वांटीटीमध्ये वाढ होत आहे.

**०६) <u>पॉलीकार्बोनेट रुफींग</u> :- (अपेक्षित वाढ रक्कम :- रु. २५,२७,३८३.६०)**

मूळ नकाशामध्ये मेन व व्ही.आय.पी. डायनिंग हॉलचे डोमवरील स्कायलाईटसाठी मेंगलोर टाईल्स दर्शविण्यात आल्या होत्या. परंतू तद्नंतर मा. विश्वस्त श्रीमती उर्मिला जाधव आर्किटेक्ट व टीसीई यांचेसमवेत झालेल्या साईटवरील बैठकीत नैसर्गिक उजेड येण्यासाठी वरील स्कायलाईटकरीता पॉलीकार्बोनेट शिटस् बसविणे योग्य होईल अशी चर्चा झाली. त्यानुसार सदर कामसाठी वरीलप्रमाणे जादा खर्च अपेक्षित आहे.

वरीलप्रमाणे क्वांटीटीजमध्ये झालेल्या वाढीव्यतिरिक्त काही अतिरिक्त बाबींचे (Extra Items) काम आवश्यकतेनुसार करण्यात येत आहे. या अतिरिक्त बाबींपैकी निविदा शर्तीनुसार ज्या बाबी DSR २००५-२००६ मध्ये उपलब्ध आहेत, त्यांचेसाठी DSR मधिल दर अधिक २७% निविदा टक्केवारी याप्रमाणेदर घेतले आहेत. जे दर DSR मध्ये नाहीत, त्यांचेसाठी निविदा शर्तीनुसार आर्किटेक्ट व टीसीई यांनी प्रमाणीत केलेनुसार दर घ्यावयाचे आहेत.

यापैकी D.S.R. दराचेबाबींमध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश आहे.

०१. P.C.C. १:२:४ in foundation :-

माती परिक्षण सल्लागार DBM Geotechnics, मुंबई यांनी फुटींग खाली PCC १:२:४ टाकण्याची शिफारस केली. मूळ निविदेमध्ये या बाबी साठी PCC १:३:६ ची तरतूद होती.

०२. आर.सी.सी. M-२५ पडदी :-

मूळ निविदेमध्ये पडदीची जाडी ही १५० मि.मि.दर्शविण्यात आली होती. तथापी, ड्रॉईंगनुसार २३० मि.मि. जाडीची पडदी करण्यात आली.

तसेच NON- DSR दराचे बाबींमध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश आहे -

०१. ट्रीमिक्स फ्लोरींग :-

प्रसादालय विभागच्या मागणीनुसार तसेच किचन कन्सलटंट यांच्या सल्ल्याने मेन किचन व बुंदी किचन मधील Hot zone मध्ये ट्रिमिक्स फ्लोरींग करण्यात आली.

०२. शॅलिटेक्स बोर्ड :-

Expansion Joint च्या फिलिंगसाठी आर्किटेक्ट यांच्या सल्ल्याने शॅलिटेक्स बोर्ड पॉलिसल्फाईड सिलंटसह वापरण्याचे ठरले आहे. याबाबीसाठी मूळ निविदेमध्ये तरतूद नाही.

०३. सी.आय.सॉईल पाईप्स :-

किचन व स्टोअर मध्ये किचन कन्सलटंट यांनी नमूद केलेल्या आवश्यकतेनुसार ड्रेनेजसाठी सी.आय.सॉईल पाईप्स टाकण्यात येत आहेत. मूळनिविदेमध्ये सदर बाबीचा समावेश नाही.

मूळ निविदेतील क्वांटीटीजमध्ये अपेक्षित असलेली वाढ व DSR आणी NON - DSR अतिरिक्त बाबी (Extra Items ) यामुळे अपेक्षित एकूण सुधारीत खर्चाचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे. त्यापैकी NON- DSR Extra items चे दर अंतिम केल्यानंतर एकूण अपेक्षित खर्चाचे रकमेत काही प्रमाणात बदल होईल.

**अ) मूळ निविदेतील कामाच्या आवाक्यासाठी :-**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | Civil Works | - Rs. | १५,११,५४,२४१.६९ |
| ०२. | Compound wall | - Rs. | २९,०९,६२१.२० |
| ०३. | Road work | - Rs. | ५०,३०,५९५.१० |
| ०४. | Sanitary & Plumbing | - Rs. | ६३,७२,८८६.५० |
| | Total | - Rs. | १६,५४,६७,३४४.४९ |
| Add २७% tender Percentage | | - Rs. | ४,३७,७७,०१०.११ |
| **Total Revised Estimated cost** | | **- Rs.** | **२०,९२,४४,३५४.६० (A)** |

(for original scope )

**ब) मेन्टेनन्स ब्लॉक व इलेक्ट्रीकल मिटर रुमचे अतिरिक्त बांधकामासाठी :-**

यान्यतिरिक्त विद्युत विभाग यांनी स्वंतत्र मिटर रुमचे बांधकाम करुन मिळणेबाबत मागणी केलेली आहे. तसेच बांधकाम विभाग, पाणीपूरवठा विभाग, बगिचा विभाग, स्वच्छता विभाग इ. सेवा पूरविणाऱ्या विभागांसाठी स्वतंत्र मेंटेनन्स ब्लॉकचे बांधकामाची आवश्यकता आहे. या दोन्ही बांधकामांसाठी आर्किटेक्ट यांनी प्लॅन एस्टीमेट सादर केलेले आहेत. मूळ निविदेत या कामांचा समावेश नाही. त्यासाठी अपेक्षित खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| Maintenance Block | - | Rs. | १६,६१,११३.८४ |
| Electrical Meter Room | - | Rs. | ६,९९,०४५.९८ |
| Total | - | Rs. | २३,६०,१५९.८२ |
| Add २७% Contractor's Percentage | - | Rs. | ५,७३,०३१.४८ |
| **Total Estimated Cost** | **-** | **Rs.** | **२९,३३,१९१.३० (B)** |
| **Total Revised Estimated Cost (A+B)** | **-** | **Rs.** | **२१,२१,७७,५४६.००** |

(For entire completion of the project )

वरीलप्रमाणे (A) व (B) मिळून सदर प्रकल्पासाठी अंदाजे एकूण रु. २१,२१,७७,५४६.०० मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावाबाबत खालील बाबींवर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१) मूळ निविदेतील कामाचा आवाका पूर्ण करणेसाठी एकूण सुधारीत अपेक्षित खर्च रु. २०,९२,४४,३५५.०० मात्र इतका आहे. मंजूर निविदा रक्कम रु. १७,७७,९६,६४७.०० मात्र वजा जाता रक्कम रु. ३,१४,४७,७०८.०० मात्र इतका जादा खर्च अपेक्षित आहे. तरी सदरहू जादा खर्चास व काम ठेकेदार IVRCL यांचेकडून करुन घेणेसाठी मंजुरी मिळणेस विनंती.

०२) आवश्यक असलेल्या अतिरिक्त वाढीव बांधाकामांपैकी इलेक्ट्रीकल मिटर रुमच्या बांधकामासाठी रु. ८,६४,०७६.७२ मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदर काम त्वरीत करणे आवश्यक असल्याने त्यासाठीचे खर्चास व काम ठेकेदार I.V.R.C.L. यांच्याकडून मंजूर निविदा दरात करुन घेणेसाठी मंजुरी मिळणेबाबत विनंती.

०३) आवश्यक असलेल्या अतिरिक्त वाढीव बांधकामांपैकी मेंटेनन्स ब्लॉक च्या बांधकामासाठी रु.२०,६९,११३.८४ मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदर काम ठेकेदार IVRCL यांच्याकडून मंजूर निविदा दरात करुन घेता येईल अथवा यथावकाश स्वतंत्ररित्या निविदा मागवून करता येईल.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रकल्पासाठी माती परिक्षणाअंती पायाच्या खोलीतील बदल, आरसीसी डिझाईनमध्ये करण्यात आलेल्या सुधारणा यामुळे प्रामुख्याने खर्चात वाढ झालेली आहे. प्रकल्प सुरु होणेअगोदर सर्व बाबींचा व खर्चाचा अचुक अंदाज बांधणे शक्य नव्हते. त्याचा विचार करता मूळ निविदेतील कामाचा आवाका पूर्ण करणेसाठी रुपये ३,१४,४७,७०८.०० मात्र इतक्या अपेक्षित जादा खर्चास, तसेच सदरहू काम ठेकेदार I.V.R.C.L. यांच्याकडून मंजूर निविदादराने करुन घेणेसाठी मंजुरी देणेत आली. त्याचबरोबर इलेक्ट्रिकल मीटर रुमच्या अतिरिक्त बांधाकामासाठी अपेक्षित असलेल्या रु.८,६४,०७७/- मात्रचे खर्चास, तसेच सदरहू काम ठेकेदार I.V.R.C.L. यांच्याकडून मंजूर निविदा दराने करुन घेणेसाठी मंजुरी देणेत आली. सदरहू वाढीव कामे पूर्ण करण्यासाठी ठेकेदार यांना दिनांक ३१.७.२००७ अखेरपर्यन्त मूदतवाढ देण्यात यावी असे ठरले. या व्यतिरिक्त निविदेतील Price variation clause नुसार देय होणारी रक्कम ठेकेदार यांना आदा करण्यात यावी. मेटेंनन्स ब्लॉकचे बांधकामासाठी यथावकाश स्वतंत्ररित्या निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२२** **शिर्डी विकास आराखड्यातील नगरपंचायत हद्दीतील आरक्षीत क्षेत्रांचा विकास करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७५** **(अ)** मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी माहे डिसेंबर, १९९२ मध्ये शिर्डी शहराचा विकास आराखडा मंजूर केलेला आहे. या विकास आराखडयात श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देणाऱ्या साईभक्तांसाठी, रहिवासी जनतेसाठी व इतर सार्वजनिक लोकोपयोगी कारणांसाठी शिर्डी शहरात व शिर्डी शहरांलगत विविध ठिकाणी जमिनी / जागा आरक्षित केलेल्या आहेत. या आरक्षित जमिनींची विकसन संस्था म्हणून त्यांच्या उपभोग्य कारणांनुसार विविध संस्था दर्शविलेल्या आहेत. त्या विकसन संस्थांमध्ये प्रामुख्याने शिर्डी नगरपंचायत व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या दोन संस्था समाविष्ट आहेत.

शिर्डी विकास आराखडयात दर्शविलेल्या विविध आरक्षणांची थोडक्यात तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे :

| अ.नं. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचा तपशील | आरक्षणाचे ठिकाण सर्व्हे नंबर / सि.स.नं. | आरक्षित क्षेत्र हेक्टर-आर | विकसन संस्था |
|---|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** |
| ०१ | ०१ | उद्यान / बगीचा | स.नं. ०२ पैकी | ००-४० | शिर्डी नगरपंचायत,शिर्डी |
| ०२ | ०२ | स्थळ सुविधा | स.नं. ०३ पैकी | ००-७७ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ०३ | ०३ | स्थळ सुविधा | स.नं. ०३ पैकी | ००-०७५ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ०४ | ०४ | स्थळ सुविधा | स.नं.०३ पैकी | ००-३२ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ०५ | ०५ | वाहनतळ | स.नं.०५ पैकी व ०४ पैकी | ०१-८९ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ०६ | ०६ | बगीचा व जलतरण तलाव | स.नं.०३ पैकी व ०४ पैकी | ०२-०६ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ०७ | ०७ | टाऊन हॉल | स.नं.०५ | ००-४६ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ०८ | ०८ | प्राथमिक शाळा व क्रिडांगण | स.नं.०६ पैकी | ००-५८ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ०९ | ०९ | उद्यान / बगीचा | स.नं. १ / २ | ००-३४ | श्री साईबाबा संस्थान,शिर्डी |
| १० | १० | उद्यान / बगीचा | स.नं. १ / २ | ०.०७५ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ११ | ११ | मंदिर विस्तारीकरण | सि.स.नं. ५,६,७ | ००-००३२ | श्री साईबाबा संस्थान,शिर्डी |
| १२ | १२ | मंदिर विस्तारीकरण | मंदिराची उत्तर बाजू | ००-०१४ | श्री साईबाबा संस्थान,शिर्डी |
| १३ | १३ | उद्यान / बगीचा | स.नं. १ / २ | ००-२० | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| १४ | १४ | उद्यान / बगीचा | | ००-०३४ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| १५ | १५ | उद्यान / बगीचा | | ००-०२८ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| १६ | १६ | उद्यान / बगीचा | | ००-०६७ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७ | १७ | सार्वजनिक शौचालय | | ००-०३५ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| १८ | १८ | सार्वजनिक शौचालय | | ००-०२४ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| १९ | १९ | टेलिकॉम विभागासाठी | सि.स.नं.१०४३ | ००-३६ | टेलिकॉम विभा |
| २० | २० | पोष्ट कार्यालयासाठी | सि.स.नं.१०४४ | ००-१६ | पोष्ट विभाग |
| २१ | २१ | शॉपिंग सेंटर व भाजी बाजार | स.नं.१७१ पैकी | ००-४२ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| २२ | २२ | उद्यान / बगीचा | | ००-०६१ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| २३ | २३ | बेघरांसाठी घरकुले | स.नं.५४, ५५ | ०१-८९ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| २४ | २४ | प्राथमिक शाळा | स.नं.५३ पैकी | ००-५५७ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| २५ | २५ | क्रिडांगण | स.नं.५५ पैकी | ०३-३३ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| २६ | २६ | मटण मच्छी बाजार | स.नं. ५६ पैकी | ००-१४४ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| २७ | २७ | आठवडे बाजार | स.नं.५६ पैकी | ०१-१३ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| २८ | २८ | कोंडवाडा | स.नं.५६ पैकी | ००-२३ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| २९ | २९ | क्रिडांगण | स.नं.५६ पै व स.नं. १११ पै | ००-७४ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ३० | ३० | प्राथमिक शाळा | स.नं.५७ पैकी | ००-३२ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ३१ | ३१ | उद्यान / बगीचा | स.नं. ११० पै,स.नं. १११ पै व स.नं. ११३ पैकी | ०२-८० | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ३२ | ३२ | प्राथमिक शाळा | स.नं. १११ पैकी | ००-७० | श्री साईबाबा शिक्षण प्रसारक मंडळ, शिर्डी |
| ३३ | ३३ | माध्यमिक शाळा | स.नं.१७ पैकी | ०१-३२ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ३४ | ३४ | रुग्णालय विस्तारीकरण | स.नं. १२४ पै, स.नं.१२५ व स.नं.१२६ पै | ०६-०० | श्री साईबाबा संस्थान, शिर्डी |
| ३५ | ३५ | शॉपिंग सेंटर | स.नं.१२४ पैकी | ००-३२ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ३६ | ३६ | रिक्रिएशन सेंटर | स.नं. १२४ पैकी | ०१-०१ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ३७ | ३७ | प्राथमिक शाळा व क्रिडांगण | स.नं. १२४ पैकी | ०-७८ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ३८ | ३८ | क्रिडांगण | स.नं. १२४ पैकी | ०१-८९ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ३९ | ३९ | संस्थानसाठी जागा | स.नं.१२४ पै, स.नं.१२५ पै व स.नं. १२६ पै | ०५-८१ | श्री साईबाबा संस्थान,शिर्डी |
| ४० | ४० | धर्मशाळा | स.नं. १४८ पै, स.नं.१५० पै व स.नं.१४९ पैकी | ०१-५१ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ४१ | ४१ | टपरी पुर्नःवसन | स.नं.१४९ ते १५० पैकी | ००-४५ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ४२ | ४२ | टपरी पुर्नःवसन | स.नं.१२५ पै व स.नं.१५० पै | ००-४५ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ४३ | ४३ | उद्यान / बगीचा | स.नं. १५० पै, स.नं.१६९ पै | ००-२१ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ४४ | ४४ | शॉपिंग सेंटर व वाहनतळ | स.नं.१६७ पै, स.नं.१६९ पै | ०२-७७ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ४५ | ४५ | ट्रक टर्मिनस | स.नं.१४९ पैकी | ०३-८० | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ४६ | ४६ | राज्य परिवहन महामंडळ | स.नं.१६२,१६३,१६४ व १६५ पैकी | ०५-४२ | राज्य परिवहन महामंडळ |
| ४७ | ४७ | सरकारी निवासस्थाने | स.नं. १६७ व १६९ | ०१-२४ | राज्य सरकार |
| ४८ | ४८ | कॅम्पिंग ग्राऊंड | स.नं.१६८, स.नं.१६४ पैकी | ०२-०३ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ४९ | ४९ | वाहनतळ | स.नं. १६८ पैकी | ००-१८७ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ५० | ५० | सार्वजनिक शौचालय | स.नं.१६४ पैकी | ००-२३ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ५१ | ५१ | सार्वजनिक शौचालय | स.नं.१६८ पैकी | ००-२५ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ५२ | ५२ | स्मशानभूमी | स.नं.१३४ पैकी | ००-१५ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ५३ | ५३ | स्मशानभूमी | स.नं.७९ पैकी | ००-२७ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ५४ | ५४ | स्मशानभूमी | स.नं.४० पैकी | ००-१९ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ५५ | ५५ | वीज वितरण केंद्र | स.नं.५५ पैकी | ०४-७२ | वीज महामंडळ |
| ५६ | ५६ | कम्पोष्ट डेपो | स.नं.२६ | ०१-०० | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |
| ५७ | ५७ | डीपी रोड, ४५ मी. रुंदीचा | | १२.६० | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| ५८ | ५८ | इतर सर्व रस्ते | | २६.२७ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी |

(उपरोक्त तक्त्यातील रकाना क्रमांक ०५ मध्ये दर्शविण्यात आलेले क्षेत्र हे अंदाजे असून, प्रत्यक्ष भूसंपादनाचे वेळेस मोजणीअंती ते कायम होईल.)

**(ब)** उपरोक्त तक्त्यात दर्शविलेली बहुतांशी आरक्षणे ही शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकरीता विविध सार्वजनिक उपयोगासाठी आरक्षित केल्याचे दिसून येते. शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेमार्फत यापैकी कोण-कोणती आरक्षणे / जागा विकसित करण्यात आल्या आहेत किंवा कोणती आरक्षणे विकसित करणेबाबत इच्छुक आहे याबाबतची विचारणा इकडील कार्यालयाचे पत्र दिनांक ०५ मे, २००७ अन्वये मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडेस करण्यात आलेली आहे.

तसेच, उपरोक्त तक्यातील अ.क्र.०८ चे प्राथमिक शाळा व क्रिडांगणासाठी आरक्षित असलेली जागा संस्थानने खरेदी / भूसंपादीत करुन विकसित केलेली असून, सध्या या ठिकाणी जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा सुरु आहे. अ.क्र. ३४ चे रुग्णालय विस्तारीकरणासाठी आरक्षित असलेल्या सर्व्हे नंबर

१२४ पैकीमधील जागेपैकी काही जागा संस्थानने खरेदी केलेली असून, उर्वरित जागेबाबतची भूसंपादन कार्यवाही सुरु आहे.

अ.क्र. ३९ चे संस्थानचे विविध उपक्रमांसाठी आरक्षित असलेल्या सर्व्हे नंबर १२४,१२५ व १२६ पैकी मधील जागेबाबत भूसंपादनाची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून, त्याबाबतचा निवाडा लवकरच जाहिर होत आहे. अ.क्र.४० चे धर्मशाळेसाठी आरक्षित असलेल्या स.नं.१४८ पैकी या जागेपैकी काही जागा संस्थानने विकत घेतलेली असून, ती विकसित करण्यात आलेली आहे.

अ.क्र. ५७ व ५८ रस्त्यांसाठी आरक्षित असलेल्या जागांबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या तीन्ही संस्थान एकत्रितरित्या शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना राबवित असून, याबाबत प्रथम प्राधान्य गटातील ११ पैकी ०९ रस्त्यांचे विकसन करणेसाठी भूसंपादन कार्यवाही सुरु आहे.

**(क)** उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या आरक्षणांपैकी उद्यान / बगीचे, क्रिडांगण, वाहनतळ, कॅम्पिग ग्राऊंड, प्राथमिक व माध्यमिक शाळा आदि आरक्षणे महत्वाची असून, या आरक्षणातील जागा शिर्डी नगरपंचायत, शिर्डी हे विकसित करण्यास इच्छुक नसतील अथवा निधीअभावी त्यांना सदर आरक्षणे विकसित करणे शक्य नसल्यास शिर्डी नगरपंचायत, शिर्डी ऐवजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत सदरील आरक्षणातील जागा भूसंपादीत / खरेदी करुन विकसित करता येतील.

वरीलपैकी महत्वाची कोणती आरक्षणे संस्थानतर्फे विकसित करावयाची याबाबत मा.व्यवस्थापन समितीने तत्वतः मान्यता दिल्यास, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडेस संबंधित आरक्षणांची विकसन संस्था म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी असा बदल करणेसाठी प्रस्ताव सादर करता येईल. तसेच शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी विकसन संस्था बदलणेबाबत यथायोग्य कार्यवाही केलेनंतर उपरोक्त महत्वाच्या आरक्षणातील जागा भूसंपादनाच्या माध्यमातून घेणे अथवा खरेदी करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने यथावकाश निर्णय घेता येतील असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त आरक्षणांपैकी साईभक्तांच्या सोयीसुविधा उपलब्ध होईल या दृष्टीने पहिल्या टप्प्यात वाहनतळ, कॅम्पिंग ग्राऊंड, उद्याने, ट्रक टर्मिनल, क्रिडांगण ही महत्वाचे आरक्षणे संस्थानतर्फे विकसित करणेसाठी या आरक्षणांची विकसन यंत्रणा म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांची नियुक्ती होण्यासाठी प्रस्ताव शिर्डी नगरपंचायत यांचेकडेस पाठविण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२३** **जुन्या जिल्हा परिषद शाळेजवळ मिळालेल्या १६ गुंठे जागेमध्ये साईभक्तांसाठी सुविधा निर्माण करणेबाबत**

**निर्णय क्र.३७६** **(अ)** शिर्डी नगरपंचायत यांनी दिनांक २१/०६/२००६ रोजीचे सर्वसाधरण सभेत ठराव क्रमांक २१अन्वये आरक्षण क्र. १० येथील १६ आर क्षेत्र श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना देणेविषयी ठराव मंजूर केला असलेबाबत शिर्डी नगरपंचायत यांनी जा.क्र. न.पं./बांध/कावि-५/६९१/२००६ दिनांक ३१/०८/२००६ रोजीचे पत्रान्वये कळविले होते.

उपरोक्त शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १६ सप्टेंबर, २००६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ७८१ खालीलप्रमाणे झालेला आहे :

" .. याप्रमाणे अटी शिर्डी नगरपंचायत यांचे ठरावात नमूद केलेल्या आहेत. यावर सविस्तर चर्चा होऊन शिर्डी नगरपंचायत यांनी वरीलप्रमाणे देऊ केलेली १६ आर जागा स्विकारणेत यावी असे ठरले. "

मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार, मा.मुख्याधिकारी व इतर अधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी आरक्षण क्रमांक १० मधील १६ गुंठे जागा (१२ मीटर दक्षिणोत्तर विकास योजना रस्त्याचे क्षेत्र धरुन) संस्थानचे कंपाऊंडलगत दिनांक २० मार्च, २००७ रोजी संस्थानचे ताब्यात दिलेली आहे.

या जागेत असणारे अतिक्रमण हटविणेबाबत मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना दिनांक २८ मार्च, २००७ रोजी पत्र देण्यात आले होते, त्यास त्यांनी दिनांक ०९ एप्रिल, २००७ रोजी उत्तर पाठविले असून श्री.नागपुरे व श्री.ओस्तवाल यांचे जागेची भूसंपादनाची कार्यवाही सुरु असलेबाबत कळविलेले आहे.

**(ब)** उपरोक्तप्रमाणे संस्थानच्या ताब्यात मिळालेल्या १६ गुंठे जमिनीचा विकास करणे आवश्यक आहे. या ठिकाणी भक्तांच्या सोयीसाठी खुल्या स्वरुपात मध्यम आकाराचे पॉलिकॉर्बोनेटचे छत उभारुन, फ्लोरींग, लॅण्डस्केपिंग इत्यादी सोयी-सुविधांसह भक्तांना अल्प विश्रांती / विसावा घेण्यासाठी बैठक व्यवस्था करता येईल तसेच या जागेस कास्ट आर्यन ग्रिलचे कंपाऊंड करता येईल. या ठिकाणी संस्थानमार्फत वेळोवेळी आयोजित करण्यात येणारे छोट-छोटे धार्मिक कार्यक्रम, जसे सामुहिक पारायण, सत्संग मेळावे, मनोरंजानत्मक कार्यक्रम, श्री गणेशोत्सव, श्री नवरात्रौत्सव इत्यादी साजरे

करता येतील. भविष्यात याठिकाणी विकास आराखडयात करावयाचा बदल मंजूर झाल्यास त्याबाबत यथावकाश निर्णय घेता येईल.

तूर्त,उपरोक्तप्रमाणे या जागेवर सुशोभित मध्यम आकाराचे पॉलिकार्बोनेटचे खुल्या मंडपाप्रमाणे छत उभारुन, भक्तांच्या अल्प विश्रांतीसाठी जागा तयार करता येईल. याकामी मंदिर व मंदिर परिसराच्या आर्किटेक्ट मे.माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवी दिल्ली यांचेकडून सविस्तर आराखडा व अंदाजपत्रक तयार करुन घेता येईल,असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,सदरहू जागेत होत असलेल्या शॉपिंग कॉम्प्लेक्सचे कडेने कास्ट आर्यन कम्पाऊंड संरक्षक भिंत बांधण्यात यावी. तसेच या जागेचे सुशोभिकरण करण्यात येऊन, या ठिकाणी साईभक्तांना बसण्यासाठी व संस्थानचे विविध कार्यक्रम घेणेसाठी सोय करण्यात यावी. याकामी आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे, नवी दिल्ली यांचे नेमणूक करण्यात यावी ,असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२४** **भक्तनिवासस्थान (५०० रुम) कडील खोल्यांचे नुतनीकरण व मेंटेनन्स बाबत**

**निर्णय क्र.३७७** श्रीसाईबाबा भक्तनिवास इमारतीचा वापर साईभक्तांसाठी सन १९९३ पासून करण्यात येत आहे. म्हणजे सुमारे १३ वर्षापासून इमारतीचा वापर करण्यात येत आहे. या इमारतीमध्ये एका महिन्यात सरासरी सुमारे ७५ हजार साईभक्तांची निवासाची व्यवस्था करण्यात येते. त्यामुळे इमारतीचे दुरुस्ती व देखभाल करणे आवश्यक आहे. भक्तनिवास (५०० रुम ) नूतनीकरणाचे करावयाच्या कामाची समक्ष पहाणी आर्किटेक्ट अरविंद वैद्य यांनी केली असून याकामाकरीता त्यांनी खालील प्रमाणे दुरुस्ती करणेबाबत एस्टीमेट सादर केले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

०१. सर्व खोल्यांना जुन्या पध्दतीची सिमेंट मोझॅक टाईल बसविलेली आहे. कालानुरुप या फरशीचे बाह्य स्वरुप आकर्षक वाटत नाही हया फरशीच्या ऐवजी नविन पध्दतीची पोर्सेलीनो फरशी बसविल्यास खोल्या जास्त आकर्षक व अल्हाददायक वाटतील.

०२. खिडक्या एम.एस. लोखंडी आहे. त्यासर्व पावसाच्या पाण्यामुळे गंजलेल्या आहे. काचा फुटलेल्या आहेत. बऱ्याचदा खिडक्या निटपणे उघडत नाही. त्यामुळे या खिडक्या काढून त्याठिकाणी मार्बलचे विंडो सिल व जॅम बसवून त्यामध्ये ॲल्युमिनीअमचे नविन खिडक्या ग्रिलसह बसविल्यास वरील अडचणी दूर होतील.

०३. सर्व दरवाजांचा दर्शनी भाग हा अत्यंत अनाकर्षक आहे. (वेळोवेळी ऑईलपेंट केल्यामुळे त्यावर पोपडे दिसतात) हयाच दरवाजांवर ६ एम.एम. प्लायवूड लावून त्यावर लॅमिनेट (सनमायका) लावल्यास दरवाजे नक्कीच कितीतरी अधिक उठावदार दिसतील तसेच सर्वदरवांच्या कड्या हँडल, स्टॉपर, ताडी पट्टी इ. बदलणे गरजचे आहे.

०४.टॉयलेच्या सर्व फ्रेम हया लोखंडी आहेत. पाण्याच्या सततच्या संपर्कामुळे त्या गंजलेल्या आहे. त्या ठिकाणी परत लोखंडी फ्रेम बसविणे संयुक्तीक होणार नाही. त्यासाठी न गंजणाऱ्या व कमीतकमी मेटेनन्स असणाऱ्या मार्बलच्या चौकटी बसविणे योग्य होईल.

०५. तसेच टॉयलेटचे दरवाजे पाण्याच्या संपर्कामुळे एकतर फुगलेले आहेत अथवा सडलेले आहेत. त्याकरीता हे सर्व शर्टस बदलणे आवश्यक आहे. त्यासाठी वॉटरप्रुफ क्वालिटीचे नामवंत कंपनीचे फ्लश डोअर घेऊन त्यावर एफ.आर.पी.चे कोटींग करुन घेतल्यास हे दरवाजे जास्त कालावधी टिकतील.

०६. रुम मधील साफसफाईच्या दृष्टीने भिंतीना ३ फूट उंचीपर्यत पोर्सेलीनो टाईल्स बसविल्यास भिंती घाण होणार नाहीत.

०७.सर्व रुममध्ये एक गोष्ट प्रकर्शाने जाणवली की भक्तांना त्यांचे खाजगी बॅगा व इतर सामान कपडे ठेवण्यासाठी व्यवस्थित कपाट नाही तरी एखादे प्लायवूडचे कपाट कुलूपासहीत हँगरची सोय असलेले ठेवणे आवश्यक आहे.

०८.तसेच वरील सर्व काम करताना पुर्वीचा काही रंग काही प्रमाणात खराब होणार आहे. म्हणून कमीत कमी नव्याने परत एक हात (कोट) रंगाचा देणे आवश्यक आहे.

तरी वरील गोष्टींचा अंतर्भाव केल्यास वरील खोल्यांची उपयुक्तता वाढून भक्तांना तेथे राहणे जास्त समाधानकारक व सुखकारक होईल असे आर्किटेक्ट यांनी कळविले आहे.

वरील बाबींचा विचार करुन नूतनीकरण करणेकामी आर्किटेक्ट यांनी फर्निचर व्यतिरिक्त खालील प्रमाणे प्राथमिक अपेक्षीत खर्च कळविला आहे.

01) ए टाईप रुम - रु. 1,01,450.00
02) बी टाईप रुम - रु. 2,20,450.00
03) सी टाईप रुम - रु. 1,12,950.00

अशाप्रकारे एकूण 486 खोल्यांचे नूतनीकरण करणेकामी खालीलप्रमाणे एकूण खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | प्रकार | प्रत्येक रुमसाठी आवश्यक खर्च | खोल्यांची संख्या | एकूण रुक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | ए टाईप | १,०१,४५०.०० | ४१४ | ४,२०,००,३००.०० |
| ०२ | बी टाईप | २,२०,४५०.०० | १८ | ३९,६८,१००.०० |
| ०३ | सी टाईप | १,१२,९५०.०० | ५४ | ६०,९९,३००.०० |
| | | | **एकूण खर्च** | **५,२०,६७,७००.००** |

उपरोक्त प्रमाणे भक्तनिवास ४८६ खोल्या नूतनीकरणकरीता रु. ५,२०,६७,७००.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे. नमुना दाखल तीन रुमचे नूतनीक रणाचे काम भक्त निवास कॅन्टीनचे काम करणारे ठेकेदार श्री. महेंद्र आर. टाटीया श्रीरामपुर यांचे मार्फत पुर्ण करण्यात आलेले आहे. सदर रुमची पहाणी मा. विश्वस्त समितीचे सदस्यानी केल्यानंतर त्यांचे अभिप्रायानुसार उर्वरीत ४८३ भक्तनिवास खोल्यांचे नूतनीकरण करुन घेता येईल व त्यानुसार अर्किटेक्ट यांचे कडुन सविस्तर प्लॅन व एस्टीमेट मागविता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,नमुनादाखल करण्यात आलेल्या तीन खोल्यांचे नूतनीकरणाची मा.विश्वस्तांनी समक्ष पहाणी करुन,उर्वरित खोल्यांचे २५-२५ चे टप्प्याने नूतनीकरण करण्यास व याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात,असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख/ अधिक्षक-भक्तनिवासस्थान)

**विषय नं.२५. श्रीसाईबाबा हॉस्पिटल मधील विविध विभागांसाठी फर्निचर व ॲल्युमिनियम पार्टीशनचे काम करणे बाबत**

**निर्णय क्र.३७८** श्रीसाईबाबा हॉस्पीटल, वैद्यकिय संचालक यांनी वेगवगळ्या निवेदनांव्दारे हॉस्पीटलमध्ये ॲल्युमिनीअम पार्टीशन, दरवाजे व फर्निचर तयार करुन मिळणेबाबत वेळोवेळी कळविले आहे. त्यानुसार श्रीसाईबाबा हॉस्पीटलमध्ये करावयाचे कामांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**अ) <u>ॲल्युमिनियम पार्टीशन कामे :-</u>**

१. ऑर्थो पॅसेज ॲल्युमिनीयम दरवाजा
२. न्युरो ओ.टी. व पॅसेज मध्ये ॲल्युमिनीयम दरवाजा
३. न्युरो ओ.टी. :- १. स्टरलायझेशन ॲल्युमिनीयम दरवाजा
२. नर्सेस स्टेशन ॲल्युमिनीयम दरवाजा
४. आय.सी.सी.यु. पॅसेज दरवाजा
५. सी.व्ही.टी.एस. ओ.टी. दरवाजा
६. लिनन डिपार्टमेंट कॅबीन तयार करणे.
७. अपघात विभागात २ ॲल्युमिनीअम पार्टीशन कॅबीन तयार करणे.

**ब) <u>फर्निचर कामे :-</u>**

०१ जनरल ओटी मध्ये ०२ कपाट बनविणे

०२ एम.आर.आय. रुम पॅसेजमध्ये नर्सेस काऊंटर टेबल बनविणे

०३ आय.सी.सी.यु व जी.आय.सी.यु.मध्ये औषध रॅक बनविणे.

०४. औषध भांडारमध्ये २ काऊंटर टेबल तयार करणे.

वरीलप्रमाणे कामे करुन मिळणेबाबत श्रीसाईबाबा हॉस्पीटल यांनी कळविले आहे. याबाबत प्रत्यक्ष पाहणी करुन आवश्यक मोजमापे घेण्यात आली आहेत. त्यानुसार सदर कामास प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रु. ७,०९,०००.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

तरी उपरोक्त कामास व त्याकरीता येणारे खर्चास मान्यता मिळणेस तसेच सदर कामासाठी आर्किटेक्ट शितल जोशी, श्रीरामपूर यांचेकडून सविस्तर प्लॅन, एस्टीमेट व निविदा तयार करुन घेऊन वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेसाठी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२६ सन २००७-२००८ करीता विद्युत,पाणीपुरवठा,ध्वनीक्षेपन, स्वच्छता, बगीचा व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीस तत्वता: मान्यता मिळणे बाबत**

**निर्णय क्र.३७९** सन २००७-०८ सालामध्ये संस्थानचे विदयुत, पाणीपुरवठा, ध्वनीक्षेपण, बांधकाम,बगीचा, स्वच्छता विभागाचे दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक साहित्य तसेच कार्यालयीन व संगणक स्टेशनरी खरेदी करावयाची आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१. | विदयुत, पाणीपुरवठा व ध्वनीक्षेपण विभाग | रु.४९,१६,४३९.०० |
| ०२. | स्वच्छता व बगीचा विभाग | रु. ७,८६,०९८.०० |
| ०३. | बांधकाम विभाग | रु. ४,१३,७४४.०० |

| | | |
|---|---|---|
| ०४. | कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी | रु.१९,५०,२००.०० |
| | एकुण | रु.८०,६६,४८१.०० |

उपरोक्तप्रमाणे सदर खरेदीस अंदाजे रु.८०,६६,४८१/-पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ कलम १७ मध्ये समितीचे कर्तव्ये व अधिकार दिलेले असून त्यातील पोटकलम २ (झ) तरतुदीनुसार सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद केलेले आहे. त्यानुसार वरीलप्रमाणे साहित्य खरेदीकामी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत येईल.

०१. विद्युत, पाणीपुरवठा व ध्वनीक्षेपण विभागासाठी आवश्यक असणारे इलेक्ट्रिकल, हार्डवेअर साहित्य, प्लंबींग व मेंटेनन्स साहित्यासाठी एकत्रित निविदा मागणी करणेत येईल.

०२. स्वच्छता व बगीचा विभागासाठी आवश्यक असणारे साहित्य, खते, औषधे व किटकनाशके साहित्यासाठी एकत्रित निविदा मागणी करणेत येईल.

०३. बांधकाम विभागाचे खरेदीसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी असे वाटते.

अ) सन २००६-०७ मध्ये मे.अल्ट्रा टेक सिमेंट लिमीटेड, पुणे यांचेकडून त्या-त्या वेळी अस्तित्वात असणाऱ्या दराने आवश्यकतेनुसार सिमेंट खरेदी करणेत आलेले आहे. सन २००७-०८ मध्येही कंपनीशी संपर्क साधून अस्तित्वात असलेल्या दराने किंवा आवश्यकता भासल्यास अल्ट्रा टेक, ए.सी.सी., राजश्री बिर्ला व अंबुजा सिमेंटच्या डिलरकडून कोटेशन मागवून बांधकाम विभागामार्फत खरेदी करता येईल.

ब) बांधकाम विभागासाठी आवश्यक असणारे खडी, वाळू, विटा, मुरुम इ. साहित्याचे दर सतत बदलत असल्याने वार्षिक दर कोणीही देत नाही. सबब परिसरातील पुरवठादारांकडून दर मागणी करुन किंवा अडचणीच्या वेळी अस्तित्वात असलेल्या दराने बांधकाम विभागामार्फत खरेदी करणेस तसेच इतर साहित्य कोटेशन मागवून खरेदी करणेत येईल.

०४. कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी साहित्य तसेच झेरॉक्स मशीनसाठी आवश्यक असणारी गेस्टेटनर इंक व मास्टर रोल हे निविदेत समाविष्ट करुन एकत्रित निविदा मागणी करणेत येईल.

उपरोक्त प्रमाणे सन २००७-०८ साठी आवश्यक असणारे वार्षिक साहित्याचे खरेदीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे तत्वतः मान्यतेनंतर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागणी करणेत येईल. त्यानंतर संबंधितांशी मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये चर्चा तथा वाटाघाटी करुन खरेदीबाबत निर्णय घेता येईल. तसेच बांधकाम साहित्य खरेदीसाठी क्र.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २००७-२००८ करीता विद्युत,पाणीपुरवठा,ध्वनीक्षेपन, स्वच्छता, बगीचा व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीस तत्वताः मान्यता देण्यात आली. तसेच वरील क्र.३ "अ" व "ब" नुसार कार्यवाही करणेस मान्यता देणेत आली. (कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.२७** **अॅलम, ब्लीचिंग, क्लोरीन सिलेंडर वार्षिक खरेदीस मंजूरी मिळणे बाबत**

**निर्णय क्र.३८०** पाणी पुरवठा विभागाचे कनकुरी साठवण तलाव येथे पाणी शुध्दीकरणांसाठी ब्लीचिंग पावडर- विक्रम (ग्रासीम) ब्रॅन्ड डी.सी.एम (डी.एस.सी.एल.)आयएसआय मार्क ३४% क्लोरीन उपलब्ध, फेरीक अॅलम - १६ % अॅलोमिना फेरीक उपलब्ध व क्लोरीन गॅस सिलेंडर (१०० किलो सिलेंडर) यांची दैनंदिन कामांसाठी आवश्यकता भासते. मागील वर्षी आपण मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार वार्षिक खरेदीमध्ये निविदा मागवून नियमानुसार खरेदी केलेली आहे. तरी सदरच्या मटेरियलचा चालू वर्षात झालेला खर्च तपशिल खालील प्रमाणे -

| अ.नं. | तपशिल | मागणी कालावधी | मागणी | खर्च | मार्च- ०७अखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ब्लीचिंग पावडर | ०५/०२/२००६ ते ३१/०१/२००७ | २५ टन. | १८ टन | ०७ टन. |
| ०२ | फेरीक अॅलम | २५/०४/२००६ ते ३१/०५/२००७ | ४० टन | ३१.५२५ टन | ८.४७५ टन. |
| ०३ | क्लोरीन गॅस सिलेंडर | ०५/०२/२००६ ते ३१/०१/२००७ | २० सिलेंडर | १४ नग. | ०६ नग. |

पुढील वर्षासाठी नविन निविदा मागवून वरील मटेरियल खरेदी करणे आवश्यक आहे. त्यात खालील प्रमाणे मटेरियलची आवश्यकता आहे.

| अ.नं. | तपशिल | आवश्यकता | अंदाजे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | **ब्लीचिंग पावडर -**<br>विक्रम (ग्रासीम) ब्रॅन्ड डी.सी.एम (डी.एस.सी.एल.),आयएसआय मार्क ३४% क्लोरीन उपलब्ध. | ३० टन. | रुपये १६,५००/- प्रती टन १२.५ % वॅट सह. | ४,९५,०००/- |
| ०२ | **फेरीक अॅलम -**<br>(१६ % अॅलोमिना फेरीक उपलब्ध) | ५० टन. | रुपये ३,६००/- प्रती टन १२.५ % वॅटसह. | १,८०,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | **क्लोरीन गॅस सिलेंडर -** (प्रत्येकी १०० किलोचे) | २५ नग. | रुपये ४,४००/- प्रती नग ४% वॅटसह. | १,१०,०००/- |
| | | | **एकुण अंदाजे खर्च -** | **७,८५,०००/-** |

तरी वरील प्रमाणे पाणी शुध्दीकरणांसाठी लागणारे मटेरियल विहित खरेदी पध्दतीने खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु. ७,८५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग/ पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

**विषय नं.२८ जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी संस्थानतर्फे नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीतील वर्गखोल्या संस्थानच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या वापरासाठी उपलब्ध करणे बाबत**

**निर्णय क्र.३८१** श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता ११वी व इयत्ता १२वी कला, वाणिज्य, व विज्ञान शाखेत सन २००६-०७ मध्ये खालील विवरणानुसार ५५२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

| अ.नं. | इयत्ता | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | ११ वी कला (अ) | ८४ |
| २ | ११ वी कला (ब) | ८४ |
| ३ | ११ वी वाणिज्य | ९९ |
| ४ | ११ वी विज्ञान | ७९ |
| ५ | १२ वी कला | ७५ |
| ६ | १२ वी वाणिज्य | ६२ |
| ७ | १२ वी विज्ञान | ६९ |
| | एकुण | ५५२ |

या विद्यार्थ्यांच्या बैठक व्यवस्थेसाठी कन्या शाळेकडे पुरेशा वर्गखोल्या उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना व शिक्षकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. यासाठी स्वतंत्र इमारत बांधावी लागणार आहे.

शिर्डीतील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी संस्थानने रुपये १,७९,५४,०००/- खर्च करुन नव्याने सुंदर व आदर्श अशी इमारत नुकतीच बांधून दिली आहे. या इमारतीमध्ये ९ हॉल आणि ४८ वर्गखोल्या अशा एकुण ५७ खोल्या उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,शिर्डी यांचे एकुण २८ वर्ग भरतात. उर्वरीत वर्गखोल्या सध्या रिकाम्या असून शाळेच्या वापरासाठी आवश्यक नाहीत.शिर्डीतील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची अतिशय गैरव्यवस्था आहे. या नवीन इमारतीच्या काचा फुटल्या आहेत. तसेच संरक्षण व्यवस्था नाही असे मुख्याध्यापक यांचेकडून समजते.

त्याप्रमाणे स्वच्छतेसाठी स्वतंत्र कामगार नसलेने म्हणावी तशी स्वच्छता राहू शकत नाही. पाणीपुरवठा व्यवस्था संस्थानतर्फेच देणेत आलेली आहे.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,शिर्डी यांचेसाठी सध्या तळ मजला व पहिल्या मजल्यावरील उपलब्ध असलेल्या एकुण ५७ पैकी ३२ वर्गखोल्या पुरेशा होतील.

उर्वरीत ९ हॉल व दुसऱ्या माळयावरील सर्व १६ वर्गखोल्या संस्थानच्या कनिष्ठ महाविद्यालयाचे वापरासाठी सध्या तात्पुरती व्यवस्था म्हणून उपलब्ध करुन घेतल्यास सुंदर व आदर्श अशा इमारतीची दुरुस्ती, देखभाल व संरक्षण संस्थानतर्फे चांगल्या प्रकारे करता येईल.जिल्हा परिषद , अहमदनगर यांचेशी समन्वय साधून कनिष्ठ महाविद्यालयासाठी वर्गखोल्या उपलब्ध करण्याची विनंती करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, कन्या विद्या मंदिरातील इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी आर्टस् व कॉमर्स ज्युनिअर कॉलेजचे वर्ग जिल्हा परिषद शाळेत भरविण्यात यावे व शास्त्र शाखेस प्रयोगशाळा आवश्यक असल्याने इयत्ता ११वी व १२वी चे वर्ग कन्या विद्या मंदिर येथेच ठेवण्यात यावे, असें ठरलें.

(कार्यवाही-मुख्याध्यापिका,कन्याशाळा/ बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२९. ज्युनिअर केजी या वर्गाची तिसरी तुकडी सुरु करणे बाबत.**

**निर्णय क्र.३८२** श्रीसाईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये ज्यु. के.जी. ते इ.१०वी पर्यंतचे वर्ग चालविले जातात. चालू शैक्षणिक वर्ष २००७-०८ साठी ज्युनिअर के.जी. या वर्गाचे दोन तुकडयांसाठी १०० विद्यार्थी प्रवेश पुर्ण झालेले आहेत. चालू वर्षी ज्युनिअर के.जी. विद्यार्थ्यांची संख्या वाढली असल्याने ९० विद्यार्थ्यांची प्रतिक्षा यादीत नोंद घेणेत आलेली आहे. प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणेकामी पालकांकडून वारंवार विचारणा होत आहे.

चालू वर्षात ज्युनिअर के.जी. या वर्गाची तिसरी तुकडी सुरु करावयाची झालेस त्यासाठी एक जादा वर्गाची आवश्यकता आहे. सध्या शाळेकडे वर्ग उपलब्ध नाहीत. सदर तुकडी सुरु करावयाची झाल्यास सध्या कन्या विद्या मंदिरकडे दिलेला हॉलेमध्ये ही तिसरी तुकडी सुरु करता येईल. या वर्गासाठी एक शिक्षकाची (वेतनश्रेणी ३०५०-७५-३९५०-८०-४५९०) आवश्यकता लागणार आहे.

त्यासाठी वार्षिक पगार खर्च अंदाजे रु.९०,०००/- इतका येईल. चालू वर्षात ज्युनिअर के.जी. या वर्गाची तिसरी तुकडीतील ७० विद्यार्थ्यांची वार्षिक शालेय फी स्वरुपात रु.९१,०००/- व वार्षिक स्कूलबस फी स्वरुपात रु.६१,५००/- असे एकूण रु.१,५२,५००/- इतकी अंदाजे रक्कम फी रुपाने जमा होईल. सध्या शाळेकडे अतिरिक्त वर्ग/ खोल्या शिल्लक नाहीत. तसेच, सि.केजी. पासून पुढे दरवर्षी एक नवीन तुकडी सुरु करावी लागणार आहे.

आतापर्यन्त चार स्कूलबसेस शाळेसाठी देण्यात आलेल्या आहेत. यावर्षी (सन २००७-०८ ) विद्यार्थी संख्या वाढल्याने आणखी एक स्कुल बसची आवश्यकता लागणार आहे. त्यासाठी एक वाहनचालक, विद्यार्थी स्कुलबसमधून आणणे नेणेकामी एक मदतनीस, व वर्गासाठी एक स्त्री मदतनीसची आवश्यकता आहे.

तरी चालू वर्ष २००७-०८ पासून ज्युनिअर के.जी. या वर्गाची ३ री तुकडी सुरु करणे व त्यासाठी एक शिक्षक, एक वाहनचालक , एक स्कुलबस मदतनीस व आया यांची नेमणूक करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग/ प्राचार्या,इंग्लिश मीडियम स्कुल)

**विषय नं.३०** **पुस्तके/फोटो छपाई कामाचे कोटेशन्स उघडून निर्णय घेणे बाबत**

**निर्णय क्र.३८३** मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१.०३.२००७ रोजीचे सभेतील निर्णयानुसार तसेच जा.नं.एसएसएस/ वशी/ प्रकाशने/५९४२/२००७ दि.१४.०४.२००७ ने विविध भाषेतील १२ पुस्तके व ४ प्रकारची वेगवेगळ्या साईजमधील फोटो छपाई करणेकामी ३० निवडक प्रेसधारकांना छपाई कामाचे कोटेशन पाठवून ते दि.०५.०५.२००७ पर्यंत मुदतीत भरुन जमा करणेविषयी कळविण्यात आले होते. त्यानुसार खालील १२ निवडक प्रेसधारकांची कोटेशन्स प्राप्त झाली आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे | ०२ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर |
| ०३ | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. | ०४ | मे कल्याणी कार्पोरेशन, पुणे |
| ०५ | महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे | ०६ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर |
| ०७ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | ०८ | मे सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि., मुंबई |
| ०९ | मे.प्रिंटमन, मुंबई | १० | मे ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई |
| ११ | मे ओनस इम्प्रेशन, मुंबई | १२ | मे. अमल ऑफसेट प्रा.लि., मुंबई/नाशिक |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता प्रेसधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

अ-०१) पुस्तके-

| अ.नं | कोटेशनसादरकर्त्यांचे नाव | श्रीसाई सच्चरित्र (पोथी ) मराठी | श्रीसाई सतचरित्र इंग्रजी | श्रीसाई सतचरित्र गुजराथी | श्रीसाईनाथ सगुणोपासना मराठी आरती | श्रीसाईनाथ स्तवन मंजरी व सुमनाजंली मराठी | श्रीसाईनाथ स्तवन मंजरी गुजराथी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| | छपाई संख्या | ६०,००० | १,००,००० | ६०,००० | १,००,००० | १,००,००० | ५,००० |
| ०१ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे | ६५.५९ | २८.६३ | ३३.६९ | १.६९ | १.६९ | **१.७९** |
| ०२ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर | ६०.०० | २३.४० | ३०.८० | --- | --- | --- |
| ०३ | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. | ६३.१५ | २८.८० | ३४.३० | १.९४ | १.९४ | १.९४ |
| ०४ | मे कल्याणी कार्पोरेशन, पुणे | **५९.९०** | **२३.३०** | **२८.९०** | १.९५ | **१.५०** | ३.४० |
| ०५ | महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे | ७८.२२ | २९.६६ | ३९.७५ | २.५२ | २.०५ | २.६० |
| ०६ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर | ६०.८८ | २३.९४ | २९.१८ | --- | --- | --- |
| ०७ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | ६६.०० | २७.२५ | ३२.८० | १.९५ | १.५३ | २.२८ |
| ०८ | मे सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि., मुंबई | ७०.०० | ३१.०० | ३८.०० | २.०० | १.७० | २.९० |
| ०९ | मे.प्रिंटमन, मुंबई | ६८.५० | २५.२० | ३१.५० | २.१६ | १.७१ | ३.२४ |
| १० | मे ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई | ७२.८० | २८.०० | ३६.४० | १.८७ | १.६६ | ३.१० |
| ११ | मे ओनस इम्प्रेशन, मुंबई | ८०.५० | २६.५० | ३७.३० | **१.६८** | १.६५ | १.८४ |
| १२ | मे. अमल ऑफसेट प्रा.लि., मुंबई/नाशिक | -- | -- | -- | २.६७ | २.२० | ३.९३ |

अ-०२) पुस्तके-

| अ.नं | कोटेशनसादरकर्त्यांचे नाव | अर्वाचीन भक्त व संतलिलामृत यातील साईबाबांचे ४ अध्याय | दैनंदिन दासबोध मराठी | श्रीसदगुरु साईनाथ सगुणोपासना मराठी आरतीचा हिंदी अनुवाद | श्रीसाई सतचरित्र सार (हिंदी दोहावली ) | श्रीसाईनाथ भजनमाला हिंदी | श्रीसाईंचे सत्य चरित्र मराठी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ |
| | छपाई संख्या | ५,००० | ५,००० | २५,००० | ५,००० | २,००० | १०,००० |
| ०१ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि. पुणे | ३.९३ | ७२.२३ | ७.३७ | ६३.२३ | २६.३३ | ७५.८५ |
| ०२ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर | -- | -- | -- | -- | -- | ८५.०० |
| ०३ | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. | ४.२५ | ६२.५२ | **६.००** | ६२.१३ | २९.४९ | ७९.७४ |
| ०४ | मे कल्याणी कार्पोरेशन, पुणे | ५.५० | ५९.७५ | ७.२५ | ६१.७५ | २४.७५ | **६६.९०** |
| ०५ | महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे | ५.०० | ६८.४० | ८.२० | ७५.१५ | ३५.९५ | ९१.१० |
| ०६ | मे.चेरी ऑफसेट प्रिंटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर | --- | --- | --- | --- | --- | --- |
| ०७ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | ४.५० | ५८.०० | ६.३० | **६१.७५** | २७.०० | ७८.५० |
| ०८ | मे सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि., मुंबई | ५.७० | ६८.०० | ९.५० | ७४.०० | ४५.०० | ८८.०० |
| ०९ | मे.प्रिंटमन, मुंबई | ५.६७ | ७५.६० | ८.०१ | -- | -- | १०५.०३ |
| १० | मे ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई | ५.२० | ६७.६० | १०.४० | ७४.८८ | ३६.४० | ९३.६० |
| ११ | मे ओनस इम्प्रेशन, मुंबई | **३.९०** | **५८.००** | ७.१५ | ६२.५० | **२४.७०** | ६७.०० |
| १२ | मे. अमल ऑफसेट प्रा.लि., मुंबई/नाशिक | ६.८७ | -- | ९.०५ | -- | -- | -- |

ब) फोटो-

| अ.नं | कोटेशनसादरकर्त्यांचे नाव | दगडावर बसलेले बाबा फोटो (कृष्ण धवल) १४"X २०" | भिंती लगत उभे असलेले बाबा फोटो (कृष्ण धवल) १४"X २०" | श्रीसाईबाबा मुर्ती फोटो (४ रंगात) १४" X २०" | द्वारकामाईत बसलेले कानाला हात लावलेले बाबा फोटो (४ रंगात ) १४" X २०" |
|---|---|---|---|---|---|
| | छपाई संख्या | १ लाख नग | १ लाख नग | २ लाख नग | २ लाख नग |
| ०१ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे | २.०३ | २.०३ | १.९३ | १.९३ |
| ०२ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर | १.९५ | १.९५ | २.११ | २.११ |
| ०३ | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. | १.९८ | १.९८ | २.१२ | २.१२ |
| ०४ | मे कल्याणी कार्पोरेशन, पुणे | १.९५ | १.९५ | **१.९२** | **१.९२** |
| ०५ | महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे | २.८५ | २.८५ | ३.१५ | ३.१५ |
| ०६ | मे.चेरी ऑफसेट प्रिंटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर | २.४१ | २.४१ | २.३६ | २.३६ |
| ०७ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | २.३० | २.३० | २.४१ | २.४१ |
| ०८ | मे सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि., मुंबई | २.६० | २.६० | २.६५ | २.६५ |
| ०९ | मे.प्रिंटमन, मुंबई | २.५२ | २.५२ | २.७० | २.७० |
| १० | मे ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई | २.४४ | २.४४ | २.६० | २.६० |
| ११ | मे ओनस इम्प्रेशन, मुंबई | **१.९०** | **१.९०** | १.९३ | १.९३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | मे. अमल ऑफसेट प्रा.लि., मुंबई/नाशिक | ३.१७ | ३.१७ | २.०० | २.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन अधोरेखीत केल्याप्रमाणे निम्नतम दर स्विकारणेत यावेत असे ठरले. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३१ नविन प्रसादालयासाठी लागणारा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा वीजपुरवठा जोडून घेणेसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांनी कळविलेली रक्कम भरणेबाबत..**

**निर्णय नं.३८४** मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,पुणे यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीमार्फत गट नंबर ८०-८५ A, निमगांव को-हाळे शिवार येथे नविन प्रसादालयाच्या प्रकल्प उभारणीसाठी बांधकाम विभागामार्फत कार्यादेश देण्यात आलेला आहे. नविन प्रसादालयाचे काम पूर्णत्वाकडे असून त्याठिकाणी आपणाला महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा विजपुरवठा जोडून घ्यावा लागणार आहे.

त्याकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे संस्थानने वीजपुरवठयाची मागणी त्यांच्या विहीत नमुन्यातील अर्जाद्वारे केली होती.

(१).श्रीराम फीडरमधून नविन प्रसादालयापर्यंत वीज वाहिनी टाकणेस मा.अधिक्षक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी , अहमदनगर यांनी त्यांचे पत्र क्र.एसई / एएनआरसी / टेक / ४३९८ / दिनांक ०५-०४-२००७ अन्वये रु.४,५३,०७५.०० इतका खर्च कळविला आहे.

(२) नविन प्रसादालयाला महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा विजपुरवठा जोडून चालू करणेकामी मा.अधिक्षक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी , अहमदनगर यांनी त्यांचे पत्र क्र.एसई /एनआरसी / टेक / ४३९१ / दिनांक :-०५-०४-२००७ अन्वये खालीलप्रमाणे खर्च कळविला आहे.

| अ.क्र. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | फिक्स्ड सर्व्हिस कनेक्शन चार्जेस | १५,०००.०० |
| ०२ | इन्स्टालेशन टेस्टींग फी | २००.०० |
| ०३ | १.३ % नॉन रिफंडेबल सुपरव्हीजन चार्जेस | ०५,९००.०० |
| ०४ | टेस्टींग ऑफ मीटरींग इक्विपमेंट | ०५,२५०.०० |
| ०५ | सिक्युरीटी डिपॉझीट | ३,५६,८१५.०० |
| ०६ | कॉस्ट ऑफ ॲग्रीमेंट ॲड बुकलेट फी | २५०.०० |
| ०७ | ॲप्लिकेशन ॲण्ड रजिस्ट्रेशन फी | १,०००.०० |
| | एकुण रुपये | ३,८४,४१५.०० |

या वीजपुरवठ्याचे (वीजवापराचे ) आवश्यक असणारे ट्रायव्हेक्टर मीटर व क्युबिकल बॉक्सबाबत त्यांनी उपरोक्त पत्रात ट्रायव्हेक्टर मीटर व क्युबिकल बॉक्स संस्थानने खरेदी करून बसवून घ्यावा असे कळविले आहे व सोबत या ट्रायव्हेक्टर मीटर व क्युबिकल बॉक्सच्या ॲप्रुव्हड मेकची यादी दिली आहे.

दिनांक ०६/०१/२००७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील मे.आदिती इलेक्ट्रिकल्स, नासिक यांना नविन प्रसादालयाच्या इलेक्ट्रिफिकेशनच्या कामासाठी रु. ३,०३,९९,६६१.१५ इतक्या रकमेचा कार्यादेश संस्थान पत्र क्र. एसएसएस/ विद्युत/६५१/२००७ दिनांक १२.०१.२००७ अन्वये देण्यात आलेला आहे. या कामामध्ये ट्रायव्हेक्टर मीटर व क्युबिकल बॉक्स व ऑईल सर्किट ब्रेकर पुरवून बसवून चालू करण्याचे कामाचा समावेश केलेला नाही. आपणाला ट्रायव्हेक्टर मीटर व क्युबिकल बॉक्ससोबतच ऑईल सर्किट ब्रेकर बसवावा लागणार आहे. नविन प्रसादालयाचे काम हे ,महाराष्ट्र शासनाच्या सी.एस.आर. रेटवर आधारीत आहे. व या सी. एस. आर मध्ये सी. एस. आर कोड १०-५-२ नुसार ट्रायव्हेक्टर मीटर व क्युबिकल बॉक्सची किंमत रु.१,३९,०९८.७५ व सी.एस.आर. कोड १०-४-५ नुसार ऑईल सर्किट ब्रेकरची किंमत रु.१,७४,११६.२५ मिळून रु.३,१३,२१५.०० इतका खर्च अपेक्षित आहे. नविन प्रसादालयाचे काम हे महाराष्ट्र शासनाच्या सी.एस.आर. रेटवर आधारीत आहे. त्यामुळे मे. आदिती इलेक्ट्रिकल्स, नासिक यांचे कडून सी.एस.आर. रेटवर ट्रायव्हेक्टर मीटर व क्युबिकल बॉक्स व ऑईल सर्किट ब्रेकर पुरवून बसवून चालू करण्याचे काम करुन घेता येईल.

उपरोक्तप्रमाणे नविन प्रसादालयासाठी विजपुरवठा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा विजपुरवठा जोडून घेणेसाठी (१) रु. ४,५३,०७५.००+(२) रु.३,८४,४१५.००+(३)रु. ३,१३,२१५.०० मिळून रु.११,०४,४३५.०० इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.३२ महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ यांचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट न. १९५ पैकी संस्थानचे मालकीचे क्षेत्रात हेलीपॅड तयार करण्याचे कामात आलेली एल.टी.लाईन,पोल शिफ्टींगबाबत.**

**निर्णय नं.३८५** संस्थानने महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ यांचे मौजे निमगांव को-हाळे येथील घेतलेल्या जमिनीपैकी गट न. १९५ पै. श्री साईबाबा संस्थानचे मालकीचे क्षेत्रात अत्यंत तातडीने हेलीपॅड तयार करुन हेलीकॉप्टर सुविधा चालू करणेबाबत संस्थानने काम चालू केलेले आहे.

गट न. १९५ पै. क्षेत्रातून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीची एल.टी. लाईन गेलेली असून सदरची लाईन शिफ्ट केल्याशिवाय हेलीकॉप्टर सेवा सुरु करणे अशक्य आहे. त्यामुळे एल.टी. लाईन त्वरीत शिफ्ट करणे गरजेचे आहे. याकामी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे संस्थानने विनंती केली होती.

मा.कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी , संगमनेर यांनी त्यांचे पत्र क्र.ईई/एसएनजीआर/टेक/शिफ्टींग/३०१०/दिनांक १२/०४/२००७अन्वये एल.टी. लाईन शिफ्ट करणेकामी मटेरीअल खर्च रु.८१,५५०.०० व मा.सहाय्यक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी राहाता यांनी एल.टी. लाईन शिफ्ट करणेसाठी सुपरव्हिजन चार्जेस + पोल चार्जेस = रु. १२,५६७.०० मिळून रु. ९४,११७.०० इतका खर्च कळविला आहे.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ यांचे मौजे निमगांव को-हाळे येथील घेतलेल्या जमिनीपैकी गट न. १९५ पै. श्री साईबाबा संस्थानचे मालकीचे क्षेत्रात हेलीपॅड तयार करण्याच्या कामात आलेली एल.टी. लाईन पोल शिफ्टींगसाठी लागणा-या रु. ९४,११७.०० इतका खर्च असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.३३** **श्री साईमंदीरात गाभाऱ्यात बसविण्यात आलेल्या वातानुकुलीत यंत्रणेचे उत्पादक कंपनी मे.ब्लू स्टार लि. मुंबई यांना या यंत्रणेचे देखभालीसाठी रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत.**

**निर्णय नं.३८६** श्री साईमंदीरात गाभाऱ्यात फेब्रूवारी २००४ मध्ये वायुवीजन यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. या यंत्रणेचा गॅरंटी पिरिअड हा फेब्रूवारी २००५ मध्ये संपलेला आहे. वेळोवेळी येणाऱ्या अडचणींबाबत संस्थानतर्फे कंपनीला कळविल्यानंतर त्यांचा तांत्रिक तज्ञ वेळोवेळी येऊन योग्य ती कार्यवाही करून दुरुस्ती करून अडचण दूर करतात. माहे जून २००६ मध्ये या यंत्रणेपैकी एका मशिनचा कॉप्रेसर खराब झाल्याने कंपनीला कळविले होते. त्यांनी जुन्या खराब झालेल्या कॉप्रेसरच्या बदली नवा कॉप्रेसर ( अंदाजे रू. ५५,०००.०० किंमतीचा ) बदलून दिला.त्यावेळी कंपनीच्या प्रतिनिधींनी, ही पहिलीच वेळ व तीर्थक्षेत्र असल्याने गॅरंटी पिरिअड संपल्यानंतरही कंपनीने वरिष्ठ पातळीवरून ही केस सहानुभूतीपूर्वक हाताळून स्पेशल केस म्हणून हा रू. ५५,०००.०० किंमतीचा नवा कॉप्रेसर दिला आहे. व यापुढे कंपनीशी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट ( रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप ) करणे गरजेचे आहे , कारण सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट ( रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप ) पिरिअडमध्ये मशिनरीचा कोणताही मेकॅनिकल पार्ट नैसर्गिकरित्या ( मशिनरीशी कन्झुमरने कोणतीही छेडछाड केलेली नसल्यास) खराब झाल्यास तो बदलून देणे कंपनीला सक्तीचे आहे. जर सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट ( रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप ) केलेले नसेल आणि मशिनरीला मेकॅनिकल प्रॉब्लेम आले व मशिनरीचे मेकॅनिकल स्पेअर्स बदलण्याची गरज लागली तर या स्पेअर्सचे ( जसे उपरोक्त कॉप्रेसरचे रू.५५,०००.०० ) बील भरावे लागेल. असे सांगितले होते.

या रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टमध्ये सर्व मेकॅनिकल स्पेअर्स हे रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट असल्याने त्या स्पेअर्सची कोणतीही किंमत न घेता स्पेअर्स बदलून मिळतात व शिवाय वर्षातून तीन वेळा कंपनीचा प्रशिक्षित एक्स्पर्ट मेकॅनिक येऊन मशिनरीची साफसफाई करून क्लिनींग करून सेटींग करून देत असतो. जेणेकरून मशिनरी सुरळीत चालू राहणे शक्य होणार आहे.

मशिनरी सुरळीत चालू राहावी यासाठी मशिनरीच्या या मूळ उत्पादक कंपनीशी - ब्लू स्टार कंपनीशी मागील वर्षी हे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यात आले होते.या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टच्या पिरीअडमध्ये मे.ब्लू स्टार लिमिटेड , मुंबई यांचे इंजिनिअर्स / मेकॅनिकने तीन वेळा सर्व्हिस व्हिजीट तसेच या व्हिजीटव्यतिरीक्त इतर वेळीही काही अडचणी निर्माण झाल्या असतांना संस्थानच्या दुरध्वनीला प्रतिसाद देऊन त्या त्या वेळी तातडीने येऊन सर्व्हिस दिली असून या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टच्या पिरीअडमध्ये मशिनरीच्या पॅनेलमधील व मशिनरीतील खराब झालेले तीन पी.सी.बी. विनामुल्य बदलून दिलेले आहेत.या मंदिराच्या श्रीमूर्तीच्या गाभा-याचे एअरकंडिशनर मशिनरीचे सन २००६-२००७ या वर्षातील वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट ( रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप ) मे.ब्लू स्टार लिमिटेड , मुंबई यांना रू. ३०,५५७.०० इतक्या रकमेला देण्यात आलेले होते. आता सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टची मुदत संपलेली असून, मे.ब्लू स्टार लिमिटेड , मुंबई यांना दिनांक ०१/०४/२००७ ते दिनांक ३१/०३/२००८ या कालावधीच्या कॉन्ट्रॅक्टसाठी रू. २९,९४७.५० + सर्व्हिस टॅक्स १२ % रु. ३,५९४.०० + एज्युकेशन सेस ०.२ % रु.

७२.०० मिळून रू. ३३,६१३.५० (पुर्णांकित रक्कम रुपये ३३,६१३.०० ०० इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली व यापुढे दरवर्षी संस्थानमधील महत्त्वाच्या मशिनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशिनरी, विद्युत विभागातील विविध मशिनरी, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईबाबा रुग्णालयातील विविध मशिनरी, एअरकंडीशनरस्, वायुवीजन यंत्रणा, वगैरे ) वार्षिक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशिनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशिनरींच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डिलरला देण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.३४ नविन स्टाफ क्वार्टरसाठी लागणारा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा वीजपुरवठा जोडून घेणेसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांनी कळविलेली रक्कम भरणेबाबत..**

**निर्णय नं.३८७** मे अस्मिता कंस्ट्रक्शन , मुंबई यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडीमार्फत गट नंबर १६९, निमगांव को-हाळे शिवार येथे नविन स्टाफ क्वार्टरच्या उभारणीसाठी कार्यादेश देण्यात आलेला आहे. नविन स्टाफ क्वार्टरचे काम पूर्णत्वाकडे असून त्याठिकाणी आपणाला महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा विजपुरवठा जोडून घ्यावा लागणार आहे.

त्याकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे संस्थानने वीजपुरवठयाची मागणी त्यांच्या विहीत नमुन्यातील अर्जाद्वारे केली होती.

(१).श्रीराम फीडरमधून नविन स्टाफ क्वार्टरपर्यंत वीज वाहिनी टाकणेस मा.अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी , अहमदनगर यांनी त्यांचे पत्र क्र.एसई/एएनआरसी/टेक/५१६६/ दिनांक १७/०४/२००७ अन्वये रु.५,३६,०६०.०० इतका खर्च कळविला आहे.

(२) नविन स्टाफ क्वार्टरला महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा विजपुरवठा जोडून चालू करणेकामी मा.अधिक्षक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी , अहमदनगर यांनी त्यांचे पत्र क्र.एसई/एएनआरसी /टेक/५१६७/दिनांक १७-०४-२००७ अन्वये खालीलप्रमाणे खर्च कळविला आहे.

| अ.क्र. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | फिक्स्ड सर्व्हिस कनेक्शन चार्जेस | १५,०००.०० |
| ०२ | इन्स्टालेशन टेस्टींग फी | २००.०० |
| ०३ | १.३ % नॉन रिफंडेबल सुपरव्हीजन चार्जेस | ०६,९७०.०० |
| ०४ | टेस्टींग ऑफ मीटरींग इक्विपमेंट | ०५,२५०.०० |
| ०५ | सिक्युरीटी डिपॉझीट | १,४७,४५०.०० |
| ०६ | कॉस्ट ऑफ ॲग्रीमेंट ॲड बुकलेट फी | २५०.०० |
| ०७ | ॲप्लिकेशन ॲण्ड रजिस्ट्रेशन फी | १,०००.०० |
| | एकुण रुपये | १,७६,१२०.०० |

या वीजपुरवठ्याचे (वीजवापराचे ) आवश्यक असणारे ट्रायव्हेक्टर मीटर व क्युबिकल बॉक्सबाबत त्यांनी उपरोक्त पत्रात या ट्रायव्हेक्टर मीटर व क्युबिकल बॉक्स संस्थानने खरेदी करून बसवून घ्यावा असे कळविले आहे व सोबत या ट्रायव्हेक्टर मीटर व क्युबिकल बॉक्सच्या ॲप्रुव्हड मेकची यादी दिली आहे.

मे. अस्मिता कंस्ट्रक्शन, मुंबई यांना नविन स्टाफ क्वार्टरच्या बांधकाम व इलेक्ट्रिफिकेशनच्या कामासाठी एकत्रीत कार्यादेश संस्थान पत्र क्र. एसएसएस / बांधकाम / १३४३१/ २००५ दि.२१.११.२००५ अन्वये देण्यात आला आहे . या कामामध्ये ट्रायव्हेक्टर मीटर व क्युबिकल बॉक्स पुरवून बसवून चालू करण्याचे कामाचा समावेश केलेला नाही. नविन स्टाफ क्वार्टरचे काम हे महाराष्ट्र शासनाच्या सी.एस.आर. रेटवर आधारीत आहे. व सी.एस.आर. मध्ये सी.एस.आर.कोड १०-५-२ नुसार ट्रायव्हेक्टर मीटर व क्युबिकल बॉक्सची किंमत रु.१,३९,०९८.७५ इतका खर्च अपेक्षित आहे. नविन स्टाफ क्वार्टरचे काम हे महाराष्ट्र शासनाच्या सी.एस.आर. रेटवर आधारीत आहे. त्यामुळे मे. अस्मिता कंस्ट्रक्शन, मुंबई यांचे कडून सी.एस.आर.रेटवर ट्रायव्हेक्टर मीटर व क्युबिकल बॉक्स पुरवून बसवून चालू करण्याचे काम करुन घेता येईल.

उपरोक्तप्रमाणे नविन स्टाफ क्वार्टरसाठी विजपुरवठा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा विजपुरवठाजोडून घेणेसाठी लागणा-या (१) रु. ५,३६,०६०.०० + (२). रु.१,७६,१२०.०० + (३) रु. १,३९,०९९.०० मिळून रु.८,५१,२७९.०० इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं.३५ शिर्डी येथील ३३/११ केव्ही उपकेंद्र जागेत महावितरण कंपनीचे विश्रामगृह उभारणीस ना हरकत दाखला देणे बाबत**

**निर्णय क्र.३८८** मा.उपकार्यकारी अभियंता (स्थापत्य), प्रबलित सिमेंट खांब कारखाना, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, राहुरी (खुर्द), जिल्हा अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक उपकाअ/स्था./प्रसिखाका/ राहुरी/२४९, दिनांक २४ एप्रिल, २००७ अन्वये त्यांना मौजे निमगांव को-हाळे येथील गट नंबर ८७ व ८८ पैकी ५२ आर जागा / जमीन ३३/११ केव्ही उपकेंद्रासाठी मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ९-१० ऑगष्ट, २००३ निर्णय क्रमांक ३७१ अन्वये ११ वर्षे मुदतीच्या कालावधीसाठी देण्यात आलेल्या जागेत विश्रामगृह बांधणेची परवानगी मिळावी म्हणून विनंती केलेली आहे.

सदरची जागा परत मिळावी म्हणून मा.अध्यक्षसो., श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी मा. ना. श्री. दिलीपराव वळसे पा., उर्जा मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना इकडील पत्र क्रमांक एसएसएस/वशी/विधी/१३२८१/२००५, दिनांक १६ नोव्हेंबर, २००५ अन्वये विनंती केलेली आहे.

शिर्डी विकास आराखडयामध्ये आरक्षण क्रमांक ५५ मध्ये सर्व्हे नंबर ५५ मध्ये क्षेत्र ०४ हेक्टर ७२ आर हे वीज मंडळासाठी राखीव आहे.

वीज मंडळास दिलेली जागा फक्त ११ वर्षे कालावधीसाठी आहे. सदर कालावधी संपल्यानंतर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे परस्पर संमतीने व सहमतीने अटी शर्तीनुसार नुतनीकरण होणार आहे.

शिर्डी येथे महाराष्ट्र राज्य वीज मंडळास विकास आराखडयात स्वतंत्ररित्या जागा दर्शविण्यात आलेली असल्याने त्यांना संस्थानने दिलेल्या मौजे निमगांव को-हाळे मधील गट नंबर ८७ व ८८ पैकी मधील जागेत विश्रामगृह बांधणेस परवानगी देणे उचित होणार नाही. तथापि, ३३/११ केव्ही वीज उपकेंद्राच्या दुरुस्ती व देखभालीच्या चाचण्या घेण्यासाठी व उपकरणांच्या दुरुस्ती बदलासाठी येणा-या तंत्रज्ञ कर्मचा-यांसाठी तात्पुरत्या स्वरुपाचे छोटेशे विश्रामगृह (२-३ खोल्यांचे कामगार निवास) बांधण्यास हरकत नाही.

याकामी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना तात्पुरत्या स्वरुपाचे छोटेशे विश्रामगृह (२-३ खोल्यांचे कामगार निवास) बांधणेस परवानगी देणेबाबत ना हरकत दाखला देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना वरीलप्रमाणे विश्रामगृह बांधकामासाठी आवश्यक त्या सुरक्षा नियमांचे पालन करुन तसेच संक्षम विभागाकडून बांधकाम परवाना घेऊन बांधकाम करणेबाबत अटींचा समावेश करुन ना हरकत दाखला देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख/ विद्युत विभाग प्रमुख)

व्यवस्थापन समितीची सभदिनांक २०.०५.२००७

**विषय नं.३६** **मंदीर परिसर ते नविन प्रसादालय बस सेवेकरिता नविन बसेस खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३८९** दि.०१/०२/२००७ चे मा. उपसमितीचे सभेत व दि.१७/०२/२००७ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.११५ नुसार जा. क्रं. एसएसएस/वाहन/४०८०/२००७ दि.१२/०३/२००७ ने अशोक लेलॅण्ड कंपनीचे अधिकृत डिलर ०१) ॲटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चरर्स, प्रा.लि. औरंगाबाद, ०२) ॲटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चरर्स, प्रा.लि. नाशिक, ०३) सोनल ॲटोमोबाईल्स, अहमदनगर यांचेकडून कोटेशन बोलावून दि.३१/०३/२००७ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत कोटेशन उघडणे करीता व चर्चा व वाटाघाटी करून पुढील निर्णया करीता प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन अशोक लेलॅण्ड कंपनीच्या वरील तिन निविदाधारकांना सभेत समक्ष बोलाविण्यात येऊन लो फ्लोअर बसेसचे सुधारीत दर देणे बाबत सांगण्यात आले होते.

दि.३०/०४/२००७ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत ॲटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चरर्स, प्रा.लि. हे महाराष्ट्र, गुजरात व आंध्रप्रदेश या राज्यात अशोक लेलॅण्डचे डिलर असलेने त्यांचे औरंगाबाद ब्रॅचचे डिलर यांचेकडून खालील प्रमाणे सुधारीत दर बोलावुन प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

**-: अशोक लेलॅण्ड कंपनीच्या स्टॅग बस व सेमी लो फ्लोअर बसेसची माहिती :-**

| अ. नं. | तपशिल | स्टॅग बस | सेमी लो फ्लोअर बस |
|---|---|---|---|
| ०१ | किंमत प्रति बस (रू.) | ९,६५,८१८.०० | २९,६५,५५०.०० |
| ०२ | इंजिन | युरो-२ | युरो-३ |
| ०३ | उपलब्धता कालावधी | २.० ते २.६ महिने | ३ महिने |
| ०४ | स्टेअरींग | मेकॅनिकल स्टेअरींग | पॉवर स्टेअरींग |
| ०५ | सस्पेंशन | लिफ स्प्रिंग सस्पेंशन | एअर सस्पेंशन |
| ०६ | टायर साइज | ७-५०-१६ | १०-२०-१६ |
| ०७ | आसन क्षमता | ३६ - स्टॅण्डर्ड सिट | अ) ३९ - लक्झरी सिट<br>ब) ४५/५० - स्टॅण्डर्ड सिट |
| ०८ | पर्याय | नॉन ए.सी. | ए.सी. / नॉन ए.सी. |
| ०९ | व्हिल बेस | ४२०० m.m. | ५६३९ m.m. |
| १० | बस बॉडी | स्टॅण्डर्ड | वायकिंग |

यावर चर्चा होऊन, प्रस्तावित चार बसेस पैकी प्रायोगिक तत्वावर दोन बसेसची प्रथम खरेदी करण्यात यावी. सेमी लो फ्लोअर बसेस खरेदी करणे अगोदर बसेसची समक्ष जाऊन पहाणी करावी असे ठरले.

सदर निर्णयानुसार, दि.०२/०५/२००७ रोजी मा.सदस्य श्री अभंग साहेब, श्री वाबळे साहेब, व सौ उर्मिला जाधव यांनी पी.एम.टी. वर्कशॉप, पुणे येथे जाऊन लो फ्लोअर बसेसची पहाणी केली. पहाणी केले नंतर मा. सदस्य यांनी च्लो फ्लोअर बसेसची लांबी जास्त असलेने व युरो-३ इंजिन असल्या कारणाने लो फ्लोअर बसेस ऐवजी स्टॅग मॉडेलचे इंजिन चेसीची खरेदी करून आपले गरजेनुरूप बॉडी बांधनी करून घ्यावी. या करीता इंजिन चेसीजचे व बॉडी बिल्डर यांचे कडून कोटेशन बोलवावे असे सुचविले.

तरी स्टॅग मॉडेलचे चेसी करीता अशोक लेलॅण्ड कंपनीच्या अधिकृत डिलरकडून तसेच नामांकित बॉडी बिल्डरकडून बॉडी बांधणीचे कोटेशन मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, स्टॅग मॉडेलचे चेसी करीता अशोक लेलॅण्ड कंपनीच्या अधिकृत डिलरकडून कोटेशन मागविण्यात यावेत. तसेच पी.एम.टी. च्या बसेसचे ज्या बॉडी बिल्डरकडून बॉडी बांधणीचे काम करण्यात येते त्यांचेकडून याकामी कोटेशन मागविण्यात यावे,असें ठरलें.

(कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं.३७** **सीटी ॲण्ड गिल्ड लंडन यांचे अभ्यासक्रम २००७-२००८ वर्षात चालविणे बाबत**

**निर्णय क्र.३९०** मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.०९/०७/२००५ रोजी पार पडलेल्या बैठकीतील विषय क्र.६६ निर्णय क्र.३१० नुसार सिटी ॲण्ड गिल्डस्,लंडन व कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज यांचे वतीने चालविले जाणारे विविध व्यावसायीक अभ्यासक्रम शिर्डी व शिर्डी परिसरातील १७ शैक्षणिक संस्थामध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे सहकार्याने सुरु करण्याबाबतचे निर्णयास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र.एसएसएस/आयटीआय/आस्था/८२३५/०५ दि.०३ ऑगस्ट २००५ व क्रमांक १०४४६/०५ दि.२०/०९/२००५ तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या व्यवस्थापन समितीच्या दि ०८/०५/२००५ व दि.०९/०७/२००५ च्या बैठकीतील विषय क्र.६६ व निर्णय क्र.३१० नुसार शासनाकडे मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

महाराष्ट्र शासन,विधी व न्याय विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.सासंवि २००५/६९८/(१०९) का १६, मंत्रालय, मुबंई ४०० ०३२ दि.०४ सप्टेंबर २००६ नुसार मंजुरी दिलेली आहे. **शासन निर्णय** - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधि नियम, २००४ मधील कलम १७ (२) (ढ) मध्ये संस्थान सर्व प्रकारच्या धर्म निरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील तसेच शिर्डी वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील या तरतुदीस अधिन राहुन अहमदनगर जिल्हयातील पुढील संस्थांमध्ये तंत्र शिक्षणाचे कोर्सेस सुरू करण्याकरीता श्री साईबाबा संस्थान मार्फत येणा-या खर्चाच्या ७५% म्हणजेच रू. ५९,६८,७५०/- (अक्षरी रू. एकोण्णसाठ लाख, आडूसष्ट हजार सातशे पन्नास मात्र) इतकी रक्कम खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शिक्षण संस्थेचे नांव | कोर्सेस संख्या |
|---|---|---|
| ०१ | प्रवरा रूरल एज्युकेशन सोसायटीचे आयटीआय, लोणी, ता. राहाता | ०३ कोर्सेस |
| ०२ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आयटीआय,शिर्डी. ता. राहाता | ०२ कोर्सेस |
| ०३ | शिर्डी साई रूरल इन्स्टीटयुटचे, आयटीआय, राहाता, ता. राहाता | ०२ कोर्सेस |
| ०४ | लक्ष्मीनारायण ट्रस्टचे,आयटीआय, राहुरी, ता. राहुरी | ०२ कोर्सेस |
| ०५ | मारूतराव घुले पा. आयटीआय, भेंडा, ता. नेवासा | ०१ कोर्स |
| ०६ | सेन्ट झेवियर, आयटीआय, श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर | ०२ कोर्सेस |
| ०७ | विखे पा. फाउंडेशनचे , आयटीआय, अहमदगनर | ०३ कोर्सेस |
| ०८ | संजिवनी एज्युकेशन सोसायटीचे अभियांत्रिकी महाविद्यालय, कोपरगांव | ०२ कोर्सेस |
| ०९ | के.बी.पी. तंत्रनिकेतन, कोपरगांव | ०२ कोर्सेस |
| १० | अमृतवाहिनी, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, ता. संगमनेर | ०२ कोर्सेस |
| ११ | प्रवरा कन्या विद्यामंदिर लोणी, ता. राहाता | ०२ कोर्सेस |
| १२ | इंजिनिअरींग कॉलेज, लोणी, ता. राहाता | ०२ कोर्सेस |
| १३ | महिला तंत्र निकेतन, लोणी, ता. राहाता. | ०१ कोर्स |
| १४ | तंत्र निकेतन महाविद्यालय, लोणी, ता. राहाता | ०१ कोर्स |
| १५ | पी.व्ही.पी. कॉलेज, लोणी, ता. राहाता | ०३ कोर्सेस |
| १६ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ता. राहाता | ०३ कोर्सेस |
| १७ | कॉलेज ऑफ होम सायन्स, लोणी, ता. राहाता. | ०१ कोर्स |

वरील सर्व कोर्सेसाठी प्रवेश क्षमता प्रति कोर्स २५ प्रशिक्षणार्थी इतकी आहे व त्यानुसार एकंदरीत एका चार महिन्याचे सत्रासाठी ३४ x २५ असे एकूण ८५० पैकी प्रत्यक्ष प्रवेश ७२३ झालेले आहेत.

वरिल शैक्षणिक अभ्यासक्रम हे दि. ०१ नोव्हेंबर ०६ ते २८ फेब्रुवारी ०७ पर्यंत पुर्ण करण्यात येवुन सिटी ॲण्ड गिल्डस, लंडन यांचे तज्ञ समितीने दि. ०८ ते १० फेब्रुवारी ०७ चे काळात अभ्यासक्रमांची पडताळणी केलेले आहे तसेच समाधान व्यक्त केले आहे. या कोर्सेसच्या अंतिम परिक्षा सिटी ॲण्ड गिल्डस, लंडन यांचे परिक्षा समितीव्दारे पार पाडल्या आहेत.

दि. ११/०३/०७ रोजी मा. श्री जाधव साहेब, प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांनी व दि. १०/०३/०७ रोजी त्याच्या सोबत असलेले वरिष्ठ अधिकारी यांनी सीटी व गिल्डस यांच्या अभ्यासक्रमाचे कामकाजा विषयी श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत भेट देवुन माहिती घेतली व समाधान व्यक्त केलेले आहे.

आतापर्यंत संस्थानकडून खालीलप्रमाणे खर्च अदा करण्यात आला आहे.

| अ. नं. | संस्थेचे नांव | कोर्सेचे नांव | शासन मान्य मंजूर प्रवेश क्षमता | प्रत्यक्ष नियमित प्रवेश | प्रत्यक्ष नियमित प्रवेशानुसार रू.५००/- प्रमाणे आदा केलेली रक्कम | डी.डी. नं. / चेक नंबर दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | प्रवरा रूरल एज्युकेशन सोसायटीचे आयटीआय, लोणी, ता. राहाता | १.मोटार व्हेईकल इंजि.<br>२.फॅब्री.वेल्डींग व पाईप वर्क<br>३.रेफ्रि.& एअर कंडिशनिंग | २५<br>२५<br>२५ | २३<br>२५<br>२५ | ३६,५००/- | ०४७३९८<br>दि.१८/०२/०७ |
| ०२ | शिर्डी साई रूरल इन्स्टीटयुटचे, आयटीआय, राहाता, ता. राहाता | १.फॅब्री.वेल्डींग व पाईप वर्क<br>२. टु व्हिलर रिपेअर | २५<br>२५ | २५<br>२५ | २५,०००/- | ४४५६३३<br>दि.१८/०२/०७ |
| ०३ | लक्ष्मीनारायण ट्रस्टचे, आयटीआय, राहुरी, ता. राहुरी | १.मेटल मशिनिग<br>२.इलेक्ट्रीकल इन्स्टॉलेशन | २५<br>२५ | २५<br>२५ | २५,०००/- | ०४७३९९<br>दि.१८/०२/०७ |
| ०४ | मारूतराव घुले पा. आयटीआय, भेंडा, ता. नेवासा | १. बेसिक इलेक्ट्रॉनिक्स | २५ | २५ | १२,५००/- | ०४७३९२<br>दि.१८/०२/०७ |
| ०५ | सेन्ट झेवियर, आयटीआय, श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर | १.फॅब्री.वेल्डींग व पाईप वर्क<br>२.मेटल मशिनिग | २५<br>२५ | ०९<br>२० | १४,५००/- | ०४७३९३<br>दि.१८/०२/०७ |
| ०६ | विखे पा. फाउंडेशनचे , आयटीआय, अहमदगनर | १.मोटार व्हेईकल इंजि.<br>२.फॅब्री.वेल्डींग व पाईप वर्क<br>३.इलेक्ट्रीकल इन्स्टॉलेशन | २५<br>२५<br>२५ | २१<br>२५<br>२१ | ३३,५००/- | ०४७४००<br>दि.१८/०२/०७ |
| ०७ | संजिवनी एज्युकेशन सोसायटीचे अभियांत्रिकी महाविद्यालय, कोपरगांव | १.रेफ्रि.& एअर कंडिशनिंग<br>२.बेसिक इलेक्ट्रॉनिक्स | २५<br>२५ | ००<br>०९ | ४,५००/- | ५६४५०७<br>दि.१८/०२/०७ |
| ०८ | के.बी.पी. तंत्रनिकेतन, कोपरगांव | १.मोटार व्हेईकल इंजि.<br>२.फॅब्री.वेल्डींग व पाईप वर्क | २५<br>२५ | ०८<br>०८ | ८,०००/- | ५६४५०६<br>दि.१८/०२/०७ |
| ०९ | अमृतवाहिनी, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, संगमनेर ता. संगमनेर | १.मोटार व्हेईकल इंजि.<br>२.प्लंबर | २५<br>२५ | २५<br>२५ | २५,०००/- | ०४७४०१<br>दि.१८/०२/०७ |
| १० | प्रवरा कन्या विद्यामंदिर लोणी, ता. राहाता | १.ब्युटी थेरपी<br>२.गारमेन्ट मेकिंग & मॅन्यु. | २५<br>२५ | २५<br>२५ | २५,०००/- | ०४७४०२<br>दि.१८/०२/०७ |
| ११ | इंजिनिअरींग कॉलेज, लोणी, ता. राहाता | १.मेटल मशिनिंग<br>२.वुड ट्रेड | २५<br>२५ | २५<br>१८ | २१,५००/- | ०४७३९४<br>दि.१८/०२/०७ |
| १२ | महिला तंत्र निकेतन, लोणी, ता. राहाता. | १. बेसिक इलेक्ट्रॉनिक्स | २५ | २५ | १२,५००/- | ०४७३९५<br>दि.१८/०२/०७ |
| १३ | तंत्र निकेतन महाविद्यालय, लोणी, ता. राहाता | १.बेसिक मेसनरी | २५ | २५ | १२,५००/- | ०४७३९६<br>दि.१८/०२/०७ |
| १४ | पी.व्ही.पी. कॉलेज, लोणी, ता. राहाता | १.ब्युटी थेरपी<br>२.स्पोकन इंग्लिश<br>३.ॲप्लाईड आय.टी. | २५<br>२५<br>२५ | २५<br>२५<br>२५ | ३७,५००/- | ०४७४०३<br>दि.१८/०२/०७ |
| १५ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ता. राहाता | १.ब्युटी थेरपी<br>२.स्पोकन इंग्लिश<br>३.हॉस्पीटॉलिटी | २५<br>२५<br>२५ | २५<br>२५<br>२५ | ३७,५००/- | ४४५६५४<br>दि.१८/०२/०७ |
| १६ | कॉलेज ऑफ होम सायन्स, लोणी, ता. राहाता. | १.फुड प्रोसेसिंग | २५ | १८ | ९,०००/- | ०४७३९७<br>दि.१८/०२/०७ |
| | | | ८०० | ६८० | ३,४०,०००/- | |
| १७ | श्री साईबाबा संस्थान | १.मेटल मशिनिंग | २५ | १९ | २१,५००/- | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आयटीआय,शिर्डी. ता. राहाता | २.इलेक्ट्रीकल इन्स्टॉलेशन | २५ | २४ | | |
| | | | ८५० | ७२३ | - | - |

वरीलप्रमाणे १ ते १६ यांना एकूण रक्कम रू.३,४०,०००/- आदा केलेली आहे तसेच सिटी ॲण्ड गिल्डस यांच्या एकूण देय रक्कम रू. ९,०३,७५०/- पैकी देय फि रक्कम रू.४,५१,२५०/- डी.डी.क्र. ०४७४०४ दि. १८/०२/२००७ नुसार आदा केलेली आहे.

तसेच सिटी ॲण्ड गिल्डस यांनी केलेल्या नियोजनानुसार टाटा मोटर्स लि.पुणे येथे दि. १३/०२/२००७ ते १४/०२/२००७ रोजी १७ निदेशकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यासाठी प्रति निदेशक रू. १०००/- व त्यावरील सेवा कर यासाठी एकूण रू. १९,०८१/- डी.डी.नं. २५७३३९ दि.०५/०३/०७ नुसार आदा करण्यात आली. अशा प्रकारे एकूण रू.८,१०,३३१/- आदा करण्यात आलेली आहेत. उर्वरीत रक्कम रू.७,९२,५००/- मंजुर रक्कम रू. ५९,६८,७५०/- मधुन आदा करता येईल. संबंधीत रू. ३,४०,०००/- दुसरा हप्ता त्या-त्या संबंधीत शैक्षणिक संस्थेव्दारे लेखापरिक्षक अहवाल / कागदपत्रे पुर्तता झाल्यानंतर आदा करण्यात येणार आहे. तसेच सिटी ॲण्ड गिल्डस यांची उर्वरीत रक्कम रू.४,५२,५००/- त्यांचेकडून कार्यवाहीपुर्ण झाल्यानंतर त्यावेळेस आदा करता येईल.

सदरच्या कार्यवाहीबाबतचा अंतरीम अहवाल मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दि. १३/०३/२००७ रोजी पाठविला आहे.

आता चालू शैक्षणिक सत्रात मागील निर्णय क्र. ३१० नुसार संबंधीत १७ शैक्षणिक संस्थामध्ये त्या-त्या संस्थेच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे कोर्सेस चालविण्यास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल तसेच औ.प्र.केंद्र, अकोले यांनी सदरील कोर्सेस त्यांचे संस्थेत सुरू करणेबाबत विनंती केलेली आहे. औ.प्र.संस्था, अकोले येथे अभ्यासक्रम सुरू करावयाचे झाल्यास दोन कोर्सेसाठी २५ प्रशिक्षणार्थी प्रति कोर्स याप्रमाणे सुरू करावे लागतील. त्यासाठी वर्ष भरात ०३ शैक्षणिक सत्र मिळून रू. ३,३७,५००/-इतका वाढीव खर्च अपेक्षित आहे. त्याप्रमाणे अंदाजपत्रकात तरतुद करून शासनाची मान्यता मागण्याच्या प्रस्तावात त्याचा समावेश करावा लागेल.

तरी सिटी ॲण्ड गिल्डस यांचे कोर्सेस चालू शैक्षणिक सत्रात चालविणेकामी तसेच त्यासाठी विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

**विषय नं.३८** **श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सत्र २००७ साठी प्रशिक्षणार्थी प्रवेश देणे बाबत.**

**निर्णय क्र.३९१** औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ऑगष्ट २००७ चे सत्रापासून सुरू होणारे शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया माहे जुन २००७ पासून सुरू करावी लागणार आहे. त्याची पुर्वतयारी आतापासूनच करणेसाठी प्रवेश प्रणालीच्या धोरणात्मक बाबींवर आवश्यक तो निर्णय मा. व्यवस्थापन समिती यांचेकडून होणे आवश्यक आहे.

सन - १९९५ पुर्वी औ.प्र.संस्थेमध्ये उमेदवारांना प्रवेश देणेकामी आलेल्या अर्जांची एकत्रित जनरल मेरीट यादी तयार केली जात असे व उमेदवारांना गुणानुक्रमे प्रवेश दिले जात असत. त्याकरीता शिर्डी मध्ये वास्तव्य असणा-या उमेदवारांना ५% गुण, तालुक्यात वास्तव्य असणा-या उमेदवारांना ३% गुण व अहमदनगर जिल्हयासाठी १% गुण अधिक देवून गुणवत्ता यादी केली जात असे.

मा. श्री द.म. सुकथनकर, यांचे अध्यक्षतेखालील व्यवस्थापन मंडळाने १९९६ मध्ये प्रवेश पध्दतीत बदल करून खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे शिर्डीसह शिर्डी परिसरातील १५ कि. मी.त्रिज्येत येणा-या गांवातील उमेदवारांना प्रवेशासाठी उपलब्ध जागांच्या ८० % जागा राखीव ठेवून उर्वरीत सर्व उमेदवारांना २० % जागा राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला होता. शिर्डीसह शिर्डी पासून १५ कि.मी. परिसरात कायम वास्तव्य असणारा उमेदवार हा त्या गांवातील मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेतच इयत्ता ८ वी, ९ वी, १० वी शिक्षण घेवून व वार्षिक परिक्षेत बसून उत्तीर्ण झालेला असावा. तसेच संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यासाठी विशेषबाब म्हणून विहीत केलेल्या परिक्षेत त्याना मिळालेल्या एकूण गुणात२ % वाढ करून गुणवत्ता यादी तयार करण्यात येते मात्र ही सवलत मुलगा किंवा मुलगी यांचेसाठी, एखाद्या कर्मचा-यास त्याच्या सेवाकाळात एकदाच मिळते.

तात्कालीन मा.व्यवस्थापन मंडळ यांचे निर्णयानुसार व शासनाने विहीत केलेल्या आरक्षण पध्दतीप्रमाणे श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रवेशासाठीचा व्यवसायनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | अभ्यासक्रम | आवश्यक शैक्षणिक अर्हता | कालावधी | प्रवेश क्षमता (नियमित जागा) | सुपर न्युममरी | एकुण जागांची प्रवेशासाठी क्षेत्र निहाय विभागणी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | शिर्डी प शिर्डी पासून १५ कि.मी. परीसरात कायम वास्तव्य असणारे उमेदवार | उर्वरीत सर्व उमेदवार |
| १ | टूल अँड डाय मेकर | इ. १० वी उत्तीर्ण | ०३ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| २ | टर्नर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०२ | ११ | ०३ |
| ३ | मशिनिष्ट ग्राईंडर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०२ | ११ | ०३ |
| ४ | फिटर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ५ | इलेक्ट्रीशियन | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ६ | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेन्टेनन्स | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ७ | रेफ्रिजरेशन, ॲण्ड एअर कन्डीशनिंग मेकॅनिक | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ८ | मोटार मेकॅनिक व्हेईकल | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ९ | वेल्डर | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | २४ | ०४ | २२ | ०६ |
| १० | ट्रॅक्टर मकॅनिक | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ३२ | ०६ | ३० | ०८ |
| | | | | १७६ | ३२ | १६४ | ४४ |

तसेच संस्थेमध्ये क्राप्टसमन फुड प्रॉडक्शन ( व्हेजेटेरीयन ) व कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामर ॲसिस्टंट (COPA) हे एक वर्ष मुदतीचे व प्रत्येकी १६ जागांची प्रवेश क्षमता असलेले दोन अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत शासनाकडे मुदतीत प्रस्ताव पाठविला आहे. शासनाकडून त्याला मान्यता मिळाल्यास त्यामध्येही प्रवेश देण्याची कार्यवाही करता येईल.

मागील वर्षी मा. व्यवस्थापन समितीने दिनांक -२४/०४/२००६ रोजी झालेल्या सभेत विषय नं. १५ निर्णय क्रमांक २७५ अन्वये उमेदवारांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत निर्णय घेण्यात आला, त्यानुसारही शिर्डी व शिर्डी पासून १५ कि.मी. च्या गावातील उमेदवारांसाठी ८० % जागांचे वरिलप्रमाणे आरक्षण चालू ठेवलेले आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत चालू वर्षी १० व्यवसायाचे प्रशिक्षणासाठी उमेदवारांना प्रवेश द्यावयाचा आहे. सर्व व्यवसायांना केंद्रशासनाची कायम मान्यता मिळालेली आहे. वरील तक्त्यात दर्शविलेल्या सुपरन्युमररीच्या अतिरीक्त जागा भरणेसाठी मागील दोन वर्षात प्रशिक्षण सोडून गेलेल्या उमेदवारांचे प्रमाणास अनुसरून शासनाकडे विहीत नमुन्यात प्रस्ताव सादर करावा लागतो. शासनाकडून मंजूरी मिळाले नंतर या अतिरिक्त जागा भरणेबाबत कार्यवाही करण्यात येते. या जागा भरण्यासाठी शासनाकडून मान्यता मिळेलच असे नाही. शिर्डीसह शिर्डी परिसरातील १५ कि.मी. त्रिज्येत येणा-या गावांची नांवे खालीलप्रमाणे आहेत. त्यानुसार १९९६ पासून या गावांना ८०% जागांवरील प्रवेश राखीव करण्यात आलेले आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | राहाता | २५ | बहादराबाद | ४९ | रांजणगांव-देशमुख |
| २ | साकुरी | २६ | शहापुर | ५० | अंजनापूर |
| ३ | दहिगांव-को-हाळे | २७ | पोहेगांव खु | ५१ | बहादरपुर |
| ४ | पिंपळस | २८ | पोहेगांव बु | ५२ | मढी बु |
| ५ | को-हाळे | २९ | चांदेकसारे | ५३ | मढी खु |
| ६ | नांदुर्खी बु | ३० | घारी | ५४ | देर्डे-को-हाळे |
| ७ | नांदुखी खु | ३१ | डाउच खु | ५५ | देर्डे-चांदवड |
| ८ | डो-हाळे | ३२ | रास्तापुर | ५६ | चांदगव्हाण |
| ९ | कनकुरी | ३३ | नाथुपाटलांची वाडी | ५७ | डाउच बु |
| १० | निमगांव-को-हाळे | ३४ | एकरूखे | ५८ | हिंगणी |
| ११ | निघोज | ३५ | गणेशनगर | ५९ | मुर्शतपुर |
| १२ | सावळीविहीर खु | ३६ | रांजणगांव | ६० | कोपरगांव |
| १३ | सावळीविहीर बु | ३७ | अस्तगांव | ६१ | धारणगांव |
| १४ | सोनेवाडी | ३८ | कालेवाडी | ६२ | जेउर पाटोदा |
| १५ | पिंपळवाडी | ३९ | संवत्सर | ६३ | जेउर कुंभारी |
| १६ | रूई | ४० | कोकमठाण | ६४ | शिंगणापूर |
| १७ | केलवड | ४१ | लक्ष्मणवाडी | ६५ | रामपूर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | खडके-वाके | ४२ | कान्हेगांव | ६६ | आदमाने वस्ती |
| १९ | काकडी | ४३ | वारी | ६७ | आडगांव |
| २० | डांगेवाडी | ४४ | देवगांव | ६८ | पिंपरी - निर्मळ |
| २१ | डांगेवाडी-कोपरगांव | ४५ | पुणतांबा | ६९ | धनगरवाडी |
| २२ | सोयेगांव | ४६ | रामपुरवाडी | ७० | शिंगवे |
| २३ | वेस | ४७ | वाकडी | ७१ | सडे |
| २४ | जवळके | ४८ | मनेगांव | ७२ | शिर्डी |

शासनाने प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून उपलब्ध जागांपैकी खालीलप्रमाणे व्यवसाय निहाय जागा राखीव ठेवलेल्या आहेत. त्यानुसार नियमित जागा भरण्यात याव्यात.

अ - मागासवर्गीयासाठी राखीव जागा

| | | |
|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती व बौध्द धर्म स्विकारलेल्या व्यक्ती | १३ % |
| २ | अनुसचित जमाती (विशिष्ट भागा बाहेरील जमाती धरून) | ७% |
| ३ | विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती ) | ३% |
| ४ | भटक्या जमाती (एन टी-१)( जुलै-१९९० पुर्वीच्या २८ व तत्सम ) | २.५ % |
| ५ | भटक्या जमाती (एनटी-२ ) ( धनगर व तत्सम जमाती ) | ३.५ % |
| ६ | भटक्या जमाती (एनटी-३ ) (वंजारी व तत्सम जमाती ) | २ % |
| ७ | इतर मागास वर्गीयांकरीता | १९ % |

एकूण- ५० %

ब. अपंग उमेदवारांसाठी ३ % आरक्षण.

क. महिलांसाठी व्यवसाय निहाय २५ % आरक्षण.

ड. तांत्रिक विषयासह परीक्षा पास उमेदवारांना व्यवसाय निहाय २५ % आरक्षण

इ. संरक्षण सेवेतील व्यक्तीसाठी १ % जागा राखीव.

फ. सर्टिफाईड ( बोल्स्टर ) स्कुलमधील व्यक्ती १% जागा राखीव.

उमेदवारांना निवडपत्र व संधीपत्र पाठविणात येणार नाहीत, त्याऐवजी अर्ज स्विकतीचे वेळी प्रवेश प्रक्रियेबाबतचे वेळापत्रक देण्यात येते. त्यानुसार त्या त्या प्रवेश फेरीनुसार प्रवेश देण्यात येतात.

उमेदवाराने अर्जात व्यवसायाचे नांव लिहू नये, आलेल्या अर्जांची शैक्षणिक अर्हतेनुसार गुणवत्ता यादी तयार करून, या यादीस अनुसरून व आरक्षण पध्दतीची अमंलबजावणी करून उमेदवारांच्या पसंतीनुसार व्यवसायास प्रवेश देवून प्रवेश प्रक्रिया पुर्ण करण्यात येते.

प्रत्येक उमेदवरास प्रत्येक वर्षाकरीता शैक्षणिक शुल्क रू. १५०० /- व अनामत रक्कम रू. ५०००/- एवढी आकारण्यात येते.

औ.प्र.संस्थेची प्रवेश प्रक्रिया मा. व्यवस्थापन समितीने संमत केलेल्या निर्णयानुसार तसेच शासनाने जारी केलेल्या प्रवेश नियमावलीनुसार पुर्ण करण्यात येते. शासनाने प्रवेश पध्दतीत काही बदल केल्यास त्यानुसार माहिती पुस्तिकेत बदल करण्यात येतो. तसेच संस्थेमध्ये नियमित अभ्यासक्रमांबरोबरच MS-CIT, City & Guild, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ यांचेही अभ्यासक्रम चालतात. संस्थानच्या निरनिराळया कार्यक्रमात औ.प्र.संस्थेचा सहभाग असतो. त्या दृष्टीने तसेच शिस्तीच्या दृष्टीने प्राचार्य यांना आवश्यक वाटतील त्या विदयार्थी व पालक यांच्यासाठीच्या सूचना माहिती पुस्तकात समाविष्ठ करता येतील. चालू वर्षी पासून प्रवेशाबाबत होणा-या निर्णयानंतर त्यानूसारचे आवश्यक तेवढे फेरबदल चालू वर्षी पासून प्रवेशाबाबत होणा-या माहिती पुस्तीकेमध्ये नमुद करता येतील असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २००७-२००८ मध्ये प्रवेश देतांना खालीलप्रमाणे प्रवेश देण्यात यावा.

| अ. नं. | अभ्यासक्रम | आवश्यक शैक्षणिक अर्हता | कालावधी | प्रवेश क्षमता (नियमित जागा) | एकूण जागांची प्रवेशासाठी क्षेत्र निहाय विभागणी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | शिर्डी प शिर्डी पासून १५ कि.मी. परीसरात कायम वास्तव्य असणारे उमेदवार | उर्वरीत सर्व उमेदवार |
| १ | टूल अँड डाय मेकर | इ. १० वी उत्तीर्ण | ०३ वर्षे | १६ | १३ | ०३ |
| २ | टर्नर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | १० | ०२ |
| ३ | मशिनिष्ट ग्राईडर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | १० | ०२ |
| ४ | फिटर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | १३ | ०३ |
| ५ | इलेक्ट्रीशियन | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | १३ | ०३ |
| ६ | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | १३ | ०३ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सिस्टीम मेन्टेनन्स | | | | | |
| ७ | रेफ्रिजरेशन, ॲण्ड एअर कन्डीशनिंग मेकॅनिक | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | १३ | ०३ |
| ८ | मोटार मेकॅनिक व्हेईकल | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | १३ | ०३ |
| ९ | वेल्डर | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | २४ | १९ | ०५ |
| १० | ट्रॅक्टर मकॅनिक | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ३२ | २५ | ०७ |
| | | | | १७६ | १४२ | ३४ |

तसेच राज्यशासनाची तात्पूरती मान्यता मिळाल्यास क्राप्टसमन फुड प्रॉडक्शन ( व्हेजेटेरीयन) व कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामर ॲसिस्टंट (COPA) मिळाल्यास हे व्यवसाय सुरु करुन त्यासाठी प्रवेशे देण्यात यावेत. सुपर न्युमररी जागेवर शासनाचे मान्यतेनंतर मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार प्रवेश देण्यात यावा व त्याबाबत माहितीपुस्तिकेत स्पष्ट उल्लेख करावा असे ठरले.

( कार्यवाही -प्राचार्य,आय.टी.आय. )

**विषय नं.३९ प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेश व नियमित गणवेश खरेदी करणे बाबत**

**निर्णय क्र.३९२** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थी यांना दरवर्षी संस्थान मार्फत कार्यशाळा गणवेष ( डांगरी ) तसेच मुलींनसाठी ॲप्रान देण्यात येतात.

अ) औ.प्र.केंद्रात एकुण दहा व्यवसायाच्या प्रत्येकी दोन युनिट प्रमाणे २० युनिट आहेत तसेच ऑगष्ट २००७ पासुन नविन दोन व्यवसाय युनिट सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे असे एकुण २२ युनिट होतील. कार्यशाळेत प्रात्यक्षिकासाठी प्रशिक्षणार्थ्यांना औद्योगिक आस्थापना प्रमाणे कार्यशाळा गणवेष हा पँट व शर्ट देणेत येतात. खरेदी करावयाचा कार्यशाळा गणवेषाचा तपशिल खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | तपशिल | आवश्यक नग | अंदाजे दर | अदांजे एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेष<br>कापड पोतदार/स्वदेशी/सनफ्लॅक्स<br>हाफ शर्ट तिन पॉकेट<br>पँट रेग्युलर साधी फिनीश एम्ब्रायडरीसह<br>पाच थ्रेड मशिन शिलाई | ३५२ | ४००/- | १,४०,८००.०० |
| ०२ | मुलींसाठी ॲप्रान फक्त टॉप<br>कापड पोतदार/ स्वदेशी/सनफ्लॅक्स<br>तिन पॉकेट,<br>पाच थ्रेड मशिन शिलाई | ३० | १२५/- | ३,७५०.०० |
| | | | एकुण रक्कम | १,४४,५५०.०० |

ब) तसेच सत्र ऑगष्ट २००६ मध्ये प्रशिक्षणार्थ्यांना आवश्यक असलेला नियमीत गणवेष हा आपण प्रशिक्षणार्थी यांचे स्थानिक पुरवठादारांकडुन संस्थेमार्फत खरेदी करुन वितरीत केले आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | नग | अंदाजे दर | अंदाजे एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | प्रशिक्षणार्थी नियमीत गणवेष व बुट | ३५२ | ६५०/- | २,२८,८००.०० |
| ०२ | मुलींसाठी सलवार कुर्ता, ओढणी व बुट | ३० | ४२५/- | १२,७५०.०० |
| | | | एकुण रक्कम | २,४१,५५०.०० |

सत्र ऑगष्ट २००७ ते जुलै २००७ साठी (अ) कार्यशाळा गणवेष खर्च रक्कम रु.१,४४,५५०/- अपेक्षित आहे. (ब) नियमीत गणवेष व बुट खर्च रक्कम रु.२,४१,५५०/- अपेक्षित आहे. सदरील खर्च हा प्रशिक्षणार्थी स्वखर्चाने करतील.

तरी वरील प्रमाणे "अ" चे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेस तसेच "ब" प्रमाणे कार्यवाहीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

**विषय नं.४० संस्थानला अकुशल, कुशल व सुरक्षा कामगार कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी कंत्राटदारांकडून/ ठेकेदारांची नेमणूक करणे बाबत**

**निर्णय क्र.३९३** संस्थानला लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रक्टर्स मार्फत कंत्राटी पध्दतीने सन-१९९१ पासून सुरक्षा कर्मचारी,सन-१९९४ पासून अकुशल कामगार व सन-१९९९ पासून कुशल कामगार पुरविणेत येत आहे.सध्या लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत संस्थानचे संबधीत विभागांना आवश्यकतेनुसार दैनदिन कामासाठी १०२५ कंत्राटी कामगार पुरविणेत येतात.कॉन्ट्रक्टर्स मार्फत कामास घेण्यात येणाऱ्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार,शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ प्रमाणे किमान वेतन दर देण्यात येत आहे.तसेच सुरक्षा अधिकारी,सुरक्षा परिवेक्षक,सशस्त्र सुरक्षा रक्षक यांना चर्चो वाटाघाटीत ठरलेप्रमाणे वेतनदर देण्यात येत आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांना कंत्राटी पध्दतीने अकुशल,कुशल कामगार पुरविणेसाठी मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., पुणे व मे.क्रिस्टल ट्रेड कॉम प्रा.लि., मुंबई यांची लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून तसेच सुरक्षा कर्मचारी पुरविणेसाठी मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई व मे.शिवा इंडस्ट्रियल सिक्युरिटी एजन्सी ( गुजरात ) प्रा.लि., मुंबई यांची सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.०१-०३-२००६ पासून ते दि.२८-०२-२००७ अखेर या कालावधीसाठी नेमणूक करणेत आलेली आहे. सदर ठेकेदारीची/कराराची वाढीव मुदत दि.३१-०५-२००७ अखेर संपत आहे.

सध्या मे बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांचेमार्फत मंदिर परिसरातील विद्युत, प्रशासन, पाणीपुरवठा, मंदिर, लेखाशाखा,प्रसादालय,भांडार,चौकशी,खरेदी,जनसंपर्क,बगीचा,कॅन्टीन,ध्वनीक्षेपण इत्यादि विभागांना प्रतिदिनी २५८ अकुशल,कुशल कंत्राटी कामगार व मे क्रिस्टल ट्रेडकॉम प्रा.लि. यांचेमार्फत संस्थानचे मंदिर परिसराबाहेरील इतर विभागांना (बांधकाम,श्री साईनाथ रुग्णालय, श्रीसाईबाबा हॉस्पीटल,साईबाबा भक्तनिवासस्थान, स्वच्छता, कन्याशाळा, आय.टी.आय., वाहन,इ. मिडीयम स्कुल, धर्मशाळा इत्यादि) विभागांना प्रतिदिनी-४४६ असे एकुण-७०४ अकुशल,कुशल कंत्राटी कामगार पुरविणेत येतात.तसेच मे सुपर प्रोटेक्शन सिक्यु.सर्व्हिसेस प्रा.लि.मुंबई यांचेमार्फत संस्थानचे मंदिर परिसरातील सुरक्षा व्यवस्थेकामी प्रतिदिनी-१९० कंत्राटी सुरक्षा कर्मचारी व मे शिवा इंडस्ट्रियल सिक्यु.एजन्सी (गुजरात) प्रा.लि.मुंबई यांचेमार्फत संस्थानचे मंदिर परिसराबाहेरील ५०० रुम,शैक्षणिक संकुल,धर्मशाळा इत्यादि विभागातील सूरक्षा व्यवस्थेकामी प्रतिदिनी-१३१ असे एकुण-३२१ सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येत आहे.उपरोक्तप्रमाणे प्रतिवर्षी मंदिर व मंदिर परिसराबाहेरील विभांगाकरीता-२ लेबर कॉन्ट्रॅक्टर्स व त्याचप्रमाणे २ सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांची नेमणूक करण्यात येते.

त्यामुळे पुढील एक वर्ष कालावधीसाठी संस्थानला अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नविन ठेकेदारांची/ कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेसाठी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्दीस देऊन मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून " सिलबंद निविदा " मागविणेत आल्या होत्या. " सिलबंद निविदा " फॉर्मस् विक्रीची मुदत दि.१८-०१-२००७ पासून ते दि.३०-०१-२००७ पर्यंत अशी होती. तसेच " सिलबंद निविदा " स्विकारण्याची अंतिम मुदत दि.३१-०१-२००७ रोजी सायंकाळी ५-०० वाजेपर्यंत अशी होती. त्यास अनुसरुन संस्थानला अकुशल,कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी मान्यताप्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकडून एकुण ३८ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. पैकी श्री.सिताराम बापु वैघ या ठेकेदाराचे विनंती वरुन त्यांची निविदा रद्द करणेत आलेली आहे.उर्वरीत ३७ सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७-०२-२००७ रोजीचे सभेपुढे उघडणेत येवून,त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करुन तो मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१-०३-२००७ रोजीचे सभेपुढे विचारार्थ सादर करणेत आला.तसेच सदर दिवशी उपस्थित ३५ कंत्राटदारांशी/ठेकेदारांशी त्यांचे निविदेतील दरांसदर्भात चर्चा/वाटाघाटीचे वेळी,त्यांनी निविदेत देवू केलेल्या दरात आणखी सुट देणार किंवा कसे? याबाबत माहिती लेखी स्वरुपात बंद पाकीटात देणेत यावी असे त्यांना सांगणेत आले.

त्यास अनुसरुन वाटाघाटीचे वेळी संबधीत उपस्थित ३५ कंत्राटदार / ठेकेदारांपैकी ३४ कंत्राटदार/ठेकेदारांनी देवू केलेले अंतीम सुधारीत दर (बंद पाकीटे) प्राप्त झालेली असून ते उघडणेत येवून,त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करणेत आलेला आहेत.तो खालीलप्रमाणे -

| **अ. नं.** | **निविदाधारकाचे नांव व पत्ता** | **प्रतिदिनी वेतनदर (रुपये)** | | | | **सर्व्हिस चार्जेस (टक्केवारी)** | **सर्व्हिस टॅक्स** (टक्केवारी) (१२.२४%) | **अ) किमान पुर्वानुभव-३ वर्ष आवश्यक ब) ठेकेदारी कर्मचारी पुरविण्याची किमान क्षमता- १००० आवश्यक क) वार्षिक उलाढाल (रुपये)** | **कामाचा अनुभव** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **संरक्षण अधिकारी** | **सुरक्षा परिवेक्षक** | **सशस्त्र सुरक्षा रक्षक** | **सुरक्षा गार्ड किमान वेतन दर रुपये-१२३.६१** | | | | |
| **(१)** | **(२)** | **(३)** | **(४)** | **(५)** | **(६)** | **(७)** | **(८)** | **(९)** | **(१०)** |
| ०१ | व्हिज सिक्युरिटी फोर्स प्रा.लि., नवपाडा, **ठाणे (प )-४०० ६०२** | **१७६.७०** | **२६५.०५** | **२६९.०७** | **१७६.७०** | **---** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव-१० वर्षे<br>ब) ---<br>क) --- | १.महाराष्ट्र सोल्युशन कंट्रोल बोर्ड,सायन,मुंबई<br>२.धृव उलन मिल्स प्रा.लि.<br>३.प्रतिभा पाईप्स अँन्ड स्टक्चरर प्रा.लि.व इतर १५ ठिकाणी |
| ०२ | बेस्ट सर्व्हीसेस, शिवाजीनगर, **पुणे-४११ ००५** | **२७५.००** | **२००.००** | **३००.००** | **१४८.००** | **---** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव-२२ वर्षे<br>ब) २०००<br>क) रु. ७.५० कोटी | १.किर्लोस्कर<br>२.फोरमायका<br>३.इस्पाक व इतर ४० ठिकाणी |
| ०३ | मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी अॅन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., एम.जी.रोड, कॅम्प **पुणे-४११ ००१** | **२३३.००** | **१२७.४६** | **१८४.५५ एक्स.स. १३१.३० सि.** | **१२३.६१** | **०.००१ %** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव- ०३ वर्षे<br>ब) ४५०<br>क) रु.१ कोटी १ लाख | १.भारती विद्यापीठ,पुणे<br>२. दिनानाथ हॉस्पीटल,पुणे<br>३. आनंदपुर हॉस्पीटल,पुणे<br>४.श्री साईबाबा संस्थान हॉस्पीटल,शिर्डी व इतर २३ ठिकाणी. |

| अ. नं. | निविदाधारकाचे नांव व पत्ता | प्रतिदिनी वेतनदर (रुपये) | | | | सर्व्हिस चार्जेस (टक्केवारी) | सर्व्हिस टॅक्स (टक्केवारी) (१२.२४%) | अ) किमान पुर्वानुभव-३ वर्ष आवश्यक<br>ब) ठेकेदारी कर्मचारी पुरविण्याची किमान क्षमता- १००० आवश्यक<br>क) वार्षिक उलाढाल (रुपये) | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संरक्षण अधिकारी | सुरक्षा परिवेक्षक | सशस्त्र सुरक्षा रक्षक | सुरक्षा गार्ड किमान वेतन दर रुपये-१२३.६१ | | | | |
| ०४ | जयभवानी एंटरप्राईजेस, महात्मा फुले नगर चिंचवड, **पुणे-४११ ०१९.** | **१३०.००** | **१२१.९४** | **१२५.००** | **११८.०९** | **०.०५%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव-१५ वर्षे<br>ब) ४००० ते ४५००<br>क) रु.६.५० कोटी | १.बजाज ॲटो लि.आकुर्डी<br>२.TAL मॅन्युफॅक्चरींग सोल्युशन्स लि.चिंचवड<br>३.टाटा मोटर्स लि.पिंपरी व इतर ६२ ठिकाणी. |
| ०५ | मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि. विलेपार्ले (वेस्ट ) **मुंबई- ४०० ०५६** | **१३१.३०** | **१२७.४६** | **१८६.२५ एक्स.स. १३१.३० सि.** | **१२३.६१** | **०.०५%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव-१५ वर्षे<br>ब) २०००<br>क) रु.२ कोटी | १.श्री साईबाबा संस्थान, शिर्डी<br>२. शिरपुर गोल्ड रिफायनर लि.शिरपुर<br>३.पद्मावती ऑईल मिल,शिरपुर<br>व इतर ४८ ठिकाणी. |
| ०६ | मे.प्रशांत औद्योगिक कामगार ॲन्ड सुरक्षा रक्षक सहकारी संस्था मर्यादित, निगडी, **पुणे-४११ ०४४** | **१३०.००** | **१२१.९४** | **१२५.००** | **११८.०९** | **०.२५%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव-१० वर्षे<br>ब) २००० ते २५००<br>क) रु. १ कोटी | ---- |
| ०७ | मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इं.) लिमिटेड, **नासिक- ४२२ १०१** | **१४०.००** | **१२१.९३** | **१४०.००** | **११८.०८** | **०.४०%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव- ३० वर्षे<br>ब) २५०००<br>क) रु.१२५ कोटी | १.ॲप्कोअर्न प्रा.लि.<br>२.अदिमा ऑग्रेनीक्स प्रा.लि.<br>३.अनमोल पॅकेजींग व इतर १११ ठिकाणी. |
| ०८ | मे.ड्रॅगॉन सर्व्हीसेस, अंधेरी (वेस्ट ) , **मुंबई-४०० ० ५३** | **१९३.००** | **११५.००** | **१७०.००** | **९०.००** | **०.५०%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव-०६ वर्षे<br>ब) ९००<br>क) रु.१,८६,९५३९६/- | १.श्री सिध्दी विनायक मंदिर<br>२.अभ्युदय को.ऑप.बॅंक लिमिटेड<br>३.नेप्च्युन ग्रुप व इतर ३८ ठिकाणी. |
| ०९ | बी.व्ही.जी.इंडिया लि., शिवाजीनगर, **पुणे-४११ ००५** | --- | --- | --- | --- | **०.७५%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव-१० वर्षे<br>ब) ४६३<br>क) रु.१०० कोटी | १.श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी<br>२.संसद भवन,दिल्ली<br>३.मंत्रालय,मुंबई<br>४.टाटा मोटर्स कंपनी, जमशेदपुर |
| १० | मे.फ्लॅश सिक्युरिटी ॲन्ड इंटेलिजन्स सर्व्हीस, कांदिवली ( ईस्ट ) **मुंबई-** | **११९.७९** | **११२.७९** | **११९.७९** | **१०८.७९** | **१%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव-३० वर्षे<br>ब) --<br>क) रु.१,६६,३५०००/- | १.दळी ॲन्ड समीर इंजिनीअरींग प्रा.लि.चिंचवड<br>२. मेटालीका प्रॉडक्शन ,प्रा.लि. पिंपरी,पुणे<br>३.जयश्री रबर प्रॉडक्टस प्रा.लि.चिंचवड,पुणे<br>व इतर ०५ ठिकाणी. |
| ११ | मे.ईगल हंटर सोलुशन्स लि., जोगेश्वरी (पु ) **मुंबई-४०० ०६०.** | **११५.००** | **१०५.००** | **१५२.००** | **९८.००** | **१%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव-२५ वर्षे<br>ब) --<br>क) रु.१०० कोटी | १.अंबुजा सिमेंट डिस्टर्न लि. रायपूर<br>२.रामगड चिली मिल्स, उत्तर प्रदेश.<br>३.इलेक्ट्रीसिटी बोर्ड ऑफीस<br>४.लार्सन ॲन्ड टुर्बो लि. व इतर ०९ ठिकाणी. |
| १२ | मेडिएटर्स ॲन्ड अजंटा सिक्युरिटी प्रा.लि., सिडको, **औरंगाबाद-४३१ ००३** | **१७३.००** | **१५३.००** | **१७३.००** | **११२.००** | **१%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव- ३३ वर्षे<br>ब) ४०००<br>क) रु.१५ कोटी | १.सारस्वत को-ऑप.बॅंक लिमिटेड,औरंगाबाद<br>२.कॉसमो फिल्म्स लि.औरगांबाद<br>३.गृहम फिम्थ स्टिल प्रॉडक्टस लि. औरगांबाद व इतर १६ ठिकाणी. |
| १३ | मे.टॉप ॲंगल सिक्युरिटीज् ॲन्ड डिटेक्टीव्हज प्रा.लि., अंधेरी (ईस्ट ) **मुंबई-४०० ०९९** | **१९३.००** | **१४०.००** | **१८६.००** | **१२०.००** | **१.२५%** | -- | अ) पुर्वानुभव-०३ वर्षे<br>ब) --<br>क) -- | १.रिलोजिस्टीक (मुंबई) प्रा.लि.उरण.<br>२. रिलायंन्स लॉजीस्टीक्स लि.मुंबई<br>३.सिसीआय लॉजीस्टीक्स लि.मुंबई,व इतर ०९ ठिकाणी. |
| १४ | मे.शिवा इंडस्ट्रियल सिक्युरिटी एजन्सी (गुजरात) प्रा.लि. पंदेसरा, सुरत-३९४२२१ | **१६०.००** | **१३०.००** | **१५०.००** | **१२४.००** | **२%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव- १६ वर्षे<br>ब) १३०<br>क) रु. २५ कोटी | १.श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी<br>२. गुजरात इलेक्ट्रीयिटी बोर्ड बडोदा<br>३.गुजरात पॅकल्स ॲन्ड केमीकल्स लि.भरुच<br>४.बॉम्बे डाईंग,मुंबई |
| १५ | मे.गार्डीयन फॅसिलीटीज मॅनेजमेंट (नागपुर ) प्रा.लि., घाटकोपर लिंक रोड,मानखुर्द | **१८१.००** | **१७५.००** | **३२२.००** | **१६९.००** | **२%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव-१२ वर्षे<br>ब) १५००<br>क) रु.३ कोटी | १.भारत सेल लि.तळोदा<br>२.गोदरेज प्रॉप्रर्टीज ॲन्ड इन्व्हीसमेंट लि.रायगड |

| अ. नं. | निविदाधारकाचे नांव व पत्ता | प्रतिदिनी वेतनदर (रुपये) | | | | सर्व्हिस चार्जेस (टक्केवारी) | सर्व्हिस टॅक्स (टक्केवारी) (१२.२४%) | अ) किमान पुर्वानुभव-३ वर्ष आवश्यक ब) ठेकेदारी कर्मचारी पुरविण्याची किमान क्षमता- १००० आवश्यक क) वार्षिक उलाढाल (रुपये) | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संरक्षण अधिकारी | सुरक्षा परिवेक्षक | सशस्त्र सुरक्षा रक्षक | सुरक्षा गार्ड किमान वेतन दर रुपये-१२३.६१ | | | | |
| | (प)**मुंबई ४०० ०४३** | | | | | | | | ३.हेंदालको लि.रायगड व इतर १०४ ठिकाणी |
| १६ | मे.शेरपा सिक्युरिटी सर्व्हीसेस, खार (वेस्ट ), **मुंबई-४०० ०५२** | **२५०.००** | **१८३.००** | **२८३.००** | **१४०.००** | **२%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव-१२ वर्षे ब) १००० क) रु.१ कोटी | १.सीएमएस ऑल ओव्हर इं. २. इंद्रप्रस्त शॉपींग काम्प्लेक्स बोरीवली,३. ओरीएंटल एन्शोरन्स कंपनी,मुंबई व इतर ०८ ठिकाणी. |
| १७ | मे.कृष्णा सिक्युरिटी सर्व्हीसेस, घाटकोपर (ईस्ट ) **मुंबई-४०० ०७५** | **१५८.००** | **११६.००** | **२३०.००** | **१००.००** | **३%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव-१७ वर्षे ब) १६२० क) रु.७२ लाख | १.सिध्दीविनायक को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.घाटकोपर, मुंबई २.त्रिमुर्ती आर्किटेक, घाटकोपर ३.पोष्ट अँन्ड टेलिग्राम हौसिंग सोसायटी,अंधेरी व इतर ४३ ठिकाणी. |
| १८ | मे.ज्वाला सिक्युरिटी फोर्स, **नागपूर-४४० ०१७** | **२४०.००** | **१८०.००** | **२००.००** | **१२३.६१** | **३%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव-१० वर्षे ब) --- क) --- | १. मे.गोंदिया डिस्ट्रीक सेंट्रल को- ऑप बँक,गोंदिया २. मे.गोंदिया डिस्ट्रीक सेंट्रल को- ऑप बँक,तिरोडा ३. मे.वंदना डिस्ट्रीलर्स प्रा.लि.,नागपुर,व इतर १३५ ठिकाणी. |
| १९ | मे.महात्मा फुले मल्टी सर्व्हीसेस, **परभणी-४३१ ४०१** | **२४७.६३** | **१४७.६३** | **१८७.६३** | **१२३.६३** | **३.३%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव ०३ वर्षे ४ महिने ब) ८५९ क) रु.६६ लाख | १.सिक्युरिटी सर्व्हीसेस, म्हाडा,औरंगाबाद २.सिक्युरिटी सर्व्हीसेस, पुणे,कोरेगांव पार्क ३.सिक्युरिटी सर्व्हीसेस, नरसिंन्हा सहकारी साखर कारखाना,परभणी व इतर १७ ठिकाणी |
| २० | मे.एक्स सर्व्हीसमन मल्टीपल येरवडा, **पुणे-४११ ००६** | **१६६.४३** | **१४४.७९** | **१६५.३३ एक्स.स. १४८.२९ सि.** | **१४०.४२** | **४%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव-१४ वर्षे ब) १२५० क) रु.२.२ कोटी रुपये | १. अमोघ इंन्टरप्राईजेस,पुणे २.आर्मसेल इं.प्रा.लि.पुणे ३.औरंगाबाद इलेक्ट्रीकल प्रा.लि.पुणे व इतर २० ठिकाणी. |
| २१ | प्रखर सिक्युरिटी अॅन्ड अलाइड सर्व्हीसेस, **पुणे-४११ ००१.** | **१५०.००** | **१४०.००** | **१८०.००** | **१२५.००** | **५%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव- ४ वर्षे ब) ६०० क) -- | १.अमी इंडस्ट्रीज लि., पिरानगुट,पुणे २.अॅटलास कॅन्फेक्सनरी, शिवाजीनगर,पुणे ३.अॅटोरायडर्स इंटरनॅशनल लि.कोरेगांव पार्क व इतर ३६ ठिकाणी. |
| २२ | मे.टायगर सिक्युरिटी सर्व्हीसेस, अंधेरी (ईस्ट ), **मुंबई- ४०० ०५९** | **१७५.००** | **१६०.००** | **१६०.००** | **१५५.००** | **५%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव- १५ वर्षे ब) ५०० क) रु.१ कोटी | १.डॉ.बाळाभाई नानावटी हॉस्पीटल,पार्ले (वेस्ट) २.बॉम्बे पॅकेजींग,विक्रोळी ३.दि.बॉम्बे संत झेवीअर कॉलेज,व्हीटी व इतर ०२ ठिकाणी. |
| २३ | मे.फ्लड लाईट सिक्युरिटी सर्व्हीसेस,हडपसर,**पुणे-४११ ०२८.** | **२३०.००** | **२२०.००** | **२१६.००** | **१३४.००** | **५.५%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव- ३ वर्षे ब) २५० क) रु.६० लाख | १.बीएसएनएल, औरंगाबाद |
| २४ | मे.ईगल आय एन्टरप्राईज, जी.आय.डी. **वापी-३९६१९५** | **१३०.००** | **१२२.००** | **१८०.००** | **११८.००** | **१०.%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव-०५ वर्षे ब) १५० क) रु.२ कोटी | १.अलोक इंडस्ट्रीज सिलवासा २.युनायटेड फासफोर्स लि. गुजरात ३.कृष्णा पेट्रोलीयाम लि. व इतर ०३ ठिकाणी |
| २५ | बिसेफ, चंदननगर, नगर-पुणे रोड, **पुणे-४११ ०१४** | **३००.००** | **२००.००** | **२००.००** | **१८०.००** | **१२.५%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव १६ वर्षे ब) २९९० क) रु.१८ कोटी | १. एम.आय.डी.सी.,पुणे २. एम.आय.डी.सी., अ.नगर ३. एल. &टी. ४.किर्लोस्कर ऑईल मिल्स व इतर ३ ठिकाणी |
| २६ | मे.एस.डी.बी.सिसको (इंडीया) लिमिटेड,लिंक रोड, कोंढवा खुर्द,**पुणे-४११ ०४८** | **३८९.००** | **१३९.००** | **१२१.००** | **११८.००** | **१४%** | **१२.२४% +२% EDNC ESS** | अ) पुर्वानुभव- १३ वर्षे ब) १६००० क) रु.७५ कोटी | १. आय.सी.सी.आय.बँक २. यु.टी.आय.बँक ३. ओरीएंटल बँक ऑफ |

| अ. नं. | निविदाधारकाचे नांव व पत्ता | प्रतिदिनी वेतनदर (रुपये) | | | | सर्व्हिस चार्जेस (टक्केवारी) | सर्व्हिस टॅक्स (टक्केवारी) (१२.२४%) | अ) किमान पुर्वानुभव-३ वर्ष आवश्यक<br>ब) ठेकेदारी कर्मचारी पुरविण्याची किमान क्षमता- १००० आवश्यक<br>क) वार्षिक उलाढाल (रुपये) | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संरक्षण अधिकारी | सुरक्षा परिवेक्षक | सशस्त्र सुरक्षा रक्षक | सुरक्षा गार्ड किमान वेतन दर रुपये-१२३.६१ | | | | |
| | | | | | | | | | कॉमर्स व इतर ६५ ठिकाणी |
| २७ | सोल्जर्स इंडस्ट्रियल सिक्युरिटी एजन्सीज देवळाली,<br>**नासिक** | --- | --- | --- | --- | --- | --- | अ) पुर्वानुभव- २६ वर्षे<br>ब) ---<br>क) ---<br>अंतिम दर दिलेले नाही | १.महाराष्ट्र युनिर्व्हसिटी ऑफ हेल्थ सायंन्स<br>२.के.के.वाघ एज्युकेशन सोसायटी<br>३.तुलसी आय.हॉस्पीटल व इतर २६ ठिकाणी |
| २८ | मे.सिध्दार्थ सिक्युरिटी ॲन्ड गोरेगांव (वेस्ट )<br>**मुंबई-४०० १०४** | --- | --- | --- | --- | --- | --- | अ) पुर्वानुभव-५ वर्षे<br>ब) --<br>क) ३<br>अनुपस्थित | १. गोल्डन शिवा फाईनेस्ट प्रा.लि.,मुंबई<br>२. अतुल एन्टरप्राईजेस् , मुंबई<br>३.मालाड इंडस्ट्रीयल युनिटस् को-ऑप.सोसायटी लि.,मुंबई व इतर २६ ठिकाणी. |
| २९ | अविसागर लेबर सप्लायर्स,<br>(श्री.भिवानंद लहु काळे)<br>**मु.पो.शिरडी ता.राहाता** | --- | --- | --- | --- | --- | --- | अ) पुर्वानुभव-०५ वर्षे<br>ब) --<br>क) ३<br>अनुपस्थित | १.वॉटरपार्क,नाशिक<br>२.त्र्यंबकेश्वर नगरपालिका<br>३.शिर्डी नगरपंचायत,शिर्डी |

ब)

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व पत्ता | अकुशल कामगार किमान वेतनदर रु.१२३.६१ प्रतिदिनी | कुशल कामगार किमान वेतनदर रु.१३१.३०प्रतिदिनी | सर्व्हिस चार्जेस (टक्केवारी) | सर्व्हिस टॅक्स (१२.२४%) | अ) किमान पुर्वानुभव-३ वर्ष आवश्यक<br>ब) ठेकेदारी कर्मचारी पुरविण्याची किमान क्षमता- १००० आवश्यक<br>क) वार्षिक उलाढाल (रुपये) | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (७) | (८) | (९) | (१०) |
| ०१. | बेस्ट सर्व्हीसेस,<br>शिवाजीनगर,<br>पुणे | रु.१४८.०० | रु.२००.०० | -- | १२.२४% | अ) पुर्वानुभव-२२ वर्षे<br>ब) २०००<br>क) रु.७.५० कोटी | १.किर्लोस्कर<br>२.फोरमायका<br>३.इस्पाक व इतर ४० ठिकाणी |
| ०२. | व्हिज सिक्युरिटी फोर्स प्रा.लि.,<br>नवपाडा,<br>ठाणे (प ) | रु.१७६.७० | रु.२६५.०५ | -- | १२.२४% | अ) पुर्वानुभव-१० वर्षे<br>ब) ---<br>क) --- | १.महाराष्ट्र सोल्युशन कंट्रोल बोर्ड,सायन,मुंबई<br>२.धृव उलन मिल्स प्रा.लि.<br>३.प्रतिभा पाईप्स ॲन्ड स्टक्चरर प्रा.लि.व इतर १५ ठिकाणी |
| ०३. | जयभवानी एंटरप्राईजेस,<br>महात्मा फुले नगर<br>चिंचवड,<br>**पुणे-** | **रु.११८.०९** | **रु.१२५.७६** | **०.०५%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव-१५ वर्षे<br>ब) ४००० ते ४५००<br>क) रु.६.५ कोटी | १.बजाज ॲटो लि.आकुर्डी<br>२.TAL मॅन्युफॅक्चरींग सोल्युशन्स लि.चिंचवड<br>३.टाटा मोटर्स लि.पिंपरी व इतर ६२ ठिकाणी. |
| ०४ | मे.प्रशांत औद्योगिक कामगार ॲन्ड सुरक्षा रक्षक सहकारी संस्था मर्यादित, निगडी,<br>**पुणे-४११ ०४४** | **रु.११८.०९** | **रु.१२५.७६** | **०.२५%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव-१० वर्षे<br>ब) २००० ते २५००<br>क) रु.१ कोटी | ---- |
| ०५ | श्री.महेंद्र मोहनीराज गंधे,<br>मनिषा,सुयोग गृहनिर्माण मंडळ<br>सावेडी,<br>**अहमदनगर** | **रु.१२३.६१** | **रु.१३१.३०** | **०.२५%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव- १६ वर्षे<br>ब) ३०००<br>क) रु.५ कोटी | १. श्री साईबाबा संस्थान, शिर्डी<br>२. क्रॉप्टन ग्रिव्हुज,नगर<br>३. एल.ॲन्ड टी.,नगर व इतर- ०४ ठिकाणी |
| ०६ | मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इं.) लिमिटेड,<br>**नासिक- ४२२ १०१** | **रु.११८.०८** | **रु.१२५.७८** | **०.४०%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव- ३० वर्षे<br>ब) २५०००<br>क) रु.१२५ कोटी | १.ॲप्कोर्अन प्रा.लि.<br>२.अदिमा ऑग्रेनीक्स प्रा.लि.<br>३.अनमोल पॅकेजींग व इतर १११ ठिकाणी. |
| ०७ | प्रतिक सर्व्हीसेस,सातपुर,<br>**नासिक-४२२ ००७** | **रु.११९.८०** | **रु.१२७.५०** | **०.६५%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव- १६ वर्षे<br>ब) १६५<br>क) रु.२५ लाख | १.मोटार इंडस्ट्रीज लि. नाशिक<br>२.ग्राफाईट इं.लि.,नाशिक |
| ०८ | बी.व्ही.जी.इंडिया लि.,<br>शिवाजीनगर,<br>**पुणे-४११ ००५** | **रु.१२३.६१** | **रु.१३१.३०** | **०.७५%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव-१० वर्षे<br>ब) ४६३<br>क) रु.१०० कोटी | १.श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी<br>२.संसद भवन,दिल्ली<br>३.मंत्रालय,मुंबई<br>४.टाटा मोटर्स कंपनी, जमशेदपुर |
| ०९ | श्री साई एन्टरप्राईजेस,<br>चिंचवड,<br>**पुणे-४११ ०१९** | **रु.१२३.६१** | **रु.१३१.३०** | **०.७५%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव ३ वर्षे<br>ब) ३००<br>क) रु.४० लाख | १.जयश्री पीस्टन्स प्रा.लि. भोसरी,पुणे,<br>२.निता इंजिनीअरींग,भोसरी,पुणे<br>३.कम-अविधा इन्व्हायरो इंजिनिअरींग प्रा.लि.पुणे व इतर ७ ठिकाणी |

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व पत्ता | अकुशल कामगार किमान वेतनदर रु.१२३.६१ प्रतिदिनी | कुशल कामगार किमान वेतनदर रु.१३१.३०प्रतिदिनी | सर्व्हिस चार्जेस (टक्केवारी) | सर्व्हिस टॅक्स (१२.२४%) | अ) किमान पुर्वानुभव-३ वर्ष आवश्यक<br>ब) ठेकेदारी कर्मचारी पुरविण्याची किमान क्षमता-१००० आवश्यक<br>क) वार्षिक उलाढाल (रुपये) | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | ओम साई सर्व्हीसेस,<br>**औरंगाबाद-४३१ ००५** | **रु.११२.००** | **नाही** | **१%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव- ०६ वर्षे<br>ब) २०००<br>क) रु. ५ कोटी | १.मे.टि.टि.के.हेल्थ केअर लि.चिकलठाणा,औरगांबाद<br>२.मे.श्रेय लाईफ सायंन्स प्रा.लि. औरंगाबाद<br>३.मे.पॉली कन्टेनर्स प्रा.लि. औरंगाबाद,व इतर-०६ ठिकाणी |
| ११ | श्रीकृष्ण एन्टरप्राईजेस, कोथरुड,<br>**पुणे-४११ ०२९** | **रु.११४.००** | **रु.११७.००** | **१.५%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव- ०८ वर्षे<br>ब) ९३३<br>क) रु.२ कोटी ६३ लाख | १.A.R.D.E.पुणे<br>२.HEMRL पाषाण,पुणे<br>३.इंडो शॉटल ॲटो पार्ट प्रा.लि.पुणे,<br>व इतर ११ ठिकाणी |
| १२ | मे.गार्डीयन फॅसिलीटीज मॅनेजमेंट (नागपुर ) प्रा.लि.,<br>(प)**मुंबई ४०० ०४३** | **रु.१६९.००** | **रु.१८१.००** | **२%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव-१२ वर्षे<br>ब) १५००<br>क) रु.३ कोटी | १.भारत सेल लि.तळोदा<br>२.गोदरेज प्रॉपर्टीज ॲन्ड इन्व्हीसमेंट लि.रायगड<br>३.हेंदालको लि.रायगड<br>व इतर १०४ ठिकाणी |
| १३ | मे.रिलायंन्स एन्टरप्रायजेस,<br>**पुणे-४११ ००१** | **रु.१०७.००** | **रु.११०.००** | **३%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव-१० वर्षे<br>ब) ११००<br>क) रु.२ कोटी | १. अेआरडीई पाषाण,पुणे<br>२. नाईट फ्रँक,शिवाजीनगर पुणे व इतर २४ ठिकाणी |
| १४ | मे.अेव्हीकॉन अेव्हीएशन कन्सल्टींग सर्व्हीसेस प्रा.लि.,<br>**मुंबई- ४०० ०५२** | **रु.१९१.६६** | **रु.२०२.७६** | **३%** | -- | अ) पुर्वानुभव- ६.१/२ वर्षे<br>ब) ५००<br>क) रु.१ कोटी ५० लाख | १.जेट एअरवेज इंडिया लिमिटेड,मुंबई<br>२.ट्रांन्समॉडल प्रा.लि.मुंबई |
| १५ | मे.महात्मा फुले मल्टी सर्व्हीसेस,<br>**परभणी-४३१ ४०१** | **रु.१२३.६३** | **रु.१३१.३३** | **३.३%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव ०३ वर्षे ४ महिने<br>ब) ८५९<br>क) रु.६६ लाख | १.सिक्युरिटी सर्व्हीसेस, म्हाडा,औरंगाबाद<br>२.सिक्युरिटी सर्व्हीसेस,पुणे, कोरेगांव पार्क<br>३.सिक्युरिटी सर्व्हीसेस, नरसिंन्हा सहकारी साखर कारखाना,परभणी व इतर १७ ठिकाणी |
| १६ | मे.टायगर सिक्युरिटी सर्व्हीसेस,<br>अंधेरी (ईस्ट ),<br>**मुंबई- ४०० ०५९** | **रु.१५०.००** | **रु.१५५.००** | **५%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव- १५ वर्षे<br>ब) ५००<br>क) रु.१ कोटी | १.डॉ.बाळाभाई नानावटी हॉस्पीटल,पार्ले (वेस्ट)<br>२.बॉम्बे पॅकेजींग,विक्रोळी<br>३.दि.बॉम्बे संत झेवीअर कॉलेज,व्हीटी<br>व इतर ०२ ठिकाणी. |
| १७ | मे.साई सर्व्हीसेस,<br>(श्री.उदय माधवराव देशमुख)<br>सिन्नर<br>जि.नाशिक,**नाशिक** | **रु.१२३.६१** | **रु.१३१.३०** | **६.५%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव- ०६ वर्षे<br>ब) ३५०<br>क) रु.७० लाख | १.सिन्नर नगर परिषद,सिन्नर<br>२.ब्रिटीश स्कॅफ्लोडींग इंटरनॅशल लि.सिन्नर<br>३.लक्ष्मी इंडस्ट्रीज प्रा.लि.सिन्नर |
| १८ | बिसेफ, चंदननगर,<br>नगर-पुणे रोड,<br>**पुणे-४११ ०१४** | **रु.१७५.००** | **रु.१८०.००** | **१२.५०%** | **१२.२४%** | अ) पुर्वानुभव १६ वर्षे<br>ब) २९९०<br>क) रु.१८ कोटी | १. एम.आय.डी.सी.,पुणे<br>२. एम.आय.डी.सी.,अ.नगर<br>३. एल. &टी.<br>४.किर्लोस्कर ऑईल मिल्स व इतर ३ ठिकाणी |
| १९ | सोल्जर्स इंडस्ट्रियल सिक्युरिटी एजन्सीज देवळाली,<br>**नासिक** | ---- | ---- | ---- | | अ) पुर्वानुभव- २६ वर्षे | १.महाराष्ट्र युनिर्व्हसिटी ऑफ हेल्थ सायंन्स<br>२.के.के.वाघ एज्युकेशन सोसायटी<br>३.तुलसी आय.हॉस्पीटल व इतर २६ ठिकाणी |
| २० | अविसागर लेबर सप्लायर्स,<br>**मु.पो.शिरडी** ता.राहाता | ---- | ---- | ---- | ---- | अ) पुर्वानुभव-०५ वर्षे | १.वॉटरपार्क,नाशिक<br>२.त्र्यंबकेश्वर नगरपालिका<br>३.शिर्डी नगरपंचायत,शिर्डी |

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला कंत्राटी पद्धतीने कुशल-अकुशल व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी खालील चार एजन्सीजची कंत्राटी कामगार पुरविण्याची क्षमता विचारात घेऊन तसेच किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतूदीप्रमाणे किमान वेतन दरापेक्षा कमी दर अनुज्ञेय नसल्यामुळे सदरची बाब विचारात घेऊन, सदर एजन्सीचे दर मान्य करण्यात यावे व त्यांना एक वर्ष कालावधीसाठी कर्मचारी पुरविणेबाबत आदेश देण्यात यावा, असे ठरले.

**(अ) कुशल व अकुशल कंत्राटी कामगार-** कुशल व अकुशल कंत्राटी कामगार पुरविणेकामी खालीलप्रमाणे दोन निविदासादरकर्त्यांचे न्युनतम दर मान्य करण्यात आले-

०१. बीव्हीजी इंडिया लिमिटेड,शिवाजीनगर, पुणे-५

०२. मे.बॉम्बे इंटेलीजन्स सिक्यूरिटी (इं) लि .,नाशिक

या निविदासादरकर्त्यांना शॉप ॲण्ड कमर्शिअल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.०३ (तसेच मुंबई कार्यालयासाठी झोन नं.१) प्रमाणे किमान वेतन दर वेळोवेळी शासनाकडून होणाऱ्या वाढीनुसार अधिक एकूण वेतनावर ०.७५% इतका सर्व्हिस चार्ज अधिक १२.२४% सर्व्हीस टॅक्स देण्यात यावा.

याशिवाय प्रॉ.फंड (मालकाचा हिस्सा) प्रशासकीय चार्जेससह १३.६१ % अधिक कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रुप इन्शूरन्स प्रिमियम (अंशदान) याप्रमाणे रक्कम देण्यात यावी.

**(ब) सुरक्षा कंत्राटी कामगार -** सुरक्षा कंत्राटी कामगार पुरविणेकामी खालीलप्रमाणे दोन निविदासादरकर्त्यांचे न्युनतम दर मान्य करण्यात आले-

०१) मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि. विलेपार्ले (वेस्ट) मुंबई

०२) मे.स्पार्क ऑल सिक्युरिट ॲण्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि.एम.जी.रोड, कॅम्प, पुणे

या निविदासादरकर्त्यांना -

| | |
|---|---|
| (अ) संरक्षण अधिकारी- | रुपये १३१.३० प्रती दिन |
| (ब) सुरक्षा पर्यवेक्षक- | रुपये १२७.४६ प्रती दिन |
| (क) सशस्त्र सुरक्षा रक्षक | ०१. रुपये १८६.२५ प्रती दिन (माजी सैनिकाकरिता) |
| | ०२. रुपये १३१.३० प्रती दिन (सिव्हील गणमॅनकरिता) |

(ड) सुरक्षा रक्षक-शॉप ॲण्ड कमर्शिअल इस्टॅब्लीशमेंट झोन नं. ०३ (तसेच मुंबई कार्यालयासाठी झोन नं.०१ ) प्रमाणे अकुशल साठी शासनाकडून वेळोवेळी जाहीर होणारे किमान वेतन दर निश्चित करण्यात आले. या दोन्हीही ठेकेदारांना एकूण वेतनावर ०.०५% इतका सर्व्हिस चार्ज, अधिक १२.२४ % सर्व्हिस टॅक्स अधिक कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रुप इन्शूरन्स प्रिमियम (अंशदान) अधिक प्रॉ.फंड (मालकाचा हिस्सा) प्रशासकीय चार्जेससह १३.६१ % या प्रमाणे रक्कम देण्यात यावी.

त्याचप्रमाणे सध्याचे लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीची /कराराची वाढीव मुदत दिनांक ३१.५.२००७ अखेर संपुष्टात येत आहे. नवीन लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे नेमणूक प्रक्रियेस आणखी एक महिन्याचा कालवधी लागणार आहे. म्हणून कामाची गैरसोय होऊ नये याकरीता सध्याचे मे.बी.व्ही.जी इंडिया लि.पुणे व मे क्रिस्टल ट्रेडकॉम प्रा.लि.,मुंबई यांचेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या कंत्राटी कामगारांच्या त्याचप्रमाणे मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि. व मे.शिवा इंडस्ट्रीयल सिक्युरिटी एजन्सी(गुजरात) प्रा.लि.मुंबई यांचे मार्फत पुरविण्यात येणाऱ्या कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या ठेकेदारीस/करारास सध्याचेच कंत्राटासंबधातील करारातील अटी व शर्तीस अधिन राहून दिनांक ०१/०६/२००७ पासून दोन महिना मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.४१.** **कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित नेमणूका देणेबाबत.**

**निर्णय क्र.३९४** संस्थानला लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रक्टर्स मार्फत कंत्राटी पध्दतीने सन १९९१ पासून सुरक्षा कर्मचारी, १९९४ पासून अकुशल कामगार व सन-१९९९ पासून कुशल कामगार पुरविणेत येत आहे.सध्या लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत संस्थानचे संबधीत विभागांना आवश्यकतेनूसार व गरजेनूसार दैनंदिन कामास कंत्राटी कामगार घेण्यात येतात.कॉन्ट्रक्टर्स मार्फत कामास घेण्यात येणा-या कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार,शॉप ॲन्ड कर्मशियल इस्टॅब्लीशमेंन्ट झोन नं.३ प्रमाणे किमान वेतन दर देणेत येत आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१-०४-२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२५ अन्वये सन १९९१ ते २००० पर्यंत कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या १०३७ अकुशल व १७८ कुशल अशा एकूण १२१५ कंत्राटी कर्मचा-यांपैकी नियमित कामावर असणारे व आजमितीस सलग कामावर हजर असणा-या,कोर्ट केसेस वा अन्य चौकशी चालु असलेले वगळून इतर कंत्राटी कर्मचा-यांना नियमित नेमणूका देणेसाठी ॲडव्होकेट श्री.अशोकराव पाटील,कामगार कायदे सल्लागार यांचे सल्ल्याने कायदेशीर पुर्तता करुन प्रस्ताव शासनाचे मान्यतेस सादर करणेत यावा असे ठरले आहे.त्यास अनुसरुन मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग मंत्रालय,मुंबई यांचेकडे कंत्राटी कामगारांना नियमित नेमणूका देणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी जा.नं.एसएसएस/वशी-७ए/५३७४/२००६ दि.२५-०४-२००६ अन्वये सादर करणेत आलेला आहे.

त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.७.२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५२२ अन्वये कंत्राटी कर्मचारी यांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेबाबत प्रस्तावास शासनाकडुन अद्याप मान्यता मिळालेली नसल्याने,नियमावलीस अधिन राहून संस्थानने कंत्राटी कामगारांना संबंधीत वर्षात सलग दोन महिने दिलेला ब्रेक किंवा एक-एक महिना असे दोन महिने दिलेला ब्रेकच्या कालावधीस जोडून आणखी एक महिना अपरिहार्य कारणांमुळे गैरहजर राहीलेला कालावधी धरुन असा एकूण सलग तीन महिने सेवाखंडीत कालावधी शिथील करुन,सदरचे कालावधीत जे कंत्राटी कामगार नियमित कामावर आहेत व त्यापैकी आजमितीस सलग हजर असणाऱ्या अशा सर्व कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका दरमहा रुपये २०००/- (अक्षरी रुपये दोन हजार) मात्र एकत्रित मानधनावर देणेत याव्यात.त्याकामी ॲडव्होकेट श्री.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा सल्ला घेवून,मा.जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष,मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे, उपाध्यक्ष, व मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील,सदस्य या त्रिसदस्य समितीने अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले.

उपरोक्त निर्णयांस अनुसरुन सन १९९१ ते डिसेंबर २००० पर्यंत जे कंत्राटी कामगार नियमित कामावर आहेत व त्यापैकी आजमितीस सलग कामावर हजर असणा-या (संबंधीत वर्षात तीन महिने पेक्षा जास्त दिवस सेवाखंडीत अथवा गैरहजर नसलेल्या) अशा ९९७ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका दरमहा रुपये २०००/- (अक्षरी रुपये दोन हजार) मात्र एकत्रित मानधनावर देणे बाबत मा.त्रिसदस्य समिती (उपसमिती) चे दि.३०-११-२००६ रोजीचे सभेत निर्णय झाला व त्याप्रमाणे संबंधीत अकुशल,कुशल व सुरक्षा पात्र कंत्राटी कर्मचा-यांना दि.०२-१२-२००६ रोजी नियमित नेमणूक आदेश देणेत आलेले आहेत.

त्यानंतर ज्या कंत्राटी कामगारांना नियमित नेमणुक आदेश मिळालेले नाहीत अशा कंत्राटी कामगारांपैकी काही कंत्राटी कामगारांनी नियमित नेमणुक आदेश मिळावे म्हणुन अर्ज सादर केलेले आहे.त्यास अनुसरुन सन-१९९१ ते डिसेंबर-२००० पर्यंत कंत्राटदारामार्फत कामावर घेतलेल्या व आजमितीस कामावर असलेल्या परंतु सबंधीत विभागाकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाल्यामुळे त्यांना नियमित नेमणुक आदेश देण्यात आलेले नाहीत,अशा कंत्राटी कामगारांची पुन्हा संबधीत विभागाकडून प्रत्येक वर्षात,प्रत्येक महिन्यात केलेल्या कामाची,दिवसाची माहीती तात्काळ सादर करणेकामी जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३२२४/२००६ दि.२७-१२-२००६ रोजीचे पत्रान्वये संबधीत विभागांना लेखी कळविण्यात आले.त्यास अनुसरुन संबंधीत कंत्राटी कामगारांचे हजेरी रेकॉर्डस्ची पुन्हा तपासणी/पडताळणी करणेत येऊन त्यांची माहीती संबधीत विभागाने सादर केलेली आहे.सदर कंत्राटी कामगारांचे रेकॉर्डस्ची पुन्हा पडताळणी केली असता त्यामध्ये कुशल-०२,अकुशल-४९ व सुरक्षा-०३ असे एकुण ५४ कंत्राटी कामगार नियमित नेमणुकीस पात्र असल्याचे दिसून येते.

सबब,उपरोक्त प्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१-०४-२००६ व दि.१६-०७-२००६ रोजीचे सभेत संमत करणेत आलेल्या अनुक्रमे निर्णय क्र.२२५ व आयत्या वेळेचा निर्णय क्र.५२२ या निर्णयास अनुसरुन व मान्य केलेल्या नियमावलीतील निकषास अधिन राहुन सन-१९९१ ते डिसेंबर-२००० पर्यंत जे कंत्राटी कर्मचारी नियमित कामावर आहेत व त्यापैकी आजमितीस कामावर हजर असणा-या,यादीत नमुद केलेल्या कुशल-०२,अकुशल-४९ व सुरक्षा-०३ अशा एकुण-५४ पात्र कंत्राटी कामगारांना दरमहा रु,२०००/-(अक्षरी रु.दोन हजार मात्र) याप्रमाणे एकत्रीत मानधन/वेतनावर ॲडव्होकेट श्री.अशोकराव पाटील,अ.नगर यांनी मान्य केलेल्या मसुद्याप्रमाणे शासनाची मान्यता येईपर्यंत व शासनाचे मान्यतेस अधिन राहुन कशुल,अकुशल कामगार असे शैक्षणिक पात्रतेप्रमाणे पदनिहाय/ हुद्देनिहाय वर्गीकरण न करता सध्या आहे त्या विभागातच सरसकट वर्ग-४ चे कर्मचारी या पदावर नियमित नेमणुक आदेशपत्र देणेस व त्यांचेकडून नेमणुक आदेशातील सर्व अटी,शर्ती मान्य असलेबाबत संमतीपत्र करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.४२** **दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को ऑप बँक लि,स्टेशनरोड अहमदनगर यांचे स्वयं सहाय्यता गटांनी उत्पादीत मालाचे विक्रीसाठी जागा व शेड उपलब्ध करुन देणे बाबत**

**निर्णय क्र.३९५** मा. कार्यकारी संचालक दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेट्रंल को ऑप बॅक लि.,स्टेशन रोड अहमदनगर यांनी दि ०८/०५/२००७ पत्र इकडील कार्यालयास सादर केले असून संस्थानचे शिर्डी येथील ५०० रुम भक्तनिवास व प्रसादालय परिसरात बचत गटाचे उत्पादीत मालासाठी विक्री केद्रांसाठी जागा व शेड उपलब्ध करून मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

प्रस्तुतचे पत्रात बॅकेस संलग्न स्वंय सहाय्यता गट विविध प्रकारचे मालाचे उत्पादन करीत आहे. तथापि त्यांचे उत्पादनासाठी विक्री व्यवस्था उपलब्ध नाही सदर मालाची विक्री व्यवस्था करीता ५०० रुम भक्तनिवास व प्रसादालय परिसर या दोन ठिकाणी विक्रीसाठी शेड उभारणेला जागा उपलब्ध करून मिळावी जेणेकरुन ग्रामीण भागातील दुर्बल महिलांना रोजगांरासाठी संधी उपलब्ध होईल असे नमूद करण्यात आले असून याबाबत संस्थानचे नियम व अटी मान्य राहतील असे प्रस्तुत पत्रात म्हटलेले आहे.

श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुम मधील काही गाळे शासकीय उपक्रम, संस्था व खाजगी लिलावधारक तसेच पतपेढी यांना लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर १ वर्ष मुदत पावेतो देण्यात आलेले आहे. याबाबत लिव्ह ॲन्ड लायसेन्स फी रुपये ६०५, रुपये-पासून ८८७/ ते रुपये ४२५९/- पावेतो आकारणेत आलेली आहे. सदर परिसरामध्ये अद्याप पावेतो शेड उभारणेस कोणासही परवानगी दिलेली नाही तर लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर गाळे देण्यात आलेले आहे.

**अ)** दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेट्रंल को ऑप बॅक लि.,स्टेशन रोड अहमदनगर यांनी दुर्बल महिला रोजगारांच्या दृष्टीने जागेची मागणी केलेली आहे. याबाबतचा विचार करता त्यांना प्रस्तुत ठिकाणी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुम येथे लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर गाळा /जागा देणे ठरल्यास त्यांचेकडून मासिक परवाना फी रुपये ९००/- आकारुन व विद्युत बील मीटर रिडीगप्रमाणे वेगळे आकारुन एक वर्षासाठी एक गाळा /जागा वापराकामी देता येईल.

**ब**) तसेच प्रसादालय परिसरात बचत गटाचे उत्पादीत मालासाठी विक्री केंद्रांसाठी एक स्टॉल उभारणेस दि. अहमदनगर ड्रिस्ट्रीक्ट सेंट्रल को ऑप बँक जिल्हा - अहमदनगर यांना जागा दयावयाची झाल्यास रक्कम रुपये १००० मासिक परवाना फी व विद्युत बील वेगळे आकारून एक स्टॉलसाठी लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर जागा उपलब्ध करुन देता येईल. या परिसरात इतर

संस्थेस दिलेल्या स्टॉलचे अनुषंगाने रुपये ५०० ते रुपये १००० ठरविलेली आहे. याबाबतचा विचार करता प्रसादालय परिसरात बचत गटाचे स्टॉलसाठी रुपये १०००/- मासिक परवाना फी आकारून व मिटर रिडीगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारून एक वर्षासाठी लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर एक स्टॉल देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.४३ विविध संस्थांनी मागणी केलेल्या शिध्याबाबत.**

**निर्णय क्र. ३९६ (०१)** खाली दर्शविलेल्या समितीने मा.अध्यक्ष, श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्रीसाईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | अध्यक्ष, श्री विठ्ठल रुख्मिणी मंदीर ट्रस्ट,वाकडी व मौजे वाकडी ग्रामस्थ,ता.राहाता,जि.अहमदनगर (अर्ज दि.०४/०४/२००७) | दि.११/४ ते दि.१७/०४/०७ अखेर अखंड ज्ञानेश्वरी पारायण व गीत रामायण सोहळयाचे महा-प्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. |

मा.अध्यक्ष, श्री विठ्ठल रुख्मिणी मंदीर ट्रस्ट,वाकडी व मौजे वाकडी ग्रामस्थ,ता.राहाता, जि.अहमदनगर यांना दि.११/४ ते दि.१७/०४/०७ अखेर अखंड ज्ञानेश्वरी पारायण व गीत रामायण सोहळयाचे महा-प्रसादासाठी रु.२५,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेत आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

**(०२)** खाली दर्शविलेल्या समितीने मा.कार्यकारी अधिकारी, श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | श्री दिपक गायकवाड, जिल्हा परिषद सदस्य, मु.पो. जेऊर कुंभारी, ता. कोपरगांव, जि.अहमदनगर (अर्ज दि.१०/०४/२००७) | दि.१४/०४/२००७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती-निमित्त आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. |
| ०२. | अध्यक्षा, प्रियदर्शनी महिला मंडळ शिर्डी, ता.राहाता,जि.अहमदनगर (अर्ज दि.०५/०४/२००७) | दि.१४/०४/२००७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती-निमित्त आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. |

श्री दिपक गायकवाड, जिल्हा परिषद सदस्य, मु.पो. जेऊर कुंभारी, ता. कोपरगांव, जि.अहमदनगर यांना दि.१४/०४/२००७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती- निमित्त आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी रु.१५,०००/- व अध्यक्षा, प्रियदर्शनी महिला मंडळ शिर्डी, ता.राहाता,जि.अहमदनगर यांना दि.१४/०४/२००७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती-निमित्त आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी रु.१०,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेत आलेली असून,त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

**(०३** खाली दर्शविलेल्या समितीने मा.अध्यक्ष, श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | अध्यक्ष, ग्रंथराज गितांलकार श्री ज्ञानेश्वर ग्रंथ पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळा समिती, समस्थ गांवकरी व भजनी मंडळ, गळनिंब, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर (अर्ज दि.१६/०४/२००७) | गळनिंब येथे दि.१३/०४/२००७ ते दि.२०/०४/२००७ अखेर श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. |

तरी अध्यक्ष, ग्रंथराज गितांलकार श्री ज्ञानेश्वर ग्रंथ पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळा समिती, समस्थ गांवकरी व भजनी मंडळ, गळनिंब, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर यांना गळनिंब येथे दि.१३/०४/२००७ ते दि.२०/०४/२००७ अखेर श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी रु.२५,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेत

आलेली असून, त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

**(०४)** खाली दर्शविलेल्या समितीने मा.अध्यक्ष, व मा.आमदार राधाकृष्ण विखे पाटील, विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, खळी, ता.संगमनेर, जि.अ.नगर (अर्ज दि.१२/०४/२००७) | दि.०८/४ ते दि.१५/०४/०७ अखेर अखंड हरिनाम सप्ताह सोहळयाचे महा-प्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. |

सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, खळी, ता.संगमनेर, जि.अ.नगर यांना श्री क्षेत्र उंबरेश्वर येथे दि.०८/४ ते दि.१५/०४/०७ अखेर होणा-या अखंड हरिनाम सप्ताह सोहळयाचे महा-प्रसादासाठी रु.१०,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेत आलेली असून , त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

**(०५)**खाली दर्शविलेल्या समितीने मा.कार्यकारी अधिकारीसाहेब,.श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | अध्यक्ष, डॉ..बाबासाहेब आंबेडकर उत्सव समिती, शिर्डी, ता.राहाता,जि.अहमदनगर (अर्ज दि.१३/०४/२००७) | दि.१४/०४/२००७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती-निमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. |

अध्यक्ष, डॉ..बाबासाहेब आंबेडकर उत्सव समिती, शिर्डी, ता.राहाता,जि.अहमदनगर यांना दि.१४/०४/२००७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती- निमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी रु.११,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेत आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देणेत आली.

**(०६ )**खाली दर्शविलेल्या समितीने मा.कार्यकारी अधिकारी,.श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | श्री देविदास गंगाधर नाईक, अध्यक्ष, दोम दोम शाह दावल बाबा उत्सव समिती, जेऊर पाटोदा,पो. मुर्शतपूर,ता.कोपरगांव जि.अहमदनगर (अर्ज दि.०१/०४/२००७) | जेऊर पाटोदा येथे दावल बाबा यांचा उरुस- संदल(मिरवणूक) चे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. |

तरी श्री देविदास गंगाधर नाईक, अध्यक्ष, दोम दोम शाह दावल बाबा उत्सव समिती, जेऊर पाटोदा, पो. मुर्शतपूर, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर यांना जेऊर पाटोदा येथे दावल बाबा यांचा उरुस- संदल (मिरवणूक) चे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी रु.२०,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेत आलेली असून,त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

**(०७)** खाली दर्शविलेल्या समितीने मा.अध्यक्ष,.श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | अध्यक्ष, श्री भेरवनाथ विश्वस्थ महायज्ञ अखंड हरिनाम सप्ताह ज्ञानयज्ञ, शहा, ता.सिन्नर, जि.नाशिक, (अर्ज दि.१३/०४/२००७) | शहा येथे श्री भैरवनाथ मुर्तीची प्राणप्रतिष्ठा व त्यानिमित्त दि.७/५ ते १४/५/०७ अखेर अखंड हरिनाम सप्ताहाचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. |

तरी अध्यक्ष, श्री भेरवनाथ विश्वस्थ महायज्ञ अखंड हरिनाम सप्ताह ज्ञान यज्ञ,शहा,ता.सिन्नर, जि.नाशिक, यांना शहा येथे श्री भैरवनाथ मुर्तीची प्राणप्रतिष्ठा व त्यानिमित्त दि.७/५/०७ ते

दि.१४/५/०७ अखेर होणा-या अखंड हरिनाम सप्ताहाचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी रु. २५,०००/-पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेत आलेली असून, त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देणेत आली.

**(०८)**खाली दर्शविलेल्या समितीने मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्रीसाईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | कॅप्टन कणसे दादा, अध्यक्ष, लक्ष्मीनारायण मित्रमंडळ, गोंधवणी रोड, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर (अर्ज दि.२३/०४/२००७) | गोंधवणी रोड येथे दि.३/५ ते १०/५/०७ अखेर श्री ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. |

तरी कॅप्टन कणसे दादा, अध्यक्ष, लक्ष्मीनारायण मित्रमंडळ, गोंधवणी रोड, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर यांना गोंधवणी रोड येथे दि.३/५ ते १०/५/०७ अखेर श्री ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी रु.११,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेत आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

**(०९)** उपरोक्त विषयास अनुसरुन, खाली दर्शविलेल्या समितीने मा.अध्यक्षसाहेब,.श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | श्री दादासाहेब धर्माजी माकोणे, व समस्त ग्रामस्थ, खिर्डी व सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, खिर्डी ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर (अर्ज दि.२३/०४/२००७) | खिर्डी येथे दि.४/५ ते ११/५/०७ अखेर श्री ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. |

तरी श्री दादासाहेब धर्माजी माकोणे, व समस्त ग्रामस्थ, खिर्डी व सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, खिर्डी ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर यांना खिर्डी येथे दि.४/५ ते ११/५/०७ अखेर श्री ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने रु.११,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेत आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

**(१०)** उपरोक्त विषयास अनुसरुन, खाली दर्शविलेल्या समितीने मा.कार्यकारी अधिकारी, श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | श्री मकरंद को-हाळकर, सचिव, अहमदनगर डिस्ट्रीक्ट बेसबॉल असो.,सोहम् जोशीनगर, धारणगांव रोड, कोपरगांव जि.अहमदनगर (अर्ज दि.०९/०५/२००७) | कोपरगांव येथे दि.१५/०५ ते दि.१७/०५/२००७ अखेर होणा-या बेसबॉल स्पर्धेच्या कार्यक्रमासाठी खेळांडुंना प्रसाद म्हणून शिधा-स्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. |

तरी श्री मकरंद को-हाळकर, सचिव, अहमदनगर डिस्ट्रीक्ट बेसबॉल असो. कोपरगांव, जि.अहमदनगर यांना कोपरगांव येथे होणा-या दि.१५/०५/२००७ ते दि.१७/०५/२००७ अखेर होणा-या राज्यस्तरीय बेसबॉल क्रिडा स्पर्धेत येणा-या खेळाडुंना प्रसाद म्हणून रु.२५,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेत आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

**(११)**उपरोक्त विषयास अनुसरुन, खाली दर्शविलेल्या समितीने मा.कार्यकारी अधिकारी, श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | श्री कृष्णराव सयाराम उर्फ दिलीप शिंदे, विश्वगौरव विभुषित प.पु.स्वामी गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताह सोहळा समिती, मौजे समनापूर, ता.संगमनेर, जि. अहमदनगर, (अर्ज दि.०५/०४ व ८/५/२००७) | खिर्डी येथे दि.८/६ ते १५/६/०७ अखेर अखंड हरिनाम सप्ताहाचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. |

तरी श्री कृष्णराव सयाराम उर्फ दिलीप शिंदे, विश्वगौरव विभुषित प.पु.स्वामी गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताह सोहळा समिती, मौजे समनापूर, ता.संगमनेर, जि. अहमदनगर, यांना अखंड हरिनाम सप्ताहाचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी रु.५०,०००/- वा रु.१,००,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

**(१२)** उपरोक्त विषयास अनुसरुन, खाली दर्शविलेल्या समितीने मा.कार्यकारी अधिकारी,श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री राजेंद्र अर्जुन मोरे, अध्यक्ष, दोम दोम दावल मलिक बाबा उत्सव समिती, सजयनगर, कोपरगांव, जि.अहमदनगर (अर्ज दि.१४/०५/२००७) | संजयनगर,कोपरगांव येथे दि. १७/०५/०७ रोजी दोम दोम दावल मलिक बाबांचा उत्सवाचा धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | श्री.खांबेकर, विश्वस्त यांचे रु. १५,०००/-शिधा देणेबाबत शिफारस पत्र. |

तरी श्री राजेंद्र अर्जुन मोरे, अध्यक्ष, दोम दोम दावल मलिक बाबा उत्सव समिती, सजयनगर, कोपरगांव, जि.अहमदनगर यांना संजयनगर,कोपरगांव येथे दि. १७/०५/०७ रोजी दोम दोम दावल मलिक बाबांचा उत्सवाचा धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी रु.१५,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेत आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-प्रशासन शाखा-वशी,०५)

**विषय नं.४४** **श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२००७ बाबत**

**निर्णय क्र.३९७** श्रीक्षेत्र शिर्डी येथे सालाबादप्रमाणे श्रीगुरुपौर्णिमा उत्सव यावर्षी शनिवार दिनांक २८/०७/२००७ ते सोमवार दिनांक ३०/०७/२००७ ( आषाढ शुक्ल-१३-१४ शके १९२९ ते आषाढ कृष्ण ०१ शके १९२९) असा तीन दिवस साजरा करण्यात यावा, या उत्सवासाठी प्रामुख्याने खालील गोष्टींची तयारी करावी लागेल,ज्यास मान्यता देण्यात आली व खालीलप्रमाणे इतर अनुषंगिक निर्णय घेण्यात आले.

**०१) उत्सव निमंत्रण पत्रिका :-** संस्थानचा कारभार चालविणेसाठी तयार करण्यात आलेल्या योजनेच्या तरतुदीमध्ये दुरुस्ती झाल्या प्रमाणे भक्त मंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतील. श्री रामनवमी उत्सव सन २००७ मध्ये १,२०,००० निमंत्रण पत्रिका छपाई करण्यात आल्या होत्या. यंदाचे श्रीगुरुपौर्णिमा उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १,२०,००० निमंत्रण पत्रिका तसेच मा.अध्यक्ष, सर्व विश्वस्त व सन्माननीयांना खास पत्रिका पाकीटासह २००० पत्रिका छपाई करुन घ्याव्या. तसेच नेहमी प्रमाणे प्रेस नोट (न्यूज ॲटम) म्हणून वर्तमानपत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.

**०२) निमंत्रीत कलाकार कार्यक्रम :-**

| | |
|---|---|
| शनिवार दिनांक २८.०७.२००७ (प्रारंभ दिवस) | रात्रौ ७.३० ते ९.०० व रात्रौ ९.३० ते १०.०० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम |
| रविवार दिनांक २९.७.२००७ (मुख्य दिवस) | ०१) या दिवशी सायंकाळी ७.३० ते ९.०० पर्यत निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम<br>०२) रात्री १०.०० ते सकाळी ६.०० पर्यत (दिनांक ३०.७.२००७ कलाकारांची सेवा हजेरी कार्यक्रम या मुख्य दिवशी समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहील) |
| सोमवार दिनांक ३०.७.२००७ (सांगता दिवस) | रात्रौ ७.३० ते ९.३० पर्यन्त निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम |

यावर सविस्तर चर्चा होऊन,

(०१ ) निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम मिळण्याबाबत आलेल्या पत्राबाबत पुढील मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय घेण्यात यावा,असें ठरलें.

(०२)दिनांक २८/०७/२००७ ते दिनांक ३०/०७/२००७ या तीन दिवसाकरीता नारदीय पद्धतीने कीर्तन करणाऱ्या कीर्तनकाराचा कीर्तन कार्यक्रम ठरविणे यावा.

**०३) श्री साईसत्यव्रत(सत्यनारायण)पूजा व अभिषेक पूजा:-** उत्सव काळात दि.२८/०७/२००७ ते दि.३०/०७/२००७ अखेर श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण)पूजा चालू राहतील. मात्र अभिषेक पूजा होणार नाहीत.

**०४) अखंड पारायण व्यवस्था:-** उत्सव काळात दिनांक २८/०७/२००७ रोजी सकाळी ६.१५ वाजता श्री द्वारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दिनांक २९/०७/२००७ रोजी सकाळी ५.४५ वाजता त्यांची समाप्ती होईल. मा.व्यवस्थापन मंडळाचे पाच सदस्य पहिले पाच अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ साईभक्त वाचतील. इच्छूक भक्तांची नांवे दि.२७/०७/२००७ रोजी मंदिर कार्यालयात नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्या काढून (ड्रॉ पध्दतीने) पारायणाकरीता नांवे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात यावा.

या उत्सवात मा.सदस्यांच्या या सर्व कार्यक्रमांतील सहभागाबाबत उचित निर्णय घेण्याचे अधिकारी मा.अध्यक्ष यांना देण्यात आले.

**०५) पालखी व रथ मिरवणूक:-** उत्सवाचे पहिले दिवशी शनिवार दिनांक २८/०७/२००७ रोजी श्रींचे पालखीची गांवातून मिरवणूक होईल, रविवार दिनांक २९/०७/२००७ रोजी रात्रौ ०९.१५ वाजता रथाची गांवातून मिरवणूक होईल.

**०६) विद्युत रोषणाई:-** समाधी मंदिर, श्री द्वारकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदिर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री गुरुपौर्णिमा उत्सवात श्री साईराज डेकोरेटर्स,मुंबई विनामुल्य रोषणाई करीत असतात. मात्र ट्रक भाडे व येण्या-जाण्याचा खर्च त्यांना द्यावा लागेल. विद्युत विभागामार्फत त्यांना पत्र देण्यात येत आहे. ते न आल्यास संस्थानमार्फत विद्युत रोषणाई करण्यात यावी.

**०७) संरक्षण व्यवस्था:-** उत्सव काळात मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना विनंती करण्यात यावी.

**०८) प्रसाद-भोजन व्यवस्था:-** उत्सव काळात प्रसादालयात मिष्टांन्नासह रु.५.०० या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते. मा.व्यवस्थापन समितीतील सदस्यांचे कुटुंबीय व नातेवाईक तसेच इतर सन्माननीय व्यक्तींना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था केली जाते. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणा-या व्यक्तींची प्रसाद भोजन व्यवस्था स्वतंत्र मंडप टाकून केली जाते. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी , दुध व बिस्कीटे इ.कॅंटीनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडु प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टान्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री दोन ते तीन ठिकाणी चालू करावी लागेल. तसेच श्री रामनवमी उत्सवात पालखीधारकांना आलेल्या दिवशी एकवेळचे जेवण दिले होते त्यानुसार श्री गुरुपौर्णिमा उत्सवात येणा-या पालखीधारकांना एकवेळचे जेवण द्यावयाचे आहे. तशी व्यवस्था करण्यात यावी.

श्रीगुरुपौर्णिमा उत्सव-२००७ मध्ये तीनही दिवसांचे मिष्टान्न पुढीलप्रमाणे ठेवण्यात यावेत.

०१. प्रथम दिवस - शिरा ०२. मुख्य दिवस - जिलेबी ०३. सांगता दिन -बुंदी

**०९) लिलाव:-** श्रींना अर्पण केलेली पवित्र वस्त्रें व इतर वस्तूंची प्रसाद रुपाने जाहीर लिलावाने विक्री तीनही दिवस करण्यात यावी.

**१०) जादा कंत्राटी कर्मचारी:-** उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पडणेकरीता लागणारा जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यात नेमण्यात येईल. विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य ते आदेश पारीत करण्यात यावेत.

**११) मंडप व कमानी:-** उत्सवात १० मंडप व ०१ स्टेज टाकण्यात यावा.

**१२) सर्व साधारण व्यवस्था:-** नेहमीप्रमाणे भक्तांची स्वागत व्यवस्था, मदत केंद्र, प्रथमोपचार केंद्र, निवास व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, इ.व्यवस्था ठेवण्यात येतील. स्वयंसेवी म्हणून काम करु इच्छिणा-या कर्मचारी व इतर व्यक्तींना नेहमीप्रमाणे संधी देण्यात येईल. देणगी स्वीकारणेकामी जादा काऊंटर्स उघडण्याची व्यवस्था करण्यात येईल. निमंत्रीत कलाकारांची निवास, भोजन, मानधन व्यवस्था करण्यात येईल. कलाकारांसाठी वास्तव्य व्यवस्था गरजेनुसार एम.टी.डी.सी हॉटेल, शिरडी अथवा संस्थानचे निवासात करण्यात यावी.

**१३) पालखी व्यवस्था:-** श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पुणे येथील व इतर ठिकाणांहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था लेंडीबाग परिसरात करण्यात येते व पालखी सोबत येणा-या भक्तांची व्यवस्था मंगल कार्यालय, साईउद्यान इमारतीत करण्यात येते. यावर्षीही ती व्यवस्था मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार करण्यात येईल. पालख्यांचे स्वागताकरीता मा.विश्वस्तांची एक कमिटी असावी व या कमिटीने पालख्यांचे स्वागत करावे.

त्याचप्रमाणे यावर्षीचा उन्हाळा गंभीर स्वरुपाचा असल्याने पायी येणा-या भक्तांची पिण्याचे पाण्याची व्यवस्था करावी लागेल. आवश्यकतेनुसार गुहापाट, पिंप्री निर्मळ येथे संस्थानतर्फे टॅंकरने पाणी पुरविणेत यावे.

**१४) भक्तांची निवास व्यवस्था:-** संस्थानचे साईप्रसाद नं.१ व नं.२, साईउद्यान, धर्मशाळा नं.२, भक्तनिवासस्थान या इमारतीमधून करण्यात यावी.

**१५) पाणीपुरवठा:-** पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणेबाबत विनंती करण्यात येईल. नियमीत पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात यावी.

**१६) कार्यक्रमाची सांगता:-** गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रीत कीर्तनकार करतील.

**१७) खर्चाचे अंदाज पत्रक:-** श्रीगुरुपौर्णिमा सन २००७ करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २५,००,०००.०० (अक्षरी रु. पंचवीस लाख मात्र) चे खर्चास मंजूरी देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

**विषय नं.४५** **अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, त्र्यंबकेश्वर जि.नाशिक यांना आर्थिक मदत देणे बाबत**

**निर्णय क्र.३९८** मध्यवर्ती समिती अखिल भारतीय स्वामी समर्थ सेवा केंद्र दिंडोरी यांनी त्यांचे दि.०२/०४/२००७ चे पत्रान्वये " विश्वातील अखिल सजीवांच्या सुख शांती,समृध्दी व कल्याणासाठी श्री कोटीचंडीयाग २ जानेवारी २००६ पासून सुरु केलेला आहे. हया कोटीचंडी यागांतर्गत महाराष्ट्रातील प्रमुख शक्तीपीठांवर

तुळजापूर,कोल्हापूर,माहुर येथे राष्ट्रीय सत्संग मेळावे आयोजीत करुन लाखो भावीकांनी आई भगवतीची अत्युच्च सेवा केलेली आहे. चतुर्थ सत्संग मेळावा सर्व भाविकांचे श्रध्दास्थान असलेला सप्तशृंग गड वणी, जि.नासिक येथे २१ मे २००७ रोजी आयोजीत केलेला आहे. हया सत्संग कार्यक्रमासाठी अंदाजे १५ लाख भावीकांची उपस्थिती अपेक्षित आहे. हया कार्यक्रमासाठी महाप्रसाद,मंडप,पाणी,व्यवस्था,प्रचार, प्रसार, आरोग्य व्यवस्था व इतर सर्व व्यवस्थेसाठी सुमारे २ कोटी खर्च अपेक्षित आहे. कार्यक्रम यशस्वी होणेसाठी श्री साईबाबा संस्थानकडून रु.२५ लाख आर्थिक मदत मिळावी अशी विनंती केलेली आहे. मा.अध्यक्ष महोदय यांनी सदरचा प्रस्ताव निर्णयासाठी मिटींगला ठेवा. असे निर्देश दिलेले आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मध्यवर्ती समिती अखिल भारतीय स्वामी समर्थ सेवा केंद्र दिंडोरी यांनी सप्तशृंगी गड वणी, जि.नाशिक येथे होणाऱ्या सत्संग कार्यक्रमासाठी रुपये १ लाखापर्यन्त शिधा स्वरुपात मदत देण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी५/३)

**विषय नं.४६** **परमपुज्य रामदेव स्वामींनी पुरस्कृत केलेल्या योग प्राणायमाचे योग शिक्षक शिबीर आयोजित करणे बाबत.**

**निर्णय क्र.३९९** श्री भूपेंद्र शहा, अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश पतंजलि योग समिती, पुणे, यांचे प.पू.स्वामी रामदेव महाराज प्रणीत पतंजलि योगपीठ द्वारा संपूर्ण भारत देशभर प्रत्येक जिल्ह्यात योगशिक्षक घडविण्यासाठी येत्या २० मे ते १५ जून २००७ पर्यंत पंधरा दिवसाचे शिबिर आयोजित करण्याचे ठरविले आहे. या वर्षात सर्व देशात एकूण १ लाख योग शिक्षक तयार व्हावेत, जेणे करुन स्वामीजींचे स्वस्थ व निरोगी भारत निर्माण करण्याचे २०११ पर्यंतचे स्वप्न प्राणायाम व योगासनांचा प्रसार, प्रचार व त्याचबरोबर प्रत्यक्ष घरोघर जाऊन जनसामान्यांना शिकविण्याचे अभियान चालवून साकार होईल. याचदृष्टीने एक पुढचे पाऊल म्हणून आपल्या संस्थेने आता योगशिक्षक घडविण्याच्या या योजनेत पुढाकार घ्यावा व ५०० जणांसाठी १५ दिवसाचे प्रशिक्षण शिबिर २० मे ते १५ जून २००७ या कालावधीत आपल्या संस्थेद्वारा जाहिर करावे व त्याचा आर्थिक भार संस्थेने स्वीकारावा ही नम्र विनंती. आमचे सर्व प्रशिक्षीत योग शिक्षक या कालावधीत नव्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी शिर्डी मुक्कामी राहातील. या योगशिक्षकांसाठीचे शिबिरातील प्रशिक्षणार्थींची दिनचर्या साधारणपणे खालीलप्रमाणे असेल.

| वेळ | तपशील |
|---|---|
| पहाटे ५.०० ते सकाळी ७.०० | प्रातःकालीन सुरुवातीची प्रार्थना, प्राणायाम, सुक्ष्म व्यायाम आणि योगासनांचा सराव. |
| सकाळी ८.०० | व्यक्तिगत अन्हिकासाठीचा काळ (स्नान, संध्या, कपडे धुलाई इ.) |
| सकाळी ८.३० ते ९.०० | अल्पोपहार |
| सकाळी ९.०० ते १०.३० | विविध विषयांवर तज्ञांचे मार्गदर्शन |
| सकाळी १०.३० ते १०.४५ | मध्यंतर |
| सकाळी १०.४५ ते १२.०० | विविध विषयांवर तज्ञांच्या बौध्दिकावर गटशः चर्चा. |
| दुपारी १२.०० ते १४.०० | भोजन व विश्रांती |
| दुपारी १४.०० ते १४.३० | मंत्र, श्लोक व सुत्रांची संस्था व अभ्यास. |
| दुपारी १५.०० ते १६.३० | स्वामी रामदेवजींच्या सी.डी.चे दर्शन व अभ्यास |
| दुपारी १६.३० ते १७.०० | पेयपान |
| दुपारी १७.०० ते रात्रौ १९.०० | प्राणायाम, सूक्ष्म व्यायाम व योगासनांचा सराव. |
| रात्रौ १९.०० ते २०.३० | भोजन |
| रात्रौ २०.३० ते २२.०० | सांस्कृतिक कार्यक्रम , व्यक्तिगत गुण-दर्शन |
| रात्रौ २२.३० | दिनचर्याला पूर्णविराम. |

तसेच संस्थानमार्फत निवास, भोजन, लाईट, प्रसिध्दीसाठी वर्तमानपत्रात निवेदन, सिक्युरिटी, प्रथमोपचार-वजनकाटा, दोन स्क्रीन, दोन प्रोजेक्टर, २ माईक, सतरंज्या इ.ची व्यवस्था, तसेच नाश्ता-मोडाची मटकी, मुग, चने, दलीया-सालीसह मुग, गहु-भरडा, दुधीभोपळा, ज्युस शक्य असेल तर, तसेच जेवणासाठी एक भाजी - दुधी, तोंडली, घोसाळे, पालेभाजी, चपाती-फुलके, वरण-मुगाचे व भात इ. मिळावे अशी विनंती केलेली आहे.

अध्यक्ष, पतंजलि योग समिती, पुणे ही संस्था प्रशिक्षणार्थींकडून रु.१,१००/- मात्र शिबीराचे शुल्क म्हणून घेणार आहे. सदरचे शुल्क हे पतंजलि योगपीठ ट्रस्ट, हरिद्वार यांचेकडे जमा होणार आहेत. म्हणजे यात संस्थेचा सहभाग असा काही नाही फक्त ते शिबिर आयोजित करणार सर्व खर्च संस्थानच करणार आहे. शिबिरासाठी साधारण खर्च खालीलप्रमाणे येण्याची शक्यता आहे.

| अ.नं. | तपशील | अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| ०१ | निवास व्यवस्था-२५० जणांसाठी १२ x १००/- x १५ | रु. ००,१८,०००.०० (अंतर्गत) |
| ०२. | भोजन(दोनवेळचे जेवण, नाष्टा व पेयपान) व्यवस्था - २५० जणांसाठी ५०/- x २५० x १५ व कं.का.-१२४/- x २० x १५ | रु.०२,२४,७००.०० (कॉन्टॅक्ट) |
| ०३. | संरक्षण व्यवस्था-१२४/- x ५ x १५ (कंत्राटी कामगार) | रु. ००,०९,३००.०० |
| ०४. | स्वच्छता व्यवस्था- १२४/- x २ x १५ (कंत्राटी कामगार) | रु. ००,०३,७२०.०० |

| | | |
|---|---|---|
| ०५. | जाहिरात(स्थानिक पेपर-निवेदन),बोर्ड, बॅनर्स इ.कामी | रु. ००,३०,०००.०० |
| ०६. | मंडप(स्वयंपाक/लॉनवर बैठकव्यवस्थेसह) | रु. ००,५०,०००.०० |
| | **अंदाजीत एकूण खर्च** | **रु. ०३,३५,७२०.००** |

सदर बाबतीत श्री भुपेंद्र शहा, अध्यक्ष, पतंजलि योगपीठ, पुणे, तसेच नगर जिल्हा पतंजलि योगपीठाचे अधिकारी असे एकुण ४ जण योगशिक्षक प्रशिक्षण शिबिराचे आयोजनाचे चर्चेसंदर्भात आले होते. त्यात प्रशिक्षणार्थींची निवासव्यवस्था इं.मि.स्कुल व क.वि.मंदिरचे वर्ग , तज्ञांचे मार्गदर्शन, गटशः चर्चा, सी.डी. दर्शन इ. साठी क.वि.मंदिरचा म्युझीक हॉल, स्टेज व स्टेजसमोरील लॉन योगासनासाठी, प्रसिध्दीसाठी वर्तमानपत्रातून निवेदन, नेहमीचे जेवण, नाष्टा व चहा इ. सर्व व्यवस्था संस्थानमार्फत करणेबाबत साधकबाधक चर्चा झाली. यासाठी साधारणपणे रु. ०३,३५,७२०/- (अक्षरी रु. तीन लोख पस्तीस हजार सातशे वीस मात्र) खर्च येण्याची शक्यता आहे. सदरचे शिबिर पतंजलि योग समिती, पुणे व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित करता येईल. पतंजलि योग समिती, पुणे यांना काही अंशी योगदान करणेस सांगता येईल.

तथापि सदरचे खर्चास शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे, असे नम्र मत आहे. तसेच यात संस्थानमधील इच्छुक कर्मचारी भाग घेऊ शकत नाही, कारण शिबिराचे शुल्क रु. १,१००/- मात्र ठेवलेली आहे, तसेच त्यांची दिवसभराची दिनचर्या ठरलेली असलेने व प्रत्येक कार्यक्रमासाठी हजर असणे आवश्यक असलेने कर्मचारी हजर राहू शकत नाही. त्यामुळे संस्थान इच्छुक कर्मचा-यांना योगशिक्षक शिबिराचा लाभ घेता येणार नाही. तसेच माहे मे,जून हे सुट्टीचे महिने असलेने साईभक्तांची गर्दी होण्याची शक्यता आहे.

तथापि उपरोक्तप्रमाणे दि.२५/०५/२००७ ते दि. ०४/०६/२००७ अखेर पतंजलि योग समिती, पुणे व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित करणेस तसेच अंदाजित येणा-या रु.०३,३५,७२०/- (अक्षरी रु. तीन पस्तीस हजार सातशे वीस मात्र)चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री भूपेंद्र शहा, अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश पतंजलि योग समिती, पूणे, यांचे प.पू.स्वामी रामदेव महाराज प्रणीत पतंजलि योगपीठ द्वारा दि.२५/०५/२००७ ते दि. ०४/०६/२००७ अखेर आयोजित करण्यात यावयाच्या योग शिक्षक शिबीरास संस्थानमार्फत फक्त निवासव्यवस्था करण्यात यावी, इतर सर्व व्यवस्था त्यांना करणेबाबत सांगण्यात यावे असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**विषय नं.४७** **संस्थान कर्मचारी आकृतीबंधाबाबत**

**निर्णय क्र.४००** संस्थानचे विविध विभागांसाठी ( श्री साईबाबा हॉस्पीटल सोडून ) आवश्यक कर्मचा-यांचा पदनिहाय आकृतीबंध विश्वस्त मा. डॉ.ई.बी.गोंदकर, मा.कार्यकारी अधिकारी व प्रशासकिय अधिकारी, प्रशासकिय अधिकारी व संबंधीत विभागांचे अधिक्षक/विभाग प्रमुखांचे समवेत चर्चा करुन, तयार करण्यात आलेला आहे. सदरचा आकृतीबंध मा.व्यवस्थापन समितीचे दि. २५/११/२००६ रोजी झालेल्या सभेमध्ये सादर करण्यात येऊन सभेतील निर्णयानुसार, व्यवस्थापन समितीचे मा. सदस्यांचे अभिप्राय व मार्गदर्शनार्थ, सर्व मा. सदस्यांना जा.नं.एसएसएस/वशी-०१/१६६६५/२००६ दि. २९/११/२००६ अन्वये पाठविण्यात आलेला आहे. तसेच प्रस्तावित केल्याप्रमाणे विविध विभागांमध्ये उपअधिक्षक/ उपविभाग प्रमुख या पदांचा समावेश करणेत आलेला आहे. त्यानुसार आकृतीबंधाबाबत तपशील खालील प्रमाणे-

| अ.नं. | तपशील | पद संख्या |
|---|---|---|
| ०१ | एकूण प्रस्तावीत पदे | ३०२८ |
| ०२ | माहे जून २००६ अखेर संस्थान आस्थापनेवरील कायम कर्मचारी | १०३९ |
| ०३. | रिक्त पदे | १९८९ |

वरीलप्रमाणे रिक्त पदे दर्शविलेली आहेत. तथापी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दि.०२/१२/२००६ रोजी ९९७ कंत्राटी कर्मचा-यांच्या वर्ग-४ चे कर्मचारी म्हणून तसेच आचारी, ज्यु. इंजिनिअर्स इ. च्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. तथापी वरीलप्रमाणे केलेल्या ९९७ कंत्राटी कर्मचा-यांच्या नेमणूकीस अद्याप शासनाची मान्यता मिळालेली नसल्याने त्यांना पदनिहाय स्थानापन्न करणेत आलेले नाही. शासनाची मान्यता मिळालेनंतर ९९७ पैकी कुशल श्रेणीतील उपलब्ध विविध पदांवर त्यांच्या नेमणूका करण्यात येतील. सबब प्रत्यक्ष रिक्त पदांची संख्या खालील प्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| ०१. | वरील प्रमाणे रिक्त पदे | १९८९ |
| ०२ | मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार केलेल्या नेमणूका कंत्राटी कर्मचारी, | ९९४ |
| ०३ | ज्यु.इंजिनिअर्स, | ००६ |
| ०४ | आचारी | ००१ |
| | एकूण | १००१ |
| | नक्की रिक्त पदे- | ९८८ |

वरीलप्रमाणे तयार करणे तयार करण्यात आलेल्या आकृतीबंधाच्या प्रती सर्व विश्वस्तांना पुरविण्यात आल्या होत्या,त्याची नोंद घेण्यात येऊन,तो सोबत परिशिष्ट "अ" म्हणून ठेवण्यात आलेला आहे. सदरहू आकृतीबंध शासनाचे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा. त्यास मान्यता मिळालेनंतर संस्थान सेवेतील कायम कर्मचाऱ्यांच्या पदनिहाय पात्रतेनुसार पदोन्नती व नेमणूका करण्यात याव्यात असे ठरले.
(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**विषय नं.४८** **गट 'क' व 'ड' वर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालविण्यासाठी आश्वासीत प्रगती योजना लागू करणे बाबत.**

**निर्णय क्र.४०१** सदरहू विषयाबाबत आस्थापना उपसमितीचे सभेत चर्चा करुन अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले.
(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.४९.** **डॉ.आर.जी.ढवळे, वैद्यकीय संचालक, यांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.४०२** श्री आर.जी.ढवळे यांची संस्थानचे हॉस्पीटलकरीता मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.६८ अन्वये वैद्यकिय संचालक या पदावर जा.नं.एसएसएस/वशी-०१/१७११६/२००६ दि.०१/१२/२००६ (०९/१२/२००६) अन्वये ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी रु.३५,०००/- एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर पदावर ते दि. ०१/१२/२००६ रोजी हजर झालेले असून त्यांच्या नेमणूकीची मुदत दि.३१/०५/२००७ अखेर संम्पुष्ठात येत आहे.

डॉ. आर.जी. ढवळे, वैद्यकिय संचालक यांनी दि.०९/०५/२००७ रोजी अर्ज करुन त्यात,संस्थानने श्रीसाईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयात वैद्यकीय संचालक म्हणून माझी सहा महिन्यांकरीता नियुक्ती करण्यात आलेली आहे.त्यानुसार मी उपरोक्त पदावर दि.०१/१२/२००६ पासून कार्यरत आहे.सदरची मुदत दि.३१/०५/२००७ रोजी कार्यालयीन कामकाजोत्तर संपुष्टात येत आहे.त्यानंतर पुढील मुदतवाढीबाबत मला उपरोक्त दिनांकापुर्वी माहिती मिळाल्यास त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणे सोपे होईल तरी मला माझे उपरोक्त पदाचे वाढीबाबतचा निर्णय कळविण्यात यावा." अशी विनंती केलेली आहे.

सदर अर्जावर प्रशासकीय अधिकारी (रुग्णालये) यांनी "डॉ.ढवळे यांची मुदत दि.३१/०५/२००७ रोजी संपुष्टात येत आहे पुढील कालावधीसाठी निर्णय घेणेकामी तात्काळ व्यवस्थापन समिती / आस्थापना उपसमिती समोर निर्णय व्हावा." असे निर्देश दिले आहेत.

वैद्यकीय संचालक,श्रीसाईबाबा हॉस्पीटल यांचे अर्जातील विनंती तसेच प्रशासकीय अधिकारी (रुग्णालये) यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेवून सदर डॉ.ढवळे यांना मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,डॉ.आर.जी.ढवळे यांना सध्याचेच शर्ती/अटींवर सहा महीन्यांकरिता मुदतवाढ देण्यात यावी,असें ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**यानंतर मा.अध्यक्षांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय न. ०१** **नवीन प्रसादालयाकरीता बनविलेल्या नमुना फर्निचरचे बिलाची रक्कम आदा करणे बाबत**

**निर्णय क्र.४०३** नविन प्रसादालयाकरीता आवश्यक फर्निचर, फॅब्रिकेटेड इक्वीपमेंट खरेदीकामी कलाकृती स्टील फर्निचर, गोकुळ शिरगांव यांना मा.व्यवस्थापन उपसमिती दि. ११/०१/०७ व १/२/०७ चे सभेमध्ये चर्चेसाठी बोलविणेत आलेले होते. मा.व्यवस्थापन उपसमिती सदस्य व श्री.कुलकर्णी यांनी प्रसादालयाची पहाणी करुन प्रत्यक्ष कामकाज पहिले व प्रसादालयातील कर्मचारी यांचेशी चर्चा केली. चर्चेअंती सर्वप्रकारचे फर्निचर, ट्रॉलीज वर्कींग टेबल, जेवणाचे टेबल व कुकर्स यांचे गेज व स्पेशीफिकेशन निश्चीत केलेले आहे. याकरीता सर्व प्रकारच्या फर्निचरचे फॅब्रिकेटेड इक्वीपमेंटचे एक / एक नमुना मे.कलाकृती स्टील फर्निचर प्रा.लि., गोकुळ शिरगांव यांचेकडून तयार करुन घेउन सदरचे सर्व नमुने खरेदी उपसमितीमध्ये मंजूर करुन घेउन त्या नमुन्यामध्येच पुरवठादारांनी माल पुरविण्यात यावा यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देउन निवीदा मागणी करुन खरेदीच्या विहीत पध्दतीने खरेदी करावे त्याकामी अंदाजे रु. २,२५,०००/- खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. उपरोक्त उपसमितीचे इविवृत्ताची मा.व्यवस्थापन समिती दि.१७/०२/२००७ चे सभेत नोंद घेणेत आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.१७/०२/०७ चे सभेतील निर्णय क्र ११५ नूसार जा.नं. एसएसएस / वशि/प्रसाद/३०६४/०७ दि.२७/०२/०७ चे पत्रानूसार कलाकृती स्टील फर्निचर प्रा.लि. यांना खालीलप्रमाणे फर्निचर नमुन्यादाखल बनविणेस कळविलेले होते.

| | | |
|---|---|---|
| १) ट्रे ट्रॉली | - | ०१ |
| २) फुड सर्व्हीस ट्रॉली ४ भांडयासह | - | ०१ |
| ३) फुड सर्व्हीस ट्रॉली २ भांडयासह | - | ०१ |
| ४) टू ट्रे ट्रॉली (बुंदीसाठी) | - | ०१ |
| ५) बुंदी बर्नर , शेगडी कढईसह | - | ०१ |

६) बल्क कुकींग बर्नर (शेगडीमोठी) - ०१
७) व्हेजीटेबल कटींग युनीट - ०१
८) डायनींग टेबल ४ सीटरसह - ०१

वरीलप्रमाणे तयार केलेले फर्निचरची वेळोवेळी पहाणी केलेली आहे. त्याबाबत मा.सौ. उर्मिला जाधव, व्यवस्थापन समिती सदस्या यांचे मार्गदर्शन घेणेत आलेले आहे. तसेच उपरोक्त १ ते ८ प्रमाणे कळविलेले फर्निचर व्यतीरिक्त खालीलप्रमाणे अत्यावश्यक फर्निचर बनविणेस सांगणेत आलेले आहे.

१) पाण्याची ट्रॉली - ०२
२) मध्यम शेगडी - ०१
३) साईड टेबल (बुंदीशेगडीसाठी) - ०२
४) बुंदीलाडू वळणे टेबल व बाके - ०१ सेट
५) डायनींग टेबल - ०१
६) ड्रेनेज कव्हर - ०१

उपरोक्तप्रमाणे जा.नं.एसएसएस/वशि/प्रसाद/३०६४/०७ दि.२७/०२/०७ अन्वये ८ व मा.सौ.उर्मिला जाधव, व्यवस्थापन समिती सदस्या, यांचे मार्गदर्शन व अत्यावश्यक ६ प्रकारचे असे एकूण १४ प्रकारचे फर्निचर तयार करुन मे.कलाकृती स्टील फर्निचर प्रा.लि. यांनी पाठविलेले आहे.

उपरोक्त १ ते ८ फर्निचरकामी मा.व्यवस्थापन उपसमिती सभा दि.११/१/०७ व १/२/०७ मध्ये अंदाजे रु.२,२५,०००/- खर्चास मान्यता मिळालेली आहे. मात्र कलाकृती स्टील फर्निचर प्रा.लि. यांनी पुर्वीचे १ ते ८ व वाढीव १ ते ६ अत्यावश्यक फर्निचरची एकुण किंमत ३,१३,५७८/- कळविलेली आहे. त्यानूसार वाढीव खर्च रु. ८८,५७८/- चे खर्चास मान्यता घेणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे पुरवठा आदेश कलाकृती स्टील फर्निचर या नावाने देण्यात आलेला आहे. मात्र बील कुलकर्णी स्टील फर्निचर प्रा.लि. या नावाने पाठविलेले आहे. त्याकामी फेरबदलाबाबतचे दि.१/४/०७ चे पत्रान्वये कळविलेले आहे. त्यांचे विनंतीपत्रानूसार कलाकृती स्टील फर्निचर प्रा.लि. ऐवजी कुलकर्णी स्टील फर्निचर प्रा.लि. या नावाचे बील स्विकारुन रक्कम आदा करणेस मान्यता असावी.

तरी कुलकर्णी स्टील फर्निचर प्रा.लि., गोकूळ शिरगांव यांनी नमुनादाखल बनविलेल्या फर्निचरचे एकूण बीलाची रक्कम रु. ३,१३,५७८/- अक्षरी रु.तीन लाख तेरा हजार पाचशे अठयाहत्तर मात्र. आदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय न.०२** **अत्यावश्यक प्रसंगी आय.टी.आय चे विद्यार्थ्यांना सेवेचे मानधन देणे बाबत.**

**निर्णय क्र.४०४** काही ठराविक कालावधीमध्ये साईभक्तांची अचानक मोठया प्रमाणावर गर्दी होत असते. (उदा. नाताळ सुटी, दिपावली सुटी, उत्सवाचा कालावधी, सलग सुट्टया आल्यानंतर) मोठया प्रमाणातील गर्दीमध्ये साईभक्तांची गैरसोय होऊ नये याकरीता वाढीव सेवा / सुविधा पुरविणे यात संस्थानचे आद्य कर्तव्याचा भाग आहे. ज्या वाढीव सेवा / सुविधा पुरविल्या जातात त्या मर्यादीत काळापुरत्याच असतात. त्याकामी ऐनवेळी लेबर कॉन्ट्रक्टरकडे पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध होत नाही. जरी त्या कालावधीसाठी जादा कर्मचारी घेतलेच तर साधारण गर्दीमध्ये अगर कमी गर्दीचे काळात त्यांना काम देणे शक्य होत नाही. ही अडचण विचारात घेता सन २००६ चे नाताळ सुटी, नविन २००७ वर्षारंभ २६ जानेवारीची गर्दी तसेच उत्सवाचे काळामध्ये कंत्राटी कर्मचा-या ऐवजी आय.टी.आय.चे विदयार्थ्यांकडून काम करुन घेण्यात आलेले आहे. त्या सेवेच्या काळात आय.टी.आय.चे विदयार्थ्यांना मानधन देणेबाबत संस्थानचे कामगार कायदेसल्लागार ॲड अशोक पाटील, अ.नगर यांनी अभिप्राय दिलेला आहे. ॲड अशोक पाटील यांनी आय.टी.आय. चे विदयार्थ्यांना रोजंदारी रक्कम आदा करणे अडचणीचे ठरेल. त्याऐवजी रोजंदारी दरापेक्षा मानधन रक्कम प्रति दिनी रु.१००/- प्रमाणे आदा करता येईल असा अभिप्राय दिलेला आहे. त्यानुसार नाताळ सुटया व नविन वर्षारंभाचे गर्दीचे कालावधीत काम करुन घेतलेल्या आय.टी.आय.चे विदयार्थ्यांचे मानधन रु.१,८८,९००/- आदा करणेस व त्यापुढेही गरजेनूसार मर्यादित कालावधीत घेतलेल्या सेवेचे मानधन आदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय न. ०३.** **प्रसादालयातील गहू, डाळी, कडधान्य व इतर किराणा मालाची घट-तूट खर्ची घालणेबाबत.**

**निर्णय क्र.४०५** प्रसादालयामध्ये दररोज सरासरी १७,००० साईभक्त प्रसाद भोजन घेतात. सुमारे ५००० अन्नपाकीटे व ९०,००० लाडूची विक्री होते. त्याकामी लागणारा किराणा माल, कडधान्ये मध्यवर्ती भांडारकडून प्रसादालयाचे उपभांडारमध्ये आणला जातो. आणलेला किराणा माल साफ करुन दळण्यात येतो. सदर माल प्रथमतः डिस्टोनर मशिनद्वारे व त्यानंतर मनुष्यबळाकरवी साफ केला जातो, निवडला जातो व त्यानंतर दळण्यात येतो.

दळण, कांडण व डिस्टोनर मशिनमधून काढलेल्या मालामध्ये ब-याच प्रमाणात कचरा, खडे, मातेरे निघते. कांडण व डिस्टोनर मशिनमधून काढणा-या मालामध्ये साधारणतः गहू, हरबरा, वाटाणा, मुग, मठ, हरबराडाळ, तूरडाळ, मुगडाळ, अखंडधने इ. चा समावेश असतो. ही सर्व प्रक्रीया करतांना ब-याच प्रमाणात घट-तूट येते. मात्र सदर येणारी घट-तूट यापूर्वीचे कोणत्याही लेखापरिक्षकाने मुद्या उपस्थित न केल्यामुळे घट-तुट स्वतंत्रपणे खर्च दाखविण्यात येत नव्हती. सदर घट-तूट जो तो माल खर्च दाखवितांना अंदाजे दाखविण्यात येत होती. मात्र सन २००५-२००६ चे स्थानिक अंतर्गत लेखापरिक्षक यांनी घट-तूटीचा मुद्या नमूद केला. त्यामुळे दि.१५/०८/२००६ पासून प्रत्यक्ष वापरण्यात येणारा मालच खर्ची दाखविण्यात आलेला आहे. घट-तुटीचा, कचरा, काडी, मातेरे,कोंडा वगैरे खर्ची दाखविले नाही. त्याचा प्रयोगादाखल काही मालाचा तपशील खालीलप्रमाणे आहे. इतर डाळी, कडधान्य, व किराणा माल पूर्वीप्रमाणेच घटतुटीसह नावे दाखविलेला आहे.

| अ. नं. | मालाचे नाव | घटतुट कालावधी | एकूण खर्च माल किलो / ग्रॅम | आलेली घट किलो / ग्रॅम | प्रति क्विं. घट कि / ग्रॅ |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | गहू | दि.१५/०८/०६ ते ३१/०३/०७ | ५४७६८४.००० | १३८७७.००० | २.५३३ |
| ०२. | तुरडाळ | दि.०१/०३/०७ ते ३१/०३/०७ | ९७५४.००० | ८८.००० | .९०२ |
| ०३. | हरबराडाळ | दि.२८/११/०६ ते ३१/०३/०७ | २००६१४.००० | २३५९.००० | १.१७६ |
| ०४. | मुगडाळ | दि.१६/०२/०७ ते ३१/०३/०७ | १४७५.००० | २२.०० | १.४९१ |
| ०५. | गुळ | दि.०१/०३/०७ ते ३१/०३/०७ | १२००.५०० | ११.००० | .९१६ |
| ०६. | रवा | दि.०१/०२/०७ ते ३१/०३/०७ | ४४४५.५०० | ४३.५०० | .९८० |
| ०७. | शेंगादाणे | दि.०३/०३/०७ ते ३१/०३/०७ | १८२५.५०० | १५.२०० | .८३३ |
| ०८. | मिरची | दि.१०/११/०६ ते ३१/०३/०७ | ३९२७.००० | १५५.५०० | ३.९५९ |
| ०९. | अखंड हळद | दि.०६/११/०६ ते ३१/०३/०७ | ३०४५.००० | १२५.००० | ४.१०५ |
| १०. | मोहरी | दि.१०/०३/०७ ते ३१/०३/०७ | १४२.२५० | २.१७० | १.५२७ |
| ११. | जिरे | दि.११/०३/०७ ते ३१/०३/०७ | १५९.००० | ६.३६० | ४.००० |
| १२. | मसाला | दि.२५/०३/०७ ते ३१/०३/०७ | २४४.५३० | ५.००० | २.०४४ |
| १३. | धनेपावडर | दि.१६/११/०६ ते ३१/०३/०७ | ३७९७.५०० | ६६.९०० | १.७६२ |
| १४. | हिरवी विलायची | दि.०१/१२/०६ ते ३१/०३/०७ | १३४४.९४५ | १३.२०० | .९८१ |
| १५. | हरबरा | दि.१४/०३/०७ ते ३१/०३/०७ | २७२०.००० | २०.४०० | .७५० |
| १६. | वाटाणा | दि.०६/०३/०७ ते ३१/०३/०७ | २९२०.००० | ३२.१८० | १.१०२ |
| १७. | मुग | दि.०७/०३/०७ ते ३१/०३/०७ | ४२४०.००० | ४८.५०५ | १.१४४ |
| १८. | मठ | दि.०७/०३/०७ ते ३१/०३/०७ | ४१८५.००० | ३२.०९८ | .७६७ |
| १९. | मेथी | दि.२३/०२/०७ ते ३१/०३/०७ | १९.२५० | .४९२ | २.५५६ |
| २०. | सुंठ | दि.२५/०९/०६ ते ३१/०३/०७ | ८३.००० | ४.३३५ | ५.२२३ |
| २१. | मैदा | दि.०४/०३/०७ ते ३१/०३/७ | ३३८८.००० | १२.६७१ | .३७४ |
| २२. | शाबुदाणा | दि.०१/०३/०७ ते ३१/०३/०७ | २२१.००० | २.२२१ | १.००५ |
| २३. | कच्चेपोहे | दि.०१/०३/०७ ते ३१/०३/०७ | ९८.००० | .९८० | १.००० |

श्री.लोंगाणी, स्थानिक अंतर्गत लेखापरिक्षक यांनी संदर्भिय लेखापरिक्षण मुद्यानूसार धान्य, कडधान्य, डाळ वगैरे सर्व साहित्य निवडणे, दळणे इ. प्रक्रिया करतांना प्रत्यक्षात येणारी घट-तुट खर्ची टाकण्यात यावी असे सुचविले होते. त्यानुसार उपरोक्त प्रमाणे धान्य, कडधान्यामध्ये इतर किराणा माल यामध्ये प्रत्यक्ष आलेली घट-तुट दर्शविण्यात आलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे धान्य,कडधान्य व इतर किराणा मालाचे वापरामध्ये प्रत्यक्ष आलेल्या घट - तुटीचा अहवाल संस्थान अंतर्गत लेखापरिक्षक व श्री लोंगाणी साहेब , स्थानिक अंतर्गत लेखापरिक्षक यांचे अवलोकनार्थ ठेवण्यात आला होता. मात्र अवलोकनाअंती त्यांनी सध्याची आलेली घट - तुट खर्ची घालणेस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेत यावी असे त्यांनी सांगितले आहे. तसेच सन २००७-२००८ या वर्षापासून घट-तुट दर्शविण्याची कार्यवाही करण्यासाठी संस्थानप्रमाणे सरकारी डिपार्टमेंट उदा.कारागृह, मिलिटरी कॅम्प,धार्मिक संस्थान, सरकारी अन्नधान्य महामंडळ या ठिकाणी घट-तुट दाखविण्याची काय पध्दती अस्तित्वात आहे. त्याची माहीती घेउन घट-तुटीची नियमावली तयार करण्यात यावी असे सुचीत केलेले आहे.

तरी सन २००६-२००७ या वर्षामध्ये धान्य,कडधान्य व इतर किराणा मालामध्ये आलेल्या वर नमूद केलेल्या प्रत्यक्ष घट-तुटीस मान्यता मिळावी. सन २००७-२००८ पासून पुढे श्री लोंगाणी , स्थानिक अंतर्गत लेखापरिक्षक यांचे सुचनेनूसार शासकीय डिपार्टमेंट कडून माहीती घेउन श्री लोंगाणी यांचे मार्गदर्शनाने नियमावली करुन घट-तुट दर्शविण्याची कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय न. ०४ गुरुकृपा सेल्स, कोपरगांव यांना श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील दिलेल्या गाळयामध्ये त्यांचे शेतातील ताजे फळे व फळांचा रस/ज्युस, उसाचा रस विक्रीकामी परवानगी देणेबाबत**

**निर्णय क्र.४०६** संस्थानने गुरुकृपा सेल्स, कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना साईबाबा भक्तनिवास इमारतीतील एक गाळा साईभक्तांचे व संस्थानचे सोयीच्या दृष्टीने साईगंगा मिनरल वॉटरची साईभक्तांना वाजवीदरात विक्री करणेकामी अकरा महिने मुदतीचे कालावधी करिता परवानगी देऊन वापरांसाठी खालील तपशिलानूसार दिलेला आहे.

| अ.नं | इमारतीचे नांव | गाळा धारकाचे नांव | वापरासाठी घेण्यात येणारी दरमहा फी | वापर | पूर्वीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईबाबा भक्त निवासस्थान -डी विंग कडील गाळा नं ०८ | गुरुकृपा सेल्स, कोपरगांव | दरमहा रुपये २०००/- | साईगंगा मिनरल वॉटर | १०-१२-२००५ ते ०९-११-२००६ |

उपरोक्त प्रमाणे गुरुकृपा सेल्स, हॉटेल स्पॅन कपांऊड, साई कॉर्नर, कोपरगांव , जिल्हा अहमदनगर यांची दिनांक ०९-११-२००६ रोजी मुदत संपत असल्याने मुदतवाढ मिळणेबाबत त्यांचा प्रस्ताव इकडील कार्यालयास दि. १८/०१/२००७ रोजी प्राप्त झालेला आहे. त्यात त्यांनी " श्री साईबाबा संस्थानने आम्हांला श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ( ५०० रुम्स ) कडील एक गाळा डिसेंबर २००५ पासून भाडेतत्वावर कराराने दिलेला होता आम्ही मागील वर्षाचे संपूर्ण भाडे आदा केलेले आहे. करारनाम्याचे पुढील वर्षासाठी नूतनीकरण करण्यात यावे. तसेच शक्य असेल तर करारनाम्याचे नुतनीकरण ५ वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात यावे. सहकार्याबद्यल आभारी आहोत " असे म्हटलेले आहे.

साईभक्तांना व संस्थानला उपरोक्त गाळयाचा होणारा उपयोग लक्षात घेता, गुरुकृपा सेल्स, हॉटेल स्पॅन कपांऊड, साई कॉर्नर, कोपरगांव , जिल्हा अहमदनगर यांना दिनांक १०/११/२००६ रोजी पासून ते दिनांक ०९/१०/२००७ अखेर ११ महिने कालावधी करिता डिपॉझीट रुपये १०,०००/- ( दहा हजार ), मागील मासिक परवाना फी रुपये २०००/- मध्ये १० % वाढ करुन दरमहा रक्कम रुपये २,२००/- मात्र आकारून व तसेच दरमहा मिटर रिडीग प्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीस अनुसरून लिव्ह अ‍ॅन्ड लायसेन्सी तत्वावर गाळयास मुदतवाढ देणेबाबत विचारार्थ ठेवण्यात आलेला आहे.

आता गुरुकृपा सेल्स, कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांचे दिनांक ११/०२/२००७ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले असून त्यात त्यांनी ५०० रुम येथील गाळा आम्हाला वाजवी मासिक परवाना फी आकारुन देण्यात आलेला आहे या सहकार्याबद्यल धन्यवाद, सदर गाळयाचे पुढील वर्षाकरिता नुतनीकरण करणेत यावे. अशी विनंती केली असून, सदर पत्रात त्यांनी शेती / फर्म हाऊस मधून उत्पादीत होणारे ताजे फळे , फळाचा ज्युस, उसाचा रस आमच्या फर्म हाऊस मधून संस्थानने आम्हांला दिलेल्या ५०० रुम येथील गाळयामध्ये वाजवी दरात साईभक्तांना विक्री करणेकामी संस्थानने संमती दिलेली आहे. असे म्हटले असून त्यांचे शेती / फार्म हाऊस मधून उत्पादीत होणारे ताजै फळे , फळाचा ज्युस, उसाचा रस इ.श्री साईबाबा संस्थानने ५०० रुम येथे दिलेल्या गाळयात / स्टॉलवर विक्री करण्याची आमचा प्रस्ताव आहे. त्याकामी परवानगी मिळावी साईभक्तांसाठी चांगली सेवा व सुविधा मिळेल असे म्हटलेले आहे

गुरु

मासिक परवाना फी रुपये २०००/- व विद्युत बील वेगळे आकारुन परवानगी देण्यात आलेली आहे. सदर गाळयाची मुदत दि ०९/११/२००६ रोजी संपलेली आहे.सदर गाळयास मुदतवाढ बाबत त्यांनी वेगळा प्रस्ताव दिलेला आहे. सदर गाळा नं ०८ मध्ये आता उसाचा रस, ताजे फळे, फळाचा रस / ज्युस साईभक्तांना वाजवी दरात विकणेकामी परवानगी मागितलेली आहे. सदर परवानगी दयावयाची झाल्यास त्यांचेकडून डिपॉझीट रुपये १०,०००/- ऐवजी रुपये २४,०००/- व यापूर्वी ठरविण्यात आलेल्या गाळयाचे मासिक परवाना फी मध्ये वाढ करुन रुपये ४०००/- आकारुन व विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह अ‍ॅन्ड लायसेन्स तत्वावर ११ महिनेकरिता सदर व्यवसाय करणेकामी परवानगी देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात आला.मे.गुरुकृपा सेल्स, कोपरगांव यांनी पूर्वीचे शर्ती-अटीप्रमाणे फक्त मिनरल वॉटरची विक्री करावी. त्यासाठी वर प्रस्तावित केल्याप्रमाणे रुपये २२००/- मासिक परवाना फी व दरमहा मिटर रिडींग प्रमाणे विद्युत वेगळे आकारण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय न. ०५. भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये श्री नंदू गणपत कोळपकर यांना देण्यात आलेल्या गाळयास मुदतवाढ देणे बाबत**

**निर्णय क्र.४०७** मा.व्यवस्थापन मंडळाच्या दि.१४-१२-१९९५ रोजीच्या निर्णयाप्रमाणे श्री.नंदू गणपत कोळपकर यांना नविन भक्तनिवासस्थान {५०० रुममधील }गाळा क्र.६ दि.२१-०२-१९९६ रोजी झालेल्या लिलावाव्दारे ११ महीने मुदतीकरीता डिपॉझीट रक्कम रु.१,२५,०००/- मात्र व मासिक परवाना फी रु.रक्कम रु.३,२००/- मात्र तसेच विद्युत आकार मिटर रिडींगप्रमाणे वेगळा याप्रमाणे देण्यात आलेला होता. व त्यानंतर सदर गाळयास खालीलप्रमाणे वेळोवेळी मुदतवाढ मासिक परवाना फी मध्ये वाढ करुन नुतनीकरण करुन देणेत आलेले आहे/-

०१. दि.१३-०३-१९९६ ते दि.१२-०२-१९९७
०२. दि.१३-०२-१९९७ ते दि.१२-०१-१९९८
०३.दि.१३-०१-१९९८ ते दि.१२-१२-१९९८
०४. दि.१३-१२-१९९८ ते दि.१२-११-१९९९
०५. दि.१३-११-१९९९ ते दि.१२-१०-२०००
०६. दि.१३-१०-२००० ते दि.१२-०९-२००१
०७. दि.१३-०९-२००१ ते दि.१२-०८-२००२
०८. दि.१३-०८-२००२ ते दि.१२-०७-२००३
०९. दि.१३-०७-२००३ ते दि. १२-०६-२००४
१० दि.१३-०६-२००४ ते दि. १२-०६-२००६
११. दि.१३-०६-२००६ ते दि. १२-०६-२००७

दिनांक १३/०६/२००६ ते दिनांक १२/०६/२००७ अखेर या कालावधीसाठी मासिक परवाना फी रुपये ४२५९/- आकारुन व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन ठरविण्यात आलेली होती.

श्री.कोळपकर यांनी त्यांचे दि.२६-०४-२००७ रोजीचे पत्रान्वये गाळयाचे नुतनीकरण व परवाना फीचे संदर्भात अर्ज दिला आहे. त्यात त्यांनी " दि. १९/०२/२००६ रोजी झालेल्या लिलावात मला नविन भक्तनिवास ( ५०० रुम ) मध्ये गाळा क्रमांक ६ हा प्रोव्हीजन स्टोअर्ससाठी साईभक्तांचे सेवेसाठी ११ महिन्यांसाठी करारावर देण्यात आला होता. त्यानंतर हा करार नुतनीकरण करण्यात आलेले आहे मागील करार १ वर्षासाठी दि १३/०६/२००६ ते दि १२/०६/२००७ पर्यत करण्यात आलेला आहे. त्यासाठी परवाना फी रुपये ४२५९/- व अनामत रक्कम रुपये १.२५ लाख आहे. लिलावाच्या म्हणजे सन १९९६ ला घेतेवेळी ३२००/-व अनामत रक्कम रुपये १.२५ लाख होते व आतापर्यंत वाढवून रुपये ४२५९/- झालेले आहे. तसेच

सन १९९६ ते २००१ पर्यंत साईभक्तांना या गाळयाव्दारेच सेवा पुरविली जात होती. परंतु सदर भक्तनिवास मध्ये दुकानांची संख्या वाढलेली आहे. सदर गाळयाशेजारील गेट जे यापूर्वी उघडे होते ते सध्या बंद आहे सदर परवाना फी इतर गाळयांच्या तुलने फारच जास्त आहे. मी सन १९९६ पासून प्रोव्हीजन स्टोअर्स या माध्यमातून साईभक्तांना कुठल्याही प्रकारची तक्रार नसता उत्तम सेवा दिलेली आहे व यापुढेही देत राहील. या सर्व बाबी विचारात घेऊन परवाना फी रुपये २०००/- पर्यंत करण्याचा विचार करण्यात यावा तसेच १ वर्षाऐवजी ३ वर्षासाठी असावी अशी विनंती त्यांनी केलेली आहे.".

श्री.कोळपकर यांनी मासिक परवाना फी रुपये २०००/- आकारावी अशी विनंती केलेली आहे. यापुर्वीच्या मासिक परवाना फी ३२००/- मध्ये १० टक्के वाढ करणेत करुन दिनांक १३/०६/२००४ ते १२/०६/२००५ मासिक परवाना फी पहिल्या वर्षी रक्कम रु.३,८७२/- व व्दितीय वर्षी सदरच्या मागील रक्कमेत १० % वाढ करुन मासिक परवाना फी रुपये ४२५९/- मात्र दिनांक १३/०६/२००५ ते दि १२/०६/२००६ अखेर या कालावधीसाठी आकारणेत आलेली आहे. व दि. १३/०६/२००६ ते दि १२/०६/२००७ या कालावधीकरिता भक्तांना या सुविधेची आवश्यकता असल्याने परवाना फी रकमेत कोणतीही वाढ न करता पूर्वीचेच मासिक परवाना फी रक्कम रुपये ४२५९/- इतकीच व मिटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

श्री.नंदू गणपत कोळपकर यांचे गाळयाची लिव्ह ॲन्ड लायसन्स मुदतवाढ दिनांक १२/०६/२००७ रोजी संपत आहे सदर कालावधीत त्यांना मासिक परवाना फी रु ४२५९/- मात्र आकारणेत आलेली आहे. आता त्यांनी परवाना फी रुपये २,०००/- मात्रची मागणी केली आहे.

श्री.नंदू गणपत कोळपकर यांना उपरोक्त गाळा लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर देणेबाबत लिलांवात मंजूरीने प्रथम दिनांक १३/०३/१९९६ रोजी देणेत आला होता. व गाळयाचे डिपॉझीट रुपये १,२५,०००/- व लायसन्स फी रुपये ३२००/- लिलावात ठरली होती. प्रतिवर्षी गाळयाचे नुतनीकरण करतांना मासिक परवाना फी मध्ये १० % वाढ केलेली आहे. आता लायसन्स फी रुपये ४,२५९/- आहे. या बाबीचा विचार करता लायसन्स फी कमी करता येणार नाही.

श्री.नंदू कोळपकर यांनी त्यांचे अर्जात लायसन्स फी कमी करणेसाठी ज्या बाबींचा उल्लेख केला आहे त्यांचा विचार करता अर्जावर सध्याचे लायसन्स फी रुपये ४२५९/- इतकीच फी आकारुन १ वर्षासाठी त्यांना लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर गाळा देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय न. ०६. ग्रुप ग्रॅच्युईटी योजना ट्रस्ट डीड बाबत**

**निर्णय क्र.४०८** मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्र. ४१८/२२. २३/०९/२००१ अन्वये संस्थान कर्मचाऱ्यांसाठी एल. आय. सी. कडील ग्रुप ग्रॅच्युईटी योजना दि. ०१/१०/२००१ पासून लागु करण्यात आलेली आहे.

या योजनेसाठी श्री साईबाबा संस्थान एप्लॉईज ग्रुप ग्रॅच्युईटी अॅश्युरन्स स्कीम या स्वतंत्र निधीची स्थापना करण्यात येऊन या नावाने सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी येथे स्वतंत्र खाते उघडण्यांत आले असून या नेमणुक करण्यात आलेल्या तिन विश्वस्तापैकी कुठल्याही दोन विश्वस्तांच्या स्वाक्षरीने त्या खात्यावरील व्यवहार चालु आहेत. या निधीच्या व्यवस्थापनासाठी मा. श्री.भाऊसाहेब रा.वाकचौरे, कार्यकारी अधिकारी श्री.जगताप एस.के. प्रशासकीय अधिकारी व श्री. काळे ए.एम. लेखाधिकारी या तीन संस्थान अधिकाऱ्यांची विश्वस्त म्हणून तत्कालीन मा. अध्यक्ष यांचे मान्यतेंने नेमणूक करण्यात आलेली आहे. उपरोक्त तिघापैकी मा. कार्यकारी अधिकारी हे न्यासाचे चेअरमन, श्री. जगताप एस.के. पर्यायी चेअरमन व श्री काळे ए.एम. सेक्रेटरी म्हणुन कार्य करीत आहेत.

यापैकी श्री. एस. के. जगताप, प्रशासकीय अधिकारी हे दिनांक ३०/०६/२००७ रोजी संस्थान सेवेतुन सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे त्यांचे ऐवजी न्यासाचे विश्वस्त व पर्यायी चेअरमन म्हणुन प्रशासकीय अधिकारी यांची नेमणूक करणे आवश्यक असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,न्यासाचे विश्वस्त व पर्यायी चेअरमन म्हणून श्री.आर.एस.साबळे, प्रशासकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी,असें ठरलें. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय न. ०७. पाणी मापक यंत्र बसविणे बाबत**

**निर्णय क्र.४०९** शासन परिपत्रक क्रं..बिपापू १००१ (७१३/२००१) सिंव्य (धो), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दि.०७/०४/२००३ अन्वये, आपणास पाटबंधारे विभाग, नाशिक यांनी पाणी मापक यंत्र बसविणे बाबत उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये कळविलेले आहे. त्यानूसार फॅक्सद्वारे कोटेशन ०३ प्राप्त झालेले आहे. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे.-

**<u>०१. चेतस कंट्रोल सिस्टीम प्रा. लि. पुणे-</u>**

| अ.नं. | तपशिल | संख्या | दर प्रति युनिट | एकूण दर |
|---|---|---|---|---|
| ०१ | अल्ट्रॉसोनिक ओपन चॅनल टाईप फ्लोमीटर पुरविणे. बसविणे व चालू करुन देणे मॉडेल U L I -१०० ०१. वरील दरामध्ये सेल्स टॅक्स (व्हॅट) अंतर्भूत आहे. | ०१ | १,८०,०००/- | १,८०,०००/- |

**०२. प्रविला अॅटोमेशन प्रा.लि. पुणे-**

| अ.नं. | तपशिल | संख्या | दर प्रति युनिट | एकूण दर |
|---|---|---|---|---|
| ०१ | अल्ट्रॉसोनिक ओपन चॅनल टाईप फ्लोमीटर पुरविणे. बसविणे व कार्यान्वीत करुन देणे इ. ०१. वरील दरामध्ये सेल्स टॅक्स (व्हॅट) अंतर्भूत आहे. | ०१ | १,८५,०००/- | १,८५,०००/- |

**०३. तेजस इलेक्ट्रोसिस्टीम पुणे-**

| अ.नं. | तपशिल | संख्या | दर प्रति युनिट | एकूण दर |
|---|---|---|---|---|
| ०१ | अल्ट्रॉसोनिक ओपन चॅनल टाईप फ्लोमीटर पुरविणे. बसविणे व कार्यान्वीत करुन देणे इ. ०१. वरील दरामध्ये सेल्स टॅक्स (व्हॅट) अंतर्भूत आहे. | ०१ | १,९४,२००/- | १,९४,२००/- |

उपरोक्त तीनही कोटेशन दरामध्ये सेल्स टॅक्स (व्हॅट) अंतर्भूत आहे. तसेच तीनही कोटेशनमध्ये कामासाठी मेकॅनिकल व मीटर रुम (७ x७ मीटर अंदाजे) सारख्या बांधकामचा अंतर्भाव नाही ते काम संस्थेने करणे आहे. असे कोटेशनमध्ये म्हटले आहे. तेंव्हा त्यारुमचे बांधकाम संस्थानच्या बांधकाम विभागामार्फत किंवा बाहेरील ठेकेदारामार्फत करुन घेणेस तसेच क्र ०१ चे चेतस कंट्रोल सिस्टीम प्रा. लि. पुणे- यांचे कडून सदरचे अल्ट्रॉसोनिक ओपन चॅनल टाईप फ्लोमीटर खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय न. ०८. श्रीसाईप्रसाद भाडेकरु मालक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित निमगांव को-हाळे यांना पिण्याचे पाणी देणे बाबत**

**निर्णय क्र.४१०** वरील विषयास अनुसरुन वरील गृहनिर्माण संस्थेने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेसाठी मागणी केलेली आहे. त्यांचे बोअरचे पाणी क्षारयुक्त असल्याने पोटाचे विकार जडत आहे. असे पत्रात नमुद करुन सभासदांनी अर्ज केलेला आहे. सदर हौसींग सोसायटीत ५४ सभासद संख्या आहे. यापुर्वी आपलेकडून १. श्री साईनाथ गृहनिर्माण सह संस्था निमगांव-को-हाळे व २. श्री साईश्रध्दा हौसिंग सोसायटी शिर्डी यांना पिण्याचे पाणी दिलेले आहे. मात्र त्यांनी त्यांचे खर्चाने आपले पाईपलाईन पर्यंत पाईपलाईन टाकलेली आहे. त्यांना तेथील रहिवाशांचे संख्येनुसार पाणी देण्यात आलेले आहे. त्यात अनुक्रमे १. श्री साईनाथ कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था लि. शिर्डी यांना आपण दररोज २५,००० लिटर्स पाणी पुरवितो व वार्षिक पाणीपट्टी रु. १७,५००/- अक्षरी सतरा हजार पाचशे मात्र घेत आहोत. तसेच त्यासाठी मा. व्यवस्थापन मेडळ ठराव क्रं. ९, निर्णय क्रं. २५६ दि. ९-१०/०६/२००१ अन्वये निर्णय झालेला होता.

तसेच क्रं. २. श्रीसाईश्रध्दा गृहनिर्माण संस्थेस दररोज ५० हजार लिटर्स पाणी पुरविण्यात येते व त्यांचेकडूनही त्याचप्रमाणे रुपये ३५,०००/- अक्षरी पस्तीस हजार मात्र पाणीपट्टी घेत आहोत. त्यासाठी मा. व्यवस्थापन मंडळ चे दि. १५-१६/१०/२००२ चे सभेतील विषय नं. १७, निर्णय क्रं. ४८८ नुसार निर्णय झालेला होता.

वरील प्रमाणे संस्थान कर्मचा-यांचे दोन हौसिंग सोसायटयांना आपलेकडून मर्यादित पाणी पुरवठा करण्यात येत असुन सध्याचे श्री साईप्रसाद भाडेकरू मालकी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. निमगांव-को-हाळे यांना पिण्याचे पाणी दयावयाचे झाल्यास त्यांचे रहिवाशी संख्या विचारात घेता एकुण रुम ५४ व प्रत्येक रुममध्ये साधारणः ६ व्यक्ती म्हणजेच एकुण रहिवाशी संख्या ३२४ होते व दरडोई ५ लिटर्स पाणी धरल्यास दररोज अंदाजे १६२० लिटर्स पाण्याचा वापर होईल. परंतू संस्थानचा दिवसेंदिवस पाण्याचा वापर वाढलेला आहे. त्यात नविन प्रसादालय, द्वारावती इमारत, नविन स्टाफ क्वॉटर्स, नियोजित १००० रुम यांचा विचार करता साठवण तलावात वाढ झालेली नाही. व फिल्टर प्लॅन्टची क्षमता देखील कमी पडत आहे.

यापूर्वी संस्थान मार्फत श्री साईश्रध्दा कर्मचारी सहकारी गृहतारण संस्था शिर्डी व श्री साईनाथ कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था -निमगांव (शिर्डी) हौसींग सोसायटीस पूर्ण पाणी हे पाणीपट्टी वसुल करुन पुरविलेले आहे.

तरी श्रीसाईप्रसाद हौसींगला फक्त पिण्यासाठी पाणी दयावयाचे झाल्यास स्टाफ क्वॉटर्स टाकी जवळून १" पाईप कनेक्शन देवून दोन ठिकाणी जनरल स्टॅन्ड पोस्ट काढून देवून दररोज एक तास पाणी देता येईल. त्यासाठी सोसायटीस त्यांच्या स्वखर्चाने स्टाफ क्वॉटर्स टाकी पासून पाईपलाईन टाकून दोन ठिकाणी जनरल स्टॅन्ड पोस्ट बनवावे लागेल. सदरचा खर्च त्यांनी करावयाचा आहे. त्यांना फक्त पिण्यासाठी पाणी देणे आहे.

वरील साईप्रसाद हौसींग सोसायटीस पाणी देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईप्रसाद हौसिंग सोसायटीस साईश्रध्दा सोसायटीप्रमाणे स्टोअरजे टॅंकमध्ये दररोज एक तास पाणी देण्यात यावे. तसेच पाणी मापक यंत्र बसवून वर्षानंतर पाणी पट्टी नियमानुसार आकारण्यात यावी, यावे असे ठरले. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय न. ०९ कनकुरी साठवण तलाव ते भक्तनिवासस्थान पिण्याचे पाईपलाईनबाबत**

**निर्णय क्र.४११** पाणी पुरवठा विभागामार्फत सन २००० मध्ये प्रस्ताव ठेवण्यात आलेला होता. त्यानंतर सदरची पाईपलाईन बदली करणेबाबत प्रथमतः सर्व्हे करणेसाठी प्रस्ताव ठेवणेत यावा असे निर्देश देण्यात आले. यावर दिनांक २१-२२/०२/२००४ रोजी तात्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेत विषय नं.३२, निर्णय क्रं. ७३ अन्वये सविस्तर चर्चा होवून कनकुरी तलाव ते ५०० रुम (नविन भक्तनिवासस्थान) अशी ३०० mm व्यासाची नविन पाईपलाईन टाकणेकामी सर्व्हे करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. ३,००,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी महाराष्ट्र शासन तज्ञ सल्लागार श्री रोटकर यांचा सल्ला घेवून हे काम करणा-या त्यांनी सुचविलेल्या विश्वासार्ह एजन्सीजकडून या पाईपलाईनचे सर्व्हे करणेकामी कोटेशन्स मागविण्यात यावे असे ठरले. त्यानंतर दिनांक २९-३०/०५/२००४ चे मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेत विषय नं. ४७, निर्णय क्रं.२५५ अन्वये आलेल्या कोटेशन्स बाबत श्री रोटकर यांचे मार्गदर्शन घेवून त्यानुसार दिनांक ०७/०५/२००४ चे मा. व्यवस्थापन मंडळाचे सभेपुढे श्री रोटकर यांनी दिलेल्या लेखी अभिप्रायाचे बंद पाकिट उघडण्यात आले. त्यात त्यांनी सुचविलेल्या अभिप्रायानुसार में. सिंडिकेट सर्व्हिसेस,नाशिक यांना सदरचे काम देणेस व याकामी येणारे रक्कम रुपये ६२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. त्यानुसार

सिंडिकेट सर्व्हिसेस नाशिक यांनी सदर पाईपलाईन सर्व्हेचे काम पुर्ण केले व या योजनेच्या ढोबळ खर्चाचा अंदाज देण्यात आला. वरील खर्चाचा तपशिल श्री बी.व्ही. रोटकर यांचे अवलोकनार्थ पाठविण्यात आला असता, त्यावर त्यांचा अभिप्राय घेवून एकुण रक्कम रुपये २,०२,०४,२३५/- मात्रचे एस्टिमेट महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून प्रमाणित करून घेण्यात यावे व याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात याव्यात असे मा. व्य.मंडळाचे दि. २७/१२/२००४ चे सभेत विषय नं. ३१,निर्णय क्रं. १५८ अन्वये चर्चा होवून ठरले. उपरोक्त ठरावानुसार सदरचे इस्टिमेट महाराष्ट्र जीवन प्राधिकरण संगमनेर विभाग कार्यालयाकडून तपासून घेण्यात येवून त्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या में. सिंडिकेट सर्व्हिसेस नाशिक यांचेकडून करून घेवून तज्ञ सल्लागार श्री बी.व्ही.रोटकर, नागपूर यांचेकडून तपासून घेतल्या. त्याप्रमाणे दिनांक १८/०९/२००५ चे मा.व्य.समितीचे सभेत विषय नं. ३०, निर्णय क्रं. ५०६ अन्वये सदर पाईपलाईन सर्व्हे करण्याचे काम पुर्ण झाल्यानंतर निविदा फॉर्म तयार करून पुढील कामे ०१) वर्तमान पत्रात जाहिरात देणे.(जाहिरात खर्च संस्थानचा).०२) निविदा मागविणे. ०३) आलेल्या निविदांची पडताळणी करणे. ०४) पाईपलाईन टाकणेसाठी योग्य त्या एजन्सीजची निवड करणे. ०५) पाईपलाईनचे काम पुर्ण होईपर्यंत (साधारणः १२० दिवस) दैनंदिन पर्यवेक्षण करणे. इ. कामे सिंडिकेट सर्व्हिसेस, नाशिक यांना सदर कामांसाठी सुपरव्हिजन चार्जेस म्हणून रूपये १,२०,०००/- व अधिक सर्व्हिस टॅक्स चे खर्चास मान्यता देण्यात आली. त्यानुसार सदरचे काम करणेसाठी वर्तमान पत्रात जाहिरात देवून टेंडरची विक्री करण्यात आली. त्यानुसार ०६ टेंडरची विक्री होवून त्यानुसार रूपये ५,०००/- प्रती टेंडर प्रमाणे स्विकारण्यात आलेली होती. त्यानुसार सर्व्हे करण्याचे काम आलेल्या निविदानुसार सिंडिकेट सर्व्हिसेस, नाशिक यांना देण्यात आलेले होते व त्या प्रमाणे कामही पुर्ण करण्यात आलेले होते. मात्र सध्याचे मा. व्यवस्थापन समिती समोर काम पुर्ण करणेबाबत दिनांक १५/०५/२००६ चे उपसमिती सभेपुढे विषय नं.०८, निर्णय क्रं.३१८ अन्वये सदरचे काम न राबविण्याचा निर्णय झाल्याने काम तुर्त स्थगित आहे.

परंतू दैनिक सार्वमत मध्ये दिनांक ०८/०३/२००७ रोजी झालेल्या जाहीर निवेदनाप्रमाणे अ.नं.०२ मध्ये नमुद केलेप्रमाणे कोपरगांव अहमदनगर राज्यमार्ग क्रं.१० (कोपरगांव, शिर्डी, राहाता, बाभळेश्वर,कोल्हार,राहूरी, शिंगवे,देहरे,विळदघाट,अहमदनगर कि.मी.७८/२०० ते १७५/५३०.) सदर रस्त्याचे लांबीतील मजबुतीकरण व चौपदरीकरण करण्याचे काम शासनाने हाती घेतलेले आहे. तेव्हा या रस्त्यालगतच्या प्रांगणात ज्यांनी-ज्यांनी दुरध्वनी केबल्स व खांब, जलपुरवठा वा जलनिस्सारण वाहीन्या, विद्युत खांब इ. टाकलेल्या असतील तर सदर वाहिन्या सुरक्षित स्थळी हलविणेची व्यवस्था ज्याने-त्याने स्वखर्चाने करावयाची आहे. अन्यथा काम पुर्ण झालेनंतर सदरच्या वाहिन्यांचे मेन्टेनंससाठी भविष्यात रस्ता खोदाई करण्यास परवानगी मिळणार नाही. असे जाहीर निवेदन देण्यात आलेले आहे. सदर रस्त्यालगतचे प्रांगणात ५०० रुमपर्यंत आपली ३०० mm व्यासाची जलवाहीनी आलेली आहे. तसेच नगर-मनमाड रोड ते ओहर हेड टँक कनकुरी रोड पर्यंत तिच पाईपलाईन गेलेली आहे. सदर पाईपलाईन ही साधारणः १९८८ सालापासून आजपर्यंत चालू आहे. मात्र नगर-मनमाड रोडचे खाली ही पाईपलाईन गेलेली असून तिचे मेन्टेनंस करणे शक्य नाही. शिवाय कनकुरी रोडचे रूंदीकरण होत असल्याने तेथील पाईपलाईन ही रोडखाली जाणार आहे. तिचेही मेंन्टेनंस करणे भविष्यात शक्य नाही.
तरी त्यासाठी दि.३१/०३/२००७ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सदरचा विषय पूर्नविचारासाठी ठेवण्यात आलेला होता. त्यास आयत्या वेळचा विषय नं. १६, निर्णय क्रं. ३१२ नूसार मान्यता देण्यात आलेली असून त्यासाठी सद्यस्थितीचा विचार करता याबाबत भविष्यात वाढणा-या इमारती यांचाही विचार करावा लागेल. यामध्ये नविन प्रसादालय, नविन स्टाफ क्वॅार्टर, वाढीव बगीचा इ. साठी आहे. त्या पाईपलाईनमधुन पाणी पुरविण्याची शक्यता नाही म्हणून सिंडिकेट सर्व्हिसेस नाशिक यांनी केलेल्या सर्व्हे अहवालात तज्ञ व्यक्तिंचे मत विचारात घेवून वाढ करावी लागणार आहे. तसेच त्यांनी सुचविलेल्या तत्कालीन खर्च इस्टिमेट वाढीव स्वरूपाचे करावे लागणार आहे.
याकरीता संस्थानकडे पूर्वी बोलविलेल्या टेंडरमध्ये खालील प्रमाणे तज्ञ व्यक्ती व संस्था यांची नांवे आहे ते खालील प्रमाणे-

| अ.नं. | कन्सल्टींग -तज्ञ व्यक्तीं /फर्म चे नांव व पत्ता |
|---|---|
| ०१ | में. अभय खांदेशे -अहमदनगर |
| ०२ | श्री. वसंत शंकरराव राजभोज- नाशिक रोड, नाशिक |
| ०३ | में. अविनाश एस. पाटील. धुळे |
| ०४ | में. अजिंक्यतारा कन्स्लटिंग . नाशिक |
| ०५ | सिंडिकेट सर्व्हीसेस, नाशिक |
| ०६ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संगमनेर |

पैकी अ.नं. ०५ सिंडिकेट सर्व्हीसेस नाशिक यांना वर्तमान पत्रात जाहिरात देणे निविदा मागविणे आलेल्या निवीदांची पडताळणी करणे पाईप लाईन टाकणेसाठी योग्य त्या एजन्सीजची निवड करणे, पाईप लाईन पूर्ण होई पर्यंत (अंदाजे १२० दिवस) दैनंदिन पर्यवेक्षण करणे.

इत्यादी कामे १,२०,०००/- मात्र फी देवून करण्याचे ठरले होते. परंतू काम तुर्त स्थगित झाल्याने मा. व्यवस्थापन समितीच्या दि.१५/०५/२००६ च्या आयत्या वेळेचा विषय नं. ०८ निर्णय क्रं.३१८ अन्वये फी आदा करणेत आलेली आहे.

पैकी अ.नं. ०६ महाराष्ट्र जीवन प्राधिकारण, संगमनेर यांनी इस्टीमेंटच्या १७.५ % आगाऊ फी भरावी लागेल. असे कळविलेले होते.

तरी वरील पैकी तज्ञ व्यक्ती किंवा संस्था यांचे किंवा इतर व्यक्ती अगर संस्थाचे मार्गदर्शन घेवून साठवण तलाव ते ५०० रुम पर्यंत पाईप लाईनचे काम करण्याकरीता तज्ञ व्यक्तीच्या कामाच्या फी बाबत व नेमणूकीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानने यापूर्वी सिंडीकेट सर्व्हीसेस नाशिक या संस्थेकडून उपरोक्त कामाचे प्लॅन ,एस्टिमेट,डिझाईन व सर्व्हे इत्यादी कामे करुन घेण्यात आलेले आहेत. त्याबाबतची फी त्यांना आदा करण्यात आलेली आहे. या सर्व बाबींचा विचार करुन सदरहू काम मे.एल.ॲण्ड टी.कंपनीला दाखवून देऊन त्यांचेकडून अहवाल मागवावा व त्यानंतर निर्णय घ्यावा, असें ठरले. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय न. १०** **दारणा धरणांतून थेट पाईपलाईन आणणेकामी L & T कंपनीने केलेल्या प्राथमिक सर्व्हेबाबत**
**निर्णय क्र.४१२** सदरहू विषयावरील चर्चा तहकुब ठेवण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय न. ११** **पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे बाबत**
**निर्णय क्र.४१३** पाणी पुरवठा विभागाकडिल कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे अत्यावश्यक आहे. कारण पाणी पुरवठा विभागाकडिल साठवण तलाव येथे सदरचे कर्मचारी काम करत असून ते प्रशिक्षीत असणे अत्यावश्यक आहे. याबाबतचा सल्ला श्री साईबाबा संस्थानचे पाणी पुरवठा विभगाचे तज्ञ सल्लागार श्री. बी.व्ही. रोटकर (इनव्हायरोमेंट इंजिअर्स) नागपुर यांनी दिलेला आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिक्षक अभियंता, संशोधन व ट्रेनिंग सेंटर शाखा-नाशिक यांचे कडे चौकशी केली असता ते पाणी पुरवठा विभागाच्या सर्व कर्मचारी यांना मोफत प्रशिक्षण देण्यास तयार आहे. मात्र निवास व जेवणाची व्यवस्था आपण करावयाची आहे. लॅब टेक्नीशियनसाठी किमान ३० दिवसांचा कालावधी असुन तर इतर कर्मचारी यांना १२ दिवसांचा प्रशिक्षण कालवधी आहे. पैकी लॅब टेक्नीशियन म्हणून ०२ कर्मचारी व फिल्टर ऑपरेटर, पंप ऑपरेटर, फिल्टर सुपरवायझर असे एकूण १५ र्मचारी प्रशिक्षणासाठी पाठविणे अत्यावश्यक आहे. या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, निवासस्थान व भोजन यासाठी अंदाजे रुपये ३५,०००/- मात्र खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणीपुरवठा विभागाकडे कार्यरत असलेल्या कायम कर्मचाऱ्यांऱ्यांमधून सेवाजेष्ठता, पात्रता असणाऱ्या कर्मचाऱ्यास प्रशिक्षणास पाठविण्यात यावे. सदरहू कर्मचाऱ्याने प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना पदोन्नती व वेतनवाढ मागणी करता येणार नाही, तसेच ते कोणत्याही विभागात बदलीस पात्र राहतील अशी अट घालण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय न. १२** **श्री निरजकुमार मॅनेजिंग ट्रस्टी साई शिव कृपा समिती ट्रस्ट नवी दिल्ली यांना श्री साई चरित्रावर आधारित ऑडीओ व्हीडीओ कॅसेटस व सीडीज तयार करणेस परवानगी देणे बाबत**

**निर्णय क्र.४१४** श्री.निरज कुमार,मॅनेजिंग ट्रस्टी,साई शिव कृपा समिती ट्रस्ट,नवी दिल्ली यांनी त्यांचे दि. २६.०४.२००७ रोजीच्या पत्रान्वये,"आम्ही श्री साईबाबांचा प्रचार आणि प्रसार भारतामध्ये तसेच परदेशातही करतो. श्री साईबाबांच्या आशिर्वादाने समाजातल्या दुर्बल वर्गासाठी साई कृपा एज्युकेशनल व सोशियल वेलफेअर सोसायटीमार्फत साई पब्लिक स्कुल चालविले जाते. आम्ही साई शिव कृपा समिती ट्रस्ट (रजि.) च्या अंतर्गत हिमाचल प्रदेश, बिहार, झारखंड, दिल्ली आणि उत्तर प्रदेशात श्री साईबाबांच्या मंदिराचा कारभार चालवितो. तसेच पुजा अर्चना करतो आणि श्री साईबाबांच्या विचारांचा प्रसार करतो. श्री साईबाबांच्या प्रचार व प्रसारासाठी आम्ही ऐसाई म्युझिक कंपनी स्थापन केलेली आहे. श्री साईबाबांच्या जीवनकालात श्री.गोविंद रघुनाथ दाभोलकर उर्फ हेमाडपंत यांनी श्री साईंची जीवन कहाणी बाबांच्या परवानगीने लिहीली होती. भक्तांची गरज ओळखून सदर पुस्तकाचे विविध भारतीय भाषेत भाषांतर झालेले आहे. बरेचशे भक्त नियमितपणे हे पुस्तक वाचतात. श्री साई सच्चरित हे शिर्डी साईबाबांबद्दल माहिती देणारे एकमेव माध्यम आहे. आम्ही सदर साई चरित्राच्या दररोज एक अध्यायाचे वाचन करीत आहोत. दिवसेंदिवस बाबांची महती वाढत आहे.बाबांनी,जो कोणी मनुष्य माझे नाव घेवून माझ्या शिकवणूकीप्रमाणे वागेल त्याच्या सर्व इच्छा, आकांक्षा भक्तीत परिपुर्तता करेल, असे वचन दिलेले आहे. जो कोणी माझे नेहमी ध्यान करील, माझ्या गोष्टींचा, जीवनाचा विचार करील त्याला मी सदैव

मृत्युच्या दाढेतून बाहेर खेचणार.साई चरित्रापासून मिळालेल्या प्रेरणेने असे लक्षात आले आहे की अनेक लोकांना त्यांच्या धकाधकीच्या व सदैव कार्यरत जीवनामुळे साई चरित्राचा अभ्यास करता येत नाही. यासाठी आम्ही बाबांच्या कार्याचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने साई चरित्रावर आधारीत ऑडीओ कॅसेटस्, सीडीज् आणि व्हिडीओ सीडीज् तयार करण्याचे धोरण निश्चित केलेले आहे. सदरच्या कॅसेटस् बनविणेकामी संस्थानने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करु. तरी आम्हाला सदरच्या कॅसेटस् तयार करणेकामी संस्थानची परवानगी मिळावी ही विनंती." असे कळविलेले आहे.

महाराष्ट्र शासनाने पुर्नघटित केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्ये व अधिकार" या शिर्षकाखाली अधिनियम नंबर १७ (२) मधील (ठ) मध्ये "श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील," तसेच (ड) मध्ये "श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता, श्रध्दा आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल," अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने श्री साईबाबांच्या जीवनचरित्रावर आधारीत ऑडीओ,व्हिडीओ कॅसेटस् तयार करणे बाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७/१२/२००४ व १८/०९/२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. अनुक्रमे १८० व ५३२ अन्वये पुणे येथील प्रसिध्द कीर्तन केसरी श्री.चारुदत्त आफळे यांचेकडून तयार करून घेण्यास मान्यता मिळालेली होती. तथापि सदरच्या कॅसेटस् बनविणेकामी श्री.चारुदत्त आफळे यांचेकडून योग्य प्रतिसाद व मार्गदर्शन न मिळाल्यामुळे सदरची कार्यवाही तुर्त प्रलंबित ठेवण्यात आलेली आहे.

आता श्री. निरज कुमार, मॅनेजिंग ट्रस्टी, साई शिव कृपा समिती ट्रस्ट, नवी दिल्ली यांनी श्री साई चरित्रावर आधारीत ऑडीओ, व्हिडीओ कॅसेटस् व सीडीज् स्वखर्चाने तयार करणेकामी परवानगी मागितलेली आहे. यामुळे बाबांव्या कार्याचा, शिकवणुकीचा प्रचार व प्रसार होण्यास मदत होईल तसेच संस्थानवर कोणत्याही प्रकारचा आर्थिक बोजा पडणार नसलेमुळे त्यांना सदरबाबत परवानगी दयावी असे मत आहे. मात्र सदर कॅसे्टस् तयार करणेकामी त्यांना कै.दाभोलकर लिखित श्री साई सच्चरित या ग्रंथाचाच फक्त आधार घेणे बंधनकारक राहील असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात आला. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय न. १३** **संस्थानकरीता (I.S.O 9001) गुणवत्ता प्रमाणपत्र मिळविणेसाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत**
**निर्णय क्र.**

श्री साईबाबा संस्थान हा एक धर्मदाय न्यास असून संस्थानचे प्रशासन इतर कुठल्याही प्रशासनापेक्षा पूर्णतः वेगळ्या स्वरुपाचे आहे. संस्थानच्या प्रशासनामधील कामकाजामध्ये असलेली विविधता व दृष्टीकोन इतरत्र क्वचितच आढळतो. प्रशासनाच्या कामकाजाचा पाया हा मुळातच श्री साईंचे भक्तांची सेवा या प्रमुख उद्देशावर आधारलेला असल्याने येथील प्रशासनाची संरचना व निकष इतर शासकीय, अशासकीय, औद्योगिक, समाजसेवी व इतर कुठल्याही क्षेत्रातील संस्थेच्या प्रशासनापेक्षा पूर्णतः भिन्न आहे.

श्री साईबाबा संस्थानचे कार्यक्षम प्रशासन हे मा.व्यवस्थापन मंडळाच्या कुशल व अत्यंत सखोल मार्गदर्शनाखाली निश्चितच श्री साईभक्तांच्या सेवेच्या कसोटीस पूर्णतः पात्र ठरले आहे. संस्थानचा सध्याचा विकासाचा वेग पाहता यामध्ये संस्थान उत्तम लौकिकास प्राप्त राहील, यात शंका नाही. परंतु भविष्यकाळास सामोरे जाताना श्री साईबाबा संस्थानला थोडासा प्रशासकीय खर्चासाठीचा व्यावसायिक दृष्टीकोन समोर ठेवून प्रशासन चालवावे लागणार आहे.

श्री साईबाबा संस्थानच्या विविध विभागांमार्फत श्री साईभक्तांना वेगवेगळया सेवा पुरविण्यात येतात. या सेवा आणखी उत्कृष्ट रितीने, समर्पणाच्या सेवा भावनेने व व्यावसायिक कार्यक्षमता नजरेसमोर ठेवून पुरविणे गरजेचे आहे. संस्थानचे प्रशासन उत्तम आहे, परंतु अद्याप त्याचे प्रमाणीकरण (Standardization) झालेले नाही, व विभागाअंतर्गत कामाची प्रमाणित कार्यपध्दती निश्चित झालेली नाही.

सध्या जागतिक पातळीवर व्यावसायिक कार्यक्षमता प्रमाणीत करण्यासाठी **(I.S.O.9001)** गुणवत्ता प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते. या प्रमाणपत्राचे फायदे अनेक आहेत. त्यातील काही फायदे पुढीलप्रमाणे आहेत.

०१) सेवेतील पारदर्शकता वाढणे.
०२) सेवा ही उच्च श्रेणीची असणे.
०३) सेवा ही खात्रीशीर व विश्वसनीय असणे.
०४) काम करण्याची जागा व वातावरण प्रसन्नदायक असणे
०५) सेवा देणा-या कर्मचा-यांना सेवा-समाधान (Job Satisfaction) मिळणे.

०६) कर्मचा-यांचे काम करताना सुरक्षितता व आरोग्य यामध्ये वृद्धी होणे.

०७) या प्रमाणिकरणामध्ये प्रत्येक बाब नोंदली (डॉक्युमेंटेशन) जात असल्याने प्रशासकीय कामकाजात सूसुत्रता व पारदर्शकता येते.

भारतीय ब्युरोचे मा.डायरेक्टर जनरल श्री.के..एम.साहानी साहेब (आयएएस), दिल्ली व मा.श्री.के.के.जाधव, डायरेक्टर, {**QSCO(W)**}, मुंबई पूर्वी शिर्डी येथे आले होते. त्यांनी सर्व प्रशासकीय अधिका-यांना व खातेप्रमुखांना **I.S.O.9001** व त्याची आवश्यकता काय याबाबत सविस्तर माहिती दिली होती. त्यावेळी त्यांनी हे **I.S.O.9001** प्रमाणपत्र प्राप्त करणेसाठी साधारणतः रु. दोन लाख इतका खर्च अपेक्षित असल्याचे संगितले होते.

आता हैद्राबाद येथील एक साईभक्त व **I.S.O.9001** मानांकनाचे प्रमाणपत्र देणाऱ्या युआरएस या संस्थेचे भारतातील प्रतिनिधी श्री.के.व्ही सीरीषकुमार यांनी यासाठी यासाठी श्री साईंची सेवा म्हणून कोणतीही फी न घेता फक्त एक रुपयात हे प्रमाण पत्राचे काम करवून देत आहोत म्हणून लेखी कळविले आहे.

हे प्रमाण पत्र मिळविण्यासाठी करावी लागणारी सर्व पूर्वतयारी सिकंदराबाद येथील एक साईभक्त व सी.के. असोशिएटस या कंपनीच्या संचालिका व प्रोजेक्ट हेड कु. टी.व्ही. सरिथा या कोणताही मोबदला संस्थानकडून न घेता, करवून घेणार असून फक्त त्या व त्यांचे सहकारी या कामानिमित्त शिरडीत आल्यानंतर त्यांची निवासाची व भोजनाची सोय संस्थानने करावयाची आहे.

सध्या संस्थानच्या संपुर्ण विभागांचे व प्रशासकीय यंत्रणेचे संगणकीकरण करण्यात येत आहे. विभागवार संगणकीकरणाचा आराखडा तयार करताना विभागवार कामकाज पद्धती व कामाचा प्रवाह विचारात घेण्यात येत आहे. **I.S.O.9001** चे कामकाज साधारणतः विभागवार संगणकीकरण परस्परावलंबी स्वरुपाचे आहे. त्यामुळे **I.S.O.9001** हे प्रमाणपत्र प्राप्त करण्याच्या दृष्टीने प्रशासकीय कामकाज या स्थितीतच हाती घेण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत सी.के. असोशिएटस या कंपनीच्या संचालिका व प्रोजेक्ट हेड कु. टी.व्ही. सरिथा या उपस्थीत होत्या. त्यांनी **I.S.O.9001** बाबत सविस्तर माहिती सभेस करुन दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख/सर्व प्रशासकीय अधिकारी/विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय न. १४** **कॅंटीन विभागाकडील निरुपयोगी वस्तू डेडस्टॉकमधून कमी करणे व कोटेशन्सच्या उच्चतम दराने विक्री करणे बाबत.**

**निर्णय क्र.४१६** खालीलप्रमाणे कॅंटीन विभागाकडील निरुपयोगी झालेल्या वस्तू डेडस्टॉकमधुन कमी करण्यास व त्या दप्तर विभागामार्फत स्क्रॅप मालाची विक्री करणेसाठी मंजूर केलेल्या वार्षिक उच्चतम दराने विक्री करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | संगणक कोड नंबर | वस्तूंचे वर्णन | नग | प्रति नग किंमत |
|---|---|---|---|---|
| **अ** | **लोखंडी वस्तू** | | | |
| 1 | FUR/ 5002 | लोखंडी कपाट | 01 | 2,500/- |
| 2 | FUR/ 5005 | पद्मीनी खुर्च्या | 04 | 100/- |
| 3 | MCH/ 1900 | बोटल कुलर | 02 | 24,300/- |
| 4 | MCH/ 1905 | इले. वजन काटा | 01 | 12,144/- |
| 5 | UTE/ 4057 | तीन चाकी सायकल | 01 | 4,000/- |
| **ब** | स्टेनलेस स्टिल वस्तू | | | |
| 1 | UTE/ 4006 | स्टेनलेस स्टिल टी जार 15 लि. | 02 | 1,170/- |
| 2 | UTE/ 4015 | स्टेनलेस स्टिल टी जार 25 लि. | 04 | 603/- |
| 3 | UTE/ 4019 | स्टेनलेस स्टिल टी जार 10 लि. | 02 | 1,275/- |
| 4 | UTE/ 4063 | स्टेनलेस स्टिल टी जार 25 लि. | 05 | 1,197/- |
| 5 | UTE/ 4064 | स्टेनलेस स्टिल टी जार 15 लि. | 04 | 981/- |
| 6 | UTE/ 4065 | स्टेनलेस स्टिल टी जार 10 लि. | 04 | 837/- |
| 7 | UTE/ 4066 | स्टेनलेस स्टिल टी जार 5 लि. | 02 | 711/- |
| 8 | UTE/ 4071 | स्टेनलेस स्टिल टी जार 10 लि. | 02 | 700/- |
| 9 | UTE/ 4073 | स्टेनलेस स्टिल टी जार 20 लि. | 05 | 800/- |
| 10 | UTE/ 4074 | स्टेनलेस स्टिल टी जार 15 लि. | 01 | 700/- |
| 11 | UTE/ 4075 | स्टेनलेस स्टिल टी जार 10 लि. | 03 | 500/- |
| 12 | UTE/ 9006 | स्टेनलेस स्टिल टी जार 5 लि. | 02 | 1,434.30 |
| 13 | SUN/ 4014 | वॉल फॅन फायबर बॉडी | 01 | 1,200/- |
| 14 | TEL/ 4001 | कॉडलेस फोन पॅनॉसोनिक कं. | 01 | 2,300/- |

| क | फायबर वस्तू | | | |
|---|---|---|---|---|
| 15 | FUR/ 5016 | लाकडी टेबल | 02 | 125.30 |
| ड | अॅल्युमिनीयमच्या वस्तू | | | |
| 16 | UTE/ 4040 | अॅल्युमिनीयम पातेले | 01 | 666.25 |

(कार्यवाही-कॅटीन विभागप्रमुख/ अधिक्षक,दप्तर विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय न. १५** **श्रीसाईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला सन २००६-२००७ चा "अ" दर्जा व राज्यात प्रथम क्रमांक मिळालेबाबत**

**निर्णय क्र.४१७** औद्योगिक प्रशिक्षण संस्था / केंद्रातून दिले जाणारे प्रशिक्षण हे ग्राहकाभिमुख व रोजगाराभिमूख व्हावे. संस्थेत दिल्या जाणा-या प्रशिक्षणाची गुणवत्ता उच्च दर्जाची राहावी. कारखान्यांच्या मागणीप्रमाणे त्यांना कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करता यावा व औद्योगिक प्रशिक्षण संस्था/ केंद्रातून उत्तीर्ण होवून बाहेर पडणारा विद्यार्थी हा रोजगार व स्वयंरोजगार करण्यास सक्षम बनावा या बहुउद्येशाने शासनाने शासन निर्णय क्र. आयटीआय -१०००/(१८२)/व्यशि-१ दि. २१/१०/२००१ अन्वये राज्यातील सर्व अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे गुणवत्तेनुसार अ,ब,क,ड असे वर्गीकरण करण्याचा निर्णय घेतला व त्या नुसार २००१ पासून राज्यातील खाजगी औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे गुणवत्तेनुसार अ,ब,क व ड असे वर्गीकरण करण्यात येत आहे.

सन २००६ या वर्षात राज्यातील सर्व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे शासनाने ठरवुन दिलेल्या माप दंडानुसार व निकषानुसार त्रिस्तरीय समितीमार्फत निरीक्षण करण्यात आले होते. या निरीक्षणामध्ये आपल्या संस्थेचे शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेच्या उद्येशाचे अनुषंगाने उत्कृष्ठ अशी कामगिरी केलेली आहे. आपल्या संस्थेतील साधनसामुग्री संस्थेची अंतर्गत व बहिस्थ कार्यक्षमता उत्तम प्रकारची असून विशेष करून संस्थेने उत्पादनाभिमुख प्रशिक्षण योजना व संस्थेतील उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांना शिकाउ उमेदवारी मिळवुन देउन त्यांना रोजगार व स्वयंरोजगार करण्यास सक्षम बनविण्याबाबत अत्युत्कृष्ट असे कार्य केलेले आहे. त्यामुळे संस्थेला एकूण ३०० पैकी २८८ गुण प्राप्त झालेले असून, राज्यातील सर्व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये आपली संस्था सर्वाधिक गुण प्राप्त करून प्रथम आलेली आहे व आपल्या संस्थेला अ दर्जा देण्यात आलेला आहे. असे श्री ज.द. भुतांगे, संचालक (प्रशिक्षण ) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई यांनी त्यांचेकडील वरिल संदर्भिय पत्रानुसार कळविले आहे.

तसेच त्यांनी संस्थेच्या या यशाबददल आपल्या संस्थेच्या व्यवस्थापनातील पदाधिकारी, अधिकारी, प्राचार्य, गटनिदेशक, निदेशक व अन्य कर्मचारी तसेच प्रशिक्षणार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करून भविष्यातही संस्थेने सतत अशीच गुणवत्ता धारण करून युवकांना रोजगार व स्वयंरोजगार करण्यास सक्षम बनविण्याचे महान कार्य करीत राहावे असे कळविले आहे.

संस्थेस हे यश प्राप्त होणेसाठी आपले व्यवस्थापन मंडळाचे मा. अध्यक्ष श्री जयंत ससाणे, मा. उपाध्यक्ष श्री शंकरराव गेणूजी कोल्हे साहेब व सर्व माननिय विश्वस्त तसेच मा. कार्यकारी अधिकारी व मा. प्रशासकीय अधिकारी यांचे मोलाचे सहकार्य व त्यांचेकडे असलेला शैक्षणिक संस्थेबाबतचा सकारात्मक दृष्टीकोन यामुळे संस्थेने हे यश संपादन केलेले आहे असे प्राचार्य औ.प्र.संस्था यांनी कळविले आहे, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

**विषय न. १६.** **श्रीसाईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी एअर कंडीशनर्स खरेदी करणे बाबत**

**निर्णय क्र.४१८** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात यंशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचेकडील चार संगणक अभ्यासक्रम व एम.एस.सी.आय.टी. हे संगणकाचे कोर्सेस चालू आहेत. सदरील कोर्सेला साधारणतः २५० प्रशिक्षणार्थी व औ.प्र.केंद्राचे जवळपास ३०० प्रशिक्षणार्थी संगणकाचे प्रशिक्षण घेत आहेत.

औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात संगणक लॅब विकसीत करण्याचे काम सुरु आहे. त्याकरीता यापुर्वी आपण Voltas Make Air Conditioner,Vetris Model, Hi-wall Mounted Noiseless With Air filter Split with Cordless Remote Capacity-०२ Ton. हे दोन नग खरेदी केलेले आहेत व ते संगणक लॅबला बसविलेले आहेत. परंतु सदरील संगणक लॅब मध्ये ३० संगणक व एकावेळी ५० विद्यार्थी प्रशिक्षण घेणार असल्याने दोन ए.सी.हे अपुरे पडतात तसेच लॅबचे दुस-या भागात डेमो व सर्वर रुम बनविली आहे. त्याकरीता आणखी दोन टनी दोन नग ए.सी.ची आवश्यकता आहे.

तरी वरील प्रमाणे ०२ नग एअर कंडिशनर्स कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारा अंदाजे खर्च रु.७५०००/- पर्यतचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय/अधिक्षक,खरेदी विभाग )

**आयत्या वेळेचा**

**विषय न. १७ शिधा वाटपाबाबत मा.विश्वस्तांचे अर्जाबाबत**

**निर्णय क्र.४१९** उपरोक्त संदर्भीय पत्रातील विषयानुसार, दि. ०५/०४/२००७ रोजी मा.व्यवस्थापन उपसमितीची सभा आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.श्री.सुरेश वाबळे, मा.श्री. पांडुरंग अभंग, मा.श्री. अशोक खांबेकर, मा.डॉ.एकनाथ गोंदकर, व मा.सौ.सुमित्रा कोते हे सर्व विश्वस्त हजर होते. त्या सर्वांनी एकत्रितपणे मा.कार्यकारी अधिकारी यांना अर्ज सादर केलेला आहे, त्यात " आपणाकडे सुचना करण्यात येते दिवसेंदिवस सस्थानकडे शिधा मागणी वाढत आहे. त्यामध्ये काही चुकीची मागणी असते. याबाबत विश्वस्त मडळातील उपरोक्त सदस्यांनी शिधा वाटपास विरोध दर्शवित आहे. येथुन पुढे शिधा देण्यात येऊ नये. "

उपरोक्तप्रमाणे विश्वस्त मडळातील पाच सदस्यांनी शिधा वाटपास विरोध दर्शविलेला आहे. यात सद्यः परिस्थिती अशी आहे की, चालु वर्षात शिधा मागणीचे प्रमाण वाढलेले आहे, मागिल वर्षी फक्त २५-३० मंडळांनी मागणी केली होती. चालु वर्षी म्हणजे सन २००६-२००७ या सालात साधारणपणे ५०-६० चे दरम्यान शिधा स्वरुपात मागणी आलेली आहे. तसेच यापुर्वी सस्थान फक्त अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, शिबीर, परिषदा इ. साठीच शिधा स्वरुपात मदत करीत होते. आता याव्यतिरिक्त हनुमान जयंती, मंदिर जिर्णोध्दार, संत महात्म्यांची पुण्यतिथी- प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, तसेच सामुदायीक विवाह, गांवची यात्रा, संमेलने , संदल इ. साठी गांव व गांवातील वाड्या-वस्त्या, मंडळे यांचेकडून वर्षातून एक दोन वेळेस मोघम स्वरुपात शिध्याची मागणी केली जाते. तसेच एकदा शिधा स्वरुपात मदत देण्यात आली की, ते दरवर्षी शिध्याची मागणी करतात व त्यांना मागिल वर्षी दिलेने चालु वर्षी द्यावाच लागतो. दिवसेंदिवस शिधा स्वरुपातील मागणी वाढत आहे.

शिधा सामुग्री वाटपाबाबत संस्थानमार्फत नियम व विनियम तयार करणेबाबत नियुक्त केलेले श्री सुधाकर जोशी, रिटायर्ड आय.ए.एस. अधिकारी, यांनी विनियम, अर्ज नमुना, शिधा विनियोगाबाबतचे पत्र असे तयार करुन दिले होते ते दि.०६/०१/२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.४९ अन्वये मान्य करण्यात आले असून जा.क्र.एसएसएस/ वशी-०५/ ५३८६/०७, दि.०३/०४/२००७ ने मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेले आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, येथूनपुढे जास्तीत जास्त रुपये ११,०००/- पर्यन्तच शिधा स्वरुपात मदत देण्यात यावी, त्यापेक्षा जास्त वस्तुरुपाने मदत देण्यात येऊ नये असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय न. १८. शिधा सामुग्री मिळणेबाबत (०१.श्री.रिंघे दिगंबर प्रल्हादराव,जेऊर हैबती ०२. श्री.जी.व्ही रुपवते,संगमनेर) अर्ज**

**निर्णय क्र.४२०** खाली दर्शविलेल्या समितीने मा.कार्यकारी अधिकारी,.श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री रिंघे दिगंबर प्रल्हादराव, अध्यक्ष, महारुद्र यज्ञयाग सोहळा, स्वागत प्रेमी महारुद्र यज्ञयाग कमिटी, जेऊर हैबती, व सरपंच, ग्रा.का. मौजे जेऊर हैबती, ता.नेवासा, जि.अहमदनगर (अर्ज दि.१८/०५/२००७) | मौजे जेऊर हैबती येथे दि.२/६ ते ६/६/०७ अखेर महारुद्र यज्ञयाग धार्मिक सोहळा कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | श्री.अभंग, विश्वस्त यांचे शिधा देणेबाबत शिफारस पत्र. व त्यावर मा. अध्यक्ष यांचा शेरा. |
| ०२. | श्री.जी.व्ही.रुपवते, स्वागताध्यक्ष, धम्म दीक्षा सुवर्ण महोत्सव समिती, संगमनेर, जि.अहमदनगर (अर्ज दि.१८/०५/२००७) | दि.२५/०५/२००७ रोजी संगमनेर येथे होणा-या धम्म परिषदेस येणा-या भक्तांना महाप्रसादासाठी शिधा स्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | |

तरी श्री रिंघे दिगंबर प्रल्हादराव, अध्यक्ष, महारुद्र यज्ञयाग सोहळा, स्वागत प्रेमी महारुद्र यज्ञयाग कमिटी, जेऊर हैबती, व सरपंच, ग्रा.का. मौजे जेऊर हैबती, ता.नेवासा, जि.अहमदनगर यांना मौजे जेऊर हैबती येथे दि.२/६ ते ६/६/०७ अखेर महारुद्र यज्ञयाग धार्मिक सोहळा कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी रु.२५,०००/- पर्यंतच्या व श्री.जी.व्ही.रुपवते, स्वागताध्यक्ष, धम्म दीक्षा सुवर्ण महोत्सव समिती, संगमनेर, जि.अहमदनगर दि.२५/०५/२००७ रोजी संगमनेर येथे होणा-या धम्म परिषदेस येणा-या भक्तांना महाप्रसादासाठी रु.२०,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त दोन्ही कार्यक्रमास प्रत्येकी रुपये ११,०००/-पर्यंत वस्तूरुपाने मदत देण्यात यावी,असें ठरलें. (कार्यहवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

**आयत्या वेळेचा**

**विषय न. १९** **मारुती मंदीर कोकमठाण ता.कोपरगाव या मंदीर बांधकाम आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.४२१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**आयत्या वेळेचा**

**विषय न. २०** **श्रीसंत तुकाराम महाराज संस्थान,नेवासा यांना निवासी खोल्यांचे बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.४२२** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**आयत्या वेळेचा**

**विषय न. २१** **रक्तपेढीच्या स्थापनेस व उपकरणे खरेदीस आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.४२३** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**आयत्या वेळेचा**

**विषय न. २२** **धर्मशाळेत गार्डन स्पिकर बसविणे बाबत**

**निर्णय क्र.४२४** धर्मशाळा (२०० रूम) कार्यालय इमारतीच्या पूर्वेस सुमारे ८०० फूट पूर्व-पश्चिम व ३०० फूट उत्तर-दक्षिण या जागेमध्ये बाग तयार केलेली आहे, सदर बागेत लहान मुलांना खेळण्यासाठी खेळणी व साई भक्तांच्या मनोरंजनासाठी कारंजा देखील बसविण्यात आलेला आहे. रात्रौ १०.०० वाजेपर्यंत धर्मशाळेत उतरलेल्या साईभक्तांची व ग्रामस्थांची तसेच तेथील रूग्णालयातील रूग्णांचे नातेवाईक यांची सदर बागेमध्ये कारंजा, बाग बघण्यासाठी व लहान मुलांना खेळविण्यासाठी मोठी गर्दी असते. सदर बागेत गार्डन स्पिकर बसविल्यास स्पिकरवरून दररोज संध्याकाळी ०६.०० ते १०.०० वाजेपर्यंत प्रसिध्द गायकांची भक्तीगीते, भावगीते, बालगीते तसेच नाटयगीते यांच्या सी.डी./कॅसेट प्रसारीत करता येतील त्यामुळे बागेत प्रसन्न वातावरण निर्मिती होऊन, बागेत येणाऱ्या भक्तांना व ग्रामस्थांना त्याचा लाभ घेता येईल अशी संकल्पना आहे.

यासाठी, फेब्रुवारी २००७ मध्ये मा.का.अ.सो. यांच्या मान्यतेने प्रायोगिक तत्वावर बागेच्या पश्चिम बाजूने सुमारे २००X ३०० फूटाच्या बागेत अहुजा कंपनीचे ०८ नग गार्डन स्पिकर बसवून सिस्टीम चालू केली आहे व त्याची यंत्रणा धर्मशाळा चौकशी कार्यालयात ठेवली आहे, त्याबाबत गांवकरी, संस्थान कर्मचारी, त्यांचे नातेवाईक व साईभक्त जे बागेत येतात त्यांनी पुढीलप्रमाणे प्रतिक्रिया व्यक्त केली आहे "बागेत बसून भजने, गीते ऐकल्यानंतर मन शांत होते, मन रमते". उर्वरीत बागेत गार्डन स्पिकर बसविलेस एकाच वेळेस संपूर्ण विशाल बागेत आलेल्या सर्वांना गीते ऐकण्याचा आनंद होईल तसेच सदर बागेच्या लगत उत्तरेकडे नव्याने सुरु होणाऱ्या द्वारावती या इमारतीमधील साईभक्तांना या बागेतील साऊंड सिस्टीम हे मनोरंजनाचे साधन होऊ शकेल.

यासाठी, उर्वरीत सुमारे ६०० फूट X ३०० फूटाच्या बागेत गार्डन स्पिकर बसविणेसाठी खालील मटेरियल आवश्यक आहे.

| अ.नं. | मटेरियल वर्णन | कंपनी | नग | दर | अंदाजे किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १. | गार्डन स्पिकर | अहुजा मॉ.नं. GS 6301 | ३० | ३,०००/- | ९०,०००/- |
| २. | PVC 20mm / 1.5 mm पाईप (MMS) | प्रेसीजन | १७०० फूट १७० पीस | ३२/- रु. प्रती पिस | ५,४४०/- |
| ४. | PVC 20mm / 1.5 mm टी | प्रेसीजन | ४० | ५/- | २००/- |
| ५. | PVC 20mm / 1.5mm सॉकेट | प्रेसीजन | १०० | ५/- | ५००/- |
| ६. | PVC 20 X 25 mm रेडयुसर | प्रेसीजन | ४० | ५/- | २००/- |
| ७. | PVC सोल्यूशन १ लिटर | प्रेसीजन | ०१ लिटर | २००/- | २००/- |
| ८. | PVC 20mm बेंड | प्रेसीजन | ४० | १०/- | ४००/- |
| ९. | प्लेन बुस्टर ॲम्प्लीफायर मॉडेल नंबर L.B.D. 1938 | बोस्च | ०२ | २०,०००/- | ४०,०००/- |
| १०. | ७०/७६ (गेज बरोबर असावा) ट्वीन फ्लॅट टाईप फ्लेक्झिबल वायर | श्रीराम एशियन | ०८ | ३,०००/- | २४,०००/- |
| | | | | **एकूण** | **१,६०,९४०/-** |

२) स्पिकरसाठी आवश्यक असलेले २" व १" पाईपचे फाऊंडेशन, पाईप प्लेटसह वेल्डींगचे काम विद्युत विभागामार्फत उपलब्ध मटेरियल मधून करता येईल असे विद्युत विभागाने सांगितले आहे.

३) स्पिकर फीट करुन चालू करण्याचे काम ध्वनिक्षेपण विभागामार्फत केले जाईल.

४) स्पिकर फीट करणेसाठी बागेत आवश्यक असलेले सिमेंट कॉंक्रीटचे फाऊंडेशन व पाईपमधून वायर जमिनीखालून टाकणेसाठी वायरच्या मापाची नाली करून बुजविणे इ. कामे संस्थानच्या बांधकाम विभागाकडून करवून घेता येईल. बांधकाम अभियंता यांनी सदर कामास अंदाजे ५,०००/- रुपये खर्च अपेक्षित आहे असे सांगितले.

तरी वरीलप्रमाणे अ. नं. ४ ची कामे बांधकाम विभागाकडून करवून घेणेस अंदाजे ५,०००/- रुपये खर्च तसेच अ.नं. १ प्रमाणे ३० नग गार्डन स्पिकर सह मटेरियल खरेदीस अंदाजे रुपये १,६५,९४०/- (पूर्णांकित रुपये १,७५,०००/- )चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-ध्वनीक्षेपन विभागप्रमूख/बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय न.२३ मान्यवरांचे सत्कार करणेकामी प्रिंटेड शॉल खरेदी करणे बाबत.**

**निर्णय क्र.४२५** समाधी मंदिरात श्रींचे दर्शनासाठी येणारे मान्यवर, अतिथी, व्ही.आय.पी. व महत्वाचे पदसिध्द अधिकारी वर्ग यांचा संस्थानचे वतीने शॉल, श्रीफळ देऊन सत्कार केला जातो, त्यांचे सत्कारकामी संस्थानचे वतीने शॉल देण्याची पूर्वपार पध्दत आहे. या अगोदर देणगी रुपाने आलेल्या शॉल्स सत्कारकामी वापरण्यात येत असत, परंतू देणगी आलेल्या शॉल्समध्ये किमतीचा व दर्जाचा फरक असल्याने त्या शॉल्स सत्कारकामी वापरणे योग्य वाटत नाही.

श्री सिध्दीविनायक ट्रस्ट, मुंबई हे शॉल प्रिंटेड करुन घेतात. तेथील पध्दतीप्रमाणे मान्यवरांचा सत्कार करणेकामी प्रिंटेड शॉल खरेदी करणे आवश्यक आहे. मागील वर्षी मे.पलख एन्टरप्राईजेस, सुरत यांचे कडून श्रींचे कळसाचे चित्र असलेल्या शॉल प्रिंटेड करुन खरेदी करण्यात आलेल्या आहेत. आजतागायत मान्यवरांचे सत्कारकामी त्या शॉल्स वापरण्यात येत आहेत.

माहे एप्रिल- २००६ ते माहे मार्च- २००७ अखेर कॉटन शॉल- २.५ मीटर लांबी x रुंदी ६० से.मी. (जरी बॉर्डर नसलेली पिवळा रंग) प्रति नग रु.४२/- याप्रमाणे खरेदी करण्यात आल्या होत्या. एकूण एका वर्षासाठी ६००० नग प्रिंटेड शॉल्स खरेदी करण्यात आलेल्या होत्या. यासाठी एकूण रु. २,५२,०००/- मात्र खर्च आलेला आहे. साधारणपणे मान्यवरांचे सत्कार करणेकामी एका महिन्यात ४०० ते ५० नग शॉल्स खर्ची पडतात.

दिवसेंदिवस संस्थानमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमात वाढ होत असल्याने मान्यवरांची संख्याही वाढत चालली आहे. करिता पुढील वर्षाकरिता माहे एप्रिल- २००७ ते ३१ मार्च- २००८ या वर्षासाठी अंदाजे ८००० नग प्रिंटेड शॉल्स कोटेशन्स मागवून खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग/अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय न.२४ अधिक मास सत्संग मंडपाचे कामाबाबत**

**निर्णय क्र.४२६** संस्थान तर्फे अधिक मास सत्संग सोहळा दि.१७/०५/२००७ ते दि.१५/०६/२००७ अखेर साजरा करण्यास मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०४/२००७ चे सभेत निर्णय क्र.१०२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. या कामी मंडप उभारनी कामी खालिल मंडप ठेकेदार यांचे कडुन दि.११/०५/२००७चे पत्रान्वये कोटेशन मागविण्यात आले होते.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | श्री. बी. एस. कातुरे, पुणे. |
| ०२ | श्री. जितेंद्र शर्मा,नाशिक |
| ०३ | श्री. शर्मा डेकोरेटर्स,वैजापुर |
| ०४ | श्री. पंडीतराव खरपुडे,कैलास डेकोरेटर्स, अ.नगर |
| ०५ | श्री. झुराळे मंडप डेकोरेटर्स,खैरी निमगांव |
| ०६ | श्री.जाधव मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद |
| ०७ | रोशनी मंडप, संक्रापुर ता.राहुरी |
| ०८ | बाबला टेन्ट हाऊस,श्रीरामपुर |
| ०९ | शुभम टेन्टं हाऊस,खैरी निमगांव |

उपरोक्त पैकी खालील चार ठेकेदारांनी विहीत मुदतीत कोटेशन सादर केले आहे.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | श्री. बी. एस. कातुरे, पुणे. |
| ०२ | श्री. शर्मा डेकोरेटर्स,वैजापुर |
| ०३ | झुराळे मंडप डेकोरेटर्स, खैरी निमगांव |
| ०४ | श्री. पंडीतराव खरपुडे,कैलास डेकोरेटर्स, अ.नगर |

उपरोक्त ठेकेदारांचे प्राप्त झालेले कोटेशन मा. अध्यक्ष, श्री. ससाणे मा.विश्वस्त श्री. विखे.पा. यांचे समक्ष दि.१२/०५/२००७ रोजी उघडण्यात आलेले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं | मंडपाचा तपशिल | श्री. बी.एस. कातुरे,पुणे | श्री. शर्मा डेकोरेटर्स, वैजापुर | श्री. झुराळे मंडप डेकोरेटर्स, निमगांव | श्री.पंडीतराव खरपुडे,कैलास डेकोरेटर्स, अ.नगर |
|---|---|---|---|---|---|

| | | कोटेशन मधिल दर रु. | चर्चे नंतरचे दररु. | कोटेशन मधिल दर रु. | चर्चे नंतर चे दर रु. | कोटेशन मधि दर रु. | चर्चे नंतरचे दररु. | कोटेशन मधिल दर रु. | चर्चे नंतरचे दररु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | १२०`x६०` साईजचा मंडप, मंडपाचे वरचे बाजुस पत्रे, आतुन रंगीत व आकर्षक कापड व मंडपाचे सर्व बाजुने अर्ध्या भागापर्यंत कपडा लावुन तो बंद करावयाचा आहे. तसेच आतम ३०`x २०` साईजचे ४`उंचीचे एक स्टेज व १५`x१०` साईजचे ५` उंची एक स्टेज तसेच मंडपाचे प्रवेशद्वारा आकर्षक कमान करणे. | १,२५,००० | | | | | | ९५,००० | |
| ०२ | बिछायती साठी मॅटीन | ५७,००० | | | | | | ८,५०० | |
| ०३ | मॅटीनवर सतरंजी | २२,००० | | | | | | १८,००० | |
| | **एकुण रुपये -:** | **२,२४,०००** | **१,९०,०००** | **२,५०,०००** | **अनुपस्थीत** | **५,२५,०००** | **४,२५,०००** | **१,२१,५००** स.टॅ..व वहातुक अतिरीक्त | **१,६४,०००** स.टॅ..व वहातुक सह. |

उपरोक्त तपशिलावरुन ठेकेदार श्री.पंडीतराव खरपुडे, कैलास डेकोरेटर्स,अहमदनगर अहमदनगर यांचे दर निम्नतम स्वरुपाचे असल्याने त्यांचे कडुन काम करुन घेणेस व त्यांना कार्यादेश देणेस समितीचे मा. सदस्यानी शिफारस केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय न. २५** **नविन प्रसादालय इमारत बांधकाम व्यवस्थापन सल्लागार टी.सी.ई.कन्सल्टींग इंजिनिअर लि.,पुणे यांचे मुदतवाढी बाबत.**

**निर्णय क्र.४२७** संस्थानचे मौजे निमगांव-कोऱ्हाळे गट नं.८०,८५ मधील जागेत बांधण्यात येत असलेल्या नवीन प्रसादालय इमारतीचे बांधकामाचे काम ठेकेदार आय.व्ही.आर.सी.एल.इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि.,पुणे यांचेमार्फत प्रगतीपथावर आहे.

उपरोक्त प्रकल्पासाठी संस्थानमार्फत प्रत्यक्ष कामावर दैनंदिन देखरेख ठेवणे, गुणवत्ता व बिले तपासणे, नियोजीत वेळेत प्रकल्प पुर्ण करुन घेणे इत्यादी कामे टि.सी.ई.कन्सल्टींग इंजिनियर्स लि.,पुणे यांची मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०४.२००६ मधील निर्णय क्र.२६१ नुसार बांधकाम व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार इकडील जा.क्र.६४१५ दि.१८.०५.२००६ चे पत्रानुसार त्यांना नेमणूक आदेश देण्यात आलेला आहे. तसेच टी.सी.ई., पुणे यांचेशी ०२ ऑगष्ट, २००६ रोजी करारनामा करण्यात आला आहे.

दि.१६.०९.२००६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.७७८ अन्वये सिव्हिल कामासाठी मे.टि.सी.ई.कन्सल्टींग इंजिनियर्स लि.,पुणे यांना १२ व्यक्ति महिन्यांसाठी (man months) रु.९२,०००/- प्रती व्यक्ति अधिक १२.२४% सर्व्हिस टॅक्स अधिक निवासस्थान इत्यादी सुविधा देणेकामी येणाऱ्या रक्कम रु.१२,३९,१२९/- चे खर्चाचे प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. टी.सी.ई. यांचेशी झालेल्या करारनाम्यानुसार दि.३१ मे, २००७ अखेर त्यांची मुदत संपुष्टात आलेली आहे. आता मे.टि.सी.ई.,पुणे यांनी त्यांचे जा.क्र.TCE/CN/४९३८A/१९६ दि.१४ मे, २००७ चे पत्रान्वये पुढील मुदतवाढीबाबत विचारणा केली आहे.

मे.टि.सी.ई. यांचेशी झालेल्या करारनाम्यातील पृष्ठ क्र.३ क्लॉज नं.२ नुसार १२ व्यक्ति महिन्यासाठी रु.९२,०००/- प्रती व्यक्ति अधिक १२.२४% सर्व्हिस टॅक्ससह देणे तसेच सदर रक्कम दि.३१ मे,२००७ अखेर लागू असुन यापुढील मुदतवाढ दिल्यास सदर रकमेवर ८% वाढ देण्याची तरतूद आहे.

सदरहू प्रकल्पाची काम पुर्ण करण्याची ठेकेदार यांची मूदत दि.१४ जुन,२००७ अखेर आहे व त्यानंतर एक महिन्याचे आत ठेकेदार मे.आय.व्ही.आर.सी.एल.यांनी अंतिम बिल सादर करावयाचे आहे. अंतिम बिल तपासणी करणे व साईट संस्थानकडे हस्तांतरीत करणेसाठी सुमारे दोन महिन्यांचा कालावधी लागणार आहे. याकामी मे.टि.सी.ई. कन्सल्टींग इंजिनियर्स लि., पुणे यांना दोन महिने मूदतवाढ देणे आवश्यक आहे. यासाठी खालीलप्रमाणे खर्च येणार आहे.

दोन व्यक्ती महिन्यांसाठी (man month) रु.९९,३६०/- प्रती व्यक्ति महिना (रु.९२,००० + ८% वाढ) अधिक १२.३६% सुधारीत सर्व्हिस टॅक्स आणि निवासाची व्यवस्था इ. सुविधा देणेकामी रु.२,२३,२८२/- मात्र इतका खर्च येईल.

तरी वरीलप्रमाणे मे.टी.सी.ई.कन्सल्टींग इंजिनियर्स लि.,पुणे यांना ३१ जुलै, २००७ अखेर एकूण दोन महिने मुदतवाढ देणेस तसेच यासाठी आवश्यक रु.२,२३,२८२/- मात्र खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रसादालयाकडील उर्वरित कामे लक्षात घेता, मे.टी.सी.ई.कन्सल्टींग इंजिनियर्स लि.,पुणे यांना तीन महिने मुदतवाढ देणेस तसेच यासाठी आवश्यक रु.२,२३,२८२/- मात्र खर्चास मान्यता त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय न. २६** **कंत्राटी सल्लागार यांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.४२८** श्री. चंद्रकान्त जयवंत रणशूर यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/८२७८/दि.०४/०८/२००५ अन्वये रेव्हेन्यु व भू-संपादन कामासाठी कंत्राटी पध्दतीने सल्लागार म्हणून दरमहा रु. ७०००/- ( रु. सात हजार) मात्रचे एकत्रित मानधनावर ते सदर पदावर हजर झाल्याचे तारखेपासून ( दि. १२/०५/२००५ पासून ) एक वर्षाचे कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली होती. सदरची मुदत संपल्यानंतर जा.नं.एसएसएस/वशी-०१/७३०३/२००६ दि. ०३/०६/२००६ अन्वये दि.१२/०५/२००६ पासून पुढे एक वर्षासाठी वाढविण्यात आलेली मुदत दि. ११/०५/२००७ अखेर संपुष्ठात आली आहे.

श्री. रणशूर यांनी दि.०५/०५/२००७ रोजी अर्ज करुन त्यात- "आपणाकडील आदेशानुसार दरमहा रु. ७०००/- मानधनावर कंत्राटी सल्लागार म्हणून हजर झाल्यापासून एक वर्षासाठी नेमणूक करणेत आली होती. त्यानुसार माझी सदरची मुदत दि. ११/०५/२००७ अखेर संपत आहे. मला जमिन खरेदी बाबत सर्व कामे करावी लागतात. तसेच संस्थान करीता जमिन भूसंपादन करणेसंदर्भात सर्व कामे करावी लागतात.

तरी कंत्राटी सल्लागार म्हणून मला एक वर्ष मुदतवाढ मिळावी तसेच सध्या मला रु. ७०००/- मात्र एकत्रित मानधन मिळते त्याऐवजी मला कराव्या लागणा-या कामाचा विचार करुन दरमहा रु. ९०००/- मानधन मिळावे " अशी विनंती केली आहे.

| ९२ | कु.सविता विजय भुसाळ | स्टाफ नर्स | ०९/०५/२००६ | ०८/०५/२००७ | सदर उमेदवाराचे काम समाधान असून त्यांची वर्तुणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात. त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील १ वर्षांची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ९३ | कु.शकुंतला पांडुरंग कुलकर्णी | स्टाफ नर्स | १३/०५/२००६ | १२/०५/२००७ | दि.१७/०३/२००७ रोजी राजीनामा मंजूर होणेबाबत अर्ज दिलेला आहे. राजीनामा मंजूर आहे. |
| ९४ | कु.सत्यभामा विठ्ठल भालेराव | स्टाफ नर्स | ०८/०५/२००६ | ०७/०५/२००७ | माहे फेब्रुवारी २००७ पासून हजेरी पटावरुन नाव कमी केलेले आहे. |

उपरोक्त श्री साईबाबा हॉस्पीटलचे वैद्यकीय संचालक व श्री साईनाथ रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षिका यांचे अभिप्रायानुसार :-

अ) संदर्भ क्र.१ व २ नूसार अ.नं.१,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८, १९,२०,२१,२२,२३,२४,२६,२७,२८,२९,३०,३१,३२,३३,३४,३५,३६,३७,३८,३९,४०,४१,४२, ४३, ४४,४६,४७,४८,४९,५०,५१,५२,५३,५४,५५,५६,५७,५८,५९,६०,६१, ६२, ६३, ६४, ६५, ६६, ६८, ६९, ७०, ७१, ७२,७३,७४,७५,७६,७८,७९,८०,८१,८२,८४,८५,८६,८७,८९, ९०, ९१, ९२ सर्व कर्मचाऱ्यांचे काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे.तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही, असे वैद्यकीय संचालक व वैद्यकीय अधिक्षिका यांची शिफारस आहे.

**ब) अ.नं.२५ श्रीमती वनिता आनंदराव अमोलिक** यांचे काम असमाधानकारक, बेजबाबदार व अकुशलता स्वरुपाचे आहे. मुदतवाढ देणेस पात्र नाही, असे वैद्यकीय संचालक यांनी गोपनीय अहवालात अभिप्राय दिलेले आहे. असा प्रतिकुल अभिप्राय दिलेला आहे.

**क) अ.नं.४५ कु. योजना रमाकांत कुलकर्णी** यांनी माहे ऑक्टोबर २००६ पासून ते माहे फेब्रु. २००७ पर्यत हक्काची रजा बाळंतपणासाठी घेतलेली होती. तसेच दि.०१/०३/२००७ पासून आजपर्यत विनापरवागी गैरहजर आहेत व कौटुंबिक अडचणी असल्यामुळे सदर उमेदवार येऊ शकणार नाही, असे त्यांचे पतींनी तोंडी सांगितले आहे.असा प्रतिकुल अभिप्राय दिलेला आहे.

ड) अ.नं.६७- कु.जयश्री डी. कसबे, अ.नं.७७- कु.विद्या राजु शर्मा, अ.नं.८८- कु.वंदना लक्ष्मण केने, अ.नं.९३-कु.शंकुतला पांडुरंग कुलकर्णी व अ.नं.९४-कु.सत्यभामा विठ्ठल भालेराव यांनी राजीनामा दिलेला असून त्यांचे हजेरी पटावरुन नांव कमी केले आहे.

इ) अ.नं. ८३ कु.आशा नारायण कासार यांनी दि.०२/०३/२००७ ते दि.०५/०३/२००७ पर्यंत विनापरवानगी गैरहजर आहेत. तसेच दि.०९/०३/२००७ ते दि.२७/०३/२००७ पर्यंत हक्काची रजा घेतलेली आहे. दिनांक २८/०३/२००७ ते दि.१२/०४/२००७ पर्यत विनापरवानगी गैरहजर आहे. इतरत्र हजर झाल्याचे गोपनीयरित्या समजते.असा प्रतिकुल अभिप्राय दिलेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त, "अ'' मध्ये नमुद केलेल्या स्टाफ नर्सेस यांना एक वर्ष मुदतवाढी देण्यात यावी, तसेच "ब'' मध्ये नमुद केलेल्या स्टाफ नर्स श्रीमती वनिता आनंदराव अमोलिक यांचे वर्तनात सुधारणा होत असल्याचे वैद्यकीय संचालक यांनी कळविलेले असल्याने त्यांना सहा महिने मुदतवाढ देण्यात यावी व "क - इ'' मधील स्टाफ नर्स कु. योजना रमाकांत कुलकर्णी व कु.आशा नारायण कासार विनापरवाना गैरहजर असल्याने त्यांची सेवा संपुष्टात आणण्यात यावी,असें ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३२ श्री साईबाबा हॉस्पीटलकडील वैद्यकीय अधिकारी यांच्या नेमणूकीबाबत..**

**निर्णय क्र. ४३४** श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटकडे वैद्यकिय अधिकारी पूर्ण वेळ/ऑनररी/व्हिजीटींग तसेच आर.एम.ओ/ सी.एम.ओ या पदावर नोकरी मिळणेबाबत खालील प्रमाणे उमेदवारांनी अर्जाद्वारे विनंती केली होती.

उपरोक्त अर्जाबाबत,मा.डॉ.तिवारी विश्वस्त साो.तसेच वैद्यकीय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे दि.३१/०३/२००७ व दि.०२.०४.२००७ रोजीचे अभिप्राय व टिपणीस अनुसरुन, संबंधीत उमेदवारांच्या मा.सचिव विधी व न्याय विभाग यांचेकडे श्री साईबाबा हॉस्पीटल वैद्यकीय अधिकारी / कर्मचारी यांचेबाबत पद व वेतनश्रेणी निहाय मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या आकृतीबंधास मंजूरीचे अधीन राहून,खालीलप्रमाणे नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

| अ. नं. | वैद्यकीय अधिकारी नांव | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश नंबर व हॉस्पीटलचे नांव | दिलेले पदनांम व एकत्रीत मानधन / वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१.. | डॉ.बापूसाो. पी. काकड संगमनेर | एम.बी.बी.एस. डी.सी.एच. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/७५०/०७ दि.०३/०४/२००७ श्री. साईनाथ हॉस्पीटल | वैद्यकिय अधिकारी(आर.एम.ओ) मा. वेतन रु. १८,०००/- |
| ०२. | डॉ.रोहीनी पी.दानवे (काकड ) | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/७५१/०७ दि.०३/०४/२००७ श्री. साईनाथ हॉस्पीटल | वैद्यकिय अधिकारी(आर.एम.ओ) मा. वेतन रु. १७,०००/- |
| ०३. | डॉ.किरण सी.खांदे, राहाता | एम.डी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/५५६९/०७ दि.०५/०४/२००७ श्री.साईबाबा हॉस्पीटल | मेक्सीलोफेसीएल सर्जन मा. वेतन रु. २५,०००/- |
| ४. | डॉ.योगिनी हेतल शहा, पुणे | एम.बी.बी.एस. डि.एन.बी.डी.एम. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/५७४८/०७ दि.०८/०४/२००७ श्री.साईबाबा हॉस्पीटल | असो.कन्स्लटंट (रेडिओलॉजी) एकत्रित वेतन रु. ३०,०००/- |
| ०५. | डॉ.बजाज हरिश, यवतमाळ | डि.एम. (कार्डिओलॉजी) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/५७४६/०७ दि.०८/०४/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | इंटरव्हेशनल कार्डिओलॉजीस्ट एकत्रित वेतन रु. ३०,०००/- |
| ०६. | डॉ.सचिन एस. पऱ्हे, श्रीरामपूर | एम.डी. पॅथॉलॉजी | जा.नं.एसएसएस/वशी-०१/६८६१/०७ दि.३०/०४/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | ज्यु. पॅथॉलॉजीस्ट एकत्रित वेतन रु. २५,०००/- |
| ०७. | डॉ.बानेश सी. गायकवाड, कोपरगाव | एम.बी.बी.एस (डि.ऑर्थो) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/६९३७/०७ दि.३०/०४/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | वैद्यकिय अधिकारी(आर.एम.अ एकत्रित वेतन रु. १८,०००/- |
| ०८. | डॉ.क्षितीज अे. जाधव, औरंगाबाद | एम.बी.बी.एस (डि.अे) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/७०७७/०७ दि.०३/०५/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | ज्यु. ॲनेस्थेशिओलॉजीस्ट एकत्रित वेतन रु.२५,०००/- |
| ०९. | डॉ.रमा एम. घाणमोडे, पुणे | एम.बी.बी.एस (डि.ओ) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/७२२७/०७ दि.०८/०५/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | आर.एम.ओ (ऑप्थाल्माजॉजी) एकत्रित वेतन रु. १८,०००/- |
| १०. | डॉ.विवेक जे. दुग्गड, पुणे | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/७५२५/०७ दि.१४/०५/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | वैद्यकिय अधिकारी(आर.एम.अ एकत्रित वेतन रु. १७,०००/- |
| ११. | डॉ. नचिकेत अे.तरोडी, कोपरगाव | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/७५३०/०७ दि.१४/०५/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | वैद्यकिय अधिकारी(आर.एम.अ एकत्रित वेतन रु. १७,०००/- |
| १२. | डॉ. प्रितम बी.जपे, कोपरगाव | एम.डी. (डि.ऑर्थो) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/७७२४/०७ दि.१८/०५/२००७ श्री.साईबाबा हॉस्पीटल | ऑर्थोपेडीक सर्जन एकत्रित वेतन रु. ३०,०००/- |

तरी उपरोक्त श्री. साईबाबा हॉस्पीटल व श्री. साईनाथ हॉस्पीटलकडे वैद्यकीय अधिकारी/ आर.एम.ओ/ असो. कन्सलटंट, इंटरव्हेशनल कार्डिओलॉजीस्ट या पदावर केलेल्या नेमणूकांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३३** **जुन्या वाहनांचा जाहिर लिलावाने विक्री करणे बाबत.**

**निर्णय क्र.४३५** विधी व न्याय विभाग शासन पत्र क्रं. सासंवि-२००५/३८७/(११७)-का.सोळा,दि.२९/६/०६चे पत्रान्वये , संस्थानकडे असलेली जुनी वाहने शासनांच्या नियमाचे पालन करण्याच्या अटीस अधिन राहुन ०५ वर्ष किंवा त्या पेक्षा अधिक जुनी असेलेली किंवा ०१ लाख किलोमिटरपेक्षा जास्त धाव झालेल्या वाहनांचा जाहीर लिलावाने विक्री करणेस शासन मान्यता देण्यात आली आहे.मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०९/२००६ सभेतील निर्णय क्रं.७१८ (१४) व मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०१/२००७ चे निर्णय क्रं.५५नुसार खालील प्रमाणे १६ वाहने जाहिर लिलावाने विक्री करणेस मान्यता मिळालेली आहे.

| अ. नं | वाहन क्रमांक | वाहन प्रकार | इंधन | खरेदी दिनांक | झालेले वर्ष -महिने | झालेले कि.मी. | खरेदी किंमत | दुरूस्ती खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | एफ-५०१ | ॲम्बेसॅडोरकार | डिझेल | ३०/०४/१९९९ | ०७-०६ | १,४५,५३८.०० | ४,५०,००० | १,६५०७०.०० |
| | - | चांदीचे नाणे | | ०९/०५/१९९९ | | | ४००/- | |
| | - | कार टेप | - | - | - | - | - | - |
| ०२ | एच-६०१ | हुन्डाई ॲसेंट | पेट्रोल | ०१/०५/२००० | ०६-०५ | १,३०,५४८.०० | ६,३२४४३/- | १,५९६३५.०० |
| | - | कार टेप | - | - | - | - | - | - |
| ०३ | एच-४०१ | व्हायझर | डिझेल | २८/०२/२००० | ०६-०८ | १,०४,१२७.०० | ४,७१९५७/- | -- |
| | - | कार टेंप | - | ३०/०३/२००० | - | - | ०३,५००/- | - |
| ०४ | एच-८०१ | ॲम्बेसॅडर कार | डिझेल | १९/०५/२००० | ०६-०५ | २,५२,६५७.०० | ४,५६,०००/- | १,१६,०२८.०० |
| | - | कार टेप | - | १९/०६/२००० | - | - | ६,१७५/- | - |
| ०५ | के-१८०१ | टाटा सुमो | डिझेल | ०३/०१/२००२ | ०४-१० | २,४३,७३४.०० | ४,१५,१७८/- | ९७,००६.०० |
| | - | कार टेप | - | ०१/०२/२००२ | | - | १०,०००/- | - |
| ०६ | एल-६०९७ | बजाज एम८० | पेट्रोल | १३/०६/२००१ | ०५-०४ | ४८,७९० | २८,९६२/- | ३,५००.०० |
| ०७ | ई-९१०० | राजदुत | पेट्रोल | १४/०२/१९९८ | ०८-०८ | २४,७९३ | ३१,२८३/- | उपलब्ध नाही |
| ०८ | एच-६८३८ | बजाज एम८० | पेट्रोल | ०१/१२/१९९९ | ०६-१० | २२,३१०.०० | २२,७८५/- | ३,०००.०० |
| ०९ | ए-७५९३ | टाटा बस | डिझेल | ०१/०६/१९९२ | १४-०४ | १,२२,३३१.०० | ६,४५,३०१/- | ७६,२५५.०० |
| १० | ए-७५९४ | टाटा बस | डिझेल | ०१/०६/१९९२ | १४-०४ | १,९५,६१४.०० | ६,४५,३०१/- | १,५०,५४९.०० |
| ११ | ए-७५९५ | टाटा बस | डिझेल | ०१/०६/१९९२ | १४-०४ | १,२९,७२३.०० | ६,४५,३०१/- | १,९७,२९१.०० |
| १२ | सी-९०१६ | टाटा बस | डिझेल | ०५/१२/१९९६ | ०९-१० | १,४९,८९७.०० | ८,४३८५६/- | १,४८,५६०.०० |
| १३ | सी-९०१७ | टाटा बस | डिझेल | ०५/१२/१९९६ | ०९-१० | १,६३,८३३.०० | ८,४३८५६/- | १,००,६२९.०० |
| | - | कार टेप | - | २४/८/२००५ | - | - | ०१,८५०/- | - |
| १४ | के-६२८१ | सुमो ॲम्ब्यु. | डिझेल | २९/०३/२००२ | ०४-०७ | ३,७९,१४०.०० | ४,३१,०००/- | १,०६,२९२.०० |
| | - | कार टेप | - | १०/०८/२००२ | ०४-०२ | - | ०३,७००/- | - |
| १५ | के-६६०१ | टे.ट्रॅव्हलर ॲम्ब्यु. | डिझेल | ०२/०५/२००२ | ०४-०२ | २,११,४९३ | ६,२०,०००/- | ३,००,४१३.०० |
| | - | कार टेप | - | १६/१२/२००२ | ०३-१० | - | ०३,८००/- | - |
| १६ | सी-७९०१ | जे.सी.बी. | डिझेल | ३०/०१/२००० | ०७-०२ | ४२७५ तास | १७,२०२३१/- | १७५८१४.०० |
| | - | बकेट १ फुट | - | २०/१०/२००० | - | - | १७६४८/- | - |

उपरोक्त १६ वाहनांचा संस्थानच्या विहीत प्रचलित कार्यपध्दती नुसार दिनांक ०५ जुन २००७ रोजी जाहीर लिलावाने विक्री करण्यात यावी. त्याचबरोबर संस्थानचे इतर निरुपयोगी असलेल्या वस्तुची जाहिर लिलावाने विक्री करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३४** **रिट पिटीशन नं. २६९२/२००६ श्री उत्तमराव रंभाजी शेळके वगैरे दि स्टेट ऑफ महाराष्ट्र, श्री साईबाबा संस्थान वगैरे बाबत**

**निर्णय क्र.४३६** मा.उच्च न्यायालय ,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर रिटपिटीशन नं २६९२/२००७ उत्तम रंभाजी शेळके रा. शिरडी वगैरे यांनी दाखल केलेले असून प्रामुख्याने त्यामध्ये खालील पक्षकार केलेले आहेत.

०१)उत्तमराव रंभाजी शेळके

०२) राजेंद्र गंगाधर, भुजबळ

विरुध्द

१) दि स्टेट ऑफ महाराष्ट्र ३) दि कलेक्टर,अहमदनगर

४) दि जिल्हा परिषद,अहमदनगर

७) श्रीसाईबाबा संस्थान ४) चॅरिटी कमिशनर

९) २४/ २६ मा. विश्वस्त, श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडी

२७) नगरपंचायत शिरडी , शिरडी

२८) मन इन्फ्रा कन्स्ट्रक्शन लिमिटेड,मुंबई

अर्जदाराने प्रस्तुतचे रिटपिटीशनमध्ये खालील प्रमाणे विनंती केलेली आहे.

आरक्षण क्रमांक १० बाबत शिर्डी विकास आराखड्यात गार्डन ऐवजी शॉपीग कॉम्प्लेक्सचे आरक्षण असा बदल करण्यात आला. तसेच आरक्षण क्रमांक ९ बाबत गार्डन बगीचा ऐवजी दुकानकेद्रं, ऑडिटोरियम, दर्शनरांग व बगीचा असा बदल करणेत

आला. शिर्डी नगरपंचायतीस प्रस्तुत आरक्षणाचे विकसन यंत्रणा करणेत आले आहे त्याबाबतचे अर्बन डेव्हलपमेंट मंत्रालय मुंबई यांचे दि.२४/०८/२००४ ची अधिसूचना रद्य व्हावी अशी अर्जदाराने विनंती केलेली आहे.

संस्थानचे संबंधात संस्थानने व्यवस्थापन समितीचे बैठकीत दिनांक ०१/०९/२००४ रोजी घेण्यात घेण्यात आलेला निर्णय रद्य व्हावा. अशी विनंती प्रस्तुत रिट पिटीशनरने प्रस्तुत (याचीकेत) केली आहे. तसेच

३) दिनांक १२/०४/२००५ रोजी शासनातर्फे घेण्यात आलेला निर्णयाप्रमाणे जिल्हा परिषद मालकीचे शिर्डी येथील जागेवर गाळे बांधणेबाबत परवानगी देणेत आलेली आहे. सदर निर्णय रद्य व्हावा. अशी विनंती करणेत आलेली आहे. जिल्हा परिषद मालकीची शिर्डी स.नं ०१ पैकी ५७ आर जागेचे हस्तांतर हे जिल्हा परिषद अधिनियमा विरुध्द आहे असे धरण्यात यावे. अशा अर्थाची विनंती याचिकेतकेली असून रिट पिटीशनचा निर्णय लागेपर्यंत प्रतिवादी नंबर २७ व २८ यांना प्रस्तुतचे साईट नं. ०९ व १० वरील बांधकाम थांबवावे. अशी विनंती प्रस्तुत रिटपिटीशनमध्ये केलेली आहे.

४)तसेच दि २९/०१/२००७ रोजीचा नगरपंचायत शिर्डी व बिल्डर मन इन्फ्रॉ कन्स्ट्रक्शन कंपनी मुंबई यांचेमध्ये झालेला दि.२९/०१/२००७ चा करारनामा रद्य होणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे. सदर करारनामाप्रमाणे बांधकाम करण्यात येऊ नये अशी विनंती रिट पिटीशनमध्ये केलेली आहे. शिर्डी नगरपंचायतीस जिल्हा परिषदेचे मालकीची जागेबाबत हस्तांतर अगर विल्हेवाट लावायचा अधिकार नाही. प्रस्तुत जिल्हा परिषद जागेचा विकास करणेचा अधिकार नाही. सदर जागेचा करारनामा करणेसाठी शासनाची परवानगी घेतलेली नाही. सार्वजनीक मालमत्तेचे रुपांतर कोणत्याही बांधकामासाठी करता येणार नाही असे मुद्दे रिट पिटीशन मध्ये नमुद केलेले आहे.

प्रस्तुत रिट पिटीशनमध्ये अर्जदाराने आणखी खालील प्रमाणे मुद्ये नमूद केले आहेत.

1) M.I Bulders ( P ) Ltd Vs. Radhaysham Sahu reported in (1999 ) 6 ssc 464 हया केसमध्ये चांगले राज्य व त्याचे सक्षम अधिकारी यांचेकडून सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व त्या सार्वजनिक मालमत्तेचे खाजगी मालमत्तेत रुपांतर होऊ नये. असे तत्व या केसमध्ये सांगितलेले आहे. या संबंधाने अनेक कायद्यामध्ये उदा नगरपचायंत कायदा, नगररचना कायदा, जिल्हा परिषद कायदा पब्लीक ट्रस्ट ॲक्ट व संस्थान अधिनियम २००४ या मध्ये याबाबत तरतुदी करण्यात आलेल्या आहेत परंतु सदर तरतुदी लागु नाहीत असे या रिटपिटीशनमधील प्रतिवादीना वाटते असे सदर रिटपिटीशनमध्ये नमूद केले आहेत असे घटना व रेकॉर्डवरुन दिसून येते असे रिटपिटीशनमध्ये सुरुवातीस नमूद करून त्यानंतर अर्जदाराने खालीलप्रमाणे बाबी रिट पिटीशनमध्ये नमूद केलेल्या आहेत.

२) शिर्डी येथील विकास आराखडयाप्रमाणे श्री साईबाबांचे मंदीर साईट न ११ मध्ये आहे साईट नं १० भक्तनिवास असून साईट नं ०९ ही मिळकत जिल्हा परिषदेची मालकीची असून तेथे शाळा आहे. मंदीरापासून सदरची मिळकत १०० फुट अंतरावर आहे साईट नं ०९,१०,११ या पिंपळवाडी रोड लगत आहे. साईट नं ०९ व १० जवळ लहान रस्ता असून तो मंदीराकडे जातो. रथ पालखी रस्ता मंदीराच्या दक्षिणेकडून जाणारा आहे. साईट नं ९ ही अनेक दस्तऐवजावरुन जिल्हा परिषद मालकीचे सार्वजनिक मालमत्ता असल्याचे स्पष्ट होते दि.०५/०८/१९९८ चे जिल्हा परिषदेच्या ठरावाप्रमाणे सदरची मिळकत श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांना काही अटीवर देण्याचे ठरलेले आहे. सदर जिल्हा परिषदेच्या जागेच्या मालकीच्या बदल्यात सर्व्हे नंबर ६ साईट नं ०८ मध्ये संस्थानने शाळेसाठी बांधकाम करुन दयावे अशा अर्थाचा प्रस्तुतचा पहिला प्रस्ताव होता. त्यानंतर जिल्हा परिषद मार्फत घेण्यात आलेली दि २०/०६/२००१ व दि २३/०१/२००२ चे ठरावाचाही उल्लेख आहे. जिल्हा परिषदेच्या मालकीची सार्वजनिक मालमत्तेची व्यापारी उपयोगासाठी हस्तांतर कसे होऊ शकेल असा मुद्या अर्जदाराने उपस्थित केला असून त्याबाबत जिल्हा परिषदेने घेतलेला ठराव निरर्थक आहे व सरकारलाही याबाबत बेकायदेशीर हस्तांतरास परवानगी देता येणार नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

जिल्हा परिषद मालकीच्या संदर्भात शासनाने दि १४/०८/२००२ प्रमाणे जो निर्णय घेतला आहे त्यामध्ये जिल्हा परिषदेच्या मिळकत हस्तांतराणा बाबत तरतुदीचे उल्लेख नमूद केलेले नाही. तसेच जिल्हा परिषदेच्या मालकीची-सार्वजनिक मालमत्तेचे हस्तांतरण संस्थानचे सार्वजनिक कामासाठी होत आहे असे चित्र उभे केले आहे.

सार्वजनिक मालमत्तेचा उपयोग दुकानदाराचे पुर्नवसानासाठी कसा करता येईल. असे रिटपिटीशन मध्ये मुद्या उपस्थित केले आहे.

सुरुवातीस साईट नं ०९ ही सार्वजनिक व निमसार्वजनिक कामासाठी आरक्षित होती. साईट नं १० बगीचा व रोडसाठी आरक्षित होती. दि ०६/०८/२००३ चे अर्बन डेव्हलपमेंट डिर्पाटमेंटची अधिसूचनाप्रमाणे साईट नं ०८ चे आरक्षण हे शिरडी नगरपंचायत ऐवजी संस्थानचे नांवे दर्शविण्यात आले. शासन निर्णयाचे दि १४/०८/२००२ ची अमंलबजावणी व्हावी या हेतूने सदरचा बदल करण्यात आला. प्लॅनमध्ये असा बदल करण्याचे काहीही कारण नाही. सदरचे दि ०६/०८/२००३ चे जाहीर प्रकटन हे प्रतिवादी नं ०१ शासन, त्यांचे अधिकाराचे उल्लंघन करणारे आहे असे पिटीशरचे म्हणणे आहे.

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी यांचेमार्फत दि १५/१०/२००३ रोजी घेण्यात आलेल्या निर्णयाबाबतही रिटपिटीशनमध्ये उल्लेख केलेला आहे. शासनाकडील निर्णय दि १४/०८/२००२ व दि०६/०८/२००३ चे आधारावर शाळेची जागेचे रुपांतर खाजगी मालमत्तेत होणार असल्याचे स्पष्ट झाले. अतिक्रमण धारकांचे पुर्नवसानासाठी हया जागेवर दुकानांचे बांधकाम होणार व नगरपंचायत शिर्डी विकसन यंत्रणा राहील असा उल्लेख हया ठरावात करण्यात आलेला आहे. सदरचे निर्णयावरुन जिल्हा परिषदेची सार्वजनिक मालमत्तेचे रुपांतर खाजगी मालमत्तेत करण्याचा प्रयत्न चालू असल्याचे सदरचे ठरावावरुन दिसते असा रिटपिटीशनमध्ये उल्लेख केलेला आहे.

मंदीराच्या सभोवतालचे अतिक्रमण भक्तांचे सुरक्षितता व आरोग्याच्या दृष्टीकोनातून समाधी मंदीराच्या जवळील परिसर अतिक्रमण विरहीत असावा त्यासाठी संस्थान व नगरपंचायत यांनी एकत्र येऊन सर्व्हे नं १ /१ /१ व १/ ब /१ /२८२ मधील दुकानदारांचे अतिक्रमण काढून दूर केलेले आहे रिट पिटीशन नं ३१८३/२००४ हयाबाबत दाखल झाले होते. रथ पालखी रस्त्याचे रुंदीकरणाबाबत शिर्डी नगरपंचायत व संस्थान यांनी सहकार्याने शासनास भू-संपादनासाठी मदत आहे. त्याबाबत २१८३/२००३ चे रिट कोर्टात दाखल झाले आहे.सदर रिटपिटीशनमध्ये शिर्डी येथे येणा-या भक्तांची संख्या वाढत आहे. स.न २००३ मध्ये १,३०,३६,५०० भक्त शिर्डी मध्ये आले होते असे ॲफेडिव्हीट मध्ये संस्थान तर्फे देण्यात आलेल्या शपथपत्रात नमूद केले आहे. प्रस्तुत ठिकाणी गर्दीच्यावेळी जाणे येणे अवघड झाले आहे असे नमूद केले आहे. हया जागेचे भू संपादन संदर्भात आवाहन देणारी याचिका दि ०८/१२/२००३ चे आदेशाने रद्य करण्यात आलेला आहे. तसेच-

मा. जिल्हाधिकारी यांनी दि १६/०२/२००५ चे आदेशाने सदरचे क्षेत्र नो पार्कीग एरिया झोन म्हणून घोषित केलेला आहे पोलीस खात्याकडून मंदीर परिसर हा सुरक्षितेच्या दृष्टीने मोकळा ठेवण्याचे सूचित करण्यात आले होते.

त्या संदर्भात दि ०४/०२/२००५ व ०८/०२/२००५ रोजी झालेल्या मिटींगला संस्थानचे चेअरमन हजर होते असे रिट पिटीशनमध्ये नमूद करण्यात आले आहे.

दि ११/०३/२००५ च्या पत्राने उपविभागीय अधिकारी यांनी संस्थानला पत्र दिले असून मंदीर परिसरात कोणतेही बांधकाम करु नये असे सूचित केले आहे.

शिर्डी येथील भक्तांची वाढती संख्या लक्षात घेता मंदीर परिसर हा मोकळा रहाणे आवश्यक आहे. असे रिटपिटीशनमध्ये नमूद केले आहे.

जिल्हा परिषद मालकीचे साईट नं ९ व १० चे हस्तांतर बेकायदेशीर असल्याचे अर्जदाराचे म्हणणे आहे सुरवातीला अतिक्रमण काढून टाकणेबाबत संस्थान व नगरपंचायत एकत्र होते परंतु त्यानंतर अतिक्रमण दुकानदारांच्या पुर्नवसन करण्यासाठी सार्वजनिक मालमत्तेत साईट न. ९ व १० जास्त किमंतीच्या मालमत्ता देऊन पुर्नवसन करीत असल्याचे मुद्दे रिटपिटपिटीशनमध्ये नमूद केले आहे.

रिट पिटीशनमध्ये संस्थानचा दिनांक ०१.०९.२००४ चा ठराव रद्य होणेबाबत विनंती केलेली आहे व प्रामुख्याने संस्थानचे विरुध्द रिट पिटीशनमध्ये त्याबाबतचा मुद्या उपस्थितीत (ठराव ४४७ बाबत ) केलेला आहे.

श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ चा उल्लेख रिटमध्ये आहे सदर अधिनियमाचे कलम १७ (३) प्रमाणे विश्वस्त मंडळाला गहाण, खरेदी भाडेपटटा वर अन्य मार्गाने संस्थान मिळकतीचे शासनाचे परवानगी शिवाय हस्तांतर करता येणार नाही तसेच शासनास निरंतर हस्तांतर मंजूरी देण्याबाबतचे अधिकार नाही तसेच अतिक्रमण धारकास दुकाने देण्याचे काम हे संस्थानचे नाही. अशा प्रकारे साईट नं ९, १० ही मिळकत संस्थानला देणे हे कायदेशीर आहे असे मानले तरी टपरी धारकांना त्याचे पुनर्वसनासाठी मिळकतीचा उपयोग करता येणार नाही .

संस्थानचे मा. व्यवस्थापन समितीचे दि ०१/०९/२००४ चे मिटींगमध्ये झालेले ठरावावरुन सार्वजनिक मालमत्तेचे रुपांतर खाजगी कारणांसाठी उघड होते. खाजगी मालकास जागा वापरांस देणेबाबत ठरले असल्याचे उघड होते. या मिटींगमध्ये शासनाने शिर्डी विकास आराखडयात बदल केला असून शिर्डी नगरपालिकेचे माध्यमातून दुकानगाळे करण्याबाबत श्री विखे पाटील यांनी सूचित केले, संस्थानचे कमेटी सदस्य साईट नं ९ व १० चे रुपांतर दुकानगाळयात करणेसाठी उत्सुक होते. असे स्पष्ट होते असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

जिल्हा परिषद, अ.नगर यांचे दि ०२/०२/२००५ चे ठरावावरुन जिल्हापरिषद मालकीची जागा भक्तांसाठी द्यावयाची होती हे उघड होते. परंतु त्याचवेळी संस्थान शासन व नगरपंचायत यांचेमध्ये जागा शॉंपीग कॉम्प्लेक्ससाठी नगरपालिकेकडे हस्तांतर करणेबाबत प्रयत्न होते. दि १८/०७/२००६ ठराव नंबर ३६६ करुन नगरपालिकेने दुकानगाळयांचे बांधकामाचा प्रस्ताव पाठविला होता हे स्पष्ट होते. सदरचे ठरावावरुन संस्थानकडे दुसरा मजला, १५ दुकाने इत्यादी येणार होते तर नगरपंचायत २५९ शॉपचे मालक होणार होते. सदरचे ठरावावरून व्यापारी कारणांसाठी २५९ दुकानासाठी ( जास्त भाग ) वापरणार होते परंतु त्याचा विनियोग कसा होणार होता हे ठरावात नमूद केलेले नाही. सदर बाब नगरपंचायत व मन कन्स्ट्रक्शन यांचेमध्ये झालेल्या करारावरून स्पष्ट होते. असे रिटपिटीशनमध्ये नमूद केलेले आहे. सदर करार बेकायदेशीर असल्याचे रिट पिटीशनमध्ये नमूद केलेले असून साईट नं ९ व १० हे एकूण क्षेत्रफळ ३६२८ स्क्वे मिटर आहे. त्यामध्ये ६० % भाग बिल्डरला देण्यात येणार आहे ३० % क्षेत्र शिर्डी नगर पंचायत व १० % क्षेत्र संस्थानकडे येणार आहे नगर पंचायतीने सदर जिल्हा परिषदेची मिळकत स्वतः ची समजून करारनामा करण्यात आलेला आहे. दुकान गाळयांची किंमत १०० कोटीपेक्षा जास्त येणार असून बाधकामासाठी खर्च ६ कोटी येईल. अशाप्रकारे ९४ कोटीचा नफा बिल्डरला मिळणार आहे. स्टॅचुटरी अथॉरिटी व संस्थान यांनी बिल्डरला नफा मिळण्यासाठी मदत केलेली आहे. सार्वजनिक मालमत्तेतून भ्रष्ट्राचाराकडे नेणारी ही गोष्ट आहे. अशा बाबी रिटपिटीशनमध्ये नमूद केलेल्या आहे.

संस्थान मिळकतीचे रक्षण करणे्साठी आवश्यकता निर्माण झालेली आहे अशा ही बाबी रिटपिटीशनमध्ये नमूद केलेल्या आहेत.

उपरोक्त रिटपिटीशनमध्ये नगरपंचायत, व मन कनस्ट्रक्शन यांचेमध्ये झालेले कराराप्रमाणे बांधकाम होऊ नये अशी विनती मा. कोर्टात केलेली आहे त्याचबरोबर संस्थानचे ठरावासही आवाहन दिलेले आहे.

शिरडी येथे दिवसेंदिवस येणा-या भक्तांची संख्या विचारात घेता अतिक्रमण उठविणे व दुकानदारांचे पुनर्वसनाबाबत संस्थान पूर्वीपासून प्रयत्नशील आहे. मा. विश्वस्तमंडळाचे ठराव , मा. धर्मादाय आयुक्त व शासनाची परवानगी व कायदेशी्र तरतुदी विचारात घेऊन संस्थानचा कारभार चालतो. याचिकाकर्त्याने संस्थानचे ठरावाचे विरोधात व नाराजीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था अधिनियम २००४ चे तरतुदी प्रमाणे प्रथम शासनाकडे प्रकरण सादर करणे आवश्यक होते. शिर्डी विकास आराखडयामध्ये आरक्षण क्रमांक ९ व १० मध्ये फेरबदल करताना रिटपिटीशनकर्त्याने हरकत घेतलेली नाही तसेच प्रस्तुतचे रिट पिटीशनकरतांना सामनेवालेस कोणतीही नोटीस दिलेली नाही. यापूर्वी याचिकाकर्त्याने ३९५१/२००५ रिटपिटीशन दाखल केले होते. त्याची पुर्नआवृत्ती प्रस्तुतचे रिटपिटीशनमध्ये आहे. या बाबी विचारात घेऊन संस्थानचे म्हणणे प्रस्तुतचे रिटपिटीशन मध्ये दाखल करता येईल. औरगांबाद येथे संस्थान वकीलाचे समवेत समक्ष भेट घेऊन चर्चा केलेली आहे. दिनांक १६/०५/२००७ रोजी संस्थानतर्फे श्री. आर.एन.धोर्डे, ॲडव्होकेट, उच्च न्यायालय,खंडपीठ, औरगांबद यांना संस्थानचे वतीने काम पहाणेस विनंती करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी मन कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी बांधकाम करु नये अशी विनंती याचिकाधारकाने केली होती. त्याबाबत दि १७/०५/२००७ रोजी सुनावणी होऊन प्रस्तुत सामनेवाला नं. २८ यांनी आवश्यक ते अंडरटेकींग (UNDER TAKING) आठवडयात कोर्टात सादर करुन बांधकाम ( साईट नं ९ व १०) करता येईल . अशा आशयाचा मा. कोर्टाचा आदेश झालेला आहे. प्रकरणी पुढील तारीख १६/०६/२००७ रोजी नेमलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी सदर याचिकामध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांचे म्हणणे/बाजू संस्थान वकीलामार्फत मांडावे लागणार आहे. आवश्यकतेनुसार शपथपत्र देऊन बाजू मांडावी लागणार आहे त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**<u>दि.२०.०५.२००७ चे सभेतील निर्णयाची कामापुरती नक्कल-</u>**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३५** **दिनांक १२.५.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.४३७** व्यवस्थापन समितीचे दि.१२.०५.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

(०१) व्यवस्थापन समितीचे दिनांक १९.०८.२००६ चे सभेत निर्णय क्र. ६२६ अन्वये श्री अजय शिवराम पांडे, गिरीश एकनाथ चोळके,मधुकर परशराम गव्हाणे व श्री अमृत गंगाधर जगताप यांना तसेच व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.१०.२००६ चे सभेत निर्णय क्र.८४६ अन्वये श्री स्वप्नील गायकवाड व श्री गंगाधर जाधव या कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांना दरमहा रुपये ७०००/- या एकत्रित निश्चीत वेतनावर एक वर्षाचे कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली आहे. त्याच पध्दतीने वाहन विभागात काम करीत असलेले श्री.अतुल एकनाथ वाघ यांना नेमणूक देणेबाबत शिफारस करण्यात आली, ती मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

(०२) डॉ.स्वाती आढाव यांची रेडिओलॉजिस्ट या पदावर रुपये ३० हजार मासिक वेतनावर नियुक्ती झालेली आहे त्यांनी मासिक वेतनाव्यतिरिक्त प्रतिमहा रुपये रु.२० हजार फिक्स मोबदला असे एकूण प्रती माह रुपये ५० हजार वेतन मिळावे अशी विनंती केलेली आहे.

तसेच डॉ.विजय नरोडे, Intensvist यांची रुपये ३० हजार मासिक वेतनावर नियुक्ती केलेली आहे. हृदयरोग विभागात ऑपरेशन झालेल्या रुग्णांना डिसचार्ज होईपर्यन्त त्यांच्यावर अत्यंत दक्षतेने उपचार करण्याचे काम करत असल्याने त्यांनी मासिक पगार रुपये ३०,०००/- अधिक २०,०००/- असे एकूण रुपये ५०,०००/- मासिक वेतन मिळावे अशी विनंती केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.स्वाती आढाव यांना दिनांक ९.११.२००६ व डॉ.विजय नरोडे यांना साईबाबा हॉस्पिटल उद्‌घाटन दिनांक १५.५.२००६ पासून मासिक रुपये २०,०००/- इन्सेंटीव्ह देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

(०३) श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना मासिक पगाराव्यतिरिक्त इन्सेन्टीव्ह देण्यात येतो, त्यामुळे सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांचा कल पैसे मिळविण्याकडे आहे. त्यामुळे वैद्यकीय अधिकारी निष्काळजीपणे रुग्णांची तपासणी करतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर ऑपरेशन केलेल्या केसेस स्पॉईल होत आहेत, याचा परिणाम मोठ्या प्रमाणावर रुग्णांवर होत आहे व रुग्णांना योग्य प्रकारे वैद्यकीय उपचार मिळत नाहीत. याकरिता देण्यात येणाऱ्या इन्सेन्टीव्हबाबत व्यवस्थापन समितीचे सभेत फेरविचार करण्यात यावा,अशी शिफारस करण्यात आली.याबाबत मा.विश्वस्त श्री पांडुरंग गमाजी अभंग, मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे, वैद्यकीय संचालक तसेच प्रशासकीय अधिकारी रुग्णालय व आस्थापना यांनी सर्व बाजूने विचार करुन सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३६** **मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नंबर १७२ मध्ये भक्तनिवासस्थान बांधणेबाबत**

**निर्णय क्र.४३८** मा.श्री.के.व्ही.रमणी,शिर्डी साई ट्रस्ट , चेन्नई यांनी पुर्वी संस्थानच्या मालकीचा स.नं. १०७, भूसंपादनाने घेण्यास येणारी जमिन स.नं. १०७/६, १०७/१४,१०७/११,१०७/४+१०७/१० चे क्षेत्र २ हेक्टर ८५ आर व सन १०८/१,१०८/५,१०८/४ व १०८/६ क्षेत्र ३ हेक्टर ७८ आर १७ चौ.मी. यामध्ये साई आश्रम प्रकल्प राविण्याचे ठरविले आहे. वर नमूद केलेल्या जमिनीपैकी स.नं. १०८/१, १०८/५,१०८/४,१०८/६ क्षेत्र ३ हेक्टर७८ आर १७ चौ.मी. खरेदी करण्यात आले आहे.

आता फक्त संस्थानच्या मालकीची स.नं.१०७ मधिल २ हेक्टर जमीन व स.नं. १०८ मधील खरेदी केलेली जमीन साई आश्रम प्रकल्पांसाठी उपलब्ध झाली आहे. स.नं. १०७ मधिल २ हेक्टर ८५ आर जमीन अद्याप मिळालेली नाही. सदर प्रकल्प पूर्ण क्षमतेने सत्वर सुरु करणेचे दृष्टीने शेती महामंडळाकडून संस्थानने ताब्यात घेतलेल्या जमिनीची साईभक्त श्री. के.व्ही.रमणी,शिर्डी साईट्रस्ट चेन्नई यांनी शिर्डी येथील दि. १९/०४/२००७ रोजीचे भेटीत पुन्हा पहाणी केली. त्यांनी मौजे निमगांव कोऱ्हाळे येथिल संस्थानच्या मालकीची जमिन गट नं. १८३,१८६, व १७२ ची पहाणी केली. त्यातील गट नं. १८१, व १८६ हा लांब असल्यामुळे त्यांनी ते मान्य केले नाहीत. मात्र गट नंबर १७२ मधील क्षेत्रा पैकी दक्षिणेकडील ३ हेक्टर देण्यात यावे असे सांगितले . गट नं. १७२ ची उत्तर बाजू ही लांब असल्याने त्यांनी दक्षिणेकडील जागेची मागणी केली. तसेच गट नं. १७२ मध्ये जाण्यासाठी गट नं. १७४ मधून रस्ता मिळणे आवश्यक राहील हेही सांगितले. तसेच यापूर्वी दिनांक ३१.०३.२००७ चे व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३०७ अन्वये मौजे निमगाव-कोऱ्हाळे मधील गट नं.८७ व ८८ पैकी हेक्टर १.०६ आर जमीन साईविश्राम प्रकल्पासाठी देण्यात आलेली आहे. ती जमीन सदर प्रकल्पासाठी अत्यंत कमी असून या जागेत साईविश्राम प्रकल्पाचे बांधकाम करणे योग्य होणार नाही. त्यामुळे या जागेऐवजी गट नं.१७२ मधील जमीन देण्यात यावी,अशी विनंती केली.

वरील सर्व बाबींचा विचार करुन श्री. के.व्ही.रमणी, शिर्डी साईबाबा ट्रस्ट यांना भक्तांच्या निवासासाठी साईविश्राम प्रकल्प फेज बी साठी गट नं. १७२ मधील ३ हेक्टर जागा देणे उचित राहील. सदर जागा प्रकल्प शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे सोबत दि. ०४/०२/२००६ रोजी झालेल्या Memorandaom of understanding मधिल अटी व शर्तीनुसार उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच गट.नं. १७२ मध्ये जाणेसाठी मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत,पुणे यांचेकडे गट नं. १७४ मधून संस्थान मालकीच्या गट नं. १७२ मध्ये जाणेसाठी असलेला रस्ता विकसीत करणेसाठी परवानगी मिळणेबाबत प्रस्ताव सादर करणेत यावा असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळचा**
**विषय ३७ माहिती तंत्रज्ञान विभागाकडील तांत्रिक कामकाजासाठी तांत्रिक सल्लागार नेमणेबाबत..**

**निर्णय क्र.४३९.** संस्थानचे संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत विविध विभागांतील संगणके नेटवर्कीगव्दारे एकमेकांशी जोडण्यात आलेली आहे. या संगणकीकरणांच्या प्रकल्पांसाठी वेळोवेळी संगणकीय यंत्रसामुग्री खरेदी करणे, संगणकीय कार्यप्रणाली विकसित करणे आदि कामे पार पाडावी लागतात. ही कामे सुरळीतपणे होण्याच्या दृष्टीने संस्थानमधील संगणकीकरणासंबंधित प्राप्त परिस्थितीची संपूर्ण माहिती असणारे तांत्रिक अर्हता उपलब्ध असलेले मनुष्यबळ संस्थान आस्थापनेकडे कमी आहे. यादृष्टीने संगणकीकरणाचे प्रकल्प व्यवस्थितरित्या कार्यान्वीत व्हावे म्हणून प्रकल्पाची कार्यवाही सुरु असतांना तसेच आवश्यक तेथे तांत्रिक सल्ला-तथा-अभिप्राय तात्काळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने, विशेषतः संगणकीय कार्यप्रणालींचे झपाटयाने होत असलेले अद्यायवतीकरण, बाजारातील उपलब्धता व गुणवत्तेबाबत सखोल ज्ञान असणारा मानद तांत्रिक सल्लागार यांची आवश्यकता आहे. यास अनुसरुन, श्री विजय मंडोरा, Sai InfoSystems (India) Pvt. Ltd, Ahmedabad यांनी संगणक व संगणक प्रणालीबाबतचे प्राथमिक स्वरुपाचे प्रात्यक्षिक मा. व्यवस्थापन समितीपूढे सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, माहिती तंत्रज्ञान विभागामध्ये चालू असलेल्या संगणक सॉफ्टवेअर, नेटवर्कीग, वेबसाईटबाबतचे कामकाजात आवश्यक तेथे सल्ला देणेसाठी तांत्रिक सल्लागार म्हणून श्री विजय मंडोरा Sai InfoSystems (India) Pvt. Ltd, Ahmedabad यांची एक वर्षाच्या कालावधीसाठी कोणत्याही प्रकारचे मानधन न देता तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूकीस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ३८ व्दारावती इमारतीवरील ४ था मजला बांधकाम व धर्मशाळा रस्ता कॉंक्रीटीकरण कामासाठी वाढीव खर्चास मंजुरी मिळणेबाबत...**

**निर्णय क्र.४४०** श्री साईबाबा संस्थान मार्फत स.नं. १४८ मध्ये व्दारावती इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सदर इमारतीचे ग्राउंड अधिक तीन मजल्यांचे आर.सी.सी.काम अंतिम टप्यात आहे. या इमारतीचे ४ थ्या मजल्यावर नव्याने बांधकाम करुन अतिमहत्वाचा व्यक्तींसाठी (VIP) खोल्या बांधणेसाठी रु. ४,३३,४३,०१५/- इतक्या अपेक्षित खर्चास व याकरीता जाहीरात देउन निविदा मागविण्यास व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ चे सभेतील निर्णय क्र. २४७ अवये मान्यता देण्यात आलेली आहे.

सध्याच्या व्दारावती इमारत बांधकामाचे निविदेुसार धर्मशाळेकडे जाणा-या रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे ठरले होते. मुळ निविदेनुसार रस्त्याचे डांबरीकरण व इतर कामांसाठी रु. ७३,९०,७५९/- इतक्या रकमेची तरतूद होती. परंतू आर्किटेक्ट यांनी सदर भागात पावसाचे पाणी साचत असल्यामुळे डांबरीकरण करणे योग्य नसल्याने कॉंक्रीटीकरण करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे.त्यामुळे व्दारावती इमारत बांधकामाचे मुळ निविदेनुसार रस्त्याचे डांबरीकरण काम न करता नविन प्रस्तावानुसार कॉंक्रीटीकरण करणेसाठी रु. ८९,४१,०००/-मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. ४ थ्या मजल्याचे कामाबरोबरच या रस्त्याच्या कामाचा समावेश सदर निविदेत करणे योग्य होईल.

तरी सदर खर्चासह या कामाकरीता सुधारीत एकुण रु. ५,२२,८४,०१५.०० खर्चास व सदरचे कामांकरीता जाहीरात देउन एकत्रीत निविदा मागविणेस मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन रस्त्याचे कॉक्रिटीकरणासाठी रु ८९,४१,०००.०० इतक्या खर्चास व सदरचे काम द्वारावती इमारतीचे चौथ्या मजल्याचे बांधकामाचे निवीदेत समाविष्ट करुन उपरोक्त दोन्ही कामासाठी जाहीरात देऊन एकत्रीत निवीदा मागविण्यात याव्यात असे ठरले. ( कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय क्र.३९ मौजे शिर्डी, तालुका राहाता येथील सर्व्हे नंबर १०७ पैकी एकूण क्षेत्र ०२ हेक्टर ८५ आर ०० चौमी भूसंपादनाबाबत.**

**निर्णय क्र.४४१ (अ)** खाली नमूद केलेल्या खातेदारांच्या जमिनी भूसंपादनाने घेणेबाबत मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०४ मार्च, २००६ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रमांक १०८ अन्वये झालेला आहे. त्याचा तपशील :

| अ.नं. | नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र | त्यापैकी घ्यावयाचे क्षेत्र | क्षेत्र कमी घेण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.विठ्ठल तुकाराम गोंदकर | १०७/६ | ०१ हे ०३ आर | ०० हे ८५ आर | एवढीच जमीन घ्यावयाची आहे. |
| ०२ | श्री.प्रभाकर गोंविद कोते | १०७/१४ | ०० हे ५७ आर<br>०० हे ०४ आर पोख<br>०० हे ६१ आर | ०० हे ५४ आर | ०७ आर जमीन कमी भरते. |
| ०३ | श्री.कैलास गोंविदराव कोते | १०७/११ | ०० हे ६६ आर<br>०० हे ०६ आर पोख<br>०० हे ७२ आर | ०० हे ६६ आर | ०६ आर जमीन कमी भरते. |
| ०४ | सौ.सुमित्रा कैलास कोते | १०७/४<br>१०७/१० | ०० हे ८६ आर | ०० हे ८० आर | ०६ आर जमीन कमी भरते. |
| | | **एकुण-** | | **०२ हे ८५आर** | |

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयांस अनुसरुन, मा.जिल्हाधिकारी, भूसंपादन शाखा, अहमदनगर यांचेकडेस दिनांक २२ मार्च, २००६ रोजी भूसंपादनाचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे दिनांक २८ मार्च, २००६ यांचे पत्रानुसार, कागदपत्रांच्या पूर्ततेसह त्रुटी दूर करुन दिनांक १२ एप्रिल, २००६ रोजी भूसंपादनाचा पूर्न:प्रस्ताव सादर करणेत आला.

मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी दिनांक ०८ मे, २००६ रोजीची भूसंपादन कायदा १८९४ चे कलम ५२ अ खाली मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना भूसंपादन अधिकारी म्हणून प्राधिकृत केले. तद्नंतर मा.तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, कोपरगांव यांनी उपरोक्त जमिनीची संयुक्त मोजणी दिनांक १७ मे,२००६ रोजी पूर्ण केली.

दरम्यानचे कालावधीत, मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपुर यांनी त्यांचे दिनांक १२ मे, २००६ रोजी जमिनीची भूसंपादनाने अंदाजे होणारी रक्कम रुपये ५,७१,७५,७१२/- मात्र होत असून, २/३ (दोन तृतीयांश) रक्कम रुपये ३,८१,१७,१४१/- मात्र रक्कम त्यांचेकडे जमा करणेबाबत कळविलेले होते. त्यानुसार मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांचेकडे दिनांक २५ मे, २००६ रोजी डिमांड ड्राफ्टने रक्कम रुपये ३,८१,१७,१४१/- मात्र जमा केलेले आहेत.

मा.तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांच्या संयुक्त मोजणीपत्रकानुसार भूसंपादन प्रस्तावातील जमिनीचे क्षेत्र कमी भरत असलेबाबत मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी कळविल्याने, दिनांक १५ जून, २००६ मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी दिनांक १५ जून, २००६ रोजीचे पत्राने संस्थान मोजणीनुसार जमीन भूसंपादन करणेस तयार आहे काय याबाबत विचारणा केली व त्यानुसार सुधारीत प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले. त्यानुसार दिनांक २१ जून, २००६ रोजी सुधारीत प्रस्ताव पाठविण्यांत आला.मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी दिनांक १२ जुलै, २००६ रोजी कलम ५२ अ खाली दुरुस्त आदेश पारीत केला.

**(ब)** उपरोक्त परिच्छेद अ मध्ये विवेचन केल्यानुसार, मा. व्यवस्थापन समितीच्या विविध निर्णयानुसार, मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १०७ पैकी मधील श्री. कोते व इतर ३ यांची ०२ हेक्टर ८५ आर जमीन भूसंपादनाच्या माध्यमातून घेणेबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे.

विषयांकित जमिनीचे भूसंपादनासाठी मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी भूसंपादन कायदा १८९४ चे कलम ४ ची अधिसूचना ०३ ऑगष्ट, २००६ रोजी महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात व दिनांक ०४ ऑगष्ट, २००६ रोजी स्थानिक वृतपत्रांमध्ये प्रसिध्द केली. तसेच भूसंपादन कायदा कलम ४(१) अन्वये चौकशीची तारीख दिनांक ०४ सप्टेंबर, २००६ व दिनांक २७ ऑक्टोबर, २००६ ही नेमलेली होती. संबंधीत जमीनमालकांनी दिलेल्या हरकतीवर संस्थान मार्फत दिनांक २१ नोव्हेंबर, २००६ रोजी अभिप्राय-वजा-म्हणणे सादर करण्यात आले.

तसेच विषयांकित जमिनीचे भूसंपादनासाठी मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी भूसंपादन कायदा १८९४ चे कलम ६ ची अधिसूचना मा.अप्पर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी दिनांक १९ डिसेंबर, २००६ रोजीचे महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात व दिनांक १७ जानेवारी, २००७ रोजी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द केली. तद्नंतर भूसंपादन कायदा १८९४ चे कलम ९(१)(२) अन्वये दिनांक १७ एप्रिल, २००७ रोजी चौकशी नेमण्यात आली असलेबाबत मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी कळविले. त्यानुसार संस्थानमार्फत कंत्राटी

सहाय्यक, भूसंपादन कक्ष हे चौकशी कामी हजर होते, मात्र संबंधित जमिनमालकांपैकी कोणी ही चौकशी कामी हजर नव्हते.

**(क)** दरम्यानचे कालावधीत शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नईचे देणगीदार साईभक्त मा.श्री. के.व्ही.रमणी यांनी निवासस्थान प्रकल्पासाठी जमीन त्वरीत उपलब्ध करुन देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीस विनंती केल्याने, मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०६ जानेवारी, २००७ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक ३४ व दिनांक १७ फेब्रुवारी,२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ११३ अन्वये विषयांकित जमीन खरेदीबाबतचा खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे :

**दिनांक ०६ जानेवारी, २००७ रोजी झालेला निर्णय क्रमांक ३४ :**

" उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या अ.नं.०२ नुसार प्रति आर रक्कम रुपये १,७६,०००/- मात्र या दराने सर्व्हे नंबर १०७ पैकीचे एकूण क्षेत्र ०२ हेक्टर ८५ आर ०० चौरस मीटर संबंधीत जमीनमालक देण्यास तयार असल्यास, ही जमीन थेट खरेदी करण्यात यावी. तसेच मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना सदरील जमिनीचा ताबा संस्थानला वर नमुद केलेला विकास प्रकल्प राबविणेकामी लवकरात लवकर मिळण्याच्या दृष्टीने थेट खरेदी करीत असल्यामुळे त्यांचेकडे सुरु असणारे भूसंपादनाचे माध्यमातून कन्सेन्ट आवार्डने जमीन घेणेबाबतचे प्रकरण मागे घेण्यात येत असल्याबाबत कळविण्यात यावे. भूसंपादन प्रकरण मागे घेतल्यामुळे, रद्द करावे लागल्याने आतापर्यन्त शासनामार्फत करण्यात आलेल्या भूसंपादन कार्यवाहीपोटी शासन नियमानुसार ०३ टक्के आस्थापना शुल्क भरणेत यावे तसेच भूसंपादन कार्यवाहीसाठी भरणेत आलेली दोन तृतीयांश रक्कम परत घेणेबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी. उपरोक्त सर्व्हे नंबर १०७ पैकी मधील जमीन थेट खरेदी करणेकामी आवश्यक असणाऱ्या कायदेशीर बाबी पूर्ण करणेसाठी येणाऱ्या आवश्यक सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात येत आहे. "

**याऐवजी**

**दिनांक १७ फेब्रुवारी, २००७ रोजी झालेला निर्णय ११३ :**

" आजचे सभेपूढे श्री कैलास गोविंदराव कोते व इतर यांनी असे नमूद केले की सर्व्हे नं. १०७ मधील एकूण २ हेक्टर ८५ आर जमीनीकरीता रुपये १६००/- प्रति चौ.मी. अधिक १०% असा दर संस्थानने आम्हाला देऊ केला आहे.सदरचा दर आजच्या बाजार भावाचा विचार करता फारच कमी आहे. संस्थानच्या साई आश्रम प्रकल्पासाठी आमची जमीन देण्यास हरकत नाही मात्र आम्हास योग्य किंमत मिळणे आवश्यक आहे. आमची जमिन ही सर्व्हे नं. १०८ मधील श्री बच्छानी यांचे जमिनी लगत आहे. त्यामूळे त्यांना देण्यात येणाऱ्या रेडीरेकनरचा दर रुपये २७००/- प्रति चौ.मि. अधिक १०% याप्रमाणे मिळावा अशी विनंती केली.

त्यांचे विनंतीबाबत चर्चा होऊन साई आश्रम प्रकल्पासाठी जमीनीची आवश्यकता, संस्थान लगतची जमीन या परिसरातील जमीनीच्या किंमती या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन रेडिरेकनरनुसार प्रति चौरस मिटर रुपये १६००/- मात्र याप्रमाणे प्रति आरला रक्कम रुपये १,६०,०००/- अधिक २०% जादा रक्कम नुसार प्रति आर रक्कम रुपये १,९२,०००/- या दराने स.नं. १०७ पैकीचे एकूण क्षेत्र ०२ हेक्टर ८५ आर क्षेत्र संबंधित जमिन मालकांकडून थेट खरेदी करण्यात यावी. तसेच मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना सदरील जमिनीचा ताबा संस्थानला वर नमुद केलेला विकास प्रकल्प राबविणेकामी लवकरात लवकर मिळण्याच्या दृष्टीने थेट खरेदी करीत असल्यामुळे त्यांचेकडे सुरु असणारे भूसंपादनाचे माध्यमातून कन्सेन्ट आवार्डने जमीन घेणेबाबतचे प्रकरण मागे घेण्यात येत असल्याबाबत कळविण्यात यावे. भूसंपादन प्रकरण मागे घेतल्यामुळे, रद्द करावे लागल्याने आतापर्यन्त शासनामार्फत करण्यात आलेल्या भूसंपादन कार्यवाहीपोटी शासन नियमानुसार ०३ टक्के आस्थापना शुल्क भरणेत यावे तसेच भूसंपादन कार्यवाहीसाठी भरणेत आलेली दोन तृतीयांश रक्कम परत घेणेबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी. उपरोक्त सर्व्हे नंबर १०७ पैकी मधील जमीन थेट खरेदी करणेकामी आवश्यक असणाऱ्या कायदेशीर बाबी पूर्ण करणेसाठी येणाऱ्या आवश्यक सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात येत आहे. "

मा. व्यवस्थापन समितीच्या उपरोक्त निर्णयांनुसार सर्व्हे नंबर १०७ पैकी मधील संबंधीत जमीनमालकांना इकडील पत्र क्रमांक १०७१/२००७, दिनांक ०७ मे, २००७ रोजी, मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयांस अनुसरुन रुपये १,९२,०००/- मात्र प्रति आर या दराने जमीन खरेदी देण्यांस तयार आहांत, अशा आशयाचे लेखी संमतीपत्र देणेबाबत विनंती करण्यात आली.

**(ड)** उपरोक्त परिच्छेद अ मधील सर्व जमीनमालकांनी त्यांचेकडील दिनांक ०८ मे, २००७ रोजीचे पत्रान्वये इकडील कार्यालयास खालीलप्रमाणे कळविलेले आहे :

मी शिर्डीतील रहिवाशी असून श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे नियोजित प्रकल्पासाठी जागा देण्याचे कबूल केले होते. परंतु काही तांत्रीक अडचणी वेळोवेळी निर्माण होत गेल्याने जमिनीचा व्यवहार त्यामुळे लांबणीवर गेला.

तरी सर्व्हे नंबर १०७ मधील जमीनीस श्री साईबाबा संस्थानकडून रुपये ०१ कोटी २५ लाख प्रती एकर असा भाव अपेक्षीत आहे. वरीलप्रमाणे व्यवहार केल्यास मी संमती देण्यास तयार आहे अन्यथा मला श्री साईबाबा संस्थान यांना जमीन द्यावयाची नाही. "

श्री.विठ्ठल तुकाराम गोंदकर,श्री.प्रभाकर गोविंदराव कोते,श्री.कैलास गोविंदराव कोते व सौ.सुंमित्रा कैलास कोते या चारही खातेदारांनी दिनांक ८ मे,२००७ रोजीच्या स्वतंत्र पत्रान्वये रुपये १ कोटी २५ लाख मात्र प्रती एकर भाव मिळावा अशी विनंती केलेली आहे.

वरील संबंधीत ०४ ही जमीनमालकांनी त्यांचे पत्रान्वये, मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १०७ पैकी मधील आप-आपले मालकीचे जमिनीचा व्यवहार अपेक्षित किंमत मिळत नसेलतर करावयाचा नाही, असे स्पष्टपणे कळविलेले आहे. जमीनमालकांनी सर्व्हे नंबर १०७ पैकी मधील जमिनीची किंमत प्रति एकर रक्कम रुपये १,२५,००,०००/- मात्र (अक्षरी रुपये एक कोटी पंचवीस लाख मात्र) मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. म्हणजेच जमिनमालकांना प्रति आर रक्कम रुपये ३,१२,५००/- (अक्षरी रुपये तीन लाख बारा हजार पाचशे मात्र) अशी जमिनीची किंमत हवाी आहे. मात्र मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६ जानेवारी, २००७ व दिनांक १७ फेब्रुवारी, २००७ रोजीचे निर्णयाप्रमाणे उपरोक्त सर्व्हे नंबर १०७ मधील संबंधीत जमीनमालकाच्या जमिनीची किंमत प्रति आर रुपये १,९२,०००/- मात्र निश्चित करण्यात आलेली आहे. अशा परिस्थितीत जमिनमालकांच्या मागणीप्रमाणे जमिनीचा दर देऊन जमीन खरेदी करणे किंवा भूसंपादन कार्यवाही सुरु ठेवण्यात यावी किंवा कसे याबाबत निर्णय होणेस विनंती तसेच जमीनमालकांच्या मागणीप्रमाणे किंमत देऊन जमीन खरेदी करण्याचे ठरले अथवा भूसंपादनाची कार्यवाही रद्द करणेचे ठरले तरी, भूसंपादन कार्यवाहीपोटी ०३ टक्के आस्थापना व इतर खर्च शासनाकडे भरावाच लागणार आहे.

तरी उपरोक्त सर्व्हे नंबर १०७ पैकी मधील श्री.कोते व इतर ३ यांची जमीन भूसंपादनाच्या माध्यमातून घेणेबाबत अथवा खरेदी करणेबाबत प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर केला होता. त्यावर साधकबाधक चर्चा होऊन, श्री.विठ्ठल तुकाराम गोंदकर, श्री.प्रभाकर गोविंदराव कोते, श्री.कैलास गोविंदराव कोते, सौ.सुमित्रा कैलास कोते यांचेपैकी जे खातेदार सर्व्हे नंबर १०७ पैकी मधील आप-आपले मालकीची जमीन दिनांक ०६ जानेवारी, २००७ व दिनांक १७ फेब्रुवारी, २००७ रोजीच्या सभेत ठरल्यानुसार, रक्कम रुपये १,९२,०००/- मात्र प्रती आर या दराने द्यावयास तयार असतील तर ती थेट खरेदी करण्यांत यावी. अशा खातेदारांचा भूसंपादनाचा प्रस्ताव वगळणेबाबत कार्यवाही करण्यात येऊन, त्यांची आस्थापना खर्चाची रक्कम संस्थानमार्फत भरण्यात यावी. तसेच जमीन खरेदी करणेकामी आवश्यक तो सर्वसमावेशक खर्च संस्थानमार्फत करण्यात यावा.

मात्र, उपरोक्त ०४ खातेदारांपैकी जे खातेदार आप-आपली जमीन रक्कम रुपये १,९२,०००/- मात्र प्रती आर या दराने द्यावयास तयार नाहीत किंवा तयार नसतील अशा संबंधीत खातेदारांकडून आतापर्यन्तच्या भूसंपादनाच्या कार्यवाहीपोटी झालेला आस्थापना खर्च भरुन घेऊन त्यांच्या जमिनीचा भूसंपादनाचा प्रस्ताव वगळण्यात यावा. याकामी मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडून प्रत्येक खातेदाराचा स्वतंत्र आस्थापना खर्च किती येईल, याची तपशीलवार माहिती मागविण्यांत यावी. अशी माहिती प्राप्त झालेनंतर, उपरोक्त ०४ खातेदारांपैकी जे खातेदार भूसंपादनाचा प्रस्ताव वगळणेसाठी आप-आपल्या हिश्श्याची आस्थापना खर्चाची रक्कम संस्थानकडे जमा करतील, अशा खातेदारांचाच भूसंपादनाचा प्रस्ताव वगळणेबाबत कार्यवाही करण्यात यावी, असे ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय क्र.४०** **महारोगी सेवा समिती आनंदवन, ता.वरोरा,जिल्हा चंद्रपुर यांना मंजुर केलेल्या निधीबाबत..**

**निर्णय क्र.४४२** श्री कौस्तुभ विकास आमटे,सहा.सचिव महारोगी सेवा समिती आदनंदवन,ता.वरोरा, जि.चंद्रपुर, यांनी त्यांचे दि.०३/०१/२००७ चे पत्रान्वये , चेतना अभियान व आनंदवन प्रकल्पासाठी आर्थिक मदत मिळणेस विनंती केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ चे सभेतील निर्णय क्र.१७५ अन्वये, चेतना अभियान व आनंदवन प्रकल्पासाठी एकत्रित रुपये एक कोटी आर्थिक सहाय्य देण्यास मान्यता दिलेली आहे.

इकडील जा.नं.वशी-३/४५७२/२००७,दि.२०/०३/२००७ अन्वये प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी पाठविलेला आहे. शासनाने त्यांचे दि.०३ मे २००७ चे पत्रान्वये महारोगी सेवा समिती वरोरा यांच्या योजनेचा तपशिल / आराखडा शासनास सादर करावा, असे निर्देश दिलेले आहे.

श्री.कौस्तुभ आमटे,सचिव,महारोगी सेवा समिती वरोरा यांनी, त्यांचे दि.९ मे २००७ चे पत्राने "सुधारीत प्रस्ताव सादर केलेला असुन त्यानुसार मंजुर केलेला निधी महारोगी सेवा समिती आनंदवन,वरोरा यांचे म ार्फत महारोग्यांचे पुनर्वसन व कल्याणार्थ राबविण्यात येणा-या विविध उपक्रमातील शेती,पाणीपुरवठा,पेशंटची वहातूक,तसेच महारोग्यांच्या कल्याणार्थ विविध प्रकारची वाहने व इतर साहित्य खरेदी करीता मिळावा,"अशी विनंती केलेली आहे.

तरी दि.१७/०२/२००७ चे सभेतील निर्णय क्र.१७५ अन्वये, चेतना अभियान व आनंदवन प्रकल्पासाठी एकत्रित रुपये एक कोटी मंजुर केलेला निधी महारोग्यांचे पुनर्वसन व कल्याणार्थ राबविण्यात येणा-या विविध उपक्रमातील शेती, पाणीपुरवठा,पेशंटची वहातूक,तसेच महारोग्यांच्या कल्याणार्थ विविध प्रकारची वाहने व इतर साहित्य खरेदी करीता, देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-६)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४१ मा.विश्वस्तांचे सुचनांबाबत**

**निर्णय क्र.४४३** मा.विश्वस्तांनी खालीलप्रमाणे सुचना मांडल्या.

अ) श्री साईबाबा संस्थानमार्फत प्रकाशित होणारे साईलिला मासिक शिर्डी येथून प्रकाशित करणेबाबत श्री मोहन जगन्नाथ यादव, जनसंपर्क अधिकारी यांचेवर सोपविण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

ब) सध्या उन्हाळ्याची तिव्रता अधिक असल्याने श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांना स्वच्छ व थंड पाणी मिळावे यासाठी संस्थानमार्फत वॉटर कूलर खरेदी करुन ते संस्थान परिसर,प्रसादालय, नगर-मनमाड रस्त्यावर ज्या ठिकाणी पाणपोईची व्यवस्था करण्यात आलेली आहे त्या ठिकाणी सदरहू वॉटर कुलर बसविण्यात यावे.

(कार्यवाही-अधिक्षक,चौकशी व निवास्थान विभाग/विद्युत विभागप्रमुख)

क) समाधी मंदिरात व्ही.आय.पी. दर्शन व आरती व्यवस्थेबाबत मा.विश्वस्त कृष्णचंद्र श्यामसुंदर पांण्ड्ये यांनी पहाणी करुन सुचना द्याव्यात. (कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख/अधिक्षक, मंदिर विभाग)

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

वरील निर्णय क्र.३३९ ते ४४३ सर्वानुमते घेण्यात आले.

स्वाक्षरीत/-
(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी